काळे हरिहर दिनकर

॥ श्रीनानामहाराज साखरे प्रासादिक ॥

सार्थ
श्रीएकनाथी भागवत

भाषांतरकार

शास्त्रसुधाकर विष्णुशास्त्री बापट

संपादक

काशिनाथ अनंत जोशी

श्रीसंतवाङ्मय प्रकाशन मंदिर

१००६ सदाशिव पेठ, पेरुगेटजवळ, पुणे २.

किंमत ४० रुपये

प्रकाशक :

रमेश शंकर आवटे
१२२५।८ शिवाजीनगर,
पुणें ५.

पहिली आवृत्ति १९२७
दुसरी आवृत्ति १९६६

मुद्रक :

रामचंद्र शंकर जोरी
इंदिरा प्रिंटिंग प्रेस,
१००५ सदाशिव पेठ, पुणें २.

प्रस्तावना

श्रीषड्गुणैश्वर्यसंपन्न पांडुरंगाच्या कृपेनें संकलित सार्थ श्रीएकनाथी भागवत वाचकांच्या हातीं देतांना आम्हांला आज परमानंद होत आहे. जवळ जवळ चाळीस वर्षांच्या दीर्घ कालावधीनंतर हा भागवतधर्माचा परमादरणीय ग्रंथराज प्रसिद्ध करण्याचें भाग्य आम्हांला लाभलें यांतच श्रमसाफल्य झालें आहे.

सध्याच्या भौतिक वातावरणांत, विज्ञानाच्या झगमगाटांत सनातन मानवी जीवनाची सातत्यानें पायमल्ली होत आहे. त्यामुळें सामान्य माणूस आज ध्येयशून्य, निराश, हताश आणि किंकर्तव्यमूढ झाला आहे. भौतिक विज्ञानाची अतिरिक्त हांव धरल्यानें व साथीसाथ युगायुगांच्या श्रद्धेनें जोपासलेल्या भारतीयांच्या आध्यात्मिक, सांस्कृतिक व धार्मिक अशा अमर जीवनमूल्यांकडे आम्ही पूर्णत: डोळेझांक केल्यानें आम्हां भारतीयांचें जीवनच खुरटल्यासारखें अशांत, अस्थिर होऊन त्यांत एक असीम अशी पोकळी निर्माण झाली आहे. दिवसेंदिवस माणूस आज माणुसकीलाच पारखा होत चालला आहे. अशा अत्यंत प्रतिकूल व अश्रद्ध वातावरणांत जीवनांत निरामय शांतता, श्रद्धा, प्रेम व परस्पर स्नेहभाव निर्माण होण्यासाठी संतवाङ्मयाची कांस धरणें हें अत्यधिक महत्त्वाचें आहे. आणि आमची अशी नितांत श्रद्धा असल्यामुळेंच आम्ही हें महत्कार्य हातीं घेतलें. "सत्य संकल्पाचा दाता भगवान" या संतवचनाप्रमाणें हें सत्कार्य त्याच्याच कृपेमुळें आज पूर्ण होत आहे.

इ. स. १९२७ सालीं आमचे आजोबा कै. त्र्यंबक हरि आवटे यांनीं अविश्रांत श्रम घेऊन सार्थ श्रीएकनाथी भागवताची पहिली आवृत्ति प्रसिद्ध केली. त्यानंतर गेल्या चाळीस वर्षांत या ग्रंथाला सतत मागणी असूनहि या ग्रंथाची दुसरी आवृत्ति निघूं शकली नाहीं.

आमचे आजोबा कै. आवटे हे भागवतधर्माचे व ब्रह्मीभूत श्रीनानामहाराज साखरे यांचे निष्ठावंत उपासक होते. अध्यात्मविषयक ग्रंथ व संतवाङ्मय प्रकाशित करण्यासाठीं त्यांनीं इ. स. १८९५ सालीं इंदिरा छापखाना स्थापन केला आणि अत्यंत चिकाटीनें सतत ३६ वर्षेपर्यंत त्यांनीं या छापखान्यांतून ह. भ. प. विनायक बुवा साखरे यांचे व ब्र. श्रीनानामहाराज साखरेप्रणित वारकरी प्रस्थानत्रयीची अर्थात् ज्ञानेश्वरी, भागवत, सकलसंतगाथा वगैरे अनेक संतश्रेष्ठांचे व इतरहि ग्रंथकारांचे सुमारे ९०० ग्रंथ प्रकाशित केले. अध्यात्माची अभिजात आवड, संतग्रंथांचें श्रद्धायुक्त परिशीलन व ब्र. श्रीनानामहाराज साखरे यांच्यासारख्या संतश्रेष्ठांचा सहवास यामुळेंच आमच्या आजोबांच्या हातून संत-ग्रंथ प्रकाशनाचें महत्कार्य पार पडलें. त्या काळांत त्यांनीं भागवतधर्माचा प्रचार आणि प्रसार करण्यासाठीं आपलें सर्व आयुष्य वेचलें. तोच त्यांचा निदिध्यास होता. तेंच त्यांचे जीवनकार्य होतें.

सर्वसमावेशक व भक्तिप्रधान भागवतधर्माचा कळकळीनें व तळमळीनें पुरस्कार करण्यासाठीं ब्र. श्रीनानामहाराज साखरे यांनीं आमच्या आजोबांना स्वहस्ते सार्थ

ज्ञानेश्वरी, सार्थ श्रीएकनाथी भागवत व सकलसंतगाथा प्रसाद म्हणून दिली. शेजारच्या पानावर दिलेला फोटो सार्थ श्रीएकनाथी भागवताच्या प्रासादिक पोथीच्या पहिल्या पानाचा आहे. ब्र. श्रीनानामहाराज साखरे यांनी दिलेला हा प्रसाद सार्थ श्रीएकनाथी भागवताच्या ग्राहकांस आम्ही आज देत आहोत.

आमचे आजोबा कै आवटे यांच्या वृद्धापकाळांत त्यांच्याकडून पूर्वीसारखे काम होईना. परंतु जीवनभरचा ध्यास त्यांना स्वस्थ बसू देईना. त्यांचे इंदिरा छापखाना व संतग्रंथ प्रकाशन यांच्यावर असलेले अपूर्व प्रेम व ब्र. श्रीनानामहाराज साखरे यांजवर असलेली भक्ति व संतग्रंथवचनांवर असलेली श्रद्धा ही पूर्वीइतकीच दृढ होती. म्हणूनच ब्र. श्रीनानामहाराज साखरे स्मारक म्हणून (१) श्रीसंतग्रंथ पारायण मंदिर, (२) श्री इंदिरा मुद्रण मंदिर, व (३) श्रीसंतवाङमयप्रकाशन मंदिर ही परस्परांस साह्यकारी होणारी त्रिवेणी संगमत्रयी आपल्या पश्चात् कोणीहि निष्ठावंतानें चालवून भागवत धर्माच्या प्रसाराचे हे सत्कार्य व ही आपली वारकरी परंपरा पुढें चालवावी, अशी आपली अखेरची इच्छा त्यांनी, आपल्या मृत्युपत्राला जोडलेल्या अखेरच्या निवेदनांत, अत्यंत कळकळीनें व्यक्त केली आहे.

वर उद्धृत केलेल्या आमच्या आजोबांच्या अखेरच्या इच्छेला अनुसरूनच आम्ही हें सार्थ श्रीएकनाथी भागवत प्रसिद्ध करण्याचे ठरविलें. त्यांच्या कृपेमुळेंच व सर्व संतप्रेमी भक्तभाविकांनी आमच्या या उपक्रमाला सर्वंकष पाठिंबा दर्शविल्यामुळेंच आज हा प्रासादिक ग्रंथ प्रसिद्ध होत आहे. सटीप ज्ञानेश्वरी व सकलसंतगाथा हे दोन प्रासादिक ग्रंथहि प्रकाशित करण्याचा आमचा मानस आहे. भक्तिभक्त श्रीपांडुरंगाच्या कृपेमुळेंच हेंहि सत्कार्य आमच्या हातून यशस्वीरीत्या पार पडेल अशी अशा आहे. सार्थ श्रीएकनाथी भागवत प्रकाशित करताना आमच्या सर्व इष्टमित्रांनी आम्हांला सक्रीय व सहानुभावानें साहाय्य केलें म्हणूनच हा ग्रंथ आज प्रकाशित होत आहे. आमच्या या सर्व इष्टमित्रांचे इहपर कल्याण व्हावें अशी त्या विश्वसंचालक, विश्वेश्वर श्रीपांडुरंगचरणीं नम्र प्रार्थना !

प्रकाशक
रमेश शंकर आवटे

निवेदन

गेल्या वर्षीं दिवाळींत भाऊबीजेला मी आणि एकनाथी भागवताचे हक्क ज्यांच्याकडे आहेत ते श्री. दादा आवटे असे पंढरपुराला गेलों होतों. दर्शन घेऊन गरुडपाराशी जरा बसलों असतां दादा दुसऱ्या एका प्रकाशकाला सांगत होते "आमचं नाथ भागवत तुम्ही काढा. बरेच वर्षे ते मिळत नाहीं." त्या वेळीं एकदम मला काय वाटलें, कोणाला ठाऊक; पण मीं एकदम म्हटलं "दादा, मीच काढतों एकनाथी भागवत" वास्तविक त्यापूर्वी जवळजवळ तीनचार वर्षे दादा मला एकनाथी भागवत काढण्याबद्दल नेहमीं आग्रह करीत होते. पण दर वेळेला हिशोब करून हें काम आपल्याला झेंपणार नाहीं म्हणून मी त्यांना नकार देत असे. कसाही हिशोब केला तरी हें काम झेंपणार नाहीं असेंच मला वाटत होतें. पण या वेळेला काय प्रेरणा झाली, काय योगायोग होता, कळत नाहीं, पण एकनाथी भागवत काढतों असंच मी एकदम बोलून गेलों. आणि आश्चर्य असं कीं, मी ज्यांना ज्यांना ही योजना सांगितली त्यांनीं नकार तर दिलाच नाहीं, पण सक्रीय मदत करण्याचींच आश्वासनें दिलीं. नेहमीं एकमेकाविरुद्ध बोलणाऱ्या लोकांचेहि याबाबतींत अगदीं एकमत झालें. हें काम तसं खरोखरच अवघड आणि कष्टदायक होतं. पण प्रत्येक गोष्ट सहज सहज नाहीं म्हटलं तरी उलगडत गेली. नाथमहाराजांनीं हे काम माझ्याकडून करवूनच घ्यायचं असं ठरविलेलं दिसत होतं. एवढ्या मोठ्या कामांत अडचणी येतातच. पण वेळ आली तेव्हां त्यांचं निवारण सहजासहजीं होऊन गेलं. प्रत्येक गोष्ट होउन गेली. योगायोग म्हणा, प्रेरणा म्हणा, कांहीं म्हणा पण काम होत गेलं हें खरं. मोठ्या प्रयत्नांनीं, कष्टांनीं होणारीं कामें अगदीं सहजासहजीं होऊन गेली. हें पुस्तक खरोखरंच तयार झालें हें कांहीं वेळेला मला खरेंच वाटत नाहीं. नाथमहाराजांनीं तरी एवढं प्रेम कां केलं समजत नाहीं. प्रेमोद्भव कशाकरतां हें आकलन होत नाहीं. असो.

नाथमहाराजांच्या वेळच्या दोन गोष्टी अजूनहि पैठणला आहेत. एक म्हणजे ते नेहमीं ज्या पांडुरंगाची पूजा करित असत तो विजयी पांडुरंग. कर्नाटकच्या एका सावकाराला दृष्टांत झाल्यामुळें ही मूर्ति त्यानें नाथांना आणून दिली. तेव्हां आपल्या हातून देवाला रोज नैवेद्य दिला जाईल कीं नाहीं याची त्यांना काळजी पडली. पांडुरंगानें लगेच उत्तर दिलें. मूर्तीच्या खालच्या विटेवर 'दास जेऊं घाल न' अशीं अक्षरें उमटलीं. तीं अक्षरें आजहि पाहावयास मिळतात. हा विजयी पांडुरंग नेहमीं गाभाऱ्यांत मध्यभागीं उंचावर सर्व पोशाखांत असतो. प्रत्येक एकादशीला खालीं काढून त्याला अभिषेक करतात. त्यानें लोण्याचा गोळा नाथांजवळून खाल्ला, त्याची खूण म्हणून त्याचा उजवा हात उताणा ठेवलेला आहे. त्याच्यावर अजून ओशटपणा दिसतो. मूर्तीवर अभिषेक करतांना ओशटपणामुळें पाणी येथून जात नाहीं, बाजूनें जातें.

दुसरी गोष्ट म्हणजे नाथांच्या वाड्यांतील श्रीखंड्याचा रांजण. हा रांजण आंत तळघर असतें तसा केलेला आहे. साधारण दहा फूट लांब रुंद, आणि दोन पुरुष खोल असा हा आहे. आंत एक कोनाडा असून त्यांत दगडाच्या श्रीविठ्ठलरुक्मिणीच्या मूर्ति आहेत. वरचें झांकण २ फूट रुंद व २ फूट लांब असें चौकोनी असून त्याला दोन पाखीं आहेत. फाल्गुन शुद्ध पौर्णिमेला एक मनुष्य आंत उतरून हा रांजण कोरडा करून, अगदी फडक्यानें पुसून घेतो. नंतर त्याला धूप देतात. हे काम दोन दिवस चालतें. आंतील श्रीविठ्ठलरुक्मिणीची पूजा व आरती होते. बीजेच्या दिवशीं (फाल्गुन वद्य द्वितीया) सगळे नाथवंशज जमतात. तेथील संस्थानाधिपतीकडे पाणी आणण्याचें किंवा त्यासारखें काम करणारा गावांत असतो त्याला श्रीखंड्या म्हणून त्या दिवशीं समजतात. मूळ श्रीखंड्या गुर्जर देशांतल्या ब्राह्मणाच्या रूपांत आला होता. म्हणून हा गुजराथी पाणक्या असतो. त्या दिवशीं त्याला देव समजतात. प्रथम रांजणाची पूजा होते. नंतर या श्रीखंड्याची पूजा होते. त्यानें सोवळ्यांत कावड भरून आणलेली असते. त्यांतील एक घागर नाथ वंशजापैकीं कोणीतरी सुवासिनी प्रथम आंत टाकते. नंतर बाकीचे टाकतात. नंतर त्या श्रीखंड्याचें काम कावडी आणून रांजणांत टाकावयाच्या हें असतें. रांजण भरेपर्यंत तो एकसारखा कावडीनें पाणी भरत असतो. इतरहि लोक कावडी भरून आणून टाकतात. देवानें ज्या रांजणांत पाणी भरलें त्यांत आपणहि पाणी टाकावें अशी प्रत्येकाची इच्छा असते. पाणी सोवळ्यानेंच टाकावयाचें असतें. रांजणाच्या झांकणाचें एकच पाखें उघडलेलें असतें व त्यावर एक फडकें टाकलेलें असतें, त्यामुळें पाणी गाळून आंत जातें. द्वितीयेपासून षष्ठीपर्यंत केव्हांतरी रांजण भरतो. घागरी आंत ओतत असतांना एकदम पाणी वर येऊन वाहूं लागलें कीं, रांजण भरला असें समजतात. केव्हां चतुर्थीलाहि रांजण भरतो. पण साधारण षष्ठीला रांजण भरतोच. देवाची कावड आंत पडली कीं रांजण भरतो अशी समजूत आहे. फाल्गुन वद्य षष्ठीला नाथांची पुण्यतिथि असते तेव्हां याच रांजणांतलें पाणी स्वयंपाकाला व पिण्याकरतां वापरतात. त्या वेळीं श्रीखंड्या समजलेल्या पाणक्यास मुख्य लोकांच्या पंक्तींत भोजनास बसवितात. गोकुळ अष्टमी वगैरे उत्सवांत मग या रांजणांतलें पाणी वापरतात.

पाणी दोरीनें पोहरा सोडून काढून घेतात. गोदावरीचें पाणी खराब झालें तर या रांजणांतलें पिण्याकरतां वापरतात. एरवीं रोज वापरत नाहींत. तीर्थ म्हणून हें पाणी रांजणांतून केव्हांहि काढून देतात. मात्र वर्षभर हें पाणी बिलकूल खराब होत नाहीं.

श्रीएकनाथी भागवताच्या प्रतींत निरनिराळे पाठभेद कांहीं कांहीं ठिकाणीं आढळतात. त्यामुळें अर्थामध्यें फारसा फरक होत नाहीं, ते पाठभेद खास चिकित्सक आवृत्तींत देणें योग्य आहे. शिवाय ही आवृत्ति खास श्रीनानामहाराज साखरे प्रासादिक अशी असल्यामुळें त्यांत कोठेंहि बदल केलेला नाहीं. श्री. कामत यांनीं जी एकनाथी भागवताची आवृत्ति संपादित केली आहे त्यांत दिलेले पाठभेद जेथें अर्थ बदलतात तेवढे खालीं देत आहे.

अध्याय ४ ओवी ८६. अग्या निजतेजसत्ता । अग्नितेज प्राशूं जातां । तोंड जळे चवी चाखितां । तेवीं कामिनीकामता नारायणदृष्टि ॥ अशी आहे. त्याचा अर्थ असा होतो कीं, अग्यासर्प आपल्या सामर्थ्याच्या बळावर अग्नीचें तेज गिळावयास गेला तर चव घेतांनाच तोंड जळावयाचें; त्याप्रमाणें नारायणाच्या दृष्टीनें त्या स्त्रियांच्या कामिकेतची गत झाली. अग्या सर्प अतिशय विषारी असतो व पैठणच्या बाजूस जंगलांत सांपडतो असें म्हणतात. याऐवजीं बाकी पोर्थीत पहिला चरण अंगीं निजतेजसत्ता असा आहे. याचा अर्थ आपल्या अंगच्या सामर्थ्याच्या बळावर अग्नितेज गिळावयास...असा होतो.

अध्याय ३ ओवी १९६. दश इंद्रियांचा गोंदळा । राजसाभिमानीं रिघाला । चितचतुष्टयाचा मेळा । तोही प्रवेशला सात्विकाभिमानीं ॥ असा कामतांचा पाठ आहे. याचा अर्थ दशेंद्रियांचा समुदाय राजस अहंकारांत शिरतो आणि चित्तचतुष्टयांचा मेळा असतो तो सात्विक अहंकारांत प्रवेश करतो. याच्या ऐवजीं इतर प्रतींत पहिला चरण दश इंद्रियांच्या गोंधळा, असा आहे. याचा अर्थ दहा इंद्रियांचा गोंधळ राजस अभिमानांत असा होईल. त्याऐवजीं गोंदळा म्हणजे समुदाय असा बरोबर वाटतो.

अध्याय ५ ओवी १७४ जेवीं दाटिलेंनि काविळें । दृष्टीतें करी पिवळें । मग देखों लागे सकळें । आचूडमूळें पीतवर्ण ॥ याचा अर्थ ज्याप्रमाणें कावीळ झाली म्हणजे ती दृष्टीच पिवळी करून सोडते मग नखशिखांत सर्व पिवळेंच दिसूं लागतें. इतर प्रतींत शेवटचा चरण, असतां निर्मळ पीतवर्ण । असा आहे त्यामुळें त्याचा अर्थ स्वच्छ असतांना पिवळें दिसतें असा होतो.

अध्याय ९ ओवी १६८. कां अंगींचेनि माजें । रानसोरु न मानी दुजें । तैसा बळाचेनि फुंजें । स्वयें गर्जे मुसमुसितु ॥ याचा अर्थ किंवा अंगच्या बलोन्मादानें रानडुक्कर जसा दुसऱ्या कोणालाहि जुमानीत नाहीं त्याप्रमाणें बलगर्वानें बड-बडत राहून सदा मुसमुसत असतो. याच्या ऐवजीं बाकीच्या प्रतींत दुसरा चरण, रणशूर न मानी दूजें, असा आहे. त्यामुळें त्याचा अर्थ अंगच्या बलोन्मदानें रणशूर जसा...असा होतो. या ओवीच्या वरील ओव्यांत सर्व दृष्टांत हीन स्वभाव दर्शविणारे आहेत. पण 'रणशूर' हा हीन स्वभावाचा दृष्टांत नाहीं.

अध्याय २० ओवी २५०. त्यजोनियां सकळ भोग । यमनियमेंसी योगमार्ग । आसनस्थ होऊनि चांग । दे मुद्रा साङ्ग आधारीं ॥ याचा अर्थ 'सारे विषयभोग टाकून देऊन यमनियमांसह योगमार्गाचा आश्रय करावा. चांगल्या रीतीनें आसनावर बसून 'मूलाधार' चक्रावर लक्ष ठेवून मुद्रा साधावी. याच्या ऐवजीं इतर प्रतींत चवथा चरण, मुद्रा साङ्ग अवधारीं, असा आहे. त्यामुळें अर्थ.......योगमार्ग कसा साधावा तें ऐक असा होतो.

अध्याय ३१ ओवी २३२. बळरामाचिया पत्नी । रेवत्यादि मुख्य करूनी । स्वपतीचा देह मनीं धरूनी । प्रवेशल्या अग्नीं तद्ध्यानयुक्त ॥ याचा अर्थ रेवती प्रमुख बळरामाच्या स्त्रियांनीं आपल्या पतीचा देह मनांत धरून, त्याचें ध्यान करीत अग्नींत प्रवेश केला. इतर प्रतींत तिसरा चरण, स्वपतीचा देह धरूनी । असा आहे. त्यामुळें त्याचा अर्थ 'पतीच्या देहाबरोबर अग्निप्रवेश केला असा दिला आहे. पण त्याच्या वरच्या २२४ व २२६ व्या ओवींत बलराम आणि कृष्ण यांचे देह रणांगणांत दिसले नाहींत असें वर्णन आहे. मग देहाबरोबर अग्निप्रवेश कसा करणार? म्हणून स्वपतीचा देह मनीं धरूनी । असें बरोबर दिसतें. शिवाय चवथ्या चरणांतील 'तद्ध्यानयुक्त' याचाहि अर्थ लागतो.

अध्याय ३१ ओवी ३८२. केशिरा कंसाचा घोडा । कृष्णें मारूनि तारिला फुडा । मल्ल मर्दूनि मालखडां । मोक्षाचा उघडा सुकाळ केला ॥ याचा अर्थ, कृष्णानें कंसाचा घोडा केशी याला मारून त्याला तारलें. आखाड्यांत मल्लांचा संहार करून मोक्षाचा उघडा सुकाळ करून ठेवला, असा आहे. याऐवजीं इतर प्रतींत तिसरा चरण मल्ल मर्दुनि मालखंडा । असें आहे. याचा अर्थ 'मालखंड मल्लाला मारून,...असा होतो. पण श्रीमद्भागवतांत अगर हरिविजय ग्रंथांत मालखंड नांवाचा मल्ल अगर दैत्य कुठेंच नाहीं. त्यामुळें मालखडां म्हणजे आखाड्यांत असा अर्थ बरोबर लागतो.

अध्याय ३१ ओवी ४७२. ये कथेच्या विचित्र लीला । जें नित्य घालिती रंगमाळा । ते नागवती कळिकाळा । सदा त्यांजवळा श्रीकृष्ण ॥ याचा अर्थ, ' जे ह्या कथेच्या विचित्र लीलांच्या रांगोळ्या ह्या तुलसीवृंदावनासमोर नित्य घालतील ते कळिकाळालाहि जिंकतील व त्यांच्याजवळ सदासर्वदा श्रीकृष्ण उभा राहिला असा आहे. इतर प्रतींत दुसरा चरण, जे नित्य घालती रंगमाळा गळां । असा आहे. म्हणजे या ओवीचा अर्थ, ' ह्या कथेची अशी विचित्र लीला आहे. जें आपल्या गळ्यांत नित्य रंगमाळा घालतात. ते ..असा कांहींतरी होतो.

अध्याय १ ओवी १५६. मग श्रीव्यासें आपण । भागवत दशलक्षण । शुकास उपदेशिलें जाण । निजबोधें पूर्ण सार्थक ॥ याचा अर्थ, ' त्यानंतर स्वतः श्रीव्यासांनीं दशलक्षण भागवताचा शुकाला उपदेश करून आपल्या आत्मबोधाचें पूर्ण सार्थक केलें, असा आहे. इतर प्रतींत दुसरा चरण ' भागवत दशलक्ष प्रमाण ' असा आहे. त्यामुळें त्याचा अर्थ दहा लक्ष भागवताचा...असा होतो. पण श्रीमद्भागवत अठरा हजार श्लोकांचें आहे त्यामुळें हा पाठ बरोबर नसून दशलक्षण अर्थाला बरोबर वाटतो.

शिवाय पैठण येथील नाथाचे वंशज नारायणबुवा गोसावी पालखीवाले यांचेकडील हस्तलिखितांत अध्याय ३१ ओवी ५५१०च्या पुढें इति श्रीभागवते महापुराणे...असे पुरे करून पुढील १२ ओव्यांना १ ते १२ क्रमांक देऊन पुढें सहा ओव्या जास्त आहेत त्या अशा—

" सिद्ध असोनिया जवळी । आप आपणिया विसरलीं । विषयसुखें नागवलीं । जैसे का जाळीं गुंफती मीन ॥ १ ॥ नेणती आत्मनिष्ठा साचार । स्वरूपानुभवें एकाकार ॥ दृष्टीं दाटे प्रेम अपार । जें सुख साचार योगाचें ॥ २ ॥ जेणें रूपें सकळ भासे । अणुमात्रहि तेणें दिसे । विषय नव्हे अनारिसे । चैतन्यरुपसे वर्तत ॥ ३ ॥ पाहों जातां जीवाभीतरी । वेगळें नव्हे तिळभरी । ऐसियासी जो नाहींच करी । असतांचि दुरी पडलेति ॥ ४ ॥ पाहतां दृष्टीं चहूंकडे । तेंचि तंव अखंडित उघडें । प्रत्यक्ष असोनि डोळियापुढें । जीं जडमूढें नेणतीं ॥ ५ ॥ निरंतर दंडायमान । सर्वसाक्षित्वाची खूण । जेणें होय चळणवळण । त्याची खूण विसरले ॥ ६ ॥ "

एकनाथी भागवत हा नाथांचा अत्यंत महत्त्वाचा, सर्वांगसुंदर आणि लोकप्रिय असा ग्रंथ आहे. हा ग्रंथ म्हणजे महाराष्ट्रांतील भागवत धर्माच्या, श्रीज्ञानेश्वरांनीं उभारलेल्या मंदिराचा आधारस्तंभ होय, असें बहिणाबाईनीं एका अभंगांत म्हटलें आहे म्हणूनच वारकरी संप्रदायांच्या प्रस्थानत्रयींत त्याला पहिलें स्थान आहे. एकनाथी भागवत प्रथम वाचून समजून घेतलें म्हणजेच ज्ञानेश्वरींतील प्रमेयाचा अर्थ नीट कळतो. एकनाथी भागवताशिवाय ज्ञानेश्वरी संपूर्ण समजत नाहीं असें म्हणतात.

नेहमींच्या संसारांतील अपूर्णता मनुष्याला नेहमीं बोचत रहाते. हें अपूर्णत्व पूर्ण करण्याकरितां त्याला ज्ञान, सुख आणि पावित्र्य यांची उत्कंठा लागत राहाते, पण या गोष्टीची स्पष्टपणें जाणीव असत नाहीं. त्यांत गोंधळ असतो. निश्चित काय पाहिजें तें समजत नसतें. त्याचें स्पष्टीकरण संतांनीं दयाळुपणानें भागवत धर्मांत केलें आहे. हा भागवत धर्म श्रीमद्भागवताच्या अकराव्या स्कंधांत सांगितलेला आहे. त्यावर नाथांनीं टीका करून तो लोकांना सुलभ होईल असा सांगितला आहे.

विषयापासून आणि देहबुद्धीपासून दुःख व पाप उद्भवतात हें जाणून पश्चात्ताप वाटूं लागतो. पश्चात्तापामुळें वैराग्य येतें. पण असें वैराग्य आलें तरी इंद्रियांचा निग्रह करतां येत नाहीं. त्यांना कोंडतां येत नाहीं. म्हणून हरिभक्ति करून विषयांना दूर करावें. हरिभक्तीमुळें इंद्रियें न कोंडता शांत रहातात. आपले सर्व विषय ईश्वराला अर्पण करणें हीच मुख्य भक्ति. सर्व इंद्रियें ईश्वराकडे लावणें हीच खरी भक्ति. हें जो अखंड करतो त्याचें भवभय नाहींसें होतें. निर्भयता प्राप्त होऊन अज्ञानी लोकांनाहि आत्मप्राप्ति व ब्रह्मस्थिति लाभते.

अशा अखंड भजनानें श्रीहरि अंतरांत प्रगट होतो हाच ईश्वराचा साक्षात्कार. त्यानंतर सर्व भगवत्स्वरूप आहे असा अनुभव येतो. भक्ताचे संकल्पविकल्प, धर्माधर्म, कर्माकर्म सर्व ईश्वरस्वरूप होतात आणि वाढतें समसमाधान वाटतें. पुढें स्वरूपानुसंधानहि वाढतें आणि ध्याता-ध्यान-देह यांचा लय होतो व अद्वैत आत्मानुभव शिल्लक राहतो. मग सर्व गोष्टी आपोआपच ईश्वरार्पण होतात. सद्गुरूच्या कृपेनें अधिकारी मुमुक्षूला सद्गुरुवचन कानीं पडतांच ही अद्वैत अनुभूतीची अवस्था लाभते. हीच पराभक्ति, अभेदभक्ति. एकनाथी भागवतांत दुसऱ्या अध्यायांत संक्षिप्त भागवतधर्म सांगितला आहे. त्यांत अभेद भजन ध्येय म्हणून सांगितलें आहे. ईश्वरासाठीं सर्व कर्में करणें, संतसंगतींत राहणें वगैरे भक्तीच्या आचारांनीं व ईश्वराच्या सतत

अनुसधानानें चित्त शुद्ध झाल्यावर गुरुकृपा जोडली जाते आणि त्याच्याकडून आत्मदृष्टि मिळते आणि साक्षात्कार होतो. मग सर्व विश्वच भगवद्रूप दिसतें. सर्वाभूतीं भगवद्भाव झाला म्हणजे भक्त परब्रह्म होतो.

अभेदभक्ति हीं एक अनुभूति आहे. तिचा क्रियेशीं कांहीं संबंध नाहीं. पण ही अभेदभक्ति क्रियात्मक आणि ध्यानात्मक भक्तिसाधनानें प्राप्त करून घ्यावयाची असते, आणि ती साध्य झाल्यावर एक अनुभूति या स्वरूपांत ती असते. हीच सच्चिदानंदस्वरूप ब्रह्मस्थिती आहे. सर्वच भक्तींत, प्रेमांत अत्युत्कृष्ट अवस्था आली कीं, केवळ आनंदावस्था उरते. त्यावेळीं प्रेमाच्या किंवा भक्तीच्या विषयाचें भान नसतें. त्यामुळें द्वैत नाहींसें होतें. ही अवस्था म्हणजे शेवटची पराभक्ति. भक्त मुक्तीला तुच्छ मानून पराभक्तीच मागतात.

अशी पराभक्ति सामान्य जनांना एकदम शक्य नाहीं. त्यांनीं श्रवण-कीर्तन-नामस्मरण अशी सुरुवात करावी. त्यामुळें अभिमान, ममता आणि भय यांचा नाश होतो. त्यांतहि नामस्मरण सोपें असून त्याचा महिमा अगाध आहे. या सर्व साधनांनीं भक्ताला अष्ट सात्त्विक भावांचा अनुभव येतो. मग तो भक्तीचें माहात्म्य गाऊं लागतो व त्याला सर्व विश्व स्वानंदानें पूर्ण भरलेलें दिसतें. विश्व देखील साकार झालेला ईश्वरच असें अनुभवास येतें. नामस्मरणांत इतकें सामर्थ्य आहे. मग साधक पूर्णत्व पावतो. याप्रमाणें भक्तीनें विरक्ति, पराभक्ति व पूर्ण साक्षात्कार एकदम प्राप्त होतात.

श्रवणकीर्तनादि उपायांशिवाय आणखी दोन साधनें नाथांनीं सांगितलीं आहेत. एक म्हणजे सर्व भूतांच्याकडे ब्रह्म किंवा ईश्वर या दृष्टीनें पाहून त्यांची भक्ति करणें, त्यांच्या ठिकाणीं दोष किंवा भेद न पाहणें. दुसरें म्हणजे मी स्वतः ब्रह्मरूप आहे, देह नाहीं. ईश्वराच्या सर्व गुणांनीं मी युक्त आहें अशी भावना करणें. ईश्वराच्या सर्व लक्षणांची भावना भक्त स्वतःच्या ठिकाणीं करतो आणि ब्रह्मभाव दृढ करतो.

याप्रमाणे अखंड ब्रह्मरूपता प्राप्त झाली म्हणजे तीच समाधि. सर्व कर्में करीत असतांनाहि या समाधीचा भंग होत नाहीं. हीच खरी सहज समाधि. यांत बुद्धि स्वरूपांत अखंड रमलेली राहाते, कर्म अहेतुक चालतें. त्याचें त्याला स्मरणहि नसतें. ही अवस्था म्हणजे भागवत धर्माची फलश्रुति होय.

भक्तिवांचून ज्ञान, आत्मसाक्षात्कार अशक्य आहे असें नाथ वारंवार स्पष्टपणें सांगतात. संसारांतील सर्व आपत्ति अज्ञानानें निर्माण होतात. त्या ज्ञानानें दूर होतात, तेथें भक्तीची काय जरूर ? असा शब्दज्ञानाचा अभिमान धरला जातो तो चुकीचा आहे. कारण संसारांतील आपत्तींचें कारण असलेल्या अज्ञानाचें स्वरूप चुकीचा अनुभव असें आहे. त्याची निवृत्ति मायेचें निवारण करणाऱ्या ज्ञानानें, पराविद्येनें होतें. ती शब्दज्ञानानें होत नाही. मी देह आहें ही खोटी अनुभूति भक्ति साधनानें लाभणाऱ्या आत्मदर्शनानें, मी आत्मा या अनुभूतीनें, नाहीशी होईल. दुसरा मार्ग नाहीं.

भक्तिसाधन सद्गुरुशिवाय होत नाहीं. म्हणून भागवत धर्मांत सद्गुरूचें स्थान फार श्रेष्ठ आहे. म्हणून सद्गुरूला शरण जाणें हाच योग्य मार्ग होय. शिष्याला ब्रह्माचा लाभ करून देतो तो सद्गुरु. सद्गुरु हा साक्षात् ईश्वर, ब्रह्म. त्यानें देह धारण केला असला तरी त्याचा देहाशीं संबंध नाहीं.

म्हणून भक्ति हें ईश्वरप्राप्तीचें एकमेव साधन आहे. भक्तीला उपकारक व अवश्य म्हणून ज्ञान व नीति यांचा अंतर्भाव भक्तिसाधनांत केलेला आहे. विरक्ति आणि नीति नसेल तर नामस्मरणाला सुरुवात होणार नाहीं. भक्तीला ध्यान आवश्यक आहे. देवाचें अखंड स्मरण हें मुख्य कर्तव्य.

ग्रंथ आज पुरा झाला. पण असेच पुढे संतवाङ्मयाचे ग्रंथ सतत तयार करत राहावें असं वाटतं. यातला आनंद कांहीं निराळाच आहे. कांहीं लोक मोठं काम केल्याबद्दल प्रशंसा करतात. पण ही प्रशंसा केवळ कर्तृत्वाचा परिणाम आहे असें नाहीं. कारण खरं म्हणजे आगाऊ ग्राहकांच्या सहकार्यामुळे व धंद्यांतील आणि इतर सर्वच संबंधी लोकांनीं अत्यंत आपुलकीनें आणि मुख्य म्हणजे सद्भाव ठेवून काम केलं त्यामुळेंच मी हें कार्य सहज करूं शकलों. प्रकाशन हा धंदा आहे. याच्यांत फायदाहि आहेच. परंतु हें कार्य यशस्वी होण्याला जे जे पुढें आले, अखेरपर्यंत ज्यांनीं ज्यांनीं चिकाटीनें व सत्कार्यावरील उत्कट प्रेमानें मला साहाय्याचा आणि निर्मळ प्रेमाचा हात दिला त्यांच्या साहाय्यानें मी भारावून गेलों आहें. अशा प्रेमळांच्या निरपेक्ष लोभानें माझें अंतःकरण भरून आले आहे. त्यामुळे पुढें लिहिणे अशक्य झाले आहे.

—का. अ. जोशी

श्रीनाथमहाराजांचे चरित्र

पंढरपूर येथील श्रीविठ्ठलाची मूर्ति विजयनगरहून ज्यांनी आपल्या अलोट भक्तिसामर्थ्यानें परत आणली त्या भानुदास महाराजांच्या कुलांत एकनाथांचा जन्म झाला. भानुदासांचा मुलगा चक्रपाणी, चक्रपाणींचा सूर्यनारायण आणि सूर्यनारायणांचा एकनाथ. नाथाच्या आईचे नांव रुक्मिणी. त्यांचा जन्म शके १४५०मध्यें पैठण येथे झाला. भानुदासांच्या वंशांत ते एकटेच राहिल्यामुळें आजोबांनी त्यांचे नांव एकनाथ ठेवले. त्यांना लहानपणीं "एक्या" म्हणत असत.

नाथांचे आईवडील नाथ जन्मताच वारल्यामुळें त्यांना आजोबा आणि आजी यांनीच वाढविले. सहाव्या वर्षीच त्यांची मुंज झाली आणि ब्राह्मण वर्गातील रीतीप्रमाणें ते वेदाध्ययन करूं लागले. त्यांच्या घरीं एक शास्त्रीबुवा होते. ते पुराणही सांगत आणि नाथांना रोज शिकवीतहि असत. नाथांची बुद्धि तीव्र असल्यामुळें ते कोठलाही विषय लवकर आत्मसात करीत असत. आणि आपल्या बुद्धीनें गुरूलाही गोंधळून टाकीत. लहानपणचें त्यांचें आचरण अगदी शुचिर्भूत असे.

बारा वर्षांतच त्यांनी भागवत वगैरे वाचून टाकले. त्यांच्या अंतःकरणावर भक्तीचा खोल ठसा उमटला आणि अध्यात्मज्ञानाची त्यांना तळमळ लागली. सद्‌गुरूशिवाय खरे ज्ञान मिळत नाही हे त्यांनी ऐकले होते. म्हणून चांगला गुरु कसा मिळेल याची त्यांना तळमळ लागली होती. त्यांचें मन कशातच रमत नव्हतें. गावांत एक शंकराचें देऊळ होते, तेथे ते जाऊन तासन्‌तास विचारमग्न होऊन बसत.

एक दिवस ते असेच उदासीनपणे बसले असतां त्यांनी तेथे आकाशवाणी ऐकली कीं, 'देवगडावर तूं जा. तेथे जनार्दनपंत नांवाचे सत्पुरुष आहेत. ते तुला कृतार्थ करतील.'

हे ऐकल्याबरोबर नाथांना संजीवनी मिळल्यासारखी झाली. त्यांनी ही हकीकत त्यांना शिकविणाऱ्या पुराणिकबुवांना सांगितली. पुराणिकबुवांनीही त्यांना जाण्याबद्दल प्रोत्साहन दिले. दुसऱ्या दिवशी पहाटेच नाथ कोणालाही न सांगता श्रीविठ्ठलाचे नांव घेऊन घराबाहेर पडले आणि सरळ देवगडाची वाट चालू लागले. तिसऱ्या दिवशी ते देवगडावर (दौलतबाद) पोचले.

जनार्दन स्वामी हे तेथील किल्लेदार होते. ते शूर, करारी स्वभावाचे आणि तेजस्वी होते. त्यांची श्रीदत्ताची उपासना होती व श्रीदत्त साक्षात् सगुण रूपांत त्यांना दर्शन देत असत. गडावर त्यांची एकांत स्थळी एक जागा होती आणि तेथे ते समाधि लावून बसत. ते दयाळू आणि न्यायी होते.

नाथ सरळ आंत गेले आणि जनार्दनस्वामींचें दर्शन होतांच त्यांचे अष्टभाव उचंबळून येऊन त्यांनी स्वामींचे पाय धरले. हेच चरण आपल्याला पावन करतील असा नाथांच्या मनांत विश्वास उत्पन्न झाला. जन्मजन्मांतरींचा मायबाप भेटल्यासारखा त्यांना झाला.

पायांना मिठी घातलेल्या त्या मुलाला स्वामींनीं प्रेमानें उठविले. त्याच्या सोम्य, स्निग्ध आणि शांत मुद्रेकडे पाहून त्यांना समाधान वाटलें. स्वामींनीं त्याच्या पाठीवरून आपला वत्सल हात फिरविला आणि त्याला पोटाशी धरले. इतका आटापिटा केल्याचे नाथांना पूर्ण समाधान झाले. स्वामींनीं विचारले, "बाळ कोठून आलास तूं ?"

"पैठणहून"

"मग इतक्या लांब चालत कशाकरिता आलास ?"

"आपल्याला भेटण्याकरिता ! आपल्याजवळ राहून मी सेवा करणार आहे" नाथांनीं उत्तर दिले.

"पण माझ्या सेवेने तुला काय मिळणार ?"

"देव भेटेल तर तो तुमच्या सेवेनेच ! माझा विश्वास आहे"

"घरी कोण आहेत तुझ्या ? त्यांना सांगून आलास कीं नाही ?"

"घरी माझे आजोबा आणि आजी आहेत. त्यांना सांगून नाहीं आलो. सांगितलं असतं तर त्यांनी मला पाठवलचं नसतं."

मग त्याला जास्त न छेडता स्वामींनी त्याला आंत जायला सांगितलं. इतक्या लहान वयांत त्याचें वैराग्य आणि धिटाई पाहून त्यांना आश्चर्य वाटलें.

आल्या दिवसापासूनच नाथांनी गुरुसेवेचें व्रत घेतले. गुरु हीच आई, गुरु हाच बाप, गुरु हाच देव आणि गुरु हेच परब्रह्म असे ते वागूं लागले. रोज स्वामींच्या स्नानाची तयारी करावी, पूजेकरिता फुले आणावी, गंध उगाळावे, पूजा होई तो तेथें उभे रहावे, जेवतांना त्यांना वारा घालावा,

रात्रीं त्यांचे पाय रगडावे असे त्यांचे काम चालले होते, तो गुरुसेवेंत पूर्ण मग्न होऊन गेला होता.

सहा वर्षांत त्याला घरची आठवणही झाली नाहीं. वेळोवेळी नाथ कसोटीला उतरत गेल्यामुळे स्वामींचेही त्याच्यावर फार प्रेम जडले होते. ते विश्वासानें त्याला काम सांगू लागले होते.

एका गुरुवारी जनार्दनस्वामी समाधींत असतांना अचानक गडावर परचक्र आले.सर्व गडावर एकच गडबड उडाली. स्वामींकडे वर्दी आली तो स्वामी समाधिस्थानांत असून दारावर एकनाथ पहारा करीत बसलेले! नाथांनी क्षणभर विचार केला आणि मंडळींना धीर देऊन ते शस्त्रागारांत गेले. स्वामींचा लढाईचा पोषाख अंगावर चढविला आणि घोड्यावर बसून ते बाहेर पडले. स्वामींचा समाधिभंग होऊ नये आणि त्यांचे काम तर बिनबोभाट आणि चोख व्हावे हीच नाथांची तळमळ !

गडावरच्या मोजक्या सैन्याला धीर देऊन ते सरळ शत्रूवर तुटून पडले. त्या आवेशाने शत्रूला वाटलें स्वामींचें अफाट सैन्य आपल्यावर चालून येत आहे. नाथांचा रणमद शत्रूला असह्य झाला.ते वाट फुटेल तिकडे पळूं लागले.शत्रूला पिटाळून लावल्यावर नाथ शस्त्रागारांत गेले, पोशाख उतरून ठेवला आणि मुकाट्यानें स्वामींच्या समाधिस्थानाजवळ येऊन पूर्वीसारखे पहारा करूं लागले. थोड्या वेळांत स्वामींची समाधि उतरून नेहमीचे कार्यक्रम सुरूं झाले. पण भोवतालचें वातावरण त्यांना कांहीं निराळेच दिसूं लागले. कांहीतरीं वेगळेच घडले आहे असे त्यांना वाटत होते. नाथ समोर उभे होते. पण त्यांच्या तोंडून केलेल्या पराक्रमाबद्दल एक अक्षरहि निघाले नाहीं. झालेला प्रकार इतरांकडून समजला तेव्हां त्यांना काय धन्यता वाटली! नाथांच्या धाडसाचे त्यांना कौतुक तर वाटलेच पण त्यांच्या निरभिमानी वृत्तीबद्दल त्यांचे अंतःकरण उचंबळून आले.

कांहीं दिवसांनीं स्वामीनीं त्यांना दप्तर लिहिण्याचें, हिशोबाचें काम दिले. गुरुसेवा व ईश्वराचे चिंतन करून ते हे काम संभाळीत असत. हिशोबाचें काम ते मोठ्या आस्थेनें आणि चोख करित असत. एक दिवस हिशोबांत एक पैशाची चूक राहिली. ती कांहीं सांपडेना. रात्री सगळे झोपल्यावर नाथ हिशोब तपासत बसले. शेवटीं पहाटेच्या सुमारास चूक सांपडल्याबरोबर नाथांनी आनंदाच्या भरांत मोठ्यानें टाळी वाजविली.

रात्रीं जनार्दनस्वामींना जाग आली तेव्हां नाथांच्या खोलींत दिवा कां जळतो म्हणून त्यांना आश्चर्य वाटले. इतक्यांत त्यांच्या कानी टाळीचा आवाज आला. ते पुढें होऊन म्हणालें, “ काय रे एकोबा, तुला एवढा आनंद कसला झाला ? ”

“ एक पैशाची चूक सांपडत नव्हती, ती आतां सापडली ”

“ मग इतका वेळ तूं हेच काम करित बसला होतास ? ”

“ हो ”

“ नाथा ” जनार्दनस्वामी म्हणाले. “ तुला एक पैशाची चूक सापडली तर एवढा आनंद झाला. त्याकरितां तूं रात्रभर जागरण केलस. मग तीच एकाग्रता संसाराची चूक शोधण्यांत केलीस तर तुला केवढा आनंद होईल ! ”

आणि त्याच वेळी स्वामींनी मनाशी ठरविलें कीं येत्या शुक्रवारी नाथाला श्रीदत्तदर्शन करवून त्याचें कल्याण करावयाचे !

गडाच्या पलीकडे उत्तरेला स्वामींचे एक एकांतस्थान होते. त्या बाजूला कोणी फिरकत नसे. श्रीदत्तमहाराज सगुणरूपानें यऊन तेथे स्वामींना दर्शन देत आणि त्यांच्याशी बोलत असत. त्या शुक्रवारी स्वामींनी नाथांना बरोबर घेतले आणि ते निघाले.“श्रीदत्तमहाराजांशिवाय इकडे कोणी फिरकत नाहीं, आणि ते कोणत्या वेषांत येतील याचा नेम नाहीं.तरी तूं बिचकूं नकोस” म्हणून स्वामींनी नाथांना बजावून ठेवले होते.

एका शिलाखंडावर बसून स्वामींनी ध्यान धरले. इतक्यांत एक मलंग तेथे आला. देह मलिन, अंगावर कातडे पांघरलेले, हातांत कटोरा आणि बरोबर एक कुत्री असा त्याचा वेष होता. तो दिसतांच स्वामींनी धावत जाऊन त्याचे पाय धरले. मलंगानें त्याला प्रेमानं उठवून आलिंगन दिले. नंतर दोघे एकाच आसनावर बसून गोष्टी बोलत बसले. थोड्या वेळानें मलंगानें जवळचा कटोरा स्वामींच्या हातांत दिला आणि त्यांना आज्ञा केली, “ जा, त्या कुत्रीची धार काढून आण.”

स्वामी लगेच उठले आणि त्यांनी कुत्रीचें कटोराभर दूध काढून आणले. मलंगानें आपल्या झोळींतले शिळ्या भाकरीचे तुकडे काढले आणि ते त्या दुधांत कालवले. नंतर मिटक्या मारीत दोघेंही एकाच कटोऱ्यांतून खाऊं लागले. भोजन संपल्यावर कटोरा धुण्याकरिता नाथांच्याकडे दिला. नाथ तो कटोरा घेऊन तळ्यावर गेले. आपले गुरु एवढे कडकडीत सोवळं पाळणारे असून या मलंगाबरोबर उष्टें खातात. तेव्हां हा कांहीं निराळा प्रकार असावा असे

नाथांच्या मनांत आले. त्यांनी पात्र पाण्यांत बुडवतांच अन्नाचे कांहीं कण वर तरंगू लागले तेव्हां हाच महाप्रसाद असें समजून त्यांनी ते पाणी पिऊन टाकले.

नंतर कटोरा स्वच्छ धुऊन त्यांनी मलंगाच्या पुढें नेऊन ठेवला. नाथांचा भाव मलंगानें जाणून 'तीन शिरे सहा हात' असा श्रीदत्तात्रेय होऊन तो प्रगट झाला. कुत्रीची कामधेनु झाली. श्रीदत्तांनी नाथांकडे प्रेमभरानें पाहिले आणि त्याला हृदयाशीं धरून ते म्हणाले "जनार्दना, हा तुझा शिष्य मोठा अवतारी पुरुष आहे. हा महाभागवत जन्माला आला आहे. हा हजारों लोकांना सन्मार्गाला लावून त्यांचा उद्धार करील. माझी याच्यावर पूर्ण कृपा आहे"

शेवटच्या शब्दाबरोबर श्रीदत्तात्रेयांची मूर्ति अंतर्धान पावली. दोघेहि गुरु शिष्य एका गोड तंद्रीत देवगडावर परत आले.

श्रीदत्तात्रेयानें नाथांना प्रत्यक्ष दर्शन आणि आशीर्वाद दिल्यामुळे, आतां त्याला अनुष्ठानाला बसवावा म्हणजे त्याच्या अंगी वैराग्य वाढेल आणि हृदयांतले ज्ञान पक्के होईल, असे स्वामींनी मनाशी ठरविले.

देवगडाच्या वायव्येला शूलभंजन नांवाचा एक रम्य पर्वत आहे. ते स्थान निवांत आणि रम्य आहे असें पाहून स्वामींनी नाथांना कर्तव्याचा बोध करून आणि श्रीकृष्णाची उपासना देऊन तेथें पाठविले. एक सुंदर जागा पाहून तीं स्वच्छ करून नाथ तेथें स्थिर आसन मांडून बसले. श्रीगुरुदेव योगक्षेम चालविण्यास आणि सर्व प्रकारें सांभाळ करण्यास समर्थ आहेत. असा पक्का विश्वास ठेऊन नाथांनी तप करण्यास सुरुवात केली. दुपारपर्यंत ध्यान करावें, संध्याकाळीं मिळेल तो फलाहार करावा असा त्यांचा क्रम असे.

एक दिवस एक गुराखी नाथ बसत असत तेथे आला. ती तेजस्वी बालमूर्ति पाहून त्याच्या मनांत आदर उत्पन्न झाला आणि नाथांचें ध्यान संपल्यावर त्यानें दुधाची भरलेली चरवी त्यांच्यापुढें ठेवली. नंतर तो रोज नियमानें चरवी भरून त्यांच्यापुढें आणून ठेवू लागला.

एक दिवस तो गुराखी जरासा लवकर आला आणि पाहतो तो नाथांची समाधि लागलेली आणि एक काळा भुजंग नाथांच्या कंबरेला विळखा घालून आपल्या फण्याची छत्री नाथांच्या डोक्यावर उभारून उभा ! ते पाहिल्याबरोबर गुराख्याची बोबडी वळली. पण लगेच शुद्धीवर येऊन तो मोठ्यानें ओरडला. नाथांची समाधि भंग पावली आणि त्यांनीं डोळे उघडले. त्याबरोबर भुजंगानें त्यांच्या देहाभोवतालचे विळखे सोडले आणि तो सळसळ करित निघून गेला.

'कांहींतरी विशेष घडले म्हणजे परत ये' असें स्वामींनीं नाथांना सांगितले होते. त्याप्रमाणें नाथ उठले आणि देवगडावर आले. स्वामींना नमस्कार करून त्यांनी सर्व प्रकार सांगितला. तें ऐकतांच स्वामी म्हणाले, "नाथा, आज तूं परिपूर्ण झालास. आतां यापुढें अनुष्ठानाची गरज नाहीं. आपण दोघे आता कांहीं दिवस तीर्थयात्रेला जाऊं"

त्याप्रमाणें दुसऱ्या दिवशीं जनार्दनस्वामी नाथांना घेऊन तीर्थयात्रेला निघाले. भक्तिप्रेमाच्या आणि ब्रम्हज्ञानाच्या गोष्टी करित ते दोघेजण गोदावरीच्या तीरावर चंद्रावती नगरींत आले. नदीच्या कांठीं चंद्रभट्ट नांवाचा एक ब्राह्मण भेटला. त्याने या दोघांना आपल्या घरी नेले.

चंद्रभट्ट मोठा विद्वान्, तपोनिष्ठ आणि सत्वशील होता. रात्री भोजन झाल्यावर चंद्रभट्टान चतुःश्लोकी भागवतावर पुराण सांगितलें. त्याची रसाळ वाणी ऐकून दोघेहि डोलू लागले. पुराण संपल्यावर स्वामी नाथांना म्हणाले, "नाथा तूंहि या चतुःश्लोकी भागवतावर देशी भाषेंतून टीका लिही."

स्वामींच्या आज्ञेप्रमाणें नाथांनी लगेच सुरुवात करून थोड्याच दिवसांत चतुःश्लोकी भागवतावर एक हजार विवरणात्मक ओव्या लिहिल्या. चंद्रभट्ट तर नाथांचें कवित्व पाहून थक्क झाला. नंतर तेथून मुक्काम हलवून गुरुशिष्यांनी पंचवटी व त्र्यंबकेश्वर पाहिले.

गड सोडून बरेच दिवस झाल्यामुळें स्वामींना परत जावयाचे होते. म्हणून नाथांना त्यांनी पुढील तीर्थयात्रेचा क्रम सांगितला आणि ते जावयास निघाले. जड अंतःकरणानें स्वामींचा निरोप घेऊन नाथ पुढील तीर्थयात्रेस निघाले.

इकडे पैठणांत बरीच वर्षें झाली तरी नाथ परत येत नाहीं म्हणून त्यांचे आजोबा चक्रपाणी काळजी करीत होते. आजीचे डोळे रडून रडून सुजले होते. म्हातारपणी त्या दोघांना हे दुःख सहन होत नव्हते. आसपास पुष्कळ शोध केला. पण नाथांचा पत्ता लागला नाहीं. त्यांच्या घरचे पुराणिकबुवाही नाथ गेल्यानंतर थोड्याच दिवसांत कोठें निघून गेले होते. ते दहा अकरा वर्षांनीं पैठणांत परत आले. नाथ अजून पैठणांत आले नाही हे कळतांच वृद्ध चक्रपाणींना धीर देऊन पुराणिकबुवा सरळ देवगडावर गेले. तेथ गडावर त्यांनी स्वामींची भेट घेतली. स्वामींनी नाथ तीर्थयात्रेस गेला आहे म्हणून सांगितले. पुराणिकबुवांनी स्वामींना पैठणची सर्व हकीकत सांगितली. तेव्हां स्वामींना करुणा येऊन त्यांनी नाथ पैठणास येईल तेव्हां

देण्याकरिता एक पत्र दिले आणि हे पत्र दिले म्हणजे नाथ पुढे जाणार नाहीं असे त्याला आश्वासन दिले.

स्वामींचे पत्र घेऊन पुराणिकबुवा पैठणास परत आले आणि त्यांनी चक्रपाणींना सर्व वृत्तांत सांगून स्वामींचे पत्रहि दिले. आपल्या नातवाची हकीकत ऐकून आजाआजीस अत्यंत आनंद झाला आणि आतां आपला नातु केव्हां पैठणला येतो याची उत्कंठेनें ते वाट पहात राहिले.

स्वामींच्या आज्ञेप्रमाणें नाथांनीं स ़ यात्रा केल्या. पयोष्णी, नर्मदा, तापी, गंगा, यमुना, कावेरी, तुंगभद्रा इत्यादि नद्यांत स्नानें केली. नाथांनी अष्टविनायकांची स्थानें व द्वादश ज्योतिर्लिंगें पाहिली. गोकुळ, वृंदावन, मथुरा, गया, प्रयाग, काशी वगैरे करून हृषीकेश, बदरिकाश्रमाची यात्रा झाली. तेथून द्वारकेस जाऊन ते पैठणांत आले आणि पिंपळेश्वराच्या देवळांत त्यांनी मुक्काम केला. त्यांच्या आजाआजींना ही वार्ता समजली तेव्हां ते नातवाच्या भेटीला निघाले. वाटेतच त्यांना नाथ भेटले. क्षणांत ओळख पटून आजोबांनी "एक्या" म्हणून नाथांना हृदयाशी धरले. जरा वेळ गेल्यावर ते म्हणाले, "एक्या, माझ्यासारख्या म्हाताऱ्याला टाकून गेलास......रागावलास काय माझ्यावर ! तुला शोधण्याकरितां वणवण फिरलो. आतां मात्र आम्ही तुला इथून जाऊं देणार नाहीं."

असं म्हणून आजोबांनी जनार्दनस्वामींनी दिलेले पत्र नाथांच्या हातात ठेवले. नाथांनीं ते मस्तकी धारण केले आणि वाचले. ती पत्रिका म्हणजे पुढें तीर्थयात्रा न करतां तेथेच राहाण्याची आज्ञा होती. त्याप्रमाणें ज्या जागेवर नाथांच्या हातांत पत्र पडले ती जागा त्यांनी सोडली नाहीं. ते पूर्वीच्या वाड्यांत गेले नाहींत. तेथेच झोपडी बांधून ते राहूं लागले. पुढें नाथांचा वाडा त्याच जागी बांधण्यांत आला.

पुढे श्रावण महिना आला तेव्हां नाथांनी गोकुळाष्टमीचा उत्सव करण्याचे ठरविले. सगळी तयारी झाली. नाथांची कीर्तनें सुरू झाली. नाथांची कीर्ति गुरूच्या कानावर गली होतीच. गोकुळाष्टमीस शिष्याचे कीर्तन ऐकावें म्हणून जनार्दनस्वामी परिवारासह पैठणला आले. नाथांच्या वाड्याजवळ ते आले तो त्यांच्या आश्चर्याला पारावार उरला नाहीं. कारण नाथांच्या द्वारावर प्रत्यक्ष दत्तात्रेय हातांत त्रिशूळ घेऊन पहारा करीत होते. त्यांनी दत्तप्रभूंचे पाय धरले. नतर दोघांचे बोलणें झाले, आपल्या शिष्याचा अधिकार पाहून स्वामी गहिवरले.

नंतर दत्तात्रेयांनी साध्या वेषाने आत जाऊन जनार्दनस्वामी आल्याची वर्दी दिली. त्याबरोबर नाथ धांवत बाहेर आले. गुरूंना वंदन करून त्यांचीं पदधूली नाथांनी मस्तकावर धारण केली. त्यांचा योग्य सत्कार केला. नाथांचे कृष्णजन्माचें कीर्तन ऐकून जनार्दनस्वामी अत्यंत खूष झाले. ते परत जायला निघाले तेव्हां नाथांच्या आजोबांनी त्यांचे पाय धरले आणि ते म्हणाले "माझ्या नातवाला तुम्ही शहाणं आतां केलंत आतां दोन हातांचे चार हात व्हावेत यासाठी आम्ही तळमळतो आहोत भानुदासांचा वंश पुढे चालावा एवढीच आमची इच्छा आहे. आपण आज्ञा केलीत तरच या गोष्टी होतील."

स्वामींना म्हाताऱ्याचा भाव कळला. नाथांना बोलावून ते म्हणाले, "विवाह करून गृहस्थाश्रम स्वीकार. सर्व आश्रमांत तोच आश्रम उत्तम आहे. सर्वांभूति भगवद्भाव ठेऊन सर्वांचा परिपोष करावा."

लग्न करायचे ठरल्यावर वैजापूरच्या एका संपन्न गृहस्थांनी आपली उपवर मुलगी आणून चक्रपाणींना दाखविली. मुहूर्त ठरला आणि मोठ्या समारंभानें नाथांचा विवाह पार पडला. एक दूरचा आप्त उद्धव नांवाचा होता. तो लग्नांत आला होता. नाथांच्यावर त्याचे प्रेम जडले आणि तो पुढें कायमचा नाथांच्या घरीं राहिला. नाथांचा सारा संसार त्याने संभाळला. घरांतील ने आण, हिशोब वगैरे कामे संभाळून कीर्तनालाही तो त्यांच्यामागे उभा राही.

नाथांना मिळालेली पत्नि गिरिजाबाई अगदी योग्य अशीच होती. थोड्याच दिवसात ती आपल्या पतीच्या कार्यांत समरस झाली. घराच्या उंबरठ्याच्या आतली जबाबदारी तिने अगदी यथायोग्य सभाळली. घरांतल्या बारिकसारिक गोष्टीत तिचे लक्ष असे. तिनें कोठल्याही कामाचा कधीही कंटाळा केला नाही. स्त्रीच्या ठिकाणीं लागणारे सर्व सद्गुण तिच्या अंगी होते.

पैठणास नाथांनी चाळीस बेचाळीस वर्षें गृहस्थाश्रम अगदी योग्य तऱ्हेने पाळला. नाथांच्या सुखाच्या संसारांत थोडे दिवस सुख भोगून वृद्ध आजाआजींनी आपले डोळे मिटले.

एक दिवस अकस्मात् दौलताबादला जनार्दनस्वामींनी समाधि घेतल्याची बातमी आली. परंतु जन्म आणि मरण या कोड्याचा पूर्ण उलगडा नाथांना झालेला असल्याकारणाने गुरुमाऊलीच्या समाधीचे वर्तमान ऐकून ते फारसे विव्हल झाले नाहीत. त्यांनी उद्धवास सांगितले, "उद्धवा षष्ठीच्या महोत्सवाकरिता सर्व साहित्याची तयारी कर."

'पण महाराज, षष्ठीला कोणतां उत्सव व्हावयाचा आहे."

"अरे फाल्गुन वद्य षष्ठीला स्वामींचा जन्म झाला,

षष्ठीला त्यांना श्रीदत्तप्रभूंचे दर्शन झाले. मलाही त्यांनी पहिल्यांदा दत्तदर्शन करविले ते षष्ठीलाच आणि आता स्वामींनी समाधि घेतली ती फाल्गुन वद्य षष्ठीलाच. ही चार वर्षे षष्ठीलाच येत असून पुढे एक पाचवे पर्वहि षष्ठीलाच येणार आहे. तें तुला नंतर कळेल. आम्हा दोघांच्या चरित्रात या षष्ठीचे मोठे महत्त्व आहे. म्हणून त्यादिवशी मी मोठा उत्सव करण्याचे ठरविले आहे."

"ठीक आहे." म्हणून उद्धव तयारीला लागला. पुढे फाल्गुन वद्य षष्टी आली. त्या दिवशी मोठा उत्सव झाला. गोदावरीच्या तीरावर दिंडी जाऊन मध्यान्हापर्यंत नामस्मरणाचा गजर झाला. दुपारी मुक्तद्वार भोजन झाले. संध्याकाळी आनंदात कीर्तन झाले. या उत्सवाच्या खर्चासाठी उद्धवाने नाथांच्या नावाचा कर्जरोखा लिहून देऊन सातशे रूपये कर्ज काढले होतें. पुढे रोख्याची मुदत भरली. तेव्हां सावकार पैसे मागण्याकरता आला. उध्दवाने सांगितले, "महाराज , आज माझ्याजवळ पैसे नाहीत. पैसे आले की मी तुमचे पैसे देऊन टाकीन."

सावकाराने मनात विचार केला "यांच्याकडे पैसे येतात पण रोज अन्नसंतर्पण चालू आहे. तेथे कुठे पैसे शिल्लक रहाणार.

असा विचार करून तो सरळ नाथांच्याकडे गेला आणि म्हणाला, "महाराज,माझ्या पैशाची मुदत टळली. तरी मला पैसे मिळत नाहींत, तेव्हां तुम्हाला पांडुरंगाची शपथ आहे. माझे देणे दिल्याशिवाय तुम्ही अन्नग्रहण करूं नये."

अशी शपथ घालून तो घरी निघून गेला. नाथांनी शपथ मोठ्या आनंदानें पाळली. ते आणि गिरिजाबाई दोघांनी अन्न वर्ज्य केले. त्यामुळें उद्धवालाही उपास पडला. दिवस संपून मध्यरात्र झाली पण तिघेही उपाशी. तेव्हां भगवंतानें उध्दवाचा वेष घेतला आणि तो सावकाराच्या घरीं गेला. सावकार दार उघडून पाहतो तो उद्धव समोर उभा ! तो म्हणाला, "महाराज, एवढ्या अपरात्री काय काम आहे ?"

पैसे आणले आहेत. ताब्यांत घेऊन पावती द्या "

पण रात्रीच्या वेळीं काय आहे. सकाळी या. हिशोब दुकानांत आहे. तेव्हां पाहूं. "

"आम्ही पैसे आणले असतां आतां कां आळस करतां? पैसे आणले तर घेत नाहीं आणि नाथमहाराजांना विनाकारण शपथ घालून उपास करायला लावता!"

त्याबरोबर सावकाराला शपथ घातल्याची आठवण झाली आणि तो तसाच दुकानांत गेला. हिशोब केला आणि रक्कम मोजून घेतली, तर हिशोबाप्रमाणें तंतोतंत रक्कम भरली. सावकारालाहि आश्चर्य वाटले त्यानें कर्जरोखा फाडून दिला. तो रोखा भगवंतानें नाथांच्या नित्यपाठाच्या पोथींत ठेऊन दिला.

नाथांसारख्या महात्म्यास उपास घडला म्हणून सावकाराला तळमळ लागून झोप आली नाहीं. दिसूं लागतांच तो प्रथम नाथांच्या वाड्यांत गेला आणि नाथांच्या पायावर डोके ठेऊन म्हणाला, महाराज, मी अपराधी आहे. मला क्षमा करा."

"शेटजी, तुम्ही इतके कां वाईट वाटून घेता?" नाथ म्हणाले. "चूक तुमच्याकडे नसून आमच्याकडे आहे. तुमचें देणे सर्व फिटेल तेव्हां आम्ही उपास सोडू."

तें ऐकून आश्चर्यचकित होऊन तो उद्धवाजवळ गेला आणि म्हणाला " अहो, काल रात्री तुम्ही माझी रक्कम व्याजासह दिली आणि महाराजांना काहीच कसे सांगितले नाहीत?"

'पण मी तुमची रक्कम दिलीच केव्हां? मी नाथमहाराजांना खोटं कसं सांगू ! "

" तुम्ही बोलता काय हे ? काल मध्यरात्री तुम्ही माझ्या घरी आला. दुकान उघडून हिशोब करून मी पैसे घेतले आणि कर्जरोखा फाडून तुम्हाला दिला "

उद्धवाला कांहीं कळेना. तो नाथांच्याकडे गेला. ते नित्यपाठाची पोथी उघडीत होते तो त्यांत फाडलेला कर्जरोखा होता. तें पाहतांच पांडुरंगानेच हे काम परस्पर केले हे त्यांच्या लक्षांत आले. त्यांनी तो कर्जरोखा उद्धवाच्या हातांत दिला. सावकारालाही पश्चात्ताप होऊन त्यानें नाथांच्या पायावर लोळण घेऊन त्यांची क्षमा मागितली. नाथांनी त्याचे समाधान करून त्याला परत घरी पाठविले.

दुसऱ्यानें अन्यायानें छळ केला तरी त्याचा प्रतिकार न करतां छळ सोसून घ्यायचा ही साधुपुरुषांची वृत्ति नाथांच्या अंगी पुरेपूर बाणलेली होती. त्यामुळें आपण कमावलेल्या आध्यात्मिक गुणांचा कसच लागतो अशी त्यांची धारणा होती. ते क्षमा, दया, तितिक्षा, शांति यापासून कधीही ढळत नसत.

एक दिवस नाथ गंगेवर स्नान करून वर येत होते. मध्येच एका वृक्षापाशीं बसलेला एक यवन उन्मत्तपणें नाथांच्या अंगावर थुंकला. कांहीं घडलेच नाहीं अशा शांत चित्तानें नाथ पुन्हा स्नानाला गेले. पुन्हा गंगास्नानाचा आनंद घेऊन ते वर येऊं लागले तो पुन्हा त्यांच्या अंगावर पीक आली. यवन जरा ओशाळून म्हणाला, " माझी चूक झाली. "

" छे छे चूक कसली ! मीच चुकून मधे आलो. आता मी पुन्हा स्नानाला जातो. "

न रागावतां ते पुन्हा स्नानाला गेले. तो यवन निर्लज्ज-

पणें पुन्हा पुन्हा थुंकत होता आणि नाथ पुन्हा पुन्हा स्नानाला जात होते. राग आणि सहनशीलता यांतील तो एक झगडाच होता.

खूप वेळा थुंकून यवन खरोखरच थकला त्याचा कंठशोष झाला. नाथांच्या अद्वितीय शांतीपुढें तो शरण आला. तो म्हणाला, "महाराज मी खरोखरच पापी आहे. मला क्षमा करा."

"छेरे बाबा! क्षमा कसली करायची? तुझ्यामुळें मला गंगेची १०८ स्नानें झाली. तुझेच माझ्यावर उपकार आहेत."

तो यवन अगदी शरमून गेला आणि म्हणाला, "महाराज मला आता पश्चाताप झाला आहे. मला कांहींतरी उपदेश करा. मी जन्मभर त्याप्रमाणें वागेन."

"ठीक आहे." नाथ म्हणाले, "उपदेश हाच कीं परमेश्वर एकच आहे. त्याला अल्ला म्हणा नाहींतर दुसरं कांहीं म्हणा तो सर्वत्र आहे. त्याचें स्मरण ठेवून मनुष्यानें नेहमीं चांगुलपणानें वागावे."

नाथमहाराज वृत्तीने अत्यंत शांत होते. दुसऱ्यांनी त्यांच मत्सर केला तरी ते त्याला क्षमा करीत. पण नाथांची ही शांतीच कांहीं लोकांना सहन होत नसे. नाथांची फजिती कशी करावी हाच विचार त्यांच्या मनांत नेहमी असे.

एक दिवस कुचर ओटचावर अशा कुटाळकंपूची सभा भरूना गप्पा रंगांत आल्या असतां एक ब्राह्मण तेथे आला. पोशाखावरून तो फार लांबून आलेला दिसत होता. कांहींतरी गम्मत करावी म्हणून त्यांतील एकाने त्या ब्राह्मणाला विचारले "काय भटजीबुवा, कुठून आलांत? काय काम आहे?"

"महाराज," तो भटजी म्हणाला, "मी फार लांबून आलो आहे. गरीबीमुळे मुलांच्या मुंजी होत नाहींत म्हणून इथे आलो. हे पैठण सुखवस्तु आणि विद्वान् लोकांचं माहेरघर! इथे तरी माझे काम होईल असं मला वाटतं."

"भटजी बुवा, तुमच्या मुलांच्या मुंजीला किती पैसे लागतील?"

"दोनशे रुपये." भटजी म्हणाला.

"ठीक आहे. देऊ आम्ही तेवढी रक्कम. पण तुम्ही एक काम केलं पाहिजे."

"कोणतं?" त्यानं उत्सुकतेनें विचारलं.

"सोपी गोष्ट आहे. तसं कांहीं फारसं अवघड नाहीं. इथें एकनाथ नांवाचा एक साधु रहातो. त्यांना म्हणे कधी राग येत नाहीं. लोक सांगतात त्यांची शांति कधी ढळत नाहीं. त्यांना तुम्ही फक्त राग आणून दाखवायचा की, तुमचं काम आम्ही करूं."

भटजीला वाटले, हे काम अगदीचं सोपं आहे. त्या कुटाळांनीं त्याला नाथांचा वाडा दाखविला. भटजी सरळ आंत गेला.

आंत गेल्यावर नाथ पूजा करीत आहेत असं त्याला समजलं. त्या बरोबर पायांतल्या जोडयासह आणि खांद्यावरच्या पडशीसह तो सरळ देवघरांत गेला आणि नाथ पूजा करीत बसले होते त्यांच्या मांडीवर जाऊन बसला. पण नाथांना जराहि राग आला नाहीं. ते हसत म्हणाले, "वा वा! काय हे प्रेम! आमच्या भेटीला बरेच लोक येतात पण असें प्रेम मी आजच पहातो आहे. आपल्याला जोडे काढून ठेवण्याचे भानहि राहिले नाही. आपल्या दर्शनानें मला फार आनंद झाला. अशी भक्ति पाहिजे."

नाथांचे बोलणें ऐकून भटजी अगदी थिजून गेला. उसने धैर्य आणून तो म्हणाला, "आपल्या भेटीला मी मुद्दाम लांबून आलो."

मग चला. "नाथ त्याला म्हणाले, "गंगेवर जाऊन स्नान करून या. भोजन तयार आहेच."

तो भटजी स्नानाला गेला. त्यानें स्नानाला मुद्दामच वेळ लावला. पण परत येतो तो पानें मांडून नाथ वाट पाहात बसले होते. नाथांनीं हसतमुखानें त्याला आपल्या शेजारच्या पानावर बसविले.

भटजी मनांत चुळबुळ करित होता. मनांतून तो अगदी खट्टू झाला होता. दोनशें रुपयांची आशा त्याला स्वस्थ बसू देत नव्हती. इतक्यात शेवटचा प्रयत्न म्हणून भटजींनें सर्व लाज सोडून एकदम उठून ओणव्या झालेल्या गिरिजाबाईच्या पाठीवर उडी घेतली. सर्व लोक चकित झाले. पण नाथ मात्र अगदी शांतपणे हसत म्हणाले, "सांभाळ हो. ब्राह्मण खाली पडेल."

गिरिजाबाई झाली तरी नाथांच्या सहवासांत रमलेली त्यांची धर्मपत्नी! ती माउली शांतपणे म्हणाली, "अगदी काळजी करूं नका. हरिपंडिताला पाठीवर घेऊन मला काम करायची संवय आहे. हा मोठा बाळ खाली पडायचा नाहीं बरं."

ही अमृतवाणी ऐकताच भटजी खाली उतरला आणि नाथांचे पाय अश्रूंनी भिजवींत त्यानें सर्व हकीकत सांगितली. तें ऐकून नाथ म्हणाले, "अहो, मग आधीच कां नाहींत बोललात? रागावलो असतो तुमच्यावर?'

नंतर उद्धवाला हांक मारून त्यांनी त्या भटजीला दोनशे रुपये दिले आणि त्याची बोळवण केली.

नाथमहाराज लोकांना शिकवीत असत त्याप्रमाणें स्वतःहि आचरण करीत असत. पैठणांतील राणू नांवाचा एक

महार रोज नाथांच्या कीर्तनाला आणि पुराणाला येत असे. नाथांनीं आपल्या घरीं जेवायला यावं अशी त्याची फार दिवस इच्छा होती. एक दिवस तो धीर करून म्हणाला. "महाराज, आपण उद्यां माझ्या घरीं जेवायला याल ? "

नाथांनी एकदां त्याच्याकडे पाहिलें आणि ते म्हणाले."हो, येईन."

राण्या महार मोठ्या आनंदानें आपल्या घरीं गेला. थोड्याच वेळांत नाथ महाराकडे जेवायला जाणार ही बातमी सर्व गावांत पसरली.शास्त्री व पंडित त्यांच्याविषयीं वाटेल ते बोलूं लागले.

दुसऱ्या दिवशीं खरोखरच नाथ महाराकडे जेवायला जातात कीं काय याबद्दल सर्व पैठण गांवाला मोठं कुतूहल वाटत होतं. लोक त्यांच्या पाळतीवर होते. त्या दिवशीं खरोखरच नाथ महारवाड्याकडे निघाले. ते सरळ राण्या महाराच्या घरीं गेले. नाथ आलेले दिसतांच तो आणि त्याची पत्नी दोघांनीं त्यांच्या पायावर मस्तक ठेवलें. नंतर आंत जाऊन ते पाटावर बसले आणि समोरच्या पानांत वाढलेले पदार्थ ते खाऊं लागले. सर्व लोकांनीं तें पाहिलें.

शास्त्रीपंडितांनीं नाथांवर बहिष्कार घालण्याचें ठरवून ते सर्व नाथांच्या वाड्यापाशीं आले. तो काय चमत्कार ! नाथ तेथें पुराण सांगत होते. नेहमीप्रमाणें श्रोते तल्लीन होऊन ऐकत होते आणि नाथ रंगांत येऊन सांगत होते.

शास्त्रीमंडळींना मोठा चमत्कार वाटून ते ताबडतोब राण्या महाराच्या घरीं गेले, तों तेथें नाथ आनंदानें भोजन करीत आहेत. त्यांना या चमत्काराचें आकलन होईना. नाथांचीं दोन रूपें कशी ? खरे नाथ कोणते ? त्यांची बुद्धि कुंठित झाली.

नाथांची फजिती होऊं नये आणि ब्राह्मणांनी त्यांच्यावर बहिष्कार टाकूं नये म्हणून पांडुरंग स्वत: नाथांचें रूप घेऊन त्यांच्या वाड्यांत पुराण सांगत होता.

देवाची भक्ति करावी आणि त्याच्या मोबदल्यांत देवाकडून कांहींतरी मागून घ्यावें अशी भक्ति नाथांनीं कधींच केली नाहीं. त्यांनीं देवाकडे कांहींच मागणें मागितलें नाहीं. श्रीहरीच्या चरणापाशीं त्यांचें एवढेच मागणे होते.

मागणें हेंचि माझे देवा दुजेपणा दुरी ठेवा ।
मी तूं ऐसी नको उरी जनार्दना कृपा करी ।।

त्यामुळें या न मागणाऱ्या भक्ताचे उतराई कसें व्हायचें याची देवाला पंचाइत पडली. देवानें द्वारका सोडली आणि ब्राह्मणवेषानें पैठणांत आला. नाथांच्या वाड्यांत जाऊन त्यांना नमस्कार करून तो उभा राहिला. नाथांनीं विचारलें, " कोण तुम्ही ? कशाकरतां आलात ? "

" आपली कीर्ति ऐकून आपली सेवा करण्याकरतां मी आलों आहें. मी अनाथ ब्राह्मण आहें. मला कोणी नातेवाईक नाहींत. आपल्याकडे राहून आपण सांगाल ती सेवा करीन. "

" आपलं नाव काय ? "

" मला श्रीखंड्या म्हणतात. मी सौराष्ट्रांतला आहे. "

" ठीक आहे आनंदानें राहा. " नाथ म्हणाले.

त्या दिवसापासून श्रीखंड्या नाथांच्या घरीं राबूं लागला. सकाळीं स्नान केल्यावर गंगेच्या कावडी खांद्यावरून आणून वाड्यांतला मोठा रांजण भरून ठेवावा. नाथांच्या पूजेची तयारी करावी. त्यांना गंध उगाळून द्यावें. फुलें आणावींत. नाथांच्या पाठीशीं राहून त्यांचें सर्व काम अगदीं चोख करीत असे. ते निजले म्हणजे त्यांचे पाय चेपावे. गिरिजाबाईचा तर तो अगदीं उजवा हात झाला होता. त्यांना भाजी चिरून द्यावी, ताक घुसळून द्यावें. सर्वांना श्रीखंड्या अगदीं हवाहवासा वाटे. त्यांच्याकडे आळस कसा तो नव्हताच. कसल्याहि कामाला तो पुढें असे.

याप्रमाणें बारा वर्षे श्रीखंड्या नाथांच्या घरीं सेवा करीत होता. पण इकडे द्वारकेस एक ब्राह्मण भगवंताच्या दर्शनासाठीं देह जावो अथवा राहो असे निर्धाराचें अनुष्ठान करित होता. त्याला रूक्मिणीनें स्वप्नांत दृष्टांत दिला, " सध्या देव येथें नाहींत कीं वैकुंठांतहि नाहींत. ते राहतात पैठणला. एकनाथांच्या घरीं श्रीखंड्या या नांवानें राहात आहेत. बारा वर्षे झाली. तेव्हां तूं पैठणला जा म्हणजे तुला देव भेटतील. "

ब्राह्मण दुसऱ्याच दिवशी पैठणला निघाला. पैठणला पोचल्यावर त्याला प्रथम भेटला तो नाथांचा कावडीवाला श्रीखंड्या. त्यानें त्याला नाथांचा वाडा दाखविला त्या अनुरोधानें ब्राह्मण नाथांच्याकडे आला. ब्राह्मणाचें स्वागत केल्यावर नाथांनी विचारले कोण आपण ? आपणाला काय पाहिजे ?

" मी द्वारकेचा ब्राह्मण. मला भगवंताचं दर्शन हवं आहे म्हणून येथे तुमच्याकडे आलों. "

भगवंत तर सगळीकडे आहे. तो सर्व चराचर व्यापून राहिला आहे. जिकडे पाहावं तिकडे तो आहेच. "

" महाराज, आपण रागावूं नये. पण हा वेदांत मी पुष्कळ ऐकला आहे. तो आतां मला पाठ झाला आहे. मला त्याचा कंटाळा आला आहे. आतां मला भगवंताचे प्रत्यक्ष सगुण रूपांत दर्शन हवे आहे. म्हणून तर मी इतक्या लांबून आलों. "

" पण मग तो इथं कसा भेटणार आपल्याला ?"

" आपल्या घरीं श्रीखंड्या ब्राह्मण आहे ना. कुठें आहे बोलवा त्याला. "

" श्रीखंड्या "तो कावड घेऊन पाणी आणायला गेला आहे "

" मग त्यानेंच मला तुमचे घर दाखविले. देव त्याच रूपांत आपल्या घरीं वावरत आहे.

त्याबरोबर नाथांनीं सद्गदित कंठानें हांक मारली, श्रीखंड्या ऽऽ श्रीखंड्या "

पण श्रीखंड्या होता कुठे ? उद्धव म्हणाला, "आतांच तर तो इथ होता. "

गिरिजाबाई म्हणाल्या, आतां पाण्याची कावड टाकून देवघरांत गेला. "

पण श्रीखंड्या देवघरांत नव्हता, नदीवर नव्हता. चहूंकडे शोधाशोध सुरू झाली. पण साऱ्या पैठणांत श्रीखंड्या पत्ता लागला नाहीं. तेव्हां समजलें कीं, श्रीखंड्याचा गुप्त झाला. देवाला आपण इतके दिवस उगीच शीण दिला म्हणून त्यांना गहिंवरून आले. नाथांनीं देवाचा धांवा सुरू केला. थोड्याच क्षणांत देवघर प्रकाशानें झळाळून उठलें. चतुर्भुज, श्यामसुंदर श्रीहरी प्रगट झाला. नाथांनी लोटांगण घातलें. द्वारकेच्या ब्राह्मणालाही सगुण रूपांत देवाचें दर्शन झालें. तो नाथांना धन्यवाद देत परत गेला.

कर्नाटकांतील एका गांवांत श्रीमंत सावकार होता. त्यानें श्रीविठ्ठलाची पंचधातूची एक सुंदर मूर्ति तयार करवून ती आपल्या घरीं आणली. नंतर त्या मूर्तीची प्राणप्रतिष्ठा करून तो मुहूर्त शोधू लागला. पण त्या रात्रीं त्याला स्वप्नांत दृष्टांत झाला माझी स्थापना तूं येथे करूं नकोस. गोदावरीच्या तीरावर पैठण गांवांत एकनाथ नांवाचा साधुपुरुष आहे. त्याला ही मूर्ति तूं अर्पण कर. माझी स्थापना तेथच व्हावी अशी माझी इच्छा आहे. तूं हट्टानें येथेच माझी स्थापना केलीस तर परिणाम चांगला होणार नाहीं. "

सावकारानें तिकडे लक्ष दिलें नाहीं. पण दुसऱ्या दिवशीं आणि तिसऱ्या दिवशींहि त्याला तसाच दृष्टांत झाला तेव्हां मात्र ती मूर्ति घेऊन तो पैठणला येण्यास निघाला. पैठणला आल्यावर नाथांच्या वाड्याचा पत्ता विचारीत तो वाड्यांत आला. त्या वेळीं नाथमहाराज पूजेला बसले होते. सावकार सरळ मूर्ति घेऊन देवघरांत गेला आणि मूर्ति नाथांपुढें ठेऊन त्यानें सर्व हकीकत सांगितली.

नाथांनीं ती मनोहर मूर्ति पाहिली आणि ते पांडुरंगाला म्हणाले, "देवा, माझ्याकडे तुम्हांला काय मिळणार ? सावकाराकडे तुला पुष्कळ भोग मिळतील. माझ्याकडे जेवायला साधेसुधे मिळेल."

नाथ एवढे बोलत आहेत तोच मूर्तीच्या विटेवर 'दास, जेऊं घाल नं ' अशीं अक्षरें उमटलीं. तेव्हां पांडुरंगाचीं इथेच राहण्याची इच्छा आहे असे समजून आपल्या हातावर लोण्याचा गोळा घेऊन नाथ मूर्तिजवळ गेले. त्याबरोबर पांडुरंगानें आपला एक हात कटिवरून काढून त्या हातांत लोणी घेऊन चाखले.

नंतर योग्य मुहूर्त पाहून मूर्तीची मोठ्या समारंभानें स्थापना केली. नाथांचें कीर्तन झालें. तो सर्व सोहळा पाहून त्या सावकाराला फार आनंद झाला. तो पुढें महिनाभर पैठणला राहिला. निघण्याच्या दिवशीं तो नाथांना म्हणाला, "महाराज, आपले संबंध कायमचे दृढ व्हावेत अशी माझी इच्छा आहे. मी या पांडुरंगाच्या मूर्तीसारखीच रुक्मिणीची मूर्ति बनवून घेतों. तिच्याबरोबर आपण या पांडुरंगाचें लग्न लावूं. आपण वरपक्षाची मंडळी आणि आमचा वधूपक्ष. रुक्मिणीची मूर्ति तयार होतांच मी आपल्याला कळवितों. मग आपण सर्वांना घेऊन आमच्या गांवीं यावे. "

ही योजना नाथांना पसंत पडली. सावकार संतुष्ट होऊन आपल्या गांवी गेला. तेथें त्यान एक सुंदर रुक्मिणीची मूर्ति तयार करवून नाथांना बोलविणें पाठविलें. नाथ आपल्या परिवारासह त्याच्या गांवीं गेले. तेथे रुक्मिणी पांडुरंगाचा लग्नसमारंभ मोठ्या थाटांत पार पडला. नंतर नाथांच्या हस्तें रुक्मिणीची स्थापना तेथें देवळांत करून ते सर्व पैठणला परत आलें. हा मोठा विजय प्राप्त झाला म्हणून सर्वांनीं त्या मूर्तीला 'विजयीपांडुरंग' असें नांव दिलें.

मनुष्याचा जन्म समाजाच्या कोणत्याहि थरांत झाला असला, तरी त्या जन्मानें व्यक्त होणाऱ्या भेदाचा प्रतिष्ठा ज्ञानानें बाळगू नये, कारण सर्वांचा आत्मा एकच असून त्याचा आदर केला पाहिजे. हें आत्म्याच्या एकत्वाचें रहस्य मनांत बाळगून सर्वांविषयीं समदृष्टि ठेवून वागावें अशी नाथांची शिकवण होती. ब्राह्मण, महार, चोर साव, श्रीमंत गरीब, स्त्री-पुरुष या भेदांचें त्यांच्या बुद्धींतून समूळ उच्चाटन झाले असल्या कारणानें जशी ब्राह्मणांशीं तशीच महारांशीं त्यांची वागणूक असे.

त्या दिवशीं नाथांच्या वडिलांचें श्राद्ध होतें. रीतीप्रमाणें ब्राह्मणांना आमंत्रण गेलें होतें. उद्धवानें सर्व सामग्री जुळविलेली होती. सकाळीच स्नान करून गिरिजाबाई स्वयंपाकाच्या तयारीला लागल्या होत्या. श्रीखंड्या मदत करीत होता.

त्याच वेळीं रस्त्यानें कांहीं महार जात होते. त्यांतील एक जण म्हणाला, " कायरे, हा अन्नाचा सुवास !"

दुसरा म्हणाला, ' अरे, असले अन्न खायला आपण काय बामण आहोंत ?"

त्यांचा संवाद नाथ आंतून ऐकत होते. नाथांना जरासें हंसू आलें; पण लगेच एक विचार करून ते स्वयंपाकघरांत गेले आणि आपल्या पत्नीला म्हणाले, "अहो, तुम्ही केलेल्या स्वयंपाकाच्या वासानें रस्त्यावरून जाणारे काही महार वेडावून गेले आहेत. माझ्या मनात असा विचार आला आहे की, हे अन्न आपण त्यांना देऊ आणि श्राद्धाकरता दुसरे नवे तयार करूं. कसं काय ?"

" यांत मला काय विचारायचं " गिरिजाबाई म्हणाल्या, "आपल्य मनांत आलेला विचार मला कधीं आवडला नाहीं असं कधी झालंय् कां ?"

नाथांनी सगळ्याच महारवाड्याला बोलवायला उद्धवाला पाठविले. भराभर सर्व महारवाडा नाथांच्या वाड्यांत जमला. पत्रावळी मांडल्या, रांगोळ्या काढल्या आणि नाथांनी त्या सर्वांना मनमुराद आग्रह करून जेवण वाढले. ते विडे घेऊन नाथांना धन्यवाद देत निघून गेले.

नंतर गिरिजाबाईंनीं घरादारावें सारवण करून पुन्हा स्नान केलें आणि नवा स्वयंपाक बनविला. पण दुपार टळली तरी निमंत्रित ब्राह्मणांपैकीं कोणीच आले नव्हते. त्यांना निरोप गेला तरी कोणाचाच पत्ता नाहीं. शेवटी उद्धवानें त्यांना कसेंबसें वाड्यांत आणले. सर्व ब्राह्मण खवळलेले होते. ते म्हणाले, "ब्राह्मणधर्म बुडवून तुम्ही हा काय प्रकार मांडला आहे. भानुदासांच्या कुळांत हा काय भ्रष्टाचार !"

नाथ मनाची शांतता राखीत म्हणाले, "पहिला स्वयंपाक आपल्यासाठीच केला होता. पण अंत्यजानी वास घेतल्यामुळे ते अन्न उष्टे झाले होते. ते मी आपणाला कसे वाढूं ?"

" म्हणून काय ते अन्न आमच्या आधीं महारांना खाऊं घालावयाचे ? तुम्ही महारमांगांना जेवायला घालून विटाळ चालविला आहे."

" नाहीं, तसं नाहीं. सडासारवण करून स्नान करून पुन्हा सर्व स्वयंपाक केला आहे. आता लवकर चला. श्राद्धाची सर्व तयारी आहे.

" मग बोलवा कीं तुमच्या पितरांना." ब्राह्मण उपहासानें म्हणाले, "तुम्ही एवढे तत्त्वज्ञान सांगता तर तुमचे पितरही येतील कीं जेवायला !

कधीं न बोलणारा श्रीखंड्या एकदम मधेंच म्हणाला, "जरूर येतील. तुम्ही कांहीं काळजी करूं नका."

असं म्हणून त्यानें नाथांचा हात धरून त्यांना आंत नेले. आंत जाऊन पाहतात तो नाथांचे पितर पाटावर येऊन बसलेले ? श्राद्धकर्म चालविण्याकरताही गांवतल्या ब्राह्मणांचे पितर येऊन बसले होते.

नाथांनीं डोळे मिटून पांडुरंगाचें स्मरण केले आणि श्राद्धकर्माला सुरूवात केली. यथासांग श्राद्धसंकल्प झाला. सर्व ब्राह्मण तृप्त झाले. पिंडदान व्यवस्थित झाले.

नाथांच्या वाड्यांतून पिंडदान वगैरे उरकून विप्रसमुदाय बाहेर पडला होता. त्यांत गावांतल्या ब्राह्मणांचे कोणी वडिल, कोणी आजोबा, कोणी चुलते वगैरे होते. ते पाहून गावांतली सर्व मंडळी अगदी चाट पडली. नाथ हे कोणी लोकोत्तर पुरुष आहेत अशी त्यांची खात्री झाली.

नाथ भागवतावर रोज पुराण सांगत असत. संतांच्या आग्रहावरून त्यांनी भागवताच्या एकादश स्कंधावर टीका लिहीण्यास सुरुवात केली. नाथ रोज वाचून दाखवीत असत आणि त्यांचे चहाते शिष्य ते लिहून घेत असत. दोन अध्याय पुरे झ त्यावर नाथांचा एक शिष्य काशीयात्रेस गेला, त्यानें ते आपल्या बरोबर नेले.

तेथे रोज मणिकर्णिकेच्या घाटावर तो त्याचें नित्यपठण करित असे. ती मधुर शब्दरचना ऐकून लोक त्याच्या भोंवती जमत असत. एक दिवस तेथील एक मोठ्या मठपतींच्या दोन शिष्यांनीं ते पाहिले. भागवतासारख्या पूज्य ग्रंथावर प्राकृत भाषेंतील टीका ऐकून त्यांना भयंकर राग आला. त्यांनी ते वर्तमान आपल्या गुरूंच्या कानावर घातलें. मठपतीनें लागलीच त्या नाथांच्या शिष्याला बोलावून घेतले आणि विचारले, " तूं हे काय चालवले आहेस ? भागवतासारख्या मान्यवर संस्कृत ग्रंथावर प्राकृत टीका कोणी लिहिली ? हा पाखंडी मनुष्य कोण ? मला याचा बंदोबस्त केलाच पाहिजे. का ही टीका तूंच स्वतः लिहीली आहेस?"

तो घाबरून म्हणाला, महाराज, माझ्या अंगी कोठली एवढी विद्वत्ता ! दक्षिणेंत प्रतिष्ठान क्षेत्रांत श्रीएकनाथ नांवाचे एक सत्पुरुष आहेत. सामान्य लोकांना कळावे म्हणून त्यांनी ही टीका प्राकृतांत केली आहे."

त्याबरोबर त्या मठाधिपतीनें दोन शिष्यांना पत्र देऊन नाथांना आणण्याकरतां पाठविले. ते पैठणला पोचले. तोपर्यंत नाथांचे पांच अध्याय पुरे झाले होते. श्रीजनार्दनस्वामींचीही त्या ग्रंथाला मान्यता मिळाली होती.

मठाधिपतीची आज्ञा पाहून नाथांनी उद्धवाला काशीयात्रेची तयारी करण्यास सांगितले. पांच अध्याय बरोबर घेऊन ते काशीस निघाले.

नाथांची शांत, गंभीर मूर्ति पाहून काशीकरांना आनंद वाटला. पण या पाखंडी माणसाचे दर्शन नको म्हणून मठाधिपति, मध्यें पडदा लावून त्याच्याशी बोलूं लागले.

नाथ म्हणाले, "आपण बोलाविलेत म्हणून मी एवढ्या लांबून आलो आहे. मग आपण मला दर्शन कां बरे देत नाही ?"

प्राकृतांत ग्रंथरचना करणाऱ्याला मी पाखंडी समजतो. अशा पाखंड्याचें मी तोंडसुद्धां पाहूं इच्छित नाहीं. तूं देववाणीचा अपमान केला आहेस.

"महाराज, यांत देववाणीचा अपमान आहे असें मला वाटत नाहीं. भागवतासारखा अति गोड ग्रंथ पण तो संस्कृत भाषेंत असल्यामुळे सामान्य लोकांना कळत नाही. सामान्य लोकांपर्यंत हे ज्ञान जावे म्हणून मी हा उपक्रम केला आहे. मला क्षमा करा. पण संस्कृत भाषा काय देवानें केली आणि प्राकृत भाषा काय चोरांपासून झाली. स्वामींनी एकवार हा अनुवाद ऐकावा. आपणाला जर त्यांत कांहीं दोष आढळला किंवा विपरीत अर्थ दिसला तर मी माझ्या हातानें हा ग्रंथ गंगेंत बुडवून टाकीन. पण ऐकून याची परीक्षा करावी."

"ठीक आहे, वाचा तर—"

नाथ शांत चित्तानें आणि गंभीर वाणीनें वाचूं लागले. ऐकणाऱ्या मंडळींत मोठेमोठे विद्वान, दशग्रंथी, तपोनिष्ठ, वेदसंपन्न, तर्कतीर्थ लोक होते. पण नाथांची वाणी ऐकल्याबरोबर सर्व लोक स्तब्ध होऊन ऐकत राहिले. त्यांचे अमोघ वक्तृत्व, मुद्देसूद प्रतिपादन, आत्मप्रत्ययाचा साक्षात्कार यांनीं सर्व श्रोते दिपून गेले. सर्व पंडित डोलूं लागले. नाथवाणीनें मठाधिपतिसंकट सर्वजण संतुष्ट झाले. त्यांनी आणि इतर पंडितांनी आग्रह करून नाथांना काशींत राहूनच ग्रंथ पुरा करण्यास सांगितलें. मठाधिपतीनें तर अगदीच गळ घातली.

त्यांच्या इच्छेला मान देऊन, नाथ काशींत एक वर्षभर राहिले. रोज होईल तेवढा ग्रंथ मणिकर्णिकेच्या घाटावर वाचून दाखवावा. शके १४९५ मध्यें कार्तिक शुद्ध पौर्णिमेला सोमवारी ग्रंथ पुरा झाला नाथांनीं या ग्रंथाला 'एकाकार टीका' असे नांव दिले. लोक त्याला एकनाथी भागवत म्हणून ओळखूं लागले.

ग्रंथ ऐकून मठाधिपतीला तर अत्यंत आनंद झाला. त्यानें नाथांची हत्तीवरून मिरवणूक काढण्याचे ठरविले. तेव्हां नाथ म्हणाले, "तुमचे प्रेम मी जाणतो. पण माझी मिरवणूक न काढता या ग्रंथाची मिरवणूक काढा. तुम्ही पायी चालायचे आणि मी हत्तीवर बसायचे. माझा तेवढा अधिकार नाहीं."

नाथांच्या या सौजन्यपूर्ण आणि नम्र वृत्तीनें सर्वांचा आदर अधिकच दुणावला. सारे काशीकर मिरवणुकींत सामील झाले. बुक्का गुलालाची उधळण झाली. टाळ झणझणू लागले. नाथभागवताचा काशीक्षेत्रीं मोठा जयजयकार झाला.

नाथांचा हा ग्रंथ इतका अद्वितीय झाला कीं तेविसाव्या अध्यायांत नाथ म्हणतात, 'माझ्या गुरूचाही गुरू, जो श्रीदत्त परमगुरू योगेश्वर हे भिक्षुगीत ऐकून संतुष्ट झाला. त्यानें नीट परीक्षा करून मला आदरानें आश्वासन दिले आणि स्वहस्तें मला अभय देऊन हे विवरण ऐकून तो डोलूं लागला."

नंतर काशीक्षेत्रांतील सर्वांचा निरोप घेऊन नाथ पैठणला निघाले. जातांना गंगेची कावड रामेश्वराला घालण्याकरितां भरून नेली होती. ते पैठणजवळ आले तेव्हां दुपार झालीं होती. दुपारचा सूर्य रणरणत होता. गोदावरीची वाळू तापून गेली होती. जवळपास कोठे झाड दिसत नव्हते. अंगातून घामाच्या धारा चालल्या होत्या. इतक्यांत एका गाढवाचें ओरडणें कानीं आलें म्हणून नाथ पाहूं लागलें. एक गाढव गडबडा लोळत होते. बिचारे पाण्यावाचून तळमळत होते.

तें दृश्य पाहून नाथांचें अंतःकरण कळवळून गेलें. त्यांनीं पुढचा मागचा विचार न करतां गंगेचीं आणलेली कावड सरळ याच्या मुखांत पालथी केली. त्याचा आत्मा शांत झाला.

बरोबरीची मंडळी चकित झाली. मोठ्या कष्टानें त्या वेळीं काशीयात्रा घडत असें. आतां रामेश्वराला काय घालणार ? उद्धवानें विचारलें, "आता रामेश्वराला काय घालणार ?"

"हाच माझा रामेश्वर !"

"आपण कांहीतरी बोलता. एक गाढव मेले असते तर काय झाले असते ?"

उध्दवा, गाढव म्हणून कां त्याला मरून द्यायचे ? अरे, देहाचा पडदा दूर केला तर या विश्वांत हरिवाचून काय आहे ? परोपकारांत प्राण झिजवणें हीच खरी भक्ति!"

यावर उद्धव काय बोलणार?

पुढे एक दिवस कांहीं कारण नसतांना नाथांचा घसा सुजला. दिवसभर ते बेचैन होते. त्यारात्रीं नाथांना स्वप्न पडलें. ज्ञानदेवांच्या घशाला अजानवृक्षाची मुळी लागल्या मुळे त्यांना त्रास होत आहे असे त्यांना दिसलें.

सकाळीं उठल्यावर त्यांना आपला घसा दुखण्याचें कारण कळले. ज्ञानदेवांची समाधी आळंदीला होती. म्हणून त्यांनीं ताबडतोब उद्धवाला आळंदीला जाण्याची तयारी करावयाला सांगितली.

मोठा समुदाय बरोबर घेऊन ते आळंदीला निघाले. टाळ मृदंगाच्या गजरांत कांहीं दिवसांत ते आळंदीला पोहचले.त्या वेळी आळंदीला सगळींकडे रान माजलेले होते.

ज्ञानदेवांनी अजानवृक्षाजवळ समाधि घेतल्याचे नाथांनी ऐकले होते. तो अजानवृक्ष कोठे आहे म्हणून त्यांनी शोधाशोध चालविली. शेवटी सर्व मंडळी थकली, तेव्हां ती विश्रांतिकरतां इंद्रायणीच्या तीरावर थांबली.नाथ एकटेच त्या घनदाट अरण्यांत शिरले. मोठ्या कष्टानें वाट काढीत त्यांनी अजानवृक्ष शोधून काढला. समाधीचें दार उघडून नाथ आत शिरले. त्यांना ज्ञानदेवाचे प्रत्यक्ष दर्शन झाले. आत चारी बाजू प्रकाशाने उजळून गेल्या होत्या. सुगंधी द्रव्याचा घमघमाट सुटला होता. ज्ञानदेवांची संपुटे झांकलेली होती. त्यांना नमस्कार करून नाथांनी त्यांच्या घशाजवळ आलेली मुळी दूर केली. नाथांना जवळ घेत ज्ञानदेव म्हणाले, 'नाथा, अरे मुळीचे निमित्त करून तुला बोलविले. माझ्या ज्ञानदेवींत बरेच पाठ अशुद्ध झाले आहेत. ते तूं शुद्ध कर, एवढीच माझी इच्छा आहे.''

नंतर तीन दिवस त्या ठिकाणीं ज्ञानदेव आणि नाथ एकांतात बोलत बसले. नाथांना खूप आनंद झाला. शेवटी ज्ञानदेवांच्या पायावर डोके ठेवून नाथ जड अंतःकरणानें बाहेर आले.

सर्वांना घेऊन नाथ नंतर पैठणला गेले. पुढचे वर्ष त्यांनीं संशोधन करून सर्व ज्ञानेश्वरी शुद्ध केली. पैठणला गोदावरीच्या तीरावर हे काम शके १५०६ मध्ये पुरे झाले, असे त्यांनीच लिहून ठेवले आहे. शुद्ध प्रतीच्या शेवटी नाथांनी स्वतः लिहून ठेवले आहे, 'या शुद्ध केलेल्या ज्ञानदेवींत जो आतां स्वतःची ओवी घुसडील त्यानें सोन्याच्या ताटांत नरोटी ठेविल्यासारखें होईल.

एक दिवस नाथ असेच दुपारी बसले असतां कांखेत पोथीची चवड धरलेला कृष्णदास नांवाचा एक विद्वान् त्यांच्याकडे आला आणि म्हणाला, " महाराज, मी आपल्याला थोडी तसदी द्यायला आलो आहे. माझं एक काम आपण करा."

" जरूर करीन. त्यात तसदी कसली ? "

" मी हा रामायण ग्रंथ रचला आहे. पण तो अजून पुरा झाला नाहीं तेवढा आपण पुरा करावा."

नाथांनी त्याच्याकडचा ग्रंथ पाहण्याकरितां मागितला. ते लिखाण नाथांना फारच आवडले. ते त्याला म्हणाले, "आपणच या ग्रंथाची समाप्ति कां करित नाहीं. मला कशाला करायला लावतां ? "

" माझा मरणकाळ जवळ आला आहे असं ज्योतिषांनी मला सांगितलं आहे. त्यांचे भविष्य अगदी अचुक असते. तेव्हां माझ्या हातून हा ग्रंथ पुरा झाला नाहीं तर तो तुम्ही पुरा करावा."

पण हा तुम्हीच पुरा केलात तर त्याला किती दिवस लागतील ? "

" अकरा दिवस."

" मग आजपासून तुम्ही इथे रहा. अकरा दिवस तुम्हाला मृत्यु येणार नाहीं."

दुसऱ्या दिवसापासून कृष्णदास मुद्गल नाथांच्या वाड्यात राहून ग्रंथ लिहू लागले. अकरा दिवसांत त्यांनीं ग्रंथ लिहून संपवला. ग्रंथ नाथांपुढे ठेऊन नमस्कार केला आणि थोड्याच वेळांत ग्रंथाप्रमाणें कृष्णदासाच्या आयुष्याचीही समाप्ति झाली.

कुतूहलानें जमलेल्या लोकांनी तयारी करून कृष्णदासाची अखेरची महायात्रा काढली.

नाथांच्या वेळीं पैठण गावांत एक संन्यासी राहात होते. ते नमनभक्तीचे आचार्य होते. कोणी भेटले कीं त्याला ते दंडवत घालीत असत.म्हणून लोक त्याला दंडवत-स्वामी म्हणत असत. एकदां ते रस्त्यानें चालले असतां जवळच एक गाढव मरून पडले होते. ते पाहून जवळची कुटाळ मंडळी त्यांना म्हणाली, " काय हो स्वामी, तुम्ही सर्वांना दंडवत घालता ना ? मग या गाढवाला दंडवत घाला कीं ? "

त्याबरोबर स्वामीनीं त्या गाढवाला दंडवत घातला आणि काय आश्चर्य ? ते मेलेले गाढव उठून सरळ चालूं लागले. सर्वजण दंडवत स्वामींची प्रशंसा करूं लागले.

ही हकीकत नाथांच्या कानावर गेली. त्यांनी दंडवत स्वामींची गाठ घतली आणि ते म्हणाले, " महाराज, आपण मेलेल्या गाढवाला कशाकरतां उठविलेंत ? "

" मी मुद्दाम नाहीं तें केले."

पण भक्तानें असं सिद्धीच्या तावडींत सांपडता कामा नये. गावांत कोणी मेले कीं लोक तुम्हाला असाच त्रास देतील."

"मग मी आतां काय करूं ? "

"आतां समाधि घेऊन आपण हरिस्वरूपांत विलीन होणं चांगले."

स्वामींची नाथांवर अपार श्रद्धा होती. नाथांचे म्हणणें त्यांना पटले आणि एका आसनावर स्थिर बसून त्यांनी आनंदाने देहत्याग केला."

झाली ही गोष्ट अगदी सरळ होती.पण पैठणच्या शास्त्री पंडितांनीं नाथांवर ब्रह्महत्येचा दोष लावला. "नाथांनी एका

संन्यासाचा खून केला. त्याचा मोठेपणा नाथांना पाहावला नाही. "असं बोलायला त्यांनी सुरुवात केली.

ती सर्व ब्राह्मणमंडळी नाथांवर बहिष्कार घालावयाला तयार झाली. तेव्हा नाथ म्हणाले, "आपण मला कां दोष देता ? "

"दंडवतस्वामींना तुम्हीच मारलेंत. "

"पण स्वामींनीं स्वेच्छेनें समाधि घेतली. "

"पण ती तुम्ही त्यांना घ्यायला सांगितली. "

"पण ईश्वरसाक्ष मी दोषी नाहीं."

"तुझा दोष नाहीं ना ? मग हा इथे पाषाणाचा नंदी आहे. त्याला तुम्ही कडबा खायला लावा. म्हणजे लोकांना तुमचा निर्दोषीपणा पटेल "

प्रसंग मोठा विचित्र होता. ब्रह्महत्येचे पाप अंगाला चि -टवल्यामुळें नाथांनाही वाईट वाटले. कडब्याची पेंडी हातांत घेऊन ते नंदीजवळ गेले आणि म्हणाले, " तुझ्याकडून ही कडब्याची पेंडी मी खाववावी अशीं या भूदेवांची आज्ञा आहे. तेव्हां तूं या आज्ञेस मान दिलाच पाहिजेस. "

नाथांच्या तोंडचे एवढे शब्द बाहेर पडतांच त्या पाषाणाच्या नंदीने जीभ बाहेर काढून कडब्याचा घास तोंडांत घेतला. नंतर नाथांच्या आज्ञेवरून नंदी चालत गेला आणि त्यानें गोदावरीच्या डोहांत उडी घेतली.

नाथांचा हरिपंडीत नांवाचा एक मुलगा होता. तो मोठा पंडीत होता. पण त्याला नाथांचे प्राकृतांतले पुराण आवडत नसे. देववाणीचा अपमान करून प्राकृतांत विवरण करणें त्याला पसंत नव्हते. पण बापावर त्याचे फार प्रम होते. उघड उघड त्यांचा अपमान त्याला करायचा नव्हता. म्हणून पैठण सोडून त्यानें काशीला जायचा बेत केला. एक दिवस तयारी करून तो बायको मुलांना घेऊन निघाला. नाथांनी त्याला विचारले, "हरिपंडीता, कुठे निघालास ?"

"मी काशीला चाललो. परत येणार नाहीं मी. "

"कां ? "

"तुमचं प्राकृत पुराण, महारमांगांना जेऊ घालणं मला पसंत नाहीं. मला आपल्याशीं वादविवाद करायचा नाहीं. पण मी दूर गेलो की सुखी होईन. "

त्याचा निर्धार पाहून नाथ मग जास्त कांहीं बोलले नाहींत.

हरिपंडीत काशीस जाऊन चार वर्षे झाली. विद्वान् मुलाच्या जाण्यानें नाथांच्या मनालाहि हुरहुर वाटली. काशीक्षेत्रांत हरिपंडिताला चांगली मान्यता मिळाली होती. त्याची समजूत घालून परत आणायचं नाथांनी ठरवले. ते सरळ काशीला हरिपंडिताकडे गेले. वडिल आल्यामुळें त्याला फार आनंद झाला.

दुसऱ्या दिवशी नाथ त्याला म्हणाले, "हरिपंडिता, तू इथे किती दिवस राहाणार आहेस ? चल तू माझ्याबरोबर परत.

"येतों मी पण— "

पण मी मराठींत पुराण सांगायचं नाहीं असंच ना ? ठीक आहे. या पुढे तूंच पुराण सांगत जा. "

"मग हरकत नाहीं. मी पैठणला परत येतो. पण तुम्ही यापुढे परान्नही घ्यायचे नाहीं. "

नाथांनीं तेंही कबूल केले.

घरीं आल्यावर नाथांच्या ऐवजी हरिपंडित पुराण सांगू लागला पण हरिपंडित पुराण सांगू लागल्यापासून गर्दी हळूहळू कमी होऊं लागली. त्यामुळें हरिपंडिताची घमेंडही थोडी कमी होऊं लागली. पुढे तर लोक अगदीच कमी येऊं लागले. एक दिवशीं पुराणाला येणारी एक म्हातारी नाथांना म्हणाली, "नाथ महाराज, माझीं एक विनंति आहे आपल्याला. "

" काय म्हणतां आई ? "

" पूर्वी आमची खूप श्रीमंती होती. पण आतां आम्हाला गरिबी आली आहे. त्यामुळें मनांतला संकल्प तसाच राहिला आहे.

" कसला संकल्प ? "

" सहस्र ब्राह्मण भोजनाचा. आतां मला ते शक्य नाहीं. पण आपल्यासारख्या एका ब्रह्मनिष्ठ ब्राह्मणाला जेऊं घातले तर माझ्या संकल्प सिद्धीस जाईल. "

" पण हल्ली मी कुठेंही जेवायला जात नाही. या हरिपंडितानें कबूल केले तर येईन मी जेवायला. "

तें ऐकून हरिपंडितालाही तिची दया आली. तो म्हणाला, म्हातारे, नाथमहाराज तुझ्याकडे जेवायला येतील. पण मी स्वतः तेथे येऊन स्वयंपाक करून त्यांना वाढीन. चालेल कां तुला ? "

" चालेल. उद्या या. मी वाट पाहाते. "

दुसऱ्या दिवशीं हरिपंडित आणि नाथ त्या म्हातारीकडे गेले. हरिपंडितानें स्वतः आपल्या हातानें स्वयंपाक केला. नाथ जेवायला बसले. शेजारी हरिपंडितही जेवायला बसला. जेवतांना म्हातारीनें हळूच आपण करून ठेवलेला एक पदार्थ नाथांच्या पानांत वाढला. हरिपंडित मनांतून जळमळूं लागला पण तो कांहीं बोलला नाहीं.

जेवण झाल्यावर नाथांनी हरिपंडिताला सांगितले, "हरिपंडिता,आपल्या दोघांच्या पत्रावळी तूच उचलून टाक. म्हातारीला उगीच त्रास नको."

त्याप्रमाणें हरिपंडित पत्रावळी उचलूं लागला. नाथांच्या पुढची पत्रावळ त्यानें उचलली तर त्या खाली दुसरी पत्रा-

वळी. त्याला वाटले चुकून दोन पत्रावळी मांडल्या गेल्या असतील. त्यानें दुसरी उचलली तर त्या खाली तिसरी. एकामागे एक पत्रावळी निघाल्या. तेव्हां त्याला आश्चर्य वाटले. तो पत्रावळी उचलतां उचलतां थकला. एक हजार पत्रावळी त्यानें काढल्या तेव्हां त्या संपल्या.

म्हाताऱ्या बाईचा सहस्र ब्राह्मण भोजनाचा संकल्प अक्षरशः सिद्धीला गेला. हरिपंडित मनांतून अगदी ओशाळला. त्याचा सर्व गर्व नाहींसा झाला. त्याला खूप बोलायचे होते. पण तोंडांतून शब्द बाहेर पडत नव्हता. तो नाथांच्या अक्षरशः पाया पडला.

नाथांनीं त्याला वर उठविले आणि ते म्हणाले, उठ हरिपंडिता, अरे तूं शास्त्र शिकलास. पण माणुसकी शिकला नाहींस. त्यामुळें शास्त्राचा खरा अर्थ तुला समजलाच नाहीं. बुद्धीनें तुला ज्ञान प्राप्त होईल. पण ईश्वरभक्तीनें तुला आणखी कांहींतरी खात्रीनें येईल."

नाथांची अमृतवाणी ऐकून हरिपंडिताच्या हृदयांत श्रद्धेचा दीप तेवूं लागला. त्याचा अहंकार नाहींसा झाला. तो नाथांना म्हणाला,"बाबा, उद्यापासून तुम्ही पूर्वीप्रमाणें पुराण सांगायला लागा आणि यापुढें तुम्हीं कुठंही जेवायला जात जा."

दुसऱ्या दिवसापासून पूर्वीप्रमाणें नाथांनी आपल्या अमृतवाणीनें पुराण सांगण्यास सुरुवात केली. पूर्वीसारखी पुन्हा पुराणास गर्दी होऊ लागली. पैठणच्या लोकांनाही इतके दिवस चुकल्याचुकल्यासारखे झाले होते.

नाथांच्या मनांत एकदा पंढरपूरास जावे असे आलें. त्यांनी पैठण येथील सर्व व्यवस्था उद्धवावर सोपविली आणि उत्तम मुहूर्त पाहून ते सगळ्या मंडळींना घेऊन पंढरपुरास निघाले. पंढरपुराजवळ पोचतांच गावांतील हजारो लोक त्यांना सामोरे आले आणि मोठ्या थाटानें त्यांनीं नाथांना गावांत नेले. सर्व मंडळी श्रीपांडुरंगाच्या देवालयांत आली.

गाभाऱ्यांत जाऊन श्रीविठ्ठलमूर्तीचे दर्शन होतांच नाथांना प्रेमाचे भरते आले. गरुडपारापुढें त्यांचे कीर्तन झाले. चवथ्या दिवशी त्यांनी बडव्यांच्या विनंतीवरून भानुदासांचे चरित्र कीर्तनात लावले. नाथांनी सुरवात केली.

भक्त भागवत पारुषले ।
निःशब्द ते ठेले तुजवीण ।
रखुमाई आई ते जालीसे उदास ।
कैसे पुंडलिकास मौन पडले ॥
भानुदास म्हणे चाले आम्हासवें ।
बाचाऋण देवे आठवावे ॥

याप्रमाणें देवाला भानुदासांनी विजयनगराला जाऊन आळवले. विजयनगरचा राजा रामदेवराव हा एकदां स्वारीवरून येत असता देवदर्शनाकरतां पंढरपूरला गेला. तेथील श्रीविठ्ठलमूर्ति पाहून तो इतका संतुष्ट झाला कीं ही मूर्ति विजयनगरला न्यावी असे त्याला वाटले. मग देवाची आज्ञा मिळविण्याकरितां तो सात दिवस उपाशी बसला. त्या रात्रीं त्याला स्वप्नांत दृष्टांत झाला. "पुंडलिकाकरितां मी या ठिकाणी राहिलो आहे. येथे हरिभक्त माझ्या भेटीला येतात व त्यांच्या सहवासांत माझा वेळ आनंदांत जातो, पण तुझीं इच्छा आहे तर एका अटीवर मी तुझ्याबरोबर विजयनगरला येईन. मला ब्राह्मणांनीं सोवळ्यानें उचलावे व वाटेंत कोठे ठेऊ नये.

सकाळी जागा झाल्यावर राजाला फार आनंद झाला. त्याने प्रधानाला बोलावून घेतले आणि मूर्ति नेण्याकरिता गावोगाव ब्राह्मणांची व्यवस्था करण्यास सांगितले. सर्व तयारी झाल्यावर राजा मूर्तिसमोर हात जोडून उभा राहिला व म्हणाला, " देवा, आता आमच्याबरोबर चलावे."

मग ब्राह्मणांनीं ती मूर्ति उचलली आणि ते विजयनगरकडे निघाले. बडव्यांनी व इतर लोकांनीं मूर्ति न नेण्याविषयी राजाची प्रार्थना केली. पण सत्तेच्या जोरावर राजानें कोणास न जुमानता मूर्ति नेली. विजयनगरांत आल्यावर मोठ्या थाटामाटाने मूर्तीची स्थापना झाली. त्या दिवशी राजाला दृष्टांत झाला, "राजा, तुझ्या आग्रहावरून पंढरपूर सोडून मी येथे आलो, पण माझ्या भक्ताचा छळ तुझ्या हातून केव्हां झाला तर त्याच घटकेस मी पंढरपूरला जाईन."

इकडे पंढरपुरांत आषाढी एकादशीला सर्व संत जमले. पण पांडुरंगमूर्ति नाहीं तर देवळाला काय शोभा ? सगळे हताश होऊन बसले. एवढ्यांत संतशिरोमणि भानुदास पुढे होऊन म्हणाले, "मी पांडुरंगाला विजयनगरहून घेऊन येतो."

असे सांगून भानुदास निघाले. कांहीं दिवसांनी ते विजयनगरला पोचले. पांडुरंगाच्या मूर्तीची त्यांनी चौकशी केली. पण राजाच्या भीतीनें त्यांना कोणीच कांहीं उत्तर दिले नाहीं. शेवटी एका सत्पुरुषाने त्यांना पत्ता सांगितला.

रात्री सगळीकडे सामसूम झाल्यावर भानुदास त्या देवळाकडे गेला.राजा शेजारती करून कुलपे लावून गेला होता. आता काय करावे असा भानुदास विचार करीत आहेत तोंच कुलपे आपोआप गळून पडली. भानुदास थेट पांडुरंगाच्या मूर्तिपुढे गेले आणि देवाला म्हणाले, " देवा, मी तुला घेऊन जाण्यासाठीं आलो आहे."

असें म्हणून भानुदासांनीं देवाला पुष्कळ आळविले देवानें मोठ्या प्रेमानें आपल्या गळ्यांतला रत्नहार भानुदासांच्या गळ्यांत घातला. इतक्यांत पहाट झाल्यामुळें देवानें त्यांना बाहेर पडण्यास सांगितले. नंतर कुलपे पुन्हा होती तशी लागून राहिली.

राजा काकडआरती करण्याकरितां आला तो मूर्तीच्या गळ्यांतला रत्नहार नाहींसा झालेला. ताबडतोब चारी दिशांना सेवक धावले. जारीनें शोध सुरू झाला. नदीच्या वाळवंटांत विठ्ठलस्मरण करित बसलेल्या भानुदासांच्या गळ्यांत तो रत्नहार सांपडला. त्यांना ताबडतोब पकडून राजाच्या समोर आणले गेले. मुद्देमालासह पकडलेल्या चोराला सुळी देण्याचा राजानें हुकूम दिला.

भानुदासांच्या खांद्यावर सूळ देऊन तो ठरल्या जागी नेऊन रोवण्यांत आला. पण भानुदासांनी तो रोवतांच त्याला पालवी फुटली. राजाला हा चमत्कार कळविण्यांत आला, ताबडतोब तो त्या ठिकाणी आला. त्यानें भानुदासांना नमस्कार घातला आणि तो म्हणाला, " महाराज, माझ्याकडून मोठा अपराध घडला. "

नंतर राजा त्यांना घेऊन विठ्ठल मंदिरांत गेला. देवाला नमस्कार करून तो म्हणाला, " देवा, माझ्या हातून चुकून तुझ्या भक्ताचा छळ झाला. "

" पण आतां मी इथे राहणार नाहीं. मी माझ्या भक्ताबरोबर पंढरीला जाणार. " विठ्ठलानें सांगितले

तें ऐकून भानुदास म्हणाले, " देवा मी एकटा तुम्हाला कसा नेऊं ? "

त्याबरोबर ती मूर्ति इतकी लहान झाली कीं ती भानुदासांच्या संबळीत मावली. भानुदासांनी संबळी घेतली आणि राजाचा निरोप घेऊन तें पंढरीची वाट चालूं लागले. पंढरपूरला आल्यावर संबळी खाली ठेऊन तें चंद्रभागेंत स्नानासाठी उतरले. ते स्नान करून परत येतात तो मूर्ति पुन्हा पहिल्यासारखी झाली. मग सगळ्या लोकांनी वाजतगाजत मूर्ति पहिल्या जागीं स्थापन केली. तेव्हांपासून भानुदासांचे नांव संतमंडळाच्या अग्रस्थानी दाखल झाले.

नाथांनी कीर्तन पुरे केले आणि लवकरच ते पैठणला परत आले.

नाथांच्या रोजच्या पुराणाला एक सौंदर्यसंपन्न बाई नियमानें येत असे. साधें शुभ्र वस्त्र, दाट काळे केस, दिव्य अलंकार आणि शरीरावरचे तेज असे दिसे कीं ते ओसंडून जात आहे असें वाटे. ती पुराणाला ठरावीक वेळी यायची आणि ठरावीक वेळेला जायची.

तिला पाहून कांही लोकांच्या मनांत पाप येई. पण तिची शांत मुद्रा व भारदस्त बोलणें, वागणें पाहून ते गप्प बसत असत. पण एक दिवस मात्र ही आहे तरी कोण म्हणून तपास लावायचे त्यांनीं ठरविले.

पुराण संपल्यावर नाथांना नमस्कार करून ती वाड्याच्या बाहेर पडली. त्याबरोबर ही चांडाळचौकडीहि तिच्या मागून जाऊं लागली. ती सरळ घाटाकडे गेली आणि ती घाटाच्या पायऱ्या उतरूं लागली. मागून जाणारे आश्चर्य करूं लागले. तिनीसांजच्या वेळेला ही कशाला घाट उतरत आहे.

ती अगदी पाण्याजवळ पोचली तेव्हां पाठलाग करणारे लोक पाहतच राहिले, ही जावबीव देणार कीं काय, म्हणून त्यांना भीति वाटूं लागली. पण ती पाण्याजवळ पोचली आणि एकदम जणूं काय जलमय होऊन गेली असं दिसलं. ती चांडाळचौकडी आश्चर्य करीत घाटावरच उभी राहिली.

प्रत्यक्ष गोदामाईच स्त्रीरूप घेऊन नाथांचे पुराण ऐकायला येत असत. त्यांची अमृतवाणी ऐकून त्या परत जात असत.

दुसऱ्या दिवशी ती चांडाळचौकडी पुराणाला आली. ठराविक वेळीं गोदामाईही आल्या. तोच नेहमीचा भाव आणि तेच तेज ! त्यांना पाहून त्या पाप्यांची तोंडे मात्र ओशाळली.

पुराण संपल्यावर नाथांनी विचारले, " काय आई, काल कोणी त्रास दिला कां ? आज सोबतीला कोणी देऊं कां ?

" नको, नको. आपली कृपा नेहमी असतेच कीं सोबतीला. "

सर्व श्रोत्यांना या संवादाचा अर्थ कळला नाहीं. मात्र ज्यांना कळायचा त्यांना कळला.

तेव्हांपासून आजसुद्धा पैठणला पुराण असते तेव्हां गोदामाईकरतां पाट मांडून ठेवण्याची पद्धत आहे. आज त्या आपल्याला प्रत्यक्ष रूपांत दिसत नाहींत. पण पटा मांडून ठेवतात.

असेंच एक वडाऱ्याचे जोडपे नाथांच्या कीर्तनाला येत असे. दिवसभर मेहनत करायची आणि रात्री नाथांच्या वाड्यांत किर्तन. एक दिवस ते फारच थकल्यामुळें त्यांना झोंप येऊं लागली. पण कीर्तन तर ऐकावेसे वाटत होते. पण झोंप अनावर झाली म्हणून ते उठले.

थोडा वेळ कुठे तरी पडावे असें त्यांना वाटत होते. इकडे तिकडे पाहात ते पुढें जातात तो त्यांना नाथांची झोपायची खोली दिसली.

आंत पलंगावर मऊ मऊ गादी पसरलेली होती. या वडाऱ्यांना विचार राहिला नाहीं. ते सरळ आंत जाऊन गादीवर पडले. पण थोड्याच वेळांत त्यांना झोप लागली.

कीर्तन संपल्यावर सर्व लोक आपापल्या घरी गेले. आवरावर झाल्यावर नाथ झोंपण्याकरितां गेले, तर ते वडारी त्यांच्या पलंगावर झोपलेले. नाथांना त्यांच्याबद्दल दया आली. त्यांनी आपल्या खांद्यावरची शाल त्यांच्या अंगावर टाकली आणि त्या रात्रीं ते दुसरीकडे झोंपले.

सकाळी त्या वडाऱ्यांना जेव्हां जाग आली तेव्हां त्यांना आपली चूक कळून ते अगदी ओशाळून गेले.नाथांकडे जाऊन ते त्यांच्या पायावर डोके ठेऊन क्षमा मागू लागले. नाथांनी त्यांच्या पाठीवर हात फिरविला आणि ते म्हणाले, "भिऊं नका.अगदी भिऊं नका. आतां घरी जा. देव तुमचे कल्याण करील."

नाथांचा तोंडभर आशीर्वाद घेऊन ते आपल्या घरीं गेलें.

नाथ अशा प्रकारें सर्वांशी प्रेमळपणानें वागत असत. पण कुटाळांनी त्यांचा छळ करून त्यांची परीक्षा पाहण्याचाच बेत केला होता. त्याकरितां एक दिवस कुचार ओटयावर सभा भरली होती. इतक्यांत पावसानें भिजलेला एक प्रवासी तिथें आला आणि त्यांना म्हणाला, " मी गरीब ब्राह्मण आहे. आजची रात्र माझी कुठें सोय होईल कां ?

लोकांना काय, बरंच झालं म्हणायचं ! त्यांनी सरळ त्याला नाथांकडे पाठविला. नाथ झोंपण्याच्या तयारींत होतें. इतक्यांत हा ब्राह्मण तेथें गेला. नाथांनी विचारलें, " आपण कोण ? कोठून आलांत ?"

तो प्रवासी मोठ्या काकुळतीनें म्हणाला, "महाराज, मी परगांवाहून आलो आहे. माझे कपडे पावसानें पार भिजले आहेत. मला भूकही लागली आहे, पण रात्र झाल्यामुळें काय करावें मला कळत नाहीं. आपण माझी सोय लावलीत तर फार उपकार होतील."

पाहुणा अगदीं भिजून गेला होता. म्हणून त्याला ऊब येण्याकरितां लांकडें पेटवावी म्हणून त्यांनीं गिरिजाबाईंना सांगितले. गिरिजाबाई लांकडे घेण्याकरितां बाहेर बघूं लागल्या तों सारी पावसानें भिजलेली. तशीच त्यांनी ती पेटविण्याचा प्रयत्न केला. पण लांकडे पेट घेईनात. गिरिजाबाईंना वाटलें आतां स्वयंपाक तरी कसा होणार ? त्यांना मोठा प्रश्न पडला.

उद्धवानें सारी हकीकत नाथांच्या कानावर घातलीं.नाथ तावडतोब म्हणाले, 'अरे लांकडे ओलीं झाली म्हणून काळजी कशाला ?

"पण लांकडाशिवाय स्वयंपाक कसा होणार ? "

नाथांनी क्षणभर विचार केला आणि ते उद्धवाला म्हणाले "उद्धवा, आतां दुसरा कांहीं उपाय नाहीं. मी सांगतो तुला काय करायचं ते ? "

"सांगा काय करू ? "

"असं कर, माझा पलंग आहे ना ! तोच घे जाळायला. कांहीं हरकत नाहीं. "

पलंग जाळायचा. "

"हो. मग काय करणार ? अतिथी हा परमेश्वर आहे. त्याच्याकरीता पलंग जाळाव लागला तरी काय हरकत आहे· "

याच्यावर उद्धव कांहीं बोलूंच शकला नाहीं. अर्ध्या तासांत पाहुण्यांकरितां जेवण तयार झाले. भुकेला ब्राह्मण जेऊन तृप्त झाला तेव्हां सर्वांनाच समाधान वाटले.

नाथांची भूतदया अशीच नेहमी असे. एक दिवस नाथ दुपारचे बसले असतां एक बाई आपल्या मुलाला घेऊन तेथे आली आणि तिनें त्या पोराला नाथांच्या पुढ्यांत आदळले. त्यामुळे तो मुलगा रडायला लागला.

नाथांनी त्याला मांडीवर घेतलं आणि ते त्याची समजूत करूं लागलें. ते त्या बाईला म्हणाले, "काय, काय केलं ह्यानं ?

"दळभद्र कारटं मेलं ! जन्माला आलं ते बापाला घेऊन गेलं. बापाच्या मुळावर जन्माला आलं."

नाथ हंसू लागले. कारण तेही स्वतः मूळ नक्षत्रावरच जन्मले होते.ते म्हणाले, "मग हा काय मुलाचा गुन्हा झाला.

' तसं नाहीं. पण मग त्यानं शहाणपणानं नको कां वागायला ? "

" हो पण काय केलं त्यानं ?"

" अहो, पोराला खाल्लेलं पचत नाहीं, म्हणून औषध आणलं वैद्याकडून, पैसे नव्हते तर काढले कुठून तरी, आणि हा पोरगा औषध घेत नाही, पथ्यही पाळत नाही. "

" ठीक आहे. मुलाला राहूं द्या माझ्याकडे. मी बघतो काय ते ? तुम्ही जा, "

ती मुलाची आई स्वस्थ चित्ताने निघून गेली.

जेवायच्या वेळेला नाथांनीं मुलाला आपल्या शेजारी बसवले. वैद्यानें जे पदार्थ खाऊं नको म्हणून त्याला सांगितलं होतं ते आपणही नाथांनी खाल्ले नाहीं आणि अर्थात त्यालाहीं वाढले नाहींत. त्यामुळे मुलगाही खूष झाला.

नाथांच्या प्रेमळ वागण्यानें मुलानें औषधही नीटपणें घेतलं. कांहीं दिवसांनीं मुलगा बरा झाला. आई आली आणि नाथांना तोंडभर दुवा देऊन मुलाला घेऊन आपल्या घरीं परत गेली.

तसंच एक दिवस नाथांच्या वाडयांत कीर्तन चालू असतांना तीन चोर गर्दीत शिरले. कीर्तन संपून लोक घरोघर गेल्यावर तिघेजण तसेच लपून राहिले.

सर्व सामसूम झाल्यावर चोर आंतल्या खोल्यांत शिरले व कापडचोपड भांडी वगैरे हाताला लागेल ते उचलले आणि दरवाजाजवळ नेऊन ठेवले. आणखी कांहीं मिळते कां ते पाहात होते. तोंच एकाएकी ते चोर आंधळे होऊन त्यांना कांहीं दिसेनासे झाले.

चालतां चालतां ते त्या भांडयांवर अडखळून पडले. इतक्यांत जाग येऊन नाथ काय झाले ते पाहण्याकरितां आले. त्यांची चाहूल लागल्याबरोबर चोर मनांत समजले कीं या सत्पुरुषाकडे चोरी केल्यामुळेच आपण आंधळे झालो, त्यांनी सरळ नाथांच्या पायावर लोटांगण घातले.

नाथांनी त्यांच्या डोळयावरून हात फिरविताच त्यांना पुन्हा दिसू लागले. नाथांनी त्यांना हस्तस्पर्श केल्यामुळे त्यांच्या वृत्तीतही फरक पडला. चोरून नेण्याकरतां ढीग करून ठेवलेल्या साऱ्या वस्तु त्यांनी नाथांच्या पुढे आणून ठेवल्या.

पण नाथांची समदृष्टि अढळ होती. ते चोरांना म्हणाले, " तुम्हांला फार कष्ट पडले असतील. तुम्ही आता येथे भोजन करा. मग हे सर्व सामान घेऊन खुशाल जा. माझी कांहीं हरकत नाहीं. "

नाथांच्या त्या बोलण्यानें चोर अगदी थिजून गेले, ते कांहींच बोलले नाहींत.

खरोखरीच नाथांनीं त्यांना जेऊं घातले. नंतर जातांना त्यांनीं नाथांच्या पायावर डोके ठेवले आणि ते म्हणाले, " यापुढे आम्ही आता चोरीचा धंदा सोडून देऊं. प्रामाणिकपणें आम्ही आपले पोट भरूं "

एकदा असंच एक दिवस नाथ गंगेवर स्नान करून परत येत असतां एक महार बाई पाणी घेऊन चालली होती आणि तिचे लहान मूल वाळूंत पायास चटके बसल्यामुळें तडफडत होते.

ते पाहून नाथांचे कोमल हृदय हळहळले. त्यांनी जाऊन त्या मुलाला कडेवर घेतले आणि विचारले, " बाळ तूं कुठे राहतोस ! तुझे घर कुठे आहे ?"

मुलाला घेऊन थोडे पुढे गेल्यावर मुलानें खुणेनें आपले घर दाखविले. तेथे गेल्यावर हा महारवाडयांतला मुलगा आहे हे नाथांच्या लक्षांत आलें. म्हणून मुलाला पोचवून ते परत गंगेवर गेले व पुन्हां त्यांनीं स्नान केले.

ही हकीकत ब्राह्मणांना कळतांच सर्वजण अगदी रागानें जळफळले. एकनाथानें धर्म बुडवून भानुदासांच्या कुळाला काळोखी फासली असे म्हणूं लागले. या करितां एकनाथाला प्रायश्चित्त दिले पाहिजे असा त्यांचा ठराव झाला. त्यांनी नाथांकडे जाऊन प्रायश्चित्त घ्यायला पाहिजे म्हणून सांगितले. तेव्हां नाथ म्हणाले, "मी पुन्हा स्नान करून आपली कर्मे केलेली आहेत. प्रायश्चित्त घेण्याला जरूर नाही. पण तुमचा आग्रह असेल तर घेऊन टाकूं. त्यालाही हरकत नाही.

प्रायश्चित्त घेण्याकरतां ते गोदावरीच्या कांठावर आले. इतक्यांत एक कुष्ठरोगी ब्राह्मण नाथांची चौकशी करीत तेथे आला. आल्याबरोबर त्यानें नाथांना साष्टांग नमस्कार घातला व तो म्हणाला, "मला कुष्ठ असल्यामुळे मी त्र्यंबकेश्वराला जाऊन कडकडीत अनुष्ठान केले. अशी बारा वर्षे मी अनुष्ठानांत घालविली. शेवटी मला त्र्यंबकेश्वराचा दृष्टांत झाला कीं, पैठण येथे एकनाथ नांवाचा एक साधुपुरुष राहातो त्याच्याकडे तूं जा. वाळूंत तडफडत असलेल्या एका महाराच्या मुलाला त्यानें घरी पोचविले आहे. ते पुण्य जर तो तुला देईल तर तुझा रोग बरा होईल. त्याकरतां मी आज येथें आलो आहे. आतां आपण जर मला ते पुण्य दिलंत तर माझ्यावर फार उपकार होतील.

तें ऐकून नाथ म्हणाले, " पापपुण्याची कल्पना मला मुळींच नाहीं. पण तुम्ही म्हणत असाल तर तुमच्या हातावर उदक सोडण्यास मी तयार आहे. "

असें म्हणून नाथांनी संकल्प करून त्याच्या हातावर उदक सोडले. त्याबरोबर ताबडतोब तो रोगमुक्त झाला. सर्व ब्राह्मण खजिल होऊन आपापल्या घरी गेले.

गोदावरी कांठच्या एका खेडयांत गावबा नांवाचा एक मठ्ठ मुलगा होता. तो रोज आईकडे पुरणपोळी पाहिजे म्हणून हट्ट धरून बसत असे. एक दिवस आई त्याला म्हणाली, " मी रोजरोज कुठून पुरणपोळी आणूं तुला. पुरणपोळीच पाहिजे असेल तर पैठणला नाथमहाराजांकडे जा. "

तें ऐकतांच गावबानें सरळ पैठणची वाट धरली आणि नाथांकडे जाऊन त्यानें सर्व हकीकत सांगितली. नाथ म्हणाले, " मी तुला रोज पुरणपोळी देत जाईन. पण दुपारी मी भावार्थ रामायण सांगतो तेवढं ऐकत जा. "

" मला त्याची जरूर नाहीं. मी एकनाथ एकनाथ एवढाच मंत्र जपत जाईन. " गावबा म्हणाला.

नाथांना त्याच्या निष्ठेचे फार आश्चर्य वाटले. याच निष्ठेतून त्याच्या अंतरांत हळूहळू प्रकाश पडत चालला होता. रोज दुपारी नाथांचे भावार्थ रामायण चालूंच होते. युद्धकांडाच्या ४४ व्या अध्यायापर्यंत मजल गेली होती. त्या

दिवशी शेवटी नाथ श्रोत्यांना म्हणाले, " मी आतां आपला निरोप घेणार. मला प्रभूचे बोलावणे आले आहे. "

" पण मग हे रामायण कोण पुरे करील. "

" हा गावबा पुरे करील. " असं म्हणून नाथांनी गावबाला जवळ बोलावले. त्याच्या डोक्यावर वरदहस्त ठेवला. त्यावरोबर नाथांना नमस्कार करून गावबानें भावार्थ रामायण सांगण्यास सुरुवात केली. तें ऐकून श्रोते थक्क झाले.

फाल्गुन वद्य पंचमीला त्यांची प्रकृति बिघडली. त्यांना मूर्च्छा आली. तेव्हां एक बाई म्हणाली, " काय हो, इतर लोक मरतात तसेंच हेही मरणार कां ? "

तें ऐकतांच नाथ उठून बसले. ते उद्धवाला म्हणाले, "ठीक आहे. लोकांची इच्छा आहे. तर उद्या जलसमाधि घेऊं. दिंडी तयार करा. "

दुसऱ्या दिवशी शके १५२१ फाल्गुन वद्य षष्ठीला दिंडी निघून गोदावरीच्या वाळवंटात गेली. नाथांनी अखेरचे कीर्तन केले. तेव्हां लोकांनी त्यांना विचारले, " महाराज आपण आतां केव्हां परत येणार ?"

त्यावर नाथांनी पुढील अभंग म्हटला.

" आम्ही कां संसारा न येणें ।
करोनियां हरिभक्ति । रामनाम कीर्ति ।
जड जीव उद्धरणें ॥धृ.॥
साच असतां तरी । धाक धरितां चित्तीं ।
भवविभव प्राप्ति । समूळ मिथ्या ॥ १ ॥
जैं धर्माचि वाट मोडे । अधर्माची शीग चढे
तें आम्हां येणें पडे । संसारस्थिति ॥ २ ॥
नाना मतें पाखांड । कर्मठायीं अतिबंड
तयाचें ठेंचावें तोंड । हरीभजनें ॥ ३ ॥
जे लीला विचित्र । तें तें माझें चरित्र ।
देवभक्त एकत्र । भेद नाहीं ॥ ४ ॥
जो अवतार हरि धरी । तो तो मीच अवधारीं ।
हरि नाम गजरीं । जगदोद्धारा ॥ ५ ॥
सर्व भूतीं भगवद्भावो । भक्तीचा निर्वाहो
धर्माचा अहंभावो । वाढवणें ॥ ६ ॥
सर्व भूतीं भगवद्भक्ति । प्रतिपादावी वेदोक्ति
हेंचि एक निश्चिति । करणें आम्हां ॥ ७ ॥
लीला विग्रही भगवंत । तया म्हणती नित्य मुक्त
आम्हीं काय तेथें । वेगळें असों ॥ ८ ॥
विश्वरूप सृष्टि । अर्जुना दाविली दिठी ।
भिन्न भेदाची गोष्टी । बोलों नये ॥ ९ ॥
वत्सा हरणीचें चरित्र । वत्सें गोवळें स्वयें स्वतंत्र ।
पावे पायतणें कटिसूत्र । आपण जाला ॥ १० ॥
एका जनार्दनीं विश्वरूप गोविंद । भेद धरि तो
निंद्यहि अतिनिंद्य ॥ ११ ॥

नंतर नाथ गोदावरीच्या पाण्यांत शिरले आणि कृष्णकमल तीर्थावर आपला देह विसर्जन केला. त्यांचा पार्थिव देह वर आल्यावर हरिपंडिताच्या हातून अग्निसंस्कार झाला. दुसऱ्या दिवशीं तेथें अश्वत्थाचे एक रोप, तुळस व फुलें उगवली. त्याच्यावर त्यांची समाधि बांधली गेली.

॥ श्री ॥

सार्थ श्रीएकनाथी भागवताची विषयानुक्रमणिका

अध्याय पहिला : १ ते ३३

सद्‌गुरू गणेश, व सरस्वतीस नमन, श्रीजनार्दनस्वामींस नमन, संस्कृत व प्राकृत भाषेचें सादृश्य, भागवतसंप्रदाय परंपरा, परीक्षितीचा वृत्तान्त, संतांनीं नाथांचा केलेला गौरव, नाथांची संतांपाशीं प्रार्थना, संतांची नाथास अनुज्ञा, उपोद्धात, श्रवणाविषयीं उपन्यास, श्रीकृष्णचरित्राची अपूर्वता, श्रीकृष्णहस्तें दैत्यांचें निर्दलन, कौरवपांडवांचा गृहकलहानें नाश, श्रीकृष्णाचा कुळनिर्दलनासंबंधानें चाललेला विचार, श्रीकृष्णमूर्तीचें सौंदर्य, व चित्तादि इंद्रियांची तद्रूपता, चरणाचा महिमा, कीर्तीचा महिमा, श्रीकृष्णसंकल्पानें स्वकुळाचा नाश, श्रीकृष्णांनीं केलेल्या कर्माच्या स्मरणानें मुमुक्षूंच्या सकळ कर्माचें निर्मूलन, श्रीकृष्णकीर्तीचा महिमा, यादवांच्या नाशाची आवश्यकता, संतांचें पिंडारकास गमन, ब्राह्मणांचा प्रभाव, यादवांचा कंदुकविहार, सांबाचें स्त्रीवेषधारण, नारदाची आनंदावस्था; ब्राह्मणाचा महिमा, मुसळाचा उद्भव, यादवांची भयानक स्थिति, व श्रीकृष्णाच्या परोक्ष खलबत, मुसळाचें पिष्टीकरण, व त्याचा परिणाम, श्रीकृष्णाची समर्थता.

अध्याय दुसरा : ३४ ते १००

पिंडारकाहून नारदाचें श्रीकृष्णदर्शनार्थ द्वारकेंत पुनरागमन, नारदाचें वसुदेवगृहीं पुनरागमन व त्याचा सन्मान, नारदाचें यशोवर्णन, भागवतधर्म सांगण्याविषयीं प्रार्थना, स्ववृत्तकथन, पुनः प्रार्थना, नारदाची आनंदावस्था, भागवतधर्माचा महिमा, वसुदेवाची थोरवी, भक्तांच्या स्वानंदतेविषयीं उद्‌गार, ऋषभाची वंशावळी, भरताचा वृत्तान्त, कवि, हरि, अंतरिक्ष, प्रबुद्ध, पिप्पलायन, आविर्होत्र, द्रुमिल चमस, व करभाजन, इत्यादि नव ऋषभपुत्रांचा महिमा, विदेहाच्या होमस्थानीं आगमन, विदेहानें त्यांचा केलेला सन्मान, विदेहाची प्रार्थना, भगवद्‌भक्तांच्या दर्शनाची दुर्लभता, दर्शनाचा महिमा, आत्यतिक क्षेमप्राप्तीचा "भागवतधर्म कोणता ?" भागवत धर्माचा महिमा, भागवतधर्माचें प्रतिपादन, देहबुद्धीचा घातुक परिणाम, भगवद्भक्तीनें इंद्रियनिग्रहता, भगवद्भक्तांस भवभयाची अबाधकता, अज्ञान जीवांच्या उद्धरणार्थ भगवद्भक्तीची प्रगटता, भागवताचें माहात्म्य, मानसिक अर्पण, इंद्रियांचें अर्पण, अभिमानार्पण, चित्ताचें अर्पण, बुद्धीचें अर्पण, कायिक अर्पण, स्वाभाविक अर्पण, मायेचा उद्भव, मायानिरसनार्थ भगवद्भक्तीची आवश्यकता, अभक्तांची दुःखदावस्था, सद्‌गुरुपाद सेवनाची आवश्यकता, सद्‌गुरूचें माहात्म्य, मनःकल्पित भवबंधन, व सर्वत्र ब्रह्मभावनेनें मनाचें नियमन, भगवंताच्या चरित्रश्रवणानें, कीर्तनानें, व नामस्मरणानें अपरोक्षानुभवता, अपरोक्षानुभव भक्तांची स्वानंदता, अद्वैतता, भक्ति, विरक्ति आणि अनुभवाची एकाच वेळीं प्राप्ति, अनन्यभक्तीचा व भक्तांचा महिमा, विदेहाची आनंदावस्था, भक्तांचे विविध प्रकार, उत्तम भक्तांचें लक्षण, मध्यम भक्तांचें लक्षण, प्राकृत भक्तांचें लक्षण, उत्तम भक्तांची विषयीं अभोक्तृतां, इंद्रियादि कर्मीं अलिप्तता, आत्मारामचिंतनानें कामाची निष्कामता, प्राकृत भक्तांच्या देहाभिमानाची भगवद्भावनेनें विरामता, देह, जात, वर्णाश्रमादींची निरहंकारता, देवभक्तांची अनन्यता, अभेदता, निरपेक्षता, चरणमहिमा, नामस्मरणानें हृदयीं प्रगटता, व अनन्यता.

अध्याय तिसरा : १०० ते १७४

अंतरिक्षसंभाषणः—मायाप्रश्नोद्‌भवाची असंभवता, व तत्संबंधाचे दृष्टान्त, मायोद्‌भवाची खूण, मायेचें लक्षण, भूतात्म्याची व्यापकता, जीवशिवाचा आभास, जीवाची विषयावस्था, देहाहंता, कर्मामुळे पुनःपुनः जन्ममरण, प्रळयवर्णन, वैराज पुरुषाचा अव्यक्ती लय, भगवद्‌भक्तीनें पदाची प्राप्ति, पंचभूतें, त्रिविध अहंकार, त्रिगुण, व महत्तत्व यांचा

मायेंत प्रवेश, मायेमुळें त्रिपुटीचा उद्‌भव, स्वरूपी मायेचें मिथ्यात्व, मायोद्भवाचें रहस्य, वैराग्याची आवश्यकता, स्त्रियांच्या आसक्ततेनें मायेची बाधकता, विषयसुखार्थ केलेल्या काम्यकर्माचा दुःखद परिणाम, द्रव्यसंपादन व त्याचा अनिष्ट परिणाम, स्वर्गादि सुखाची नश्वरता, सद्‌गुरुभक्तीनें मायेपासून मुक्तता, विविध गुरूंची लक्षणें, सद्‌गुरूची लक्षणें, सच्छिष्याचीं लक्षणें, असत्संगत्यागार्थ सत्संग, दया, मैत्री, श्रद्धा, इत्यादींची आवश्यकता, साधकांस परब्रह्मप्राप्त्यर्थ साधनोपाय, शौच, तप, तितिक्षा, मौन, स्वाध्याय, आर्जव, ब्रह्मचर्य, अहिंसा, द्वंद्वसाम्यता, सद्‌गुरुप्रबोधानें परब्रह्माचीं प्राप्यता, मनास शमाचें, इंद्रियांस दमाचे, व वाचेस सत्याचें नियमन, कीर्तनानें निर्गुणाची प्राप्यता, निर्गुणानुभवानें कर्माची व दारापुत्रदेहगेहाची कृष्णार्पणता, आत्मदर्शन होईपर्यंत सगुण मूर्ति, प्रतिमा, ब्राह्मण, भगवद्भक्त, व सद्‌गुरु यांच्या पूजनाची आवश्यकता, भक्तीनें हृदयांत आत्म्याची प्रगटता, आत्मदर्शनानें उद्‌भवणाऱ्या आनंदोर्मिचें वर्णन, सद्‌गुरूपाशीं भागवतधर्मशिक्षणानें भगवद्‌भक्तीची प्राप्ति, व मायेचें निर्मूलन, नारायणाच्या सत्तेची व्यापकता, मन, बुद्धि वाचा, प्राण, व इंद्रिये यांस स्वरूपाची अगम्यता, परब्रह्मलक्षण, वेदाचा अनुभव, व शास्त्रांचा मताभिमान, अहंकार-त्यागानें ब्रह्मैकता, ब्रह्मामुळे मायाभास व ॐकाराचा उद्भव प्राणवायूप्रमाणें आत्म्याची अविकारता, तीन्हीं अवस्थांत आत्म्याचें साक्षित्व ब्रह्मीं समरसता, भगवद्‌भक्तीनें चित्ताची निर्मळता, व परब्रह्माची प्राप्यता, कर्म, अकर्म विकर्माचे विवरण, कर्मफळाशेनें पुनःपुनः जन्ममरण, वेदविहित कर्माचरणाची आवश्यकता, ईश्वरार्पणानें कर्माची नैष्कर्म्यता, पूजनादि कर्माचरणास गुरुमुखाची आवश्यकता, पूजेच्या प्रकाराचें विवरण, अपरोक्षानुभवाची प्राप्यता.

अध्याय चौथा : १७४ ते १९९

अवतारांची अनंतता, पुरुषावतारकथन, नरनारायणावतारकथन, नारदादिकांस नैष्कर्म्यलक्षणाचा बोध, व स्वरूपाची प्राप्ति, कामक्रोधादि देवांचें अप्सरांसह बद्रिकाश्रमीं आगमन, नारायणाची निर्द्वंद्वता व शांतता, नारायणानें कामक्रोधादि देवांचा केलेला गौरव, नारायणाच्या सेवेस सौंदर्यसंपन्न स्त्रिया, देवास सुंदर अशा स्त्री घेऊन जाण्याविषयीं आज्ञा, उर्वशीचा इंद्रसभेंत प्रवेश. इंद्राची अनुरक्तता, भगवद्भक्तीनें विघ्नाचें निरसन, हंसस्वरूप, दत्तात्रय, सनत्कुमार ऋषभ, हयग्रीव, मत्स्य, कुर्म, गजेंद्रोद्धरण, मार्कंडेयरक्षण, ऋषींचें रक्षण, नृसिंह, मोहिनी, कुश व लवणासुरनिर्दलन, वामन, परशुराम, रामचंद्र, श्रीकृष्ण बौद्ध, कल्कि, परमेश्वराच्या अवतारचरित्रांची अपारता.

अध्याय पांचवा : २०० ते २४८

पुरुषापासून त्रिगुणमिश्रित वर्णाश्रमाचा उद्भव, भक्तीच्या विमुखतेनें अधःपतनता, स्त्रीशूद्रादि अज्ञ जनांच संतानुग्रहानें मुक्तता, तीन्ही वर्णांचीं अभिमानानें बद्धता, स्वमतानें स्वर्गादि सुखाभिलाषार्थ केलेल्या कर्मानें अधःपतनता, कामक्रोधांचा उद्भव, व साधूंचा उपहास, स्त्रीविषयीं अनुरक्तता, व संन्याशांचा उपहास, आढ्यतां, ईश्वराविषयीं अनास्था, विषयांची स्वाभाविक अभिलाषा, विवाहप्रतिष्ठा, व स्त्रीसंगाविषयीं नियमन, मांसभक्षणानें व सुरापानानें अधःपतनता, शांतिसुखाची प्राप्ति, धनाचा विषयीं व्यर्थ केल्यानें अधःपतनता, मद्य, मांस, व मैथुन यांविषयीं वेदाचें नियमन, पशुहनन केल्याचा दुष्परिणाम, सर्वभूतीं परमात्म्याचें वास्तव्य असल्यामुळें परद्वेषानें अधःपतनता, अज्ञ जनांस संतसेवेनें कैवल्यपदप्राप्ति, ज्ञानभिमान, काम्यकर्म, व वासुदेवाच्या विमुखतेनें अभक्तांस दुर्गतीची प्राप्यता, अभक्तांच्या वर्णनानें वाचेची अशुद्धता, कृतयुगवर्णन; केशवाचें पूजन, मूर्तीचें ध्यान, लोकस्थिति व धर्मनिष्ठा, नामस्मरणाचे दहा प्रकार, त्रेतायुगवर्णन, लोकांची धर्मनिष्ठा, नामस्मरणाचे आठ प्रकार, द्वापारवर्णन; पूजेचे प्रकार, नामस्मरणाचे प्रकार, कलियुगवर्णन; श्रीकृष्णाचें ध्यान, नामसंकीर्तनाचा महिमा, पादसेवनाचा महिमा, श्रीरामाचा पत्नीसह वनवास, युगानु-रूप परमेश्वराचें पूजन, नामसंकीर्तनानें परमानंदाची व चारी मुक्तींचा प्राप्यता, इंद्रादि देवांची व कृतयुगांतील सभाग्य जनांचीं नामसंकीर्तनाविषयीं मनीषा, स्त्रीशूद्रांची नारायणीं तत्परता, द्रविड देशांतील पांचहि नद्यांचा स्थानमहिमा, मुकुंदचरणीं शरणतेनें ऋणत्रयापासून मुक्तता, भगवद्भक्तांस कर्माकर्माची अबाधकता, भागवतधर्माचें व भगवद्भक्तीचें रहस्य, ऋषभपुत्रांची अदृश्यता, विदेहास भगवद्भक्तीच्या अनुष्ठानानें परमपदाची प्राप्यता, भागवतधर्माचरणानें परम-पदाची प्राप्ति, वसुदेवदेवकीचें यशोवर्णन, श्रीकृष्णसमीपतेनें इंद्रियांची पवित्रता, कंसशिशुपालादि शत्रूंची कृष्णध्यानानें मुक्तता, वसुदेवास परब्रह्माची सहज प्राप्यता, श्रीकृष्णाची निर्गुणता, अवताराचें कारण.

अध्याय सहावा : २४८ ते २८४

देवांचें श्रीकृष्णदर्शनार्थ द्वारकेंत आगमन, श्रीकृष्णमूर्तीचें वर्णन, देवांस श्रीकृष्णदर्शनाची उत्सुकता, श्रीकृष्णचरणीं शरणता, मायेचें नियंतृत्व व अलिप्तता, धर्मस्थापनार्थ अवतारधारण, भक्तांचा महिमा, चरित्रश्रवणाचा महिमा, व तप, मंत्र, शास्त्र, दान, कर्म, इत्यादींची निरर्थकता, चरणाचा महिमा, व तत्सिद्धयर्थं भक्तांच्या पूजनादि प्रकारांचें वर्णन. याज्ञिकांचें हवन, योग्यांचें योगसाधन, ज्ञात्यांचा मायाज्ञानार्थ प्रयत्न, मुमुक्षूचें साधन, वनमाळेची महती, चरणाचा महिमा, मायादि अखिल ब्रह्मांडाचें नियंतृत्व, व अकर्तृत्व, गोकुळांतील चरित्रश्रवणाचा, व चरणतीर्थांचा महिमा, देवांच्या आनंदावस्थेचें वर्णन, यदुकुलाच्या निर्दलनानंतर सत्यलोकीं येण्याचें अभिवचन, देवांचें स्वस्थानीं गमन, द्वारकेंत उत्पातांचा उद्भव, ब्राह्मणशापाचा प्रभाव, प्रभासक्षेत्राचें माहात्म्य, यादवांचें प्रभासास गमन, उद्धवाची खेदावस्था, व श्रीकृष्णचरणीं शरणता, सख्यत्वाचें वर्णन.

अध्याय सातवा : २८४ ते ३३९

अवतारकार्याची परिपूर्तता, कलीची प्रबलता, अधर्माची वृद्धि, ब्राह्मणांची स्वधर्मापासून च्युति, व निंदेची प्रवृत्ति, स्वजनविषयक मोहत्यागाची आवश्यकता, स्वरूपध्यासानें अहंकाराचा नाश, व निज- धामाची प्राप्यता इंद्रियांस भासणाऱ्या साकारतेची नश्वरता, भेदामुळें गुणदोषाभास व कर्माकर्मविकर्मोद्भव, श्रीधरमत, मुमुक्षूस विषयत्यागाची आवश्यकता, सर्वभूतीं स्वरूपभावनेनें चित्ताचें परमानंदीं निमज्जन, ज्ञानविज्ञानानुभवानें विघ्नाची, कर्माची व विषयांची अबाधकता, कर्माच्या ठिकाणीं अलिप्तता, शांतीनें सर्वभूतीं भगवद्रूपता, जन्मदुःखविमोचनता, उद्धवाची श्रीकृष्णचरणीं शरणता, कर्मसंन्यासाची व त्यागाची गहनता, देहात्मभावना, गुरुत्वास ब्रह्मादि देवांची योग्यता, शरणता, उद्धवास अहंमहिषासुराची बाधकता, आपला आपण उद्धार करण्याची आवश्यकता, कर्मापासून तरेन किंवा न तरेन, याचा स्फूर्तिरूप अनुभव, जन्ममरणाविषयीं अनुताप, व आपला आपण गुरु, सांख्ययोगानें स्वरूपाची प्राप्यता, नरदेहाची महती, आनुमानिक ज्ञानानें ईश्वराची अप्राप्यता, व अभिमानत्यागानें आत्मानुभव, यदूचें वर्णन, अवधूतवर्णन, यदूच्या भाग्यश्रीचें व अवधूताच्या आदरातिथ्याचें वर्णन, यदूचा गौरव, आत्मज्ञानप्राप्तीस गुरूची आवश्यकता, संसारतरणोपायास सद्बुद्धीची आवश्यकता, गुरूविषयीं स्वानुभव, चोवीस गुरूंचीं नांवें, व त्यांपासून भिन्न भिन्न शिक्षणाची प्राप्यता, पृथ्वीची शांतता पर्वताची परोपकारता, वृक्षाची पराधीनता व आदरता, प्राणवायूची रसादि माधुर्याविषयीं उदासीनता, बाह्यवायूची अनासक्तता, आकाशाची समता, असंगता, निर्मळता, अभेदता, उदकाची स्वच्छता, कोमलता, मधुरता व मळनाशकता, भगवद्भक्तांचा महिमा, अग्नीची तेजस्विता व मळास्पर्शता, गुप्तता व प्रगटता, निराकारता व साकारता, चंद्राची अखंडता, व कळांमुळें वृद्धिक्षयाभास, काळगतीची सूक्ष्मता, सूर्याची अलिप्तता, कपोतकपोतींची कथा, स्त्रीआसक्तीचा दुःखद परिणाम, अन्योन्य प्रेम, कपोतीचें गर्भधारण व प्रसूतिकरण, पिलांचें लालनपालन, लुब्धकाच्या जाळ्यांत पिलांचें बंधन, कपोतकपोतींची विव्हलता, कपोतीचा आत्मघात, कपोताचे उद्गार, परस्त्रियांची निंदा व स्वस्त्रीची स्तुति, कपोताचा आत्मघात, विषयवासनेचा परिणाम, नरदेहाची कर्तव्यता.

अध्याय आठवा : ३४० ते ३७०

स्वर्गसुखाची व नरकाची सादृश्यता, साधूंची विषयीं विरक्तता, प्रारब्धाचें भोक्तृत्व, अजगरास आहाराची व त्याच्या सरस-निरसपणाची अनास्था, समुद्राची गंभीरता, समृद्धतेची व असमृद्धतेची साधर्म्यता, पतंगानुरूप स्त्रीप्रलोभनाचा परिणाम, भ्रमराचें परागसेवन व सारग्रहणता, गृहमक्षिकेची असंग्रहता, मधुमक्षिकेच्या संग्रहतेचा परिणाम, गजाची गजीच्या अंगस्पर्शानें निरुद्धता, अन्योन्यनाश, वेश्यांच्या संगतीचा दुष्परिणाम, मधुहर्त्यास मक्षिकासंग्रहाचा लाभ, मधुहर्त्यास मक्षिकेपूर्वीं मधूचा उपभोग, मृगाची नादलुब्धतेनें निरुद्धता, योषितागायनश्रवणानें मुमुक्षूची साधनापासून च्युति, ऋष्यशृंग ऋषीचा दृष्टान्त, मीनाचा रसनालोलुपतेनें नाश, मुमुक्षूनें रसनेंद्रियें आकलन करण्याची आवश्यकता, परपुरुषाभिलाष, आशेची निराशा, व वैराग्याचा उद्भव, पिंगलेचे उद्गार; हृदयस्थाचें विस्मरण, व परपुरुषाभिलाष, जारपुरु-

अध्याय नववा : ३७० ते ४१०

अध्याय दहावा : ४१० ते ४६८

अध्याय अकरावा : ४६९ ते ५८४

संकल्पविकल्पाच्या नाशामुळें अद्वैतता, देहस्थ गुणांची अस्पर्शता, इंद्रियें, मन व बुद्धि यांची संकल्पशून्यता, मुक्तावस्थेचा मुक्तासच अनुभव, सुखदुःख, व मानापमानाविषयीं उदासीनता, स्तुतिनिंदेची समता, कर्माची अहेतुकता, वाचेची मान्यता, मनाची चैतन्यता, चैतन्यानुभावानें पिशाचवत् वर्तन, शब्दब्रह्मनिष्णात विद्वानाच्या विद्वत्तेची व सन्मानप्रतिष्ठेची निरर्थकता, कुस्त्रीसंगता, पराधीनता, असत्प्रजा, धनलोभ, वाचेची अविकलता, इत्यादींमुळें होणाऱ्या दुःखदावस्थेतचें वर्णन, नामगुणकीर्तनाचा महिमा, जिज्ञासतेनें परब्रह्मप्राप्यता, मनाच्या स्थिरत्वासाठीं भक्ताचा आवश्यकता, कर्मफलत्यागानें भक्ताधिकारता, व भक्तीचा महिमा, भक्तप्रेममहिमा, श्रवण, किर्तन, व नामस्मरण, यांचा महिमा, भक्ताचे मदाश्रयानें व मत्प्रीत्यर्थ धर्मार्थकामाचरण, अभक्तलक्षण, भक्तलक्षण, सनातन भक्तीचें लक्षण, सत्संगतीनें निजभक्तीची प्राप्यता, साधूचीं लक्षणें; कृपाळुता, अद्रोहता, सहनशीलता, सत्यता, अनवद्यता, समता, परोपकारता, अकामता, बाह्येंद्रियांची नियामकता, मृदुता, शुचिष्मंतता, अपरिग्रहता, अनीहता, मितभोजनता, शांतता, स्थिरता, शरणता, मननशीलता, सावधानता, गंभीरता, धीरता, षड्गुणणा जितता, अमानिता, सन्मानता, परबोधता, मित्रता, कारुण्यता, कवित्वता, सर्वधर्मकर्मत्यागता, परमभागवता, भक्तीचीं लक्षणें, प्रतिमापूजन, संतपूजन श्रवण, मनन, ध्यान, दास्य, व आत्मनिवेदन भक्तीचें लक्षण, वैष्णवव्रताचरणाचा, व पर्वकाळमहोत्सवाचा महिमा, प्रतिमेचे स्थापन, पूजन, सेवा इत्यादि प्रकाराचें वर्णन, प्रासादप्रतिष्ठची निरभिमानता, दानाची अवाच्यता, देवाच्या वस्तूची अग्रहणता, प्रिय पदार्थ कृष्णार्पण केल्याचा महिमा. पूजचीं अकरा स्थानें, सूर्य, अग्नि, ब्राह्मण, गो, वैष्णव, आकाश, वायु, उदक, पृथ्वी, निजात्मा, सर्वत्र परमात्मभावना, सगुणनिर्गुणाचा समानता, व निर्गुणाची गहनता, सगुणमूर्तीचें वर्णन, व दर्शनमहिमा, मद्भक्तीचें लक्षण, सगुणनिर्गुणांचो ऐक्यता, कर्मकृष्णार्पणतेनें सद्भक्तीचा उद्भव, सद्गुरुभजनानें सद्भक्तीचो प्राप्यता, ज्ञानापेक्षां भक्ताचा सुलभता व विशेषता, निजभक्तीचा महिमा, संतांपासून निजभक्तीची प्राप्यता, उद्धवयशोवर्णन, व गुह्यज्ञानविषयक उद्‌गार.

अध्याय बारावा : ५८५ ते ६३२

मत्प्राप्तीस कर्म, संन्यास, वेदाध्ययन, योगादि साधनांची निरर्थकता, व सत्संगतीनें मत्प्राप्यता, दैत्य, राक्षस, स्त्री, शूद्र, अंत्यज, खग, मृग, सर्प, इत्यादिकांचें सत्संगतीनें उद्धरण, भावार्थीनें मत्प्राप्यता, सत्संगतीवांचून मत्प्राप्तीचीं दुर्लभता, गोपिकांचें यशोवर्णनः–मत्प्राप्तीस याग, व्रत, दान, तीर्थ, ज्ञान, ध्यानादि साधनाचो निरर्थकता, सत्संगतीनें गोपिकांस निजपदाचा प्राप्यता, मद्वियोगानें गोपिकांची विव्हलता, गोपिकांचें प्रेम व रासक्रीडावर्णन, गोपिकांची मच्चिंतनानें मद्रूपता, गोपिकांच्या कामाभिलाषचें निर्मूलन, सत्संगतीचा महिमा, वेदाचो त्रिगुणता, व तत्प्रेरक कर्माचीं गौणता, वेदादि शास्त्रांचा अविद्यमुळें उद्भव व तत्यागानें विधिनिषेधाची अबाधकता, हृदयस्थास शरण गेल्यानें अविद्येचें निर्मूलन, हृदयस्थाचें स्वरूप, मायेमुळें जीवाभास व कर्माचा कर्तृत्वता, ब्रह्मज्ञानानुभव होईपर्यंत स्वधर्माचरणाची आवश्यकता, जीवाचें मिथ्यात्व, जीवशिवांची चैतन्यता, जीवाच्या कर्मबंधनाचे मिथ्यात्व, जीवाची मनोरूपता, व शरीरसंयोगता, नाथांचे उद्‌गार, सूक्ष्मनादामुळें वाचा, इंद्रियें, त्रिगुण, व त्रिविध तापांची अभिव्यक्ता, जीवशिवांची अभिन्नता, भिन्न भिन्न शक्तींचा उद्भव, अदृष्ट शक्तींचा प्रभाव, भववृक्षाचें वर्णन, भववृक्षापासून फळद्वयाचा उद्भव, सांसारिकांस दुःखफळाची प्राप्यता, वानप्रस्थांस सुखफळाची प्राप्यता, संन्याशास ब्रह्मानंदाची प्राप्यता, सद्गुरुभक्तानें भववृक्षाचें निर्मूलन, सद्गुरुलक्षण, सद्गुरुभक्ति, सद्विद्याशस्त्रानें भववृक्षाचें छेदन, परब्रह्मानुभावानें कर्माचा त्याग, अहतेची बाधकता, व तत्यागाची आवश्यकता, मद्भक्तांस साधनाची अनावश्यकता, शिष्याचें श्रेष्ठ साधन, श्रीकृष्णउद्धवांचें स्वानंदनिमज्जन.

अध्याय तेरावा : ६३३ ते ६९३

गुणांची व आत्म्याची असंबद्धता, गुणाच्या नाशाने सद्विद्येची प्राप्ति, सात्त्विक अन्नसेवनानें सत्त्वाचा उत्कर्ष रजतमाचा नाश, व सद्विद्येची उपलब्धि, सात्विक पदार्थाचें दशलक्षण तामस पदार्थाचे दशलक्षण, राजसपदार्थाचे दशलक्षण, तिन्ही गुणांचें सर्वसाधारण लक्षण,सात्त्विक अन्नसेवनाने सत्त्वाची वृद्धि धर्माची प्रवृत्ति, व ज्ञानाची प्रगटता,

सत्वशुद्धींवांचून गुरूपदेशाची निरर्थकता, भक्तीनें ज्ञानाची प्रकटता, व अविद्येचें निर्मूलन, वैराग्यानें ज्ञानाग्नीची, प्रगटता, व अविद्येच्या नाशानें स्वस्वरूपता, उद्धवास जनाच्या विषयलालसेची विस्मयता, श्रीकृष्णसंभाषण देहात्म–भावनेनें नित्यमुक्ततेचें विस्मरण, व रजोगुणाचा उद्भव, रजोयुक्त मनाची कामभिलाषा, विषयांच्या अनुतापानें मनाचें नियमन करण्याची आवश्यकता, योगाभ्यासानें मनोनिग्रह, सनकादिकांस केलेल्या उपदेशासंबंधाचे उद्गार ब्रह्म-देवाची कर्मजाड्यता, ब्रह्मदेवानें केलेलें परमात्म्याचें चिंतन, हंसरूपानें सत्यलोकीं आगमन, हंसाचा सत्यलोकी सन्मान, व सनकादिकांनीं "आपण कोण" म्हणून विचारलेला प्रश्न, हंसगीतेंत नित्यानित्यविवेकज्ञानाचें प्रतिपादन, उद्धवयशो-वर्णन, आत्मा अद्वैत व देहपंचभूतात्मक असल्यामुळें प्रश्नाची अयुक्तता, आत्म्याची मनोवाचादि इंद्रियांच्या ठिकाणी व्यापकता, विषयत्यागावांचून ब्रह्मज्ञानाची अप्राप्यता, स्वरूपाच्या विस्मरणानें व कर्तृत्वभोक्तृत्वाभिमानानें देहद्वयांचा उद्भव, भक्तीनें अभिमानाचें निर्मूलन, जीवाची तद्रूपता, व देहद्वयाचे निरसन, जीवाचें तिन्ही अवस्थांमध्यें साक्षित्व, अहंममताभिमानानें संसारबंधन, तुर्यानुभवानें चित्ताचा व विषयाचा अन्योन्यवियोग, अहंकारामुळें देहभिमानाची प्रबळता, मद्भावनेनें चित्ताचा तुर्येंत प्रवेश, देहाभिमानाचें निर्मूलन, व जीवाची तद्रूपता, ज्ञानाभिमान, शास्त्राभिमान, व कर्माभिमानादि भेदभावनेनें निजज्ञानाची अप्राप्यता, आविद्यक जनांस वेदाची नियामकता, व भगवद्भक्तांस अनियामकता, आत्म्याचें तिन्ही अवस्थांत साक्षित्व, मायेमुळें गुणावस्थेंत मनाची व्यापकता व भवबंधनता, भवबंधनिरसनार्थ साधुसेवेची आवश्यकता, साधूच्या उपदेशानें ज्ञानखंडाची प्राप्ति, व त्यानें देहाभिमानाचें छेदन, निजहृदयांत आत्मा-रामाच्या भजनाचें माहात्म्य, मनःकल्पित संसाराचा आभास, अलातचक्राचा दृष्टान्त, भगवद्भावनेनें संसारभ्रमाचें निर्मूलन, जीवन्मुक्तस्थितीचें वर्णन, हंसाने सांगितलेल्या ब्रह्मज्ञानाची महती, हंसानें स्वतःच्या व्यापकशक्तींचें व निर्गुण-त्वाचें केलेलें वर्णन, सनकादिकाची निःसंदेहता, व मद्रूपता, सनकादिकांनीं हंसाच्या केलेल्या सन्मानाचें वर्णन, हंसाचें निजधामास गमन.

अध्याय चौदावा : ६९४ ते ७३९

प्रलयकाळीं वेदवचनाची विस्मृति, व पुनः ब्रह्मदेवास मद्भक्तीचा उपदेश, ब्रह्मदेवानें मनु, ऋषी, देव-किन्नर, व दानवादिकांस केलेल्या उपदेशपरंपरेचें वर्णन, प्रकृतिस्वभावानुरूप विविध साधनांचा व मतांचा उपदेश, माया वरणानें जनाची विवेकनष्टता व विषयनिष्ठा, विविध साधनांपासून दुःखरूप फळाच्या प्राप्तीनें अधःपतन, निरपेक्षतेनें ब्रह्मसुखाची प्राप्ति, भक्तांची अकिंचनता, दमनशीलता, शांतता, समता, व सुखसंपन्नता, भक्तांचा सार्वभौमराज्यपदा-पासून सायुज्यमुक्तीपर्यंत त्याग, ब्रह्मदेव, संकर्षण, लक्ष्मी. शंकर, व स्वदेहापेक्षांहि भक्तांची विशेष प्रियता, भक्तांचीं लक्षणें: निरपेक्षता, मननता, शांतता, समता, निर्वैरता, पंचलक्षणयुक्त भक्तांचा महिमा, अकिंचनता, अनुरक्तता, शांतता, महंतता, निर्विषयता, सुखसंपन्नता, भक्तांस विषयांची अबाधकता, भक्तीनें प्रापंचिक जनाची विषयवृत्ति, भक्तीचा महिमा, भक्तीवांचून कर्म, धर्म, सत्य, दया, विद्या, तप आदि साधनांची निरर्थकता, चरित्रश्रवणानें व आत्मचर्चेनें चित्तशुद्धि, भक्तीची प्राप्ति, व देहावर उद्भवणारीं चिन्हें, भक्तीवांचून विषयविरक्तीची व विरक्तीवांचून मत्प्राप्तीची अशक्यता, भक्तीच्या अनुभवाचीं चिन्हें, भक्तीनें अविद्येचें निरसन, व जीवाची परमानंदता, भक्तीनें ज्ञानाची प्रकटता, व जीवाची चैतन्यता, मच्चिंतनानें चित्ताची मद्रूपता, साधकानें इहामुत्रादि भोग व स्त्रीसंगतीचा त्याग करून मद्ध्यान करण्याची आवश्यकता, स्त्री व स्त्रैणसंगतीची बाधकता, उद्धवाची प्रार्थनाः-मुमुक्षूनें "कोणत्या स्वरूपाचें ध्यान करावें ?" श्रीकृष्णसंभाषणः– आसनलक्षण, अभ्यासलक्षण, प्रणवभ्यासानें निजसुखाची प्राप्ति, ध्यानयोगाचें विवरण, ध्यानानें त्रिपुटीचें निर्मूलन, व आनंदानुभवाची उपलब्धि. उपसंहार.

अध्याय पंधरावा : ७४० ते ७६४

भक्तिसाधनांच्या वेळीं सिद्धींचा उपसर्ग, स्वरूपानुभवानें आठ सिद्धींची व शुद्धसत्वगुणसंपन्नतेनें दहा सिद्धींची प्राप्यता, आठ सिद्धीचें वर्णन, दहा सिद्धींचें वर्णन, पांच सिद्धींचें वर्णन, सिद्धींच्या प्राप्त्यर्थ साधनोपाय, आठ सिद्धिः– अणिमा, महिमा, लघिमा, प्राप्ति, प्राकाम्य, ईशिता, वशिता, यत्काम. दहा सिद्धिः– अनूर्मिकत्व, दूरश्रवण, दूरदर्शन,

मनोजव, कामरूप, परकायप्रवेशन, स्वच्छंदमृत्यु, सुरक्रीडाप्राप्ति, संकल्पसंसिद्धि, अप्रतिहत आज्ञा, पांच सिद्धि;– त्रिकालज्ञता, अद्वंद्वता, प्रतिष्टंभ, परचित्तभिज्ञता, अपराजितत्व, भिन्नभिन्न सिद्धींची भिन्नभिन्न धारणेनें प्राप्ति, साधकाला शम, दम, वैराग्य विवेक, मनन, ध्यानादि साधनांनीं सिद्धींची प्रकटता, त्यांची बाधकता, म्हणून तत्त्यागाची आवश्यकता, जन्म, औषधी, तप, मंत्र योगादि साधनानें प्राप्त होणाऱ्या सिद्धींचें वर्णन, मद्भक्तांना सिद्धींची निरिच्छा, श्रीकृष्णांनीं स्वतःच्या प्रभुत्व, विभुत्व व व्यापकत्व या शक्तींचें केलेलें वर्णन, सिद्धीच्या विघ्नांची खूण.

अध्याय सोळावा : ७६५ ते ७९४

भागवताची परंपरा, व स्वकृत टीकेसंबंधानें उद्गार, प्रत्येक अध्यायाचा निष्कर्ष, जनार्दनकृपेचा महिमा, अर्जुनाचा विभूतिविषयक प्रश्न, व त्यास सांगितलेलें ध्यानरहस्य, विभूतींचें वर्णन;–ईश्वरत्व; गति, काळ, अकृत्रिमता, सूत्रक्रिया, महत्तत्त्व, जीव, मन, हिरण्यगर्भ, ॐकार, अकार, गायत्रीछंद, इंद्र, अग्नि, वामन, शंकर, भृगु, हनु, नारद, कामधेनु, कपिल, गरुड, दक्ष, अर्यमा, प्रल्हाद, चंद्र, कुबेर, ऐरावत, वरुण, सूर्य, भूपति, उच्चैःश्रवा, सुवर्ण, यम, वासुकी, शेष, सिंह, संन्यासी, ब्राह्मण, गंगा, समुद्र, धनुष्य, त्रिपुरारी, मेरु, हिमालय, अश्वत्थ, यव, वसिष्ठ, बृहस्पति, कार्तिकस्वामी, ब्रह्मयज्ञ, अहिंसाव्रत, वायु, अग्नि, उदक, वाचा, योग, नीति, आन्वीक्षिकी, विद्या शतरूपा, मनु, नारायण, सनत्कुमार, संन्यासधर्म, क्षमा, सत्यवचन, मौन्य, प्रजापति, संवत्सर, मधुमाधव, मार्गशीर्ष, अभिजित, कृत्ययुग, असित, देवल, व्यास, उशनाचार्य, वासुदेव, उद्धव, हनुमंत, सुदर्शन, पद्मराग, पद्मकळा, कुश, गा ृत, उद्यमलक्ष्मी, कपटयुक्ति, सहनशीलता, सत्त्ववृत्ति, मनाबळ, शरीरबळ, धैर्यबळ, भजनकर्म, वासुदेवादि नऊ मूर्ति, विश्वावसु, पूर्वचित्ती, स्थैर्य, गंध, मधुररस, प्रकाश, तेज, अनाहत ध्वनि, बळी, अर्जुन, उत्पत्तिस्थितिप्रळय. इंद्रियाची अभिव्यक्तता, पंचवीस तत्त्वें, त्रिगुण, क्षत्रक्षेत्रज्ञ, त्रिभूतींची अपारता, मानवी विभूति, विभूतींचे मनोजन्यत्व, व स्वरूपाच्या ठिकाणीं मिथ्यात्व, मन, बुद्धि, इंद्रियें, यांच्या नियमनानें मद्रूपाची प्राप्ति, व संसृतीचें नियमन, इतर साधनाची निरर्थकता, मन, बुद्धि, इंद्रियें व प्राण, यांच्या नियमनाची आवश्यकता, भक्तीनें शांतीचा उद्भव, साधनाचें निर्मूलन, व संसाराची निवृत्ति, संकटसमयीं भक्तरक्षण, भक्तीचा महिमा, श्रीकृष्णउद्धवाची स्वानंदता.

अध्याय सतरावा : ७९४ ते ८३९

शुकानें उद्धवाचें केलेलें यशोवर्णन, जगदुद्धारार्थ योगप्रश्न केल्याबद्दल उद्धवाचा गौरव, वर्णाश्रमधर्म.-कृतयुगवर्णन; वर्ण, ध्यान, व तपश्चरण, त्रेतायुगवर्णन, वेदाची व यज्ञाची, प्रगटता चार वर्णांचा उद्भव, वर्णाश्रमस्थिति, गुणानुरूप वर्णव्यवस्था, ब्राह्मणांचीं लक्षणें,–शम, दम, तप, शौच, संतोष, शांति, आर्जव, निजभक्ति, दया, सत्य, क्षत्रियांचीं लक्षणें,–तेज, बळ, धृति, शौर्य, तितिक्षा, औदार्य, उद्यम, स्थैर्य, ब्राह्मभक्ति, ऐश्वर्य, वैश्यांचीं लक्षणें-द्रव्यलोभ, अर्थसंचय, दाननिष्ठा, ब्राह्मणसेवा, अदंभत्व, शूद्रांचीं लक्षणें:–द्विजसेवा, गोरक्षण, देवसेवा, चारही आश्रमांतील कर्तव्यतेचें संक्षिप्त वर्णन, वर्णबाह्य अंत्यजादि जातींचीं लक्षणें, अशौच, असत्य, चोरी, नास्तिकपणा, शुष्कनिग्रह, काम, क्रोध, लोभ, सर्व वर्णांचें धर्मलक्षणें:–अहिंसा, सत्य, अचौर्य, अकामता, अक्रोधता, निर्लोभता, भूतप्रियहितकारिता, आश्रमधर्मवर्णन,–ब्रह्मचर्याश्रमांत उपकुर्वाण व नैष्ठिक असे दोन भेद, उपकुर्वाण धर्माचरण, व्रतधारण, वीर्यरक्षण, आचार्य, माता, पिता, सूर्य, अग्नि, गो, ब्राह्मण, इत्यादिविषयींचें कर्तव्य, गुरूची महती, युक्ताहार, गुरुसेवा, नैष्ठिक धर्माचरण, यावज्जन्म गुरुसेवेविषयीं, तत्परता, ब्रह्मभावना, स्त्रियांचें अवलोकन, दर्शन स्पर्शन, इत्यादिविषयीं बंधन, सदाचरण, स्वधर्मनियमन, भक्तीची उपलब्धि, उपकुर्वाण, व्रताच्या समाप्तीनंतर गार्हस्थ्य, वानप्रस्थ, अगर संन्यासादि कोणत्याही आश्रमाचें अधिकारानुरूप ग्रहण, भक्तांस आश्रमनियमाची अनावश्यकता, गृहस्थाश्रम, भार्यासंबंधानें युक्तायुक्त विचार, षट्कर्मांचे व त्रिकर्मांचे अधिकारी, ब्राह्मणांना युक्त धर्माचरणानें ब्रह्मसुखाची प्राप्यता, भक्तांचें रक्षण केल्यानें धनिकांची मुक्तता, राजधर्म, ब्राह्मण, क्षत्रिय, वैश्य व शूद्र यांनीं अनुपपत्तिकाळीं कोणत्या रीतीनें उपजीविका करावी, तत्संबंधानें विचार, नित्यकर्म, यज्ञाचरण, स्त्री, पुत्र,

गृहादींची अनासक्तता, अनासक्ततेनें निजमुक्तता, भगवद्भक्तांस आश्रमांतराची अनावश्यकता, वानप्रस्थाधिकारी, संन्यासाधिकारी, अनधिकारी, अहंममताभिमानानें, व कुटुंबाच्या मोहानें अधःपतनता, नरदेहाचें कर्तव्य, ब्राह्मणाची योग्यता.

अध्याय अठरावा : ८४० ते ८७४

वानप्रस्थाश्रम,–वनवासगमन, आहार, निद्रा, वस्त्राच्छादनाविषयीं नियम, तपोलक्षण, फलाहाराविषयीं नियम, वेदोक्त कर्माचरण, निजस्वरूपाची प्राप्ती, कामाभिलाषी वानप्रस्थास मूर्खाची उपमा, संन्यासग्रहण, अगर अग्नींत प्रवेश, संन्यासाश्रम–वैराग्ययुक्त वानप्रस्थाची संन्यासग्रहणता, विधिविधानाची अकर्तव्यता, वस्त्राच्छादनादि नियम, नारायणाच्या अनुसंधानानें मन आदि इंद्रियांची पवित्रता, त्रिदंडलक्षण, आहार, विहार, आचार, विकार, संचार, भक्षेचीं पवित्रस्थानें, विषयांची विरक्तता, स्वरूपानुभवानें प्रपंचाचे मिथ्यात्व, चार प्रकारचे संन्यासी, परमहंसाचे धर्म, हंसाची परमहंसाशीं साधर्म्यता, ज्ञाननिष्ठ संन्याशाचा लोकरक्षणार्थ कर्मकर्तव्यता, वेड्याप्रमाणें वर्तन, वादविषयक भाषणाविषयीं मौन, जनापासून होणाऱ्या उपसर्गाचा सहनता, निर्वैरता, ब्रह्मभावना, आहाराची निरिच्छता, भिक्षेस्तव पर्यटनाची आवश्यकता, युक्ताहार, प्रावरण, व शयनादींचें नियमन, कर्माची निरभिमानता, आत्मदर्शनानें भेदाचें निरसन, प्रारब्धाचे भोक्तृत्व, देहाचें पतन, व स्वरूपीं समरसता, मुमुक्षूची संन्यासग्रहणताः–इहामुत्रभोगादि विषयांची विरक्तता, अयुक्त कर्मांचा दुःखद परिणाम, गुरूस शरण जाण्याची आवश्यकता, गु [illegible]विषयीं तत्परता, विषयार्थी, दांभिक, व अविरक्त संन्याशाचें वर्णन, चारही आश्रमधर्मांचें संक्षिप्त लक्षण, गृहस्थांचें स्वधर्माचरण, मद्भक्ती हाच चारहि आश्रमांचा व सर्व वर्णांचा स्वधर्म, भगवद्भक्तीचें वर्णनः–सर्वभूतीं मद्भावनेनें अनन्यभक्तीची उपलब्धि, अनन्यभक्तीचें लक्षण, स्वधर्मानुष्ठानानें त्रिगुणांचें निर्मूलन. व ज्ञानाची प्रगटता, ज्ञानोदयानें विकल्पाचा त्याग, सर्वभूतीं परमात्म्याचा भास व भक्तीचा उल्हास, भक्तीनें निजस्वरूपाची उपलब्धि, स्वधर्माची उपेक्षा, व सकाम कर्माचा दुःखद परिणाम, स्वधर्मानें भक्तीची उपलब्धि, स्वधर्माचा महिमा.

अध्याय एकोणिसावा : ८७४ ते ९२१

ज्ञानानुभवाचें लक्षण, ज्ञानानें साधनाचा त्याग, ज्ञात्याचें मजवरील प्रेम, ज्ञात्याची पढीयंतता, ज्ञानाची पवित्रता, ज्ञानविज्ञान लक्षण, ज्ञानविज्ञानसंपन्न ज्ञात्याच्या भजनस्थितीचें लक्षण, मुनीश्वराचें ज्ञानसाधन, प्रपंचाचें मिथ्यात्व, व वस्तूचें सत्यत्व, उद्धवाची आनंदावस्था, धर्माची थोरवी, व भीष्माची महती, ज्ञानलक्षण, विज्ञानलक्षण, त्रिगुणांची अंतवंतता, वस्तूचें संतत्व, व प्रपंचाच्या मिथ्यात्वाचीं चार प्रमाणें, इहामुत्रादि भोगाची विरक्ति, भक्तीचें लक्षण, कथा, किर्तन, पूजन स्तवनादिविषयीं आदरता, मद्भक्तांची आदरता, सर्वभूतीं मद्भावना, सर्वकाळ मद्भजनानें मनाची मदर्पणता, द्रव्यदारादि भोगांचा त्याग, व सर्वकर्मांची मदर्पणता, मदर्पणानें मनाची निर्मळता, व स्वरूपता, स्वरूपतेनें चौथ्या भक्तीची उपलब्धि, तीन्ही भक्तींपेक्षां चौथ्या भक्तीचा महिमा, भक्तांचें ऐश्वर्य, भक्तीचें रहस्य, श्रीकृष्णउद्धवांचें प्रेमनिमज्जन, नाथांचे उद्गार, मनाच्या स्वरूपतेचा सुगमोपाय; नामस्मरणानें पापाचें क्षालन, सत्ववृद्धीनें धर्मपरायणता, वैराग्याचा उद्भव, व ज्ञानाची प्रगटता, ज्ञानप्रकाशानें स्वरूपाचें अनुसंधान, व मनाची मदर्पणता, मनाच्या अर्पणतेनें मद्भक्तीची उपलब्धि, अज्ञ जनांतील ज्ञानी, पंडित, भाग्यवंत, मुक्त, राजयोगी, धर्मज्ञ व पवित्र यांच्या संबंधानें विवेचन, परमात्म्याच्या प्राप्त्यर्थ, धर्म, ज्ञान, वैराग्य, ऐश्वर्य, अशा चार लक्षणांचा गुह्यार्थ, यमनियमादि प्रश्नोद्भवाचे कारण, यमाचें बारा प्रकार, नियमाचें बारा प्रकार, यमनियमांचा महिमा, नाथांचे उद्गार, शम, दम, तितिक्षा, धृति, दान, तप, शौर्य, सत्य, ऋत, शौच, त्याग, धन, यज्ञ, दक्षिणा, बळ, भाग्य, लाभ, विद्या, लज्जा, श्री, सुख, दुःख, पंडित, मूर्ख, सन्मार्ग, चित्तविक्षेपता, स्वर्ग, नरक, गुरु, गृह, आढ्य, दरिद्री, कृपण, ईश्वरत्व, प्रश्नाची समाप्ती, साधकानें गुणदोषांपासून अलिप्त रहाण्याची आवश्यकता, ब्रह्मज्ञानलक्षणः–अविद्येमुळें गुणदोषांचा उद्भव व ब्रह्माचे पूर्णत्व, गुणदोषांसंबंधानें वेदरहस्य, आत्म्याच्या ठिकाणीं गुणदोषांचा अभाव, साधकाचें कर्तव्य,

अध्याय विसावा : ९२२ ते ९५९

वेदार्थानुभवास भगवत्कृपेची आवश्यकता, वेदांत कर्मभक्ति ज्ञानाचें प्रतिपादन, व त्याचे भिन्न भिन्न अधिकारी, गुणदोषांच्या अस्तिनास्तीचें रहस्य, कर्मयोग :– विरक्ति उद्भवेपर्यंत कर्माची कर्तव्यता, विरक्तीनें मत्कथेची आदरता व कर्माची अबाधकता, स्वधर्माचरणानें विरक्तीचा उद्भव, अन्यगतीनें स्वर्ग अगर नरकाची प्राप्ति, नैष्कर्म्यानें पापपुण्याचा क्षय, ज्ञानाची प्रगटता, व पराभक्तीची उपलब्धि, नरदेहाची श्रेष्ठता, तत्प्राप्त्यर्थ देवांची मनीषा, व त्याची धन्यता, अधर्माने नरकगति, पुण्यसंपत्तीने स्वर्गप्राप्ति, म्हणून दोन्हींचा त्याग करून भक्तिसाधनाची आवश्यकता, ज्ञानाभिमानानें निरयगतीची प्राप्यता, नरदेहाची नश्वरता, व परमार्थसाधन हीच कर्तव्यता, दृष्टान्त, पक्ष्याची घरट्याविषयीं निरभिमानता, नरदेहाचें क्षणिकत्व जाणून तद्विषयीं वैराग्याची आवश्यकता, वैराग्ययुक्त भक्तीनें देहाभिनाची निरावृत्ति, दुर्लभ अशी नरदेहनौका, मदुपासनेचा सानुकूल वायु, सद्‌गुरूसारखा कुशल कर्णधार नावाडी, अशा सुसंगमानें भवाब्धीचें उल्लंघन व सायुज्यांत निमज्जन, परमार्थास विमुख असणारा, आत्मघातकी व त्यास निरयगतीची प्राप्ति, साधकाची कर्तव्यता, मोक्षापर्यंत कर्मफळाचा त्याग, व स्वरूपाचें अनुसंधान, मनाच्या स्थिरत्वाचा साधनोपाय, साधनानें मनाची स्वरूपता, अश्वाचा दृष्टान्त, पुढील विषयाचें दिग्दर्शन, सांख्ययोग, चैतन्याची व्यापकता व तच्चिंतनानें मनाची उपरमता, विषयांचा वैराग्ययुक्त त्याग व गुरूपदेशचिंतनानें मनाची स्वरूपीं लीनता, योगसाधनानें परमात्म्याची प्रगटता, अन्वीक्षिकी विद्येनें तत्पदप्राप्ति मत्प्राप्तीस, मद्‌भक्ति हेंच सुलभ साधन, योग्याची पापापासून अनुतापानें शुद्धता, वेदाज्ञेचें रहस्य, विषयनिवृत्तीसाठीं कर्मप्रवृत्ती, स्वकर्मानें चित्तशुद्धि, वैराग्याचा व शुद्धसत्वाचा उद्भव, शुद्धसत्वानें गुरुभजनाची प्रगटता, गुरूचें माहात्म्य, अधिकारानुरूप कर्माचरणाची आवश्यकता, भक्तियोग, भक्तीचा अधिकारी, विषयांतून मुक्त होण्याकरतां परमेश्वराचा धांवा, मत्कृपेनें अनुतापाचा व भक्तीचा उद्भव, निदिध्यासानें भ्रांतीचें निरसन व हृदयांत प्रगटता, भक्तीचा महिमा, भक्तीचें रहस्य, भक्तलक्षण; निरपेक्षतेनें अभेद भक्तीची प्राप्ति, निरपेक्ष भक्ताचें ऐश्वर्य, मद्‌भक्तांना गुणदोषांचा अभाव, वेदान्तर्गत तिन्ही कांडांचा निष्कर्ष व त्याच्या अनुष्ठानानें सगुणाची अगर निर्गुणाची प्राप्यता.

अध्याय एकविसावा : ९५९ ते १००५

भक्तिज्ञानोल्लंघनानें सकामकर्माची प्रवृत्ति, व त्याचा दुःखद परिणाम, कर्मामुळें गुणदोषांचा उद्भव, विषयनिवृत्तीसाठीं शुद्धाशुद्धतेचें विवरण, व्यावहारिक आचारवर्णन, स्वधर्मकर्मसिद्ध्यर्थ वेदांत, समविषमतेचें प्रतिपादन, स्वधर्माचरणानें मोक्षाची प्राप्ति; वेदाचा गुह्यार्थ समजण्यास गुरूची आवश्यकता, वेदामुळें जगदुद्धार, उद्धवाचा गौरव, अधिकारानुरूप कर्माचरणासाठीं वर्णाश्रमाचें नियम, देशाची शुद्धाशुद्धता, काळाची पवित्रापवित्रता, द्रव्याची शुद्धाशुद्धता, कर्त्याची शुचिता, शुचित्वाचीं सहा लक्षणें, गुणदोषांचें युक्तायुक्त लक्षण, विषयत्यागार्थ गुणदोषांचें प्रतिपादन, विषयांच्या आसक्ततेनें कामक्रोधोद्भव, व त्यामुळें कर्तव्याकर्तव्याचें विस्मरण, अविवेकानें मूढवत् स्तब्धता, विषयाभिनिवेश भ्रमाचें वर्णन, सकाम अगर निष्काम कर्माची वासनेप्रमाणें फळश्रुति, मूर्खांच्या उद्धारार्थ स्वर्गादिभोगांचीअभिव्यक्तता, प्राणिमात्रांना विषयांची स्वाभाविक अभिलाषा व तत्त्यागार्थ वेदानें विधिनिषेधाचें केलेलें विवरण, सकाम प्राण्यासाठीं फळश्रुतीचें प्रतिपादन, स्वधर्मानें सकाम निष्काम कर्माचें निर्मूलन, सकाम कर्मानें स्वधर्मापासून पराङ्‌मुखता, सकाम प्राण्याची दानता, कृपणता व तमाच्या वृद्धीनें मुग्धता, कामाभिलाषेनें हृदयस्थ परमात्म्याची अप्रगटता, व त्यामुळें अधःपतनता, वेदार्थाच्या अगम्यतेनें सकाम प्राण्यांना स्वर्गादि साधनांची आदरता, याज्ञिकांची यज्ञार्थ पशुहननानें दुःखदावस्था, स्वर्गादि सुख स्वप्नवत् असतांही सकाम प्राण्यांची तद्विषयीं लोलुप्यता, स्वधर्मानुष्ठानानें ब्रह्माची प्राप्यता, सकाम कर्माचरणानें अधःपतनता, गुणानुसार विषयाभिलाषा, व तत्प्राप्त्यर्थ अन्य देव, पितर, भूतादि पिशाचांचे भजन, सकाम कर्माचा अनिष्ट परिणाम, जीवांना कर्मत्याग होऊन ब्रह्मप्राप्त्यर्थ वेदाचें परोक्ष विवरण व त्याचा गुह्यार्थ, वेदाची अर्थतः शब्दतः, दुर्ज्ञेयता, वेदाचे व्यासकृत चार विभाग, व त्याची दुर्बोधता, ब्रह्माची अविकारता व मायेची विकारता, सकाम प्राण्यांना सूक्ष्मनादाची अनावस्था, योग्याला सूक्ष्मनादाचें अनुसंधान, ॐकाराचा उद्भव व त्याची व्यापकता, वैखरी वाचेची अभिव्यक्तता, गायत्रीछंद व त्याचा महिमा, इतर छंद, वेदरहस्याचीं मत्कृपेवांचून अगम्यता, तिन्ही कांडांचा निष्कर्ष, उद्धवाची आनंदावस्था व गुरुकृपेचा महिमा.

अध्याय बाविसावा : १००६ ते १०६६

तत्त्वसंख्येसंबंधानें भिन्नभिन्न मतानुवाद, वादाची सत्त्ववृद्धीनें उपरमता, कार्यकारणानुरूप तत्त्वोपपत्ति, व अनुप्रवेशता, वक्त्याच्या ज्ञानविवक्षेप्रमाणें तत्त्वांची न्यूनाधिकता. सव्वीस तत्त्वांचें विवरण, पंचवीस तत्त्वांचें विवरण, आत्म्याची निर्गुणता, व जीवात्म्याची गुणकर्मी अलिप्तता, त्रिगुण काळ व महतत्त्वाची प्रकृतीसी अभिन्नता, अठ्ठावीस तत्त्वें–प्रकृति, पुरुष, महतत्त्व, पंचमहाभूतें, अहंकार, पंचज्ञानेंद्रियें, पंचकर्मेंद्रियें, मन, पंचविषय व त्रिगुण, प्रकृतीपासून उत्पत्तिस्थितिनिर्दलन पुरुषामुळें प्रकृतीची प्रकाशता, प्रकृतिपुरुषाचें भिन्नत्व, पुरुषावलोकनानें प्रकृतीची महदहंकारादि तत्त्वांशीं एकत्रता, व ब्रह्मांडाचा उद्‌भव, भिन्न भिन्न तत्त्वसंख्येचें विवरण :— सात तत्त्वें सहा तत्त्वें, चार तत्त्वें, सतरा तत्त्वें, सोळा तत्त्वें, तेरा तत्त्वें, अकरा तत्त्वें, नव तत्त्वें, दोन तत्त्वें, एक तत्त्व, निजतत्त्व, सिद्धयर्थ तत्त्वांची न्यूनाधिकता, तत्त्वांचा निष्कर्ष, श्रीकृष्णसंभाषण:— रात्रिदिवसांप्रमाणेंच प्रकृतिपुरुषांचा संबंध पुरुषाच्या अस्तानें प्रकृतीची प्रबलता, अहंकारता, त्रिगुणता, व त्रिविधतापता, त्रिविधतापांची व्यापकता, अहंकाराचा उद्‌भव, व त्याची व्यापकता, प्रकृतिपुरुषांची भिन्नता, आत्म्याची शुद्धता, स्वरूपाच्या विस्मरणानें विषयाभिवृद्धि, देहाभिमाननिरसनार्थ साधनांची आवश्यकता, अज्ञानलक्षण, लिंगदेहयुक्त मनाचा देहाभिमान व त्याचें देहांतर, आत्मा अलिप्त असून आभासाचें कारण, मनाचें विषयांत तादात्म्य, व तदनुरूप देहांतरगमन जननमरणमीमांसा, देहाचें जन्ममरण, व आत्म्याची अविनाशता, मनोजन्य त्रिपुटीचा उद्‌भव, काळगतीचा प्रभाव, आत्म्याचें अखंडत्व, व देहात्मबुद्धीच्या स्फूर्तीचें मिथ्यात्व, आत्म्याची अविनाशता, व देहात्मभावनेनें जन्ममरणाचा आभास, देहाच्या निषेक, गर्भ, जन्म, बाल्य, कौमार, यौवन, तारुण्य, जरा, व मृत्यु, अशा नव अवस्था, मनोजन्य विकारता, आत्म्याची व जीवाची अलिप्तता, व निःसंगता, देहाभिमानामुळें जन्ममरणाचें भोक्तृत्व, विरागी साधकाच्या निजात्मतेची अगम्यता, आत्म्याच्या जननमरणसंबंधानें लौकिक मताचें निरसन, वृक्षाचा दृष्टांत, आत्मज्ञानाच्या विस्मरणानें देहाभिमानाची प्रबलता, व त्रिगुण कर्माचरणानें भिन्न भिन्न योनींत पुनःपुनः जन्ममरण, गायनलुब्ध श्रोत्यांचा दृष्टांत, आब्रह्मस्तंबपर्यंत मनोजन्यविकारता, भवभयाचें विवेकवैराग्यादि साधनानें निरसन व ब्रह्मानंदाची प्राप्यता, साधकांस विषयांच्या अनुतापानें वैराग्याचा उद्‌भव, व सद्‌गुरुकृपेनें त्यांच्या भवभ्रमाचें निर्मूलन, प्रारब्धाचें अवशेष भोक्तृत्व, साधूंच्या शांतीचें वर्णन, उद्धवाची विस्मितता.

अध्याय तेविसावा : १०६६ ते ११४६

उद्धवाचें गौरव, स्वरूपानुभवी साधूंची शांति, प्राकृत जनांना दुर्जनांच्या वाग्बाणाची असह्यता, भिक्षुगीतेचा इतिहास, व त्याचें माहात्म्य, संन्याशाचें दुर्जनांनीं छळण केलें असतांही त्यानें शान्त चित्तानें गाइलेली गाथा, कदर्युब्राह्मणाचा वृत्तांत, व्यवसाय, कर्मभ्रष्टता, व कृपणता, धर्म, कर्म, स्वजन, पांथस्थ, स्वदेहादि कर्तव्यापासून पराङ्मुखता, पुत्र, पत्नी, सहोदर, स्वजन, इत्यादिकांनीं केलेला तिरस्कार, धनरक्षकतेनें इहपरलोकांतील सुखापासून च्युति, स्वधर्म, स्वकर्म व स्वकर्तव्याच्या विमुखतेने धननाश, व स्वजनापासून उपेक्षितता, धननाशाचा उद्वेग, विषयांचा अनुताप, व परमेश्वराचा धांवा, धनलोभाच्या अनिष्ट परिणामाविषयीं भिक्षूचे उद्‌गार, धनापासून पंधरा अनर्थः चोरी, हिंसा, असत्य, दंभ, काम, क्रोध, गर्व, मद, भेद, वैर, अविश्वास, स्पर्धा, स्त्री, द्यूत, मद्यपान, साधकांनीं अर्थत्याग करण्याची आवश्यकता, अर्थापासून पुत्रपत्नीसुहृदांचा अन्योन्य विरोध, कर्मभूमींत नरदेह, व त्यांतहि, ब्राह्मणकुळांत जन्म दुर्लभ असतां धनलोभामुळें देहसार्थक्याची अनास्था, धनाचा युक्तस्थानीं व्यय करण्याची आवश्यकता व न केल्यानें होणारा अनिष्ट परिणाम, अर्थतृष्णेमुळें स्वकर्तव्याचें विस्मरण, विवेकी साधकांची स्वकर्तव्यानें मुक्तता, अधर्मानें अर्थाचा व जरेनें सामर्थ्याचा नाश, मायाभ्रमामुळें धनार्जनाचे प्रयत्न, देहास सौख्य होतें ह्मणावें, तर त्याची मरणोन्मुखता, भगवत्कृपेनें विवेकयुक्त वैराग्याचा उद्‌भव, आत्मज्ञानसाधनार्थ आयुष्याचा व्यय करण्याचा निश्चय परमार्थसाधनाच्या साह्यार्थ सकल देवांची प्रार्थना, कदर्यूला अभिमानत्यागानें शांतीची प्राप्ति. वनांत वास्तव्य, व भिक्षार्थ ग्रामांत संचार, स्वग्रामांत आगमन, व तेथील दुर्जनांनीं केलेलें छळण, त्रिविध प्रारब्धाचें देहास भोक्तृत्व व स्वधर्मनिरततेमुळें शांतीची अढळता, मन हेंच सुखदुःखाचें कारण होय, मनापासून त्रिगुणांचा उद्‌भव, व जीवत्वाचा आभास, मनोजन्य मीपणानें जीवाचा उद्‌भव; व सुखदुःखाचें भोक्तृत्व, दान, स्वधर्म, व्रतादि निष्काम साधनानें

मनोनिग्रहाची साध्यता, मुमुक्षूचें मन निश्चळ असल्यास साधनाची अनावश्यकता, व मन चंचळ असल्यास साधनाची अयुक्तता, मनाची देवादिकांसहि अनिवारता, सद्‌गुरुभक्तीनें मनोजयप्राप्ति, मनाचें दुर्जयत्व, व शत्रु, मित्र, अगर उपेक्षा या तीन साधनांनीं नियमन, मीं व माझें, या मनोजन्य देहात्मभावनेनें सुखदुःखाचें भोक्तृत्व, जन, देवता, आत्मा, ग्रह, कर्म, व काळ हीं सुखद्‌ःखाचीं कारणें नव्हेत, आत्म्याची निर्द्वंद्वता, देहाहंतेचा उद्‌भव, व सुखद्‌ःखाचें भोक्तृत्व, सिद्धांची द्वंद्वसहिष्णुता, विवेकसंपन्न अद्वैतात्मनिष्ठेनें मनोजयाची साध्यता, मकुंदचरणीं अनन्यशरणतेनें विवेकाचा उद्‌भव, व निजशांतीची प्राप्ति, भिक्षूची विवेकयुक्त वैराग्यता, व त्यामुळें शांतीची अढळता, आविद्यक अज्ञानापासून मनाचा उद्‌भव व त्यामुळें सुखद्‌ःखाचें भोक्तृत्व, विवेकानें मनाचें नियमन, व अद्वैताची प्राप्यता, मनोनिग्रहाचा इत्यर्थ, भीक्षुगीतमाहात्म्य.

अध्याय चोविसावा : ११४७ ते ११९३

कपिलानें देवहूतीस सांगितलेल्या ज्ञानानें द्वंद्वाचें निरसन, ब्रह्माचें पूर्णत्व, अहंतेची स्फूर्ति, व प्रकृतिपुरुषांचा उद्भव, वेदाचा उद्भव, व त्यांतील अभेदज्ञानाचा विवेकसंपन्नास अनुभव, ब्रह्माची निर्विकारता, व मायेमुळें प्रकृतिपुरुषांचा उद्भव, पुरुषाची अविकारता, व प्रकृतीची विकारता, प्रकृतीपासून त्रिगुण, महत्तत्त्व, व अहंकार यांचा उद्भव, अहंकाराचे सात्त्विक, राजस, व तामस, असे तीन प्रकार, तामसापासून पंचभूतांचा, राजसापासून दशइन्द्रियांचा, व सात्त्विकापासून इन्द्रियदेवतांचा उद्भव, पंचभूतांच्या एकत्रतेनें ब्रह्मांडाचा उद्भव, नारायणाचा लीलाविग्रह, व नाभिकमलापासून ब्रह्मदेवाचा उद्भव, ब्रह्मदेवाच्या रजोन्धत्वाचें चतुःश्लोकी भागवतोपदेशानें निरसन, व त्रैलोक्याचा उद्भव, सिद्धलोक, सप्तपाताळें, व त्यांत देवदानवादि जीवांचें वास्तव्य, सकामकर्मानें त्रैलोक्यांत पुनः पुनः संसृति, स्वर्गलोकरचना, ध्रुवमंडळ, महर्लोक, जनोलोक, तपोलोक, सत्यलोक, कैलासलोक, वैकुंठलोक, भिन्नभिन्न साधनांनीं भिन्नभिन्न लोकप्राप्ति, मद्भक्तांस सलोकता, समीपता, सरूपता, अगर सायुज्यता मुक्तीची प्राप्ति, अनन्यभक्तांचें प्रेमरहस्य, नाथांचे उद्‌गार, त्रिगुणकाळाची काळसत्ता, व जीवाचें उन्मज्जन व निमज्जन, प्रकृतिपुरुषांची व्याप्ति, वस्तूचें कार्यकारणी अनश्वरत्व व अविद्येचें मिथ्यात्व, ब्रह्म, माया व काळाची अभेदता, ब्रह्मप्रळयांतीं अगर आत्यंतिक प्रळयांतीं ब्रह्माची सनातनता, प्रळयलक्षण–पंचभूतांचा अन्योन्य लय होऊन शब्दतन्मात्रेंत प्रवेश, राजसापासून उद्‌भव व राजसांत लय, सात्विकापासून इंद्रियदेवतांचा व मनाचा उद्भव व लय, शब्दतन्मात्रेचा गुणांसह महत्तत्त्वांत लय, महत्तत्त्वाचा गुणसाम्यांत, गुणसाम्याचा अव्यक्तांत, व अव्यक्ताचा काळांत लय, काळाचा जीवांत लय, जीवशब्दाचें लक्षण, व पुरुषासच जीव असें अभिधान, जीवाचें मिथ्यात्व, व परब्रह्माचें अद्वयत्व, आदिमध्यांत ब्रह्माचें अभिन्नत्व, प्रकृतिपुरुषांचें भिन्नत्व, व प्रकृतीच्या ठिकाणीं स्वातंत्र्याचा अभाव, सांख्यज्ञानानें विकल्पाचें म्हणजे अज्ञानाचें निरसन, सांख्यज्ञानाचा महिमा, सांख्यज्ञानप्राप्तीची खूण.

अध्याय पंचविसावा : ११९४ ते १२२९

पुरुषाच्या ठिकाणीं प्रत्येक गुणाची भिन्नभिन्न अभिव्यक्तता, उद्धवाच्या श्रेष्ठत्वाचें वर्णन, सत्त्वगुणाचीं पंधरा लक्षणें, शुद्धसत्त्वाचें लक्षण, रजोगुणाचीं पंधरा लक्षणें, तमोगुणाचीं सोळा लक्षणें, जीवाची त्रिगुणास्तव गुंतागुंती व सुटकेचा उपाय, त्रिगुणवृत्तीच्या त्रिविध अहंकारांचें व ममत्वाचें लक्षण, त्रिगुणमिश्रित धर्म, अर्थ, काम यांचें लक्षण, सत्त्वयुक्त, रजोयुक्त, व तमोयुक्त, पुरुषांचें लक्षण, सात्त्विक, राजस, व तामस प्रकृति कर्माचें लक्षण, भगवंताचा व मायेचा अन्योन्य संबंध, त्रिगुणास्तव जीवाची सेवकता, व निर्गुणत्वानें आत्म्याची सेव्यता, गुणक्षोभापासून चित्तवृत्तीनें पुरुषाची बद्धकता, भगवत्कथाश्रवण, कीर्तन, व नामस्मरणानें सत्त्वगुणाची वृद्धि, सत्त्वगुणलक्षण, सत्त्ववृद्धीनें विवेक, वैराग्य, स्वधर्म, सुख, शम, व दम, यांचा योग, रजोगुणवृद्धि, रजोगुणलक्षण, रजोगुणवृद्धीनें दुःख, कर्म, यश, व श्री, यांचा योग, तमोगुणाची प्रबळता, तमोगुणलक्षण, तमोगुणवृद्धीनें शोक, मोह, पाप, अविवेक, अधर्म व निद्रा, यांचा योग सत्त्वगुणवृद्धीनें विषयांचा उद्वेग, व भगवत्पदीं अनन्य शरणता, रजोगुणानें विषयाचें चिंतन, व चित्ताची विक्षेपता, तमोगुणवृद्धीनें चित्ताची शून्यता, व मनाची नष्टता, सत्वगुणाच्या दैवी, रजोगुणाच्या आसुरी, व तमोगुणाच्या राक्षसी संपत्तीचें लक्षण, सत्वरजस्तमोगुणांच्या जागृति, स्वप्न, सुषुप्ति, अशा तीन अवस्था, तुर्यावस्था, सत्वगुणानें सत्य-

लोकापर्यंत प्राप्ति, रजोगुणवृद्धीनें शूद्रादि चांडाळ वर्णांत जन्म, तमोगुणाच्या वृद्धीनें स्थावरापर्यंत अधोगति, प्राणोत्क्रमणाच्या वेळीं सत्वगुणाची वृद्धि असल्यास स्वर्गलोकप्राप्ति, रजोगुणाची वृद्धि असल्यास मनुष्यलोकांत जन्म, व तमोगुणाची वृद्धि असल्यास नरकांची प्राप्ति, मद्भक्तीनें वैकुंठाची अगर निर्गुणस्वरूपाची प्राप्ति, त्रिगुण व निर्गुण यांचें चतुर्विध लक्षणः—कर्माचे चार प्रकार, ज्ञानाचे चार प्रकार, निवासाचीं चार स्थानें, कर्त्याचे चार प्रकार, श्रद्धेचे चार प्रकार, आहाराचे चार प्रकार, सुखाचे चार प्रकार, द्रव्य, देश, फळ, काळ, ज्ञान, कर्म कर्ता, श्रद्धा, अवस्था, आकार, व निष्ठा, यांची त्रिगुणात्मकता, पुरुषाव्यतिरिक्त प्रकृतिकार्याचें मिथ्यात्व, त्रिगुणकर्मास्तव जीवाचें बंधन, व त्याचें सद्गुरुभक्तीनें निरसन, नरदेहास्तव मद्भजनानें सत्वगुणाची वृद्धि, विवेकयुक्त ज्ञान व विज्ञानाच्या उद्भवानें त्रिगुणाचें मिथ्यात्व, व ब्रह्माची प्राप्ति, निरपेक्षभक्तीनें शुद्धसत्वगुणाची स्वानंदस्फूर्ति, व त्याचें शुद्धसत्वविवेकानें निरसन, त्रिगुणांच्या निर्मूलनानें लिंगदेहाचा नाश, जीवाचें मिथ्यात्व, व निर्गुणाची प्राप्ति. निर्गुणानुभवानें साधकांची जीवन्मुक्तता, अज्ञानाचें अभेदभक्तीनें निरसन, व निजात्मप्राप्ति, अध्यायांतील विषयाचा निष्कर्ष.

अध्याय सव्विसावा : १२३० ते १२६९

भागवतधर्माचरण हेंच नरदेहाचें कर्तव्य, भागवतधर्मानें परमानंदाची प्राप्ति, जीवन्मुक्तांना मायादि कार्यांचा अभाव, मुमुक्षूंना कुसंगत्यागाची आवश्यकता, पुरूरवावर्णन, उर्वशीवर्णन, अन्योन्य करार, करारांचें उल्लंघन, व उर्वशीचें गमन, पुरुरव्याची विव्हळता, उर्वशीचें धिक्कारयुक्त भाषण व शापकथन, पुरूरव्याला उर्वशीची प्राप्ति, व व कामभोगानें उद्भवलेली विरक्ति, उर्वशीपासून झालेल्या सुखाचें व तिनें केलेल्या अपमानाचें अनुतापयुक्त वर्णन, नारायणावांचून स्त्रीपाशनिर्मोचनाची अशक्यता, कामनिवृत्तीस इंद्रादि देवांच्या यजमानाची अगर वेदादिशास्त्राध्ययनाची निरर्थकता, हृदयस्थ नारायणाच्या प्रगटतेनें कामाचें निर्मूलन, उर्वशीच्या अपराधांपेक्षां स्वतःच्या अपराधांचें आविष्करण, देह दुर्गंधियुक्त असतांहि सौमनस्यादि गुणांचा आरोप, आत्म्याची नित्यमुक्तता, देहाचें जडत्व, व देहाभिमानानें विषयांचें भोक्तृत्व, देहाचे निरनिराळे आठ विभागी असल्यानें देहाभिमानाची विफलता, मी भोक्ता आणि माझा देह, हेंच अधःपतनास कारण, स्त्रीदेहाची कुश्चितता, व तिच्या सौंदर्याला लुब्ध होणाऱ्या जनांस कृमीची उपमा, स्त्री व स्त्रैण संगतीची बाधकता, म्हणून साधकांनीं त्यांच्या संगतीचा त्याग करण्याची आवश्यकता, पुरूरव्याची धन्यता, मत्कृपेचा महिमा, सद्गुरुबोधानें पुरूरव्याचें द्वैतनिरसन, उर्वशीचा त्याग, व स्वानंदांत निमज्जन, दुःसंग त्यागार्थ सत्संगाची आवश्यकता, संतांचीं लक्षणें, निरपेक्षता, मच्चित्तता, प्रशांतता, समदर्शनता, निरहंकारता, निर्ममता, निर्द्वंद्वता, अपरिग्रहता, संतमहिमा-संतमुखींच्या कथाश्रवणानें साधकांच्या सकळ पापाचें क्षालन व चित्ताची शुद्धता, कथाकीर्तनीं अनुराग उद्भवण्यास भगवत्कृपेची आवश्यकता, कथाश्रवणानें अंतरशुद्धता, कथेची स्फूर्ति, गुणकथांच्या श्रद्धायुक्त गानानें प्रेमाचा उद्भव, व मत्परता, मत्परतेनें मद्भक्तीची प्राप्यता, निरपेक्ष भक्तीनें, चारीही मुक्तींचा त्याग, अनन्यभक्तीनें आनंदानुभवाची प्राप्यता, सत्संगतीनें द्वंद्व, अज्ञान, व मरणभयाचें निर्मूलन, जीवाच्या उन्मज्जननिमज्जनाचें संतनौकाश्रयानें उद्धरण, अन्नानें प्राणपोषण, धर्मानें ऐहिक परलौकिक सुख, नारायणास शरण गेल्यानें त्रिविधतापनिवारण, तद्वत् सत्संगतीनें भवभयनिर्मोचन, सूर्योदयानें सृष्टिस्थित्यंतराची व सत्संगसूर्योदयानें अंतरस्थित्यंतराची तुलना, सूर्यापेक्षां संतांचा विशेष महिमा, संत हेच जीवांना देव, बंधु, सुहृद, आत्माराम असून, त्यांच्याच संगतीनें साधकांची निर्मुक्तता, पुरूरव्याचा जन्मवृत्तान्त, आत्मानुभवानें उर्वशीचा, स्वर्गादि भोगांचा, व देहसंगतीचा त्याग, व निःसंग संचार.

अध्याय सत्ताविसावा : १२७० ते १३०४

आगमनिर्गमोक्त, पूजाविधानाची अपारता, व त्याचें संक्षिप्त निवेदन, पूजाविधीचे वेदोक्त, आगमोक्त, व मिश्र असे तीन प्रकार, वेदोक्तकर्मास ब्राह्मण, क्षत्रिय, व वैश्य, असे तीन वर्ण अधिकारी, पूजेचीं आठ स्थानें, शौच, दंतधावन, स्नान, संध्या, व संकल्परहित नित्यकर्मानें चित्ताची शुद्धता, पूजेचीं आठ स्थानें:—सकाम व निष्काम भक्तांन, पूजाद्रव्योपचाराविषयीं उपन्यास, प्रतिमेला स्नान, अलंकार, व भोजनादि उपचार, स्थंडिल ,अग्नि, सूर्य, उदक

हृदय, ब्राह्मण, सद्‌गुरु, अनन्यभक्तांच्या भावयुक्त उदकानेंहि संतोष, अभक्तांच्या गंधधूपदिपादी नानाद्रव्यार्पणानेंही संतोषाचा अभाव, पूजाविधि, स्नान, पूजासंभार व आसन, नमन, न्यास, ध्यान, व कलशादि पात्रांचें पूजन, पाद्य, अर्घ्य, व आचमनोदक, देहशुद्धि, व अण्वीनामक जीवनकळेच्या साकार मूर्तीचें ध्यान, सगुणमूर्तिधानानें अभेदभक्तीचा उद्भव, अभेदभक्तीचा महिमा, अभेदभक्ताचा महिमा, श्रीकृष्णोद्धवांची स्वानंदैक्यता, मूर्तीचें आवाहन, व न्यास पाद्य, अर्घ्य, आचमन, मधुपर्क, पीठावरण, आसन, व भक्तभाव, आयुधांचें पूजन, पार्षदांचें पूजन, दुर्गाविनायकादि देवांची प्रतिष्ठा व पूजन, सुवासिक द्रव्योदकानें समंत्रक अभिषेक, वस्त्रालंकारादि भूषणें, पाद्य, अर्घ्य, आचमन, मधुपर्क, गंध, अक्षता, पुष्प, धूप, दीप, व नीराजनादि उपचार, नानापदार्थयुक्त भोजन, वार्षिकपर्वांच्या, पूजोपचारांचें दिग्दर्शन, आगमोक्त होमाचा विधि, कुंडरचना, व अग्निप्रतिष्ठा, मूर्तीचें ध्यान, समिधा व अवदानादि उपचार, नमन, बळिहरण, नारायणाचें ध्यान, व मंत्रजप, पूजाविधि, आचमन, करोद्वर्तन, तांबूल व पुष्पांजली, नामस्मरण, कथा, कीर्तन, नृत्य, व अभिनय, स्तोत्र, पठण, कथानिरूपण, प्राकृतस्तवन, व नमन, साष्टांग नमनाचें लक्षण, प्रसादग्रहण व पूजासमाप्त, पूज्यमूर्तींच्या श्रद्धायुक्त पूजनानें भक्तांचा उद्धार, उपासनाकांडरहस्य, उपरिनिर्दिष्ट पूजविधीनें भक्तांस ऐहिक पारलौकिक सिद्धींची प्राप्यता, देवलय बांधून त्यांत मूर्तीची प्रतिष्ठा, पूजादि, वार्षिक उत्सवार्थ क्षेत्रगामादि वर्षासन, व त्यापासून मिळणारी फळश्रुति, साधकांची निष्कामभक्तीनें मदैक्यता, साधकांना हितोपदेश, दुर्गुणवर्णन, नामस्मरणानें कर्माकर्माचें निर्मूलन,

अध्याय अठ्ठाविसावा : १३०५ ते १३६२

त्रिगुणामुळें स्तुतिनिंदेची प्रवृत्ति, म्हणून गुणदोष न पाहातां सर्वत्र भगवद्भावनिरीक्षणाची आवश्यकता, स्वरूपीं अविद्यादि कार्याचें मिथ्यात्व, वेदवचनाचें रहस्य, आदिमध्यांतीं वस्तूची अभिन्नता, मायेमुळें प्रपंचाभास, संतांना ज्ञानविज्ञानानुभवानें सर्वाभूती समता, प्रपंचाच्या नश्वरतेची चार प्रमाणें, म्हणून मुमुक्षूनें तद्विषयीं उदासीन असण्याची आवश्यकता, संसारबद्धतेचीं खूण, देहेंद्रिये प्राणमनआदि धर्माच्या अहंभोक्तृत्वानें पुनः पुनः संसृति, संसाराचें मिथ्यात्व, आभासाचें कारण, जीवाची विषयसेवनानें बद्धता, बद्धमुक्तांचा भिन्नभिन्न अनुभव, देहाहंतेमुळें शोकहर्षादि गुणवृत्तीचें व जन्ममरणाचें भोक्तृत्व, जीवाची अहंतात्यागानें शुद्धता, पण अहंतेला कल्पांतीही मुक्ततेचा अभाव, आत्म्याची परात्परता, मायेचें अधिष्ठान, व्याप्त, व जीवाची अहंतेनें बद्धता, देहाहंतेचें निर्मूलत्व देहाहंतेच्या उद्भवाची खूण, आचार्योपास्तीनें ज्ञानखड्गाची प्राप्ति, व त्यानें देहाहंतेचें छेदन, देहाहंतेच्या छेदनानें साधकांचा निःसंग संचार, विवेकज्ञानानें ब्रह्मैक्यता, शब्दज्ञानानें पावनता, तपानें अनुताप व अनुतापानें आनुमानिक ज्ञान, प्रत्यक्ष ज्ञानोपलब्धि, प्रत्यक्षज्ञानोपलब्धिचें साधन, प्रत्यक्षज्ञानोपलब्धिच्या फळाचें वर्णन, प्रत्यक्षज्ञानोपलब्धिनें तीन्ही अवस्थेत अविकारता, तुर्यानुभव, तुर्यानुभवानें प्रपंचाचें मिथ्यात्व, मनामुळें प्रपंचाभास, निर्दिष्ट ज्ञानानें साधकाच्या संदेहाचें छेदन, व स्वानंदाची उपलब्धि, साधकांना आत्मानुभवानें प्रकृति व तत्कृतकार्याचा अभाव, अपरोक्षज्ञानानें इंद्रियकर्माची अबाधकता, व गुणदोषी अलिप्तता, स्वरूपाच्या विस्मरणानें अहंतेचा उद्भव, व त्यामुळें विषयांची बाधकता, अहंतेचे मद्भक्तीनें निर्मूलन, भक्तीचा महिमा, भक्तांस विषयांची अबाधकता, विषयार्थी साधकांना कुयोगानें संसृतीची आपदा, परमार्थी साधकाच्या बिन्धाचे अनुतापानें निरसन, व पुनर्जन्मात कर्माची अस्पर्शता, अज्ञान्याला अहंकर्तृत्वामुळ कर्माचें बंधन, व ज्ञान्याला निरभिमानानें अबंधन, ज्ञान्याची देहीं देहातीनता, व देहकर्मी अलिप्तता, अज्ञानामुळें विकारता, भक्तीनें अज्ञानाचें निर्मूलन, आत्म्याची निर्विकारता, ज्ञानाज्ञानी अलिप्तता, स्वयंप्रकाशता, अप्रमेयता, अनिर्वाच्यता, स्वतःसिद्धता, व निर्द्वंद्वता, व पंचाभासाचें कारण, पंडिताच्या म्हणजे पूर्वमीमांसकाच्या मताची अयुक्तता म्हणून त्यांच्या संगत्यागाची आवश्यकता, साधकाच्या अंतरायनिवृत्तीचा उपायः- योग्यांना उपसर्गाची बाधकता, उपसर्गाचें तप, मंत्र, ध्यान नामसंकीर्तन, सत्संग, इत्यादि साधनें निर्मूलन योग्यांचे नश्वर देहाच्या अमरत्वार्थ निरर्थक प्रयत्न, ज्ञान्याचा विवेकवैराग्ययुक्त त्याग, योग्यांनीं सिद्धीचा त्याग करून मद्भक्ती करण्याची आवश्यकता, अनन्यभक्तांना विघ्नाची अबाधकता, व स्वसुखानुभवाची उपलब्धि, उद्धवाचें यशोवर्णन,

अध्याय एकोणतिसावा : १३६२ ते १४४०

भागवतधर्माचरणानें जन्ममरणाचें निर्मूलन, कर्मलक्षण, मदुद्देशानें केलेल्या कर्माची मदर्पणता, मनाला शनैः शनैः अनुसंधानानें मदर्पणतेची साध्यता, मदर्पणतेनें मद्भजनाची जिज्ञासा, अखंड अनुसंधानाचा साधनोपाय, पवित्र-क्षेत्रीं अगर सरितातीरीं वास्तव्यानें पावनता, सत्संगतीचा महिमा, संत लक्षणाची खूण, संतचारित्र्याचें अनुकरण, देवाला मौल्यवान् वस्तू, नृत्य, गायन, कीर्तनादि निवेदनानें भक्तीचा उद्भव, अंतरंगभक्तीचें लक्षण, भक्तांच्या भजनस्थितीचें लक्षण, भक्तीच्या उपलब्धीपर्यंत वेदमर्यादेचें पालन, भक्तांना ब्रह्मदेवापासून मशकापर्यंत सर्वभूतीं समता, नरदेहीं भगवद्भावनिरीक्षणानें अहंकाराचें निर्मूलन, गर्व, सन्मान, प्रतिष्ठा, ममता, वर्णाभिमान, इत्यादि त्यागाची आवश्यकता, सर्वभूतीं लोटांगणानें लोकेषणेचा ऱ्हास, भगवद्भाव उद्भवेपर्यंत साधनाची आवश्यकता, भगवद्भावानें भगवद्रूपता, भगवद्रूपवृत्तींचाही विलय व परब्रह्मीं ऐक्यता, सर्व साधनांत भक्ति हेंच श्रेष्ठसाधन, भक्तांपासून भक्तीची प्राप्ति, व अभेदभजनानें मत्प्राप्ति, अभेदभजनाचें कायिक, वाचिक, मानसिक लक्षण, साधकांना भक्तीमुळें विघ्नाची अबाधकता, कोणतेंहि कर्म मदर्पण करणें ही सुद्धां उत्तम भक्ति, सद्बुद्धिलक्षण, विषयासक्तांच्या ब्रह्मार्पण, कर्माची, व ज्ञानयोगादि साधनांची निरर्थकता, कर्म मदर्पण होणें हेंच बुद्धीचें सार्थक्य, कर्ममदर्पणतेने परब्रह्मीं ऐक्यता व ज्ञानसंतुष्टता, भक्तांना ज्ञानोपदेशाची आवश्यकता, उपदेशलक्षण, ज्ञानदानी आचार्याचें माहात्म्य, ग्रंथ-पठण, श्रवण, मनन यांचें माहात्म्य, ज्ञानानुभवाची खूण, उद्धवाचें स्वानंदीं निमज्जन, शिष्याच्या ज्ञानानुभवानें गुरूला संतोषता, असच्छिष्यलक्षण, ज्ञानदानी गुरूची महती, सच्छिष्यलक्षण, लोभी गुरूची परमार्थास अपात्रता, निर्लोभी गुरूपदेशाची महति, स्त्रियांच्या संगत्यागाची आवश्यकता, मैत्रेयी, कयाधू, देवहूती, भवानी, व यज्ञपत्न्यादि ज्ञानी स्त्रियांचें दिग्दर्शन, स्त्रियांना ज्ञानोपदेश देणाऱ्या गुरूचें लक्षण, ज्ञानाधिकारी स्त्रियांचें लक्षण, पात्रशुद्धतेच्या वेळीं दोषांचा विचार, पण ब्रह्मज्ञानोपदेशीं मात्र त्यांचा अभाव, मुमुक्षूंची ग्रंथांतर्गतज्ञानानें कृतार्थता, अभक्तांना धर्म, अर्थ, काम, मोक्ष यांसाठीं साधनांची आटाआटी, अनन्यभक्तीचा महिमा, उद्धवाचें चैतन्यस्वरूपीं निमज्जन, उद्धवाला निजभक्तपणाचा प्रबोध, उद्धवाला अज्ञजनाच्या अज्ञानाची विस्मितता, साधकांना धर्म, अर्थ, काम, मोक्ष यांच्या त्यागानें, व अनन्यभक्तीनें तत्काळ स्वरूपाची प्राप्ति, अनन्यभक्तांच्या मनोरथाची पूर्तता व अंतीं सायुज्यतेचीहि प्राप्यता, उद्धवाच्या प्रेमावस्थेनें श्रीशुकाची स्वानंदता, भक्तियोगश्रवणानें उद्धवाची प्रेमावस्था, गुरू-पकार उत्तीर्णत्वाची अशक्यता, सायुज्यमुक्तीचीहि अनपेक्षा, पण सद्गुरुभक्तीची अपेक्षा, नाथांचे स्मरणीय उद्गार, बद्रिकाश्रमाचें माहात्म्य, व तत्क्षेत्रांत उद्धवाला जाण्याची अनुज्ञा, लोकसंग्रहार्थ स्वधर्मानुरूप आचारांची आवश्यकता, नित्याचरण, शिष्योपदेश, व गुरुशिष्यांचें अन्योन्यकर्तव्य, इत्यादिविषयीं उपन्यास, उपदेशानुरूप वर्तनानें शिष्याच्या त्रिगुणांचें निर्मूलन, व स्वरूपानंदाची प्राप्ति, हरिमेघा म्हणण्याचें कारण, कृष्णांना प्रदक्षिणा, उद्धवाला श्रीकृष्ण-वियोगाची विव्हलता, श्रीकृष्णपादुकांच्या प्रसादानें उद्धवाची कृतकृत्यता, उद्धवविदुरभेट, उद्धवाचें प्रभासास आगमन, व श्रीकृष्णनिर्याणावलोकन, मैत्रेयाला विदुरास ज्ञानोपदेश देण्याची अनुज्ञा, शिनोदरपरायणता, उद्धवाचें बद्रिकाश्रमी गमन, नित्याचरण, व निर्याण, श्रीकृष्णप्रणित भक्तिसारामृताचें माहात्म्य, श्रीकृष्णभक्तांना वेदसारामृताची प्राप्ति, व भवभयाचें निर्मूलन, श्रीकृष्णनामसंज्ञा, श्रीकृष्णाचें भक्तवात्सल्य, उद्धवप्रश्नानें ज्ञानरहस्याचें प्रकटीकरण, व त्यामुळें जगदुद्धरण, नाथांचे ग्रंथकर्तृत्वाविषयीं उद्गार, ज्ञानोपलब्धीस संस्कृतमराठीची साधर्म्यता.

अध्याय तिसावा : १४४० ते १४७४

श्रीकृष्णसौंदर्यवर्णन, कीर्तीचा महिमा, मूर्तिध्यानानें तद्रूपता, पदरेणूचा महिमा, ब्राह्मणवचनपालनार्थ देहत्याग, भागवतोपदेशगुह्यत्वाची परीक्षितीमुळें प्रगटता, द्वारकेंतील भयंकर उत्पातांनीं यादवांची चिताग्रस्तता, यादवांस प्रभासास जाण्याची आज्ञा, विघ्नशांत्यर्थ विध्युक्तकर्माचरणाचें दिग्दर्शन, यादवांचें प्रभासास गमन, मद्य-प्राशनानें अन्योन्य कलह, श्रीकृष्णांना कुलक्षयानें झालेला संतोष, व त्याचीं कारणें, बळरामाचें निर्याण, श्रीकृष्णांनी निजधामगमनार्थ अश्वत्थतळीं घातलेलें वीरासन, स्वरूपसौंदर्य, व दर्शनमहिमा, श्रीकृष्णमूर्तीचें वर्णन, चरणाचीं आरक्तता, व त्यांचें जराव्याधाच्या बाणानें विंधन, जराव्याधाची अनुतापयुक्त प्रार्थना, स्तवन व शरणता, जराव्याधाची

भ्रमनिवृत्ति, स्वर्गागमन, दारुकाचें श्रीकृष्णशोधन, दर्शन, नमन, व प्रार्थना, रथायुधादि ऐश्वर्याच्या ऊर्ध्वगतिगमनानें दारुकाची ताटस्थ्यता, दारुकाचे करुणोद्‌गार, श्रीकृष्णाचा द्वारकेंतील सुहृज्जनांस संदेश, दारुकाची खेदयुक्त प्रार्थना, स्वधर्मलक्षण, स्वधर्मानें वैराग्याचा उद्भव, व ज्ञानोपलब्धि, अपेक्षेचा विलय, व निरपेक्षतेचा उद्भव, विज्ञानलक्षण, उपशमलक्षण, दारुकाची श्रीकृष्णस्वरूपीं अभिन्नता, दारुकाची श्रीकृष्णांना प्रदक्षिणा, चरणीं नमन, व द्वारकेस गमन.

अध्याय एकतिसावा : १४७४ ते १५१६

श्रीकृष्णनिर्याणवर्णन, देव, सिद्ध, गंधर्व, किन्नरादिकांचें प्रभासास आगमन, समाधीचें मिष, योगधारणेचा अभाव, मूर्तीची चैतन्यता, देहाभास, व तत्संबंधानें उद्घाटन, देवांना उल्हास, व विस्मय, निजधामप्रयाणाचा देवादिकांस भ्रम, व विस्मय, श्रीकृष्णगतीची देवादिकांस अतर्क्यता, विद्युल्लतेचा दृष्टांत, देवादिकांच्या अभिमानाचा ऱ्हास, कीर्तीचें यशोवर्णन, व विस्मययुक्त स्वस्थानीं गमन, सामर्थ्यतेचें वर्णन, यदुकुळांतील जन्मकर्माचा योगमायेस्तव आभास, विदेहत्वाची शिवशक्रब्रह्मादिकांस अतर्क्यता, साधकहितार्थ निजधामगमन, अवतारलीलांची अस्पर्शता, निजमूर्तीचें स्वभक्तध्यानीं प्रतिष्ठापन, व निजधामगमन, उक्त चवदा श्लोक सद्भावपूर्वकभक्तियुक्तपठनानें श्रीकृष्णस्वरूपाची प्राप्यता, दारुकाचा प्रवेश व यादवनिधनवार्तेनें पौरांचा विलाप, मातापितृस्त्रियादि गोत्रजांचें प्रभासास गमन व निधन, श्रीकृष्णस्त्रियांच्या मुक्तत्वासंबंधानें तर्किकांच्या मताचें खंडन, अर्जुनाला श्रीकृष्णविरहाची उद्विग्नता, व गीतोपदेशस्मरणानें शांतता, अर्जुनाचे उद्‌गार, अर्जुनाला युद्धप्रसंगीं उपदेशिलेल्या ज्ञानाचा महिमा, गीतामाहात्म्य, अर्जुनहस्तें मृतांचा उत्तरविधि, श्रीकृष्णाचें सन्निहित वास्तव्य, बालवृद्धस्त्रीजनाचें अर्जुनासमवेत इंद्रप्रस्थास गमन, वज्राला राज्याभिषेक, पांडवांचें महापथास प्रस्थान, श्रीकृष्णावतारमाहात्म्य;–अवतारलीलेच्या श्रद्धायुक्तवर्णनानें सकळ पापांचें निर्मूलन, संगतीनें उद्धारलेल्यांचा नामनिर्देश, षडगुणैश्वर्यसंपत्तीची प्रगटता, चरित्रवर्णनानें पराभक्तीची प्राप्यता, अवतारलीलेची अपूर्वता, व तत्पाठकांचा पुनीतता, ज्ञान, वैराग्य, भक्ति, व मुक्ति यांचें प्रतिपादन, प्रत्येक अध्यायाचा निष्कर्ष, भागवतसांप्रदायपरंपरा, सांप्रदायपरंपरेनें व भावार्थदीपिकाप्रकाशानें स्वकृतटीकेची पूर्णता, ग्रंथाधिकारी, ग्रंथमाहात्म्य, नाथांचे स्वकृतटीकेविषयीं उद्‌गार, ग्रंथकर्तृत्वाचीं स्थाने, श्रीजनार्दनाचें आशीर्वचन, ग्रंथसमाप्तिकालनिर्देश, एकंदर श्लोकसंख्या १३६७, एकंदर ओवीसंख्या १८७९८.

सदा सेव्या सदा सेव्या श्रीमद्भागवती कथा
यस्याः श्रवणमात्रेण हरिश्चित्तं समाश्रयेत् ॥ १ ॥
अर्थोऽयं ब्रह्मसूत्राणां भारतार्थविनिर्णयः ।
गायत्रीभाष्यरूपोऽसौ वेदार्थपरिबृंहितः ॥२॥

पद्मपुराण.

नाथांना पहिले श्रीदत्तदर्शन

पैठण येथील संस्थान श्रीएकनाथमहाराज वाड्यांतील देवघरांत पूजेमध्यें एक छोटी तसबीर आहे. सध्याचे संस्थानाधिपति श्री भैय्यासाहेब महाराज यांनीं त्या तसबिरीवरून त्याचा मोठा फोटो तयार केला आहे. त्यावरूनच हें समोरच्या पानावरचें चित्र छापलें आहे ही तसबीर त्यांच्या रोजच्या पूजेंत त्यांच्या वडिलांच्याहि पूर्वींपासून आहे.

श्रीजनार्दनस्वामींनीं नाथांना पहिल्यांदा श्रीदत्तप्रभूंचें दर्शन करविलें त्या प्रसंगाचें हें चित्र आहे. हें दर्शन देवगिरीजवळच्या शूलभंजन पर्वतावर झालें. शूलभंजन पर्वत आज पहावयाचा असेल तर तो दौलताबाद ते वेरूळ घृष्णेश्वराच्या रस्त्यावर खुलताबाद नांवाचें गांव आहे तेथून अदमासे दीड मैलावर उभा आहे. त्या पर्वताच्या शिखरावर ज्या ठिकाणीं श्रीजनार्दनस्वामींनीं दत्तदर्शन करविलें ती शिळा अद्यापीहि पाहवयास मिळते. त्या शिळेचा विशेष म्हणजे आजहि ती सुस्थितींत अभंग अवस्थेंत आहे. इतर शिळेच्या कपच्या निघतात तसें या शिळेला कांहींहि झालेलें नाहीं. ती आहे त्याच अवस्थेंत आजहि आहे. नाथांच्या वेळीं शूलभंजन पर्वतावर दाट अरण्य होतें. आतां तेथें खुरटलेलीं झुडपें आहेत. नजीकच चंद्रकुंड आणि सूर्यकुंड या नांवाचीं दोन तीर्थांचीं कुंडें आहेत. तेथेंच एक प्राचीन शिवालयहि आहे. सूर्यकुंडांत स्नान केलें असतां मनुष्याचीं सर्व पातकें निघून जातात आणि चंद्रकुंडांत स्नान केलें म्हणजे सर्व रोग नाहींसे होतात ही प्रचीति आजहि येते. अद्यापीहि त्या पर्वतावर असणाऱ्या वनस्पति अंधाऱ्या रात्रीं चमकताना दिसतात. असे हें स्थान मोठें सिद्ध आहे.

याच स्थानीं श्रीजनार्दनस्वामींनीं नाथांना प्रथम दत्तदर्शन करविलें. देवगडावर नाथ स्वामींच्या घरीं राहून त्यांची सेवा करीत असतां आतां आपल्या शिष्याची तयारी झाली असें पाहून स्वामींनीं त्यांना सांगितले, "नाथा, उद्यां शुक्रवार आहे, आपण शूलभंजन पर्वतावर जाऊं. त्या बाजूला दत्तावांचून दुसरें कोणीहि येत नाहीं. पण नीट लक्षांत असूं दे अवधूत कोणत्याहि स्वरूपांत येतील. सावध रहा."

त्याप्रमाणें दुसऱ्या दिवशीं गुरुशिष्य दोघेहि शेजारच्या शूलभंजन पर्वताच्या घनदाट अरण्यांत शिरले. तिथें स्वच्छ जागा पाहून स्वामींनीं ध्यान धरलें. थोड्याच वेळांत श्रीदत्तप्रभू मलंगाच्या वेषांत आले. देह मलिन, अंगावर कातडें पांघरलेलें आणि बरोबर एक कुत्री असा सरंजाम होता. स्वामींनीं धांवत जाऊन त्यांचे पाय धरले. मलंगानें त्यांना वर उठवून आलिंगन दिलें. नंतर शेजारच्या शिळेवर बसून दोघे गप्पागोष्टी करत बसले. नाथ हें सगळें लांबून पाहत होते. थोडा वेळ गेल्यावर मलंगानें कटोरा देऊन स्वामींना सांगितलें, "जनार्दना, उठ, त्या कुत्रीची धार काढून आण."

त्याप्रमाणें स्वामींनीं कुत्रीचें दूध कटोऱ्यांत काढून आणलें. मलंगानें झोळींतील शिळ्या भाकरीचे तुकडे काढून त्यांत कालवले आणि ते दोघे मिटक्या मारून ते खाऊं लागले.

भोजन संपल्यावर कटोरा धुण्याकरितां नाथांजवळ दिला. तळ्यावर जाऊन नाथांनीं कटोरा धुण्याकरतां त्यांत पाणी घातलें. त्याबरोबर अन्नाचे कांहीं कण त्याच्यावर तरंगूं लागले. आपले गुरु याच्यांतून जेवले तेव्हां हें अमृताचें भोजन असलें पाहिजे, असा विचार करून नाथांनीं तो कटोरा तोंडाला लावला. नंतर पात्र स्वच्छ करून मलंगाच्या पुढें नेऊन ठेवलें. त्याबरोबर मलंगाच्या मुद्रेवर हास्य खेळूं लागलें. आणि तिथें ' तीन शिरें, सहा हात ' अशी श्रीदत्तप्रभूंची मूर्ति साक्षात् प्रगट झाली. दत्तप्रभूंनीं नाथांना हृदयाशीं धरलें आणि ते म्हणाले, "जनार्दना, हा अवतारी पुरुष आहे. असंख्य लोकांना भक्तिपंथाला लावून त्यांचा हा उद्धार करील. माझी याच्या-वर पूर्ण कृपा आहे."

असें म्हणून दत्तमहाराज अंतर्धान पावले. स्वामी देवगडाकडे निघाले आणि नाथहि एका अमृतमय अनुभवांत बुडी मारून गुरूच्या पाठोपाठ पावले टाकीत त्यांच्या मागोमाग वाट चालूं लागले.



॥ श्री ॥

सार्थ श्रीएकनाथी भागवत

हा

भागवतधर्मप्रसारक, पारमार्थिक, भक्तिरसपरिपूर्ण, प्रासादिक

ग्रंथ

श्रीगुरु नानामहाराज साखरे यांच्या कृपेनें

आम्हां घरीं धन शब्दाचींच रत्नें । शब्दाचींच शस्त्रें यत्न करूं ॥ १ ॥
शब्दाचि आमुच्या जीवाचें जीवन । शब्दें वांटूं धन जनलोकां ॥ २ ॥
तुका म्हणे पहा शब्दचि हा देव । शब्देंचि गौरव पूजा करूं ॥ ३ ॥

इत्यादि श्रीसंतवचनप्रेरणेनें जनतारूपी जनार्दन

भगवान् श्रीकृष्ण यांच्या चरणीं

भाव-भक्ति-प्रेमभरित अंतःकरणानें अर्पण करितों

गणेशचतुर्थी
शके १८८८

प्रकाशक.

सार्थ
श्रीएकनाथी भागवत

॥ श्री ॥

सार्थ श्रीएकनाथी भागवत

॥ श्रीगणाधिपतये नमः ॥ श्रीसरस्वत्यै नमः ॥ श्रीगुरुभ्यो नमः ॥

श्रीगणपतीला नमस्कार असो. श्रीसरस्वतीला नमस्कार असो. श्रीगुरूंना नमस्कार असो.



अध्याय पहिला.

ॐ नमो श्रीजनार्दना। नाहीं भवअभवभावना। न देखोनि मीतूंपणा। नमन श्रीचरणा श्रीसद्गुरुराया ॥१॥ नमन श्रीएकदंता। एकपणें तूंचि आतां। एकी दाविसी अनेकता। परी एकात्मता न मोडे ॥२॥ तुजमाजीं वासु चराचरा। म्हणोनि बोलिजे लंबोदरा। यालागीं सकळांचा सोयरा। साचोकारा तूं होसी ॥ ३ ॥ तुज देखे जो नरू। त्यासी सुखाचा होय संसारू। यालागीं विघ्नहरू। नामादरू तुज साजे ॥ ४ ॥ हरुष तें वदन गणराजा। चाऱ्ही पुरुषार्थ त्याचि चाऱ्ही भुजा। प्रकाशिया प्रकाशी वोजा। तो झळकत तुझा निजदंतु॥५॥ पूर्वउत्तरमीमांसा

श्रीजनार्दनस्वामींना नमस्कार असो. ज्याला जन्म व नाश हे भावविकार नाहींत, त्या सद्गुरुराय श्रीचरणांना 'मी,' 'तूं'–पणा न कल्पितांच नमन असो. १ हे गजानना ! तुला नमस्कार असो. तूं एक असतांना अनेकता दाखवितोस; पण तुझें एकात्मत्व बाधित होत नाहीं. २ तुझ्या उदरामध्यें सर्व चराचर रहातें, म्हणून तुला लंबोदर म्हणतात. म्हणूनच तूं सर्वांचा आईबापांप्रमाणें आप्त आहेस. ३ जो पुरुष तुला पहातो त्याचा संसार सुखरूप होतो. म्हणूनच तुला विघ्नहर हें उत्कृष्ट नांव शोभतें. ४ हे गणराया ! हर्ष हें तुझें मुख व चार पुरुषार्थ या तुझ्या भुजा आहेत. आपल्या निर्मलतेनें सूर्य-चंद्रादिकांनाहि प्रकाशित करणारा तुझा दांत झळकत असतो. ५ पूर्व व उत्तर या दोन

दोनी। लागलिया श्रवणस्थानीं। निःशब्दादि वाचा वदनीं। कर जोडूनि उभिया ॥ ६ ॥ एकेचि काळीं सकळ सृष्टी। आपुलेपणें देखत उठी। तेचि तुझी देखणी दृष्टी। सुखसंतुष्टी विनायका ॥ ७ ॥ सुखाचें पेललें दोंद। नाभीं आवर्तला आनंद। बोधाचा मिरवे नागबंद। दिसे सन्नद्ध साजिरा ॥८॥ शुद्धसत्त्वाचा शुक्लांबर। कासे कसिला मनोहर। सुवर्णवर्ण अलंकार। तुझेनि साचार शोभती ॥ ९ ॥ प्रकृतिपुरुष चरण दोनी। तळीं घालिशी बोजावुनी। तयांवरी सहजासनीं। पूर्णपणीं मिरवसी ॥१०॥ तुझी अणुमात्र झालिया भेटी। शोधितां विघ्न न पडे दृष्टी। तोडिसी संसारफांसोटी। तोचि तुझे मुष्टी निजपरशु ॥ ११ ॥ भावें भक्त जो आवडे। त्याचें उगविसी भवसांकडें। ओढूनि काढिसी आपणाकडे। निजनिवाडें अंकुशें ॥ १२ ॥ साच निरपेक्ष जो निःशेष। त्याचें तूंचि वाढविसी सुख। देऊनी हरिखाचे मोदक। निववि‍सी देख निजहस्तें ॥१३॥ सूक्ष्मा-हूनि सूक्ष्म सान। त्यामाजीं तुझें अधिष्ठान। यालागीं मूषकवाहन। नामाभिधान तुज साजे ॥१४॥ पाहतां नरू ना कुंजरू। व्यक्ताव्यक्तासी परू। ऐसा जाणोनि निर्विकारू। नमनादरू ग्रंथार्थीं ॥ १५ ॥ ऐशिया जी गणनाथा। मीपणें कैंचा नमिता। अकर्ताचि जाहला कर्ता। ग्रंथकथाविस्तारा ॥ १६ ॥ आतां नमूं सरस्वती। जे सारासारविवेककर्ती। चेतनारूपें इंद्रियवृत्ती। जे चाळिती सर्वदा ॥ १७ ॥ जे वाचेची वाचक। जे बुद्धीची द्योतक। जे प्रकाशा प्रकाशक। स्वयें देख स्वप्रभ ॥१८॥ ते शिवांगीं शक्तिउठी। जैसी डोळ्यांमाजीं दिठी। किंवा सुरसत्वें दावी पुष्टी। फळपणें पोटीं फळाच्या ॥ १९ ॥ जैसा साखरे-अंगीं स्वादु। कीं सुमनामाजी मकरंदु। तैसा शिवशक्तिसंबंधु। अनादिसिद्ध अतर्क्य ॥२०॥ ते अनिर्वाच्य निजगोडी। चहूं वाचांमाजी वाडी। म्हणोनि वागीश्वरी रोकडी। ग्रंथार्थीं चोखडी चवी दावी ॥ २१ ॥ सारासार

मीमांसा तुझ्या कर्णस्थानीं आहेत. परा, पश्यन्ती, मध्यमा व वैखरी या चार वाणी तुझ्या मुखांमध्यें हात जोडून उभ्या असतात. ६ हे विनायका! तूं स्वत्वानें पहातांच ही सकल सृष्टि एकाच वेळीं उद्भवते. तीच तुझी आनंदमय दृष्टि आहे. ७ सुखाच्या भरानें तुझें दोंद वाढलें आहे. नाभिस्थानीं आनंद एकवटला आहे. बोधाचें कटिसूत्र तुझ्या कंबरेंत शोभत आहे, त्यामुळें तूं विघ्नांचा नाश करण्यास सज्ज असलेला दिसतोस. ८ शुद्धसत्त्वाचें शुभ्र मनोहर वस्त्र तूं नेसला आहेस. सुवर्णाच्या अलंकारांना तुझ्यामुळें शोभा आली आहे. ९ प्रकृति व पुरुष हेच तुझे दोन चरण आहेत. त्यांना व्यवस्थितपणें खालीं टेकून तूं आपल्या सहजासनावर पूर्णपणें मिरवितोस. १० तुझी थोडीशी जरी भेट झाली तरी विघ्न शोधूनहि दृष्टीस पडत नाहीं. तूं संसाराचा पाश तोडतोस. तुझ्या मुठींतील तोच परशु आहे. ११ तुला जो अनन्य भक्त आवडतो त्याच्या संसारसंकटाचें तूं निरसन करितोस. आपल्या बोधरूप अंकुशानें तूं त्याला वर आपणाकडे ओढून घेतोस. १२ जो खरोखरच सर्वथा निरपेक्ष असतो त्याचें सुख तूंच वाढवितोस. त्याला हर्षाचे मोदक देऊन, आपल्या हातांनीं शांत करितोस. १३ सूक्ष्माहून अति सूक्ष्म वस्तूमध्येंहि तुझें अधिष्ठान आहे. म्हणून तुला मूषकवाहन हें नांव शोभतें. १४ वस्तुतः तूं नर नाहींस व हत्तीहि नाहींस, तर व्यक्त व अव्यक्त या दोहोंच्या पलीकडचा आहेस. अशा तुज निर्विकाराला जाणून ग्रंथाच्या आरंभीं तुझ्या नमनाविषयीं मीं आदर व्यक्त केला आहे. १५ पण हे गणनाथा! अशा निर्विकार असलेल्या तुला मीपणानें नमन करणारा तरी कोठें रहातो? तूं अकर्तोच या ग्रंथाच्या कथेचा विस्तार करणारा झाला आहेस. १६ आतां सारासार विचार करणाऱ्या व इंद्रियवृत्तीला चैतन्यरूपानें सर्वदा चालन देणाऱ्या सरस्वतीला वंदन करूं. १७ ती वाक्-इंद्रियाला बोलविणारी, बुद्धीला प्रकाशित करणारी, प्रकाशालाहि विषय करणारी म्हणूनच स्वयंप्रकाश आहे. १८ नेत्रांत जशी पहाण्याची शक्ति असते, किंवा फळाच्या पोटांत फलत्वानें जसें सुरसाचें आधिक्य असतें, तशीच ती शंकराच्या अंगांतील शक्ति आहे. १९ किंवा साखरेंत गोडपणा किंवा फुलांत मध जसा असतो, त्याप्रमाणें हा शिव-शक्तींचा संबंध अनादि व अतर्क्य आहे. २० वाणीनें जिचें वर्णन करितां येत नाहीं अशी ही आत्मस्वरूपाची गोडी चारी वाणींत श्रेष्ठ आहे. म्हणूनच ती वाणीची देवता ग्रंथार्थाची रुचि दाखविते. २१ हंस दुधांतील पाणी वेगळें करितो हें प्रसिद्धच आहे. जगांतील सार व असार यांची निवड करणारे असे हंस, हेंच तिचें

निवडिती जनीं। त्या हंसावरी हंसवाहिनी। बैसली सहजासनीं। अगम्यपणीं अगोचरू ॥ २२ ॥ ते परमहंसीं आरूढ । तिसी विवेकहंस जाणती दृढ । जवळी असतां न देखती गूढ । अभाग्य मूढ अतिमंद ॥ २३ ॥ तिचें निर्धारितां रूप । अरूपाचें विश्वरूप । ते आपुलेपणें अमूप । कथा अनुरूप बोलवी ॥२४॥ हा बोलू भला झाला। म्हणोनि बोलेंचि स्तविला। तैसा स्तुतिभावो उपजला । बोली बोला गौरवी ॥ २५ ॥ ते वाग्विलास परमेश्वरी । सर्वांगदेखणी सुंदरी । राहोनि सबाह्यअभ्यंतरीं । ग्रंथार्थकुसरी वदवी स्वयें ॥ २६ ॥ ते सदा संतुष्ट सहज । म्हणोनि निरूपणा चढलें भोज । परि वक्तेपणाचा फुंज । मीपणें मज येवो नेदी ॥ २७॥ वाग्देवतेची स्तुती। वाचाचि जाहली वदती। तेथें द्वैताचिये संपत्ती । उमस चित्तीं उमसेना ॥ २८॥ तिणें बोले बोलणें मोडिलें। समूळ मौनातें तोडिलें। त्यावरी निरूपण घडिलें। नबोलणें बोलें बोलवी ॥ २९ ॥ तिसी सेवकपणें दुसरा । होऊनि निघे नमस्कारा। तंव मीपणेंसीं परा । निजनिर्धारा पारुषे ॥ ३० ॥ जेथें मीपणाचा अभावो । तेथें तूंपणा कैचा ठावो । याहीवरी करी निर्वाहो। अगम्य भावो निरूपणीं ॥३१॥ जैसा सागरावरी सागरीं । चालती लहरींचिया लहरी। तैसे शब्द स्वरूपाकारीं। स्वरूपावरी शोभती ॥३२॥ जैशा साखरेचिया कणिका। गोडिये भिन्न नव्हती देखा। तैसें निरूपण ये रसाळसुखा। ब्रह्मरसें देखा समवृत्ति ॥३३॥ तेथें मीपणेंशीं सरस्वती। बैसविलें एका ताटें रसवृत्ती। तेणें अभिन्नशेष देऊनि तृप्ती। ते हे उद्गार येती कथेचे ॥३४॥ आतां वंदूं ते सज्जन । जे कां आनंदचिद्घन। वर्षताती स्वानंदजीवन । संतप्त जन निववावया ॥३५॥ ते चैतन्याचे अळंकार। कीं ब्रह्मविद्येचे श्रृंगार। कीं ईश्वराचें मनोहर। निजमंदिर निवासा ॥३६॥ ते अधिष्ठाना अधिवासु। कीं सुखासही सोल्हासू। विश्रांतीसी विश्वासू। निजरहिवासू करावया ॥३७॥ कीं ते भूतदयार्णव। कीं माहेरा आली कणव। ना ते निर्गुणाचे अवेव। निजगौरव स्वानंदा ॥३८॥ ना ते

वाहन आहे. ती हंसवाहिनी त्यावर अतर्क्य व अगम्य असें सहजासन घालून बसली आहे. २२ अशा परमहंसावर बसलेल्या तिला विवेकहंसच जाणतात. पण जे अभागी, मूर्ख व मतिमंद असतात, ते जवळ असलेल्याहि तिला पहात नाहींत. २३ तिच्या स्वरूपाचा विचार केला असतां निराकार विश्वरूप तीच आहे. तीच आपलेपणानें अपार कथा बोलविते. २४ हा बोल निर्दोष आहे म्हणून या बोलानेंच तिची स्तुति केली व स्तुतिभाव उत्पन्न झाला व बोलानेंच बोलाचा गौरव केला. २५ ती वाणींतच विलास करणारी सर्वांगसुंदर देवता सरस्वती आंत व बाहेर राहून स्वतःच ग्रंथाचा अर्थ मोठ्या चातुर्यानें बोलविते. २६ ती स्वभावतःच निरंतर प्रसन्न असते, म्हणून या निरूपणाची आवड वाढली. परंतु तिनें माझ्या ठिकाणीं वक्तृत्वाचा अभिनान वाटूं दिला नाहीं. २७ वाग्देवीची ही स्तुति वाणीनेंच केली आहे, त्यामुळें द्वैतभाव चित्तांत उपजत नाहीं. २८ तिनेंच यांतील निष्फळ शब्द काढून टाकिले, मौन समूळ घालविलें. निरूपण घडवून आणलें व बोलण्यास अशक्य असलेलें वस्तुतत्त्व शब्दानें बोलविलें. २९ पण अशा सरस्वतीहून सेवकरूपानें भिन्न होऊन मी तिला नमस्कार करण्यास निघालों, तों मीपणाबरोबर शुद्धस्फूर्ति जी परावाणी ती खुंटली. ३० आणि जेथें 'मी-'पणाचा अभाव, तेथें 'तूं-'पणा कोठचा ! शिवाय या निरूपणांत कांहीं अतर्क्य प्रसाद भरलेला आहे. ३१ समुद्रांत जशा सर्वत्र लाटांवर लाटा उसळत असतात, तशा स्वरूपाकार शब्दांच्या लहरी आत्मस्वरूपावर शोभतात. ३२ साखरेच्या कणापासून त्याचा गोडपणा जसा भिन्न नसतो, त्याप्रमाणें हें निरूपणहि ब्रह्मरसानें भरलेलें असल्यामुळें ब्रह्मरसाहून भिन्न नाहीं. ३३ त्या एकरूप ब्रह्मरसाचें ताट वाढून त्यांत 'मीपणा-'बरोबर सरस्वतीला बसविलें त्यामुळें अद्वैतानंदानें तृप्ति होऊन, त्यांची अभिन्नत्वानें तृप्ति झाल्यामुळेंच, हे कथेचे उद्गार बाहेर पडले. ३४ आतां संतप्त जनास शांत करण्यासाठीं स्वानंदरूप जलाचा वर्षाव करणारे चिदानंदाचे जणुंकाय मेघच, अशा सज्जनांना वंदन करूं. ३५ ते चैतन्याचें भूषण, किंवा ब्रह्मविद्येचे विलास, किंवा ईश्वराचें राहण्याचें मनोहर मंदिरच आहेत. ३६ ते परब्रह्माचें निवासस्थान, किंवा सुखाचाहि उल्हास किंवा विश्रांतीला राहण्यास विश्वासाचें स्थलच, ३७ किंवा ते भूतदयेचा सागरच, किंवा करुणेचें माहेरघरच, किंवा निर्गुणाचा गौरव व आनंद दर्शविणारे अवयवच आहेत, ३८

डोळ्यांतील दृष्टी । कीं तिचीही देखणी पुष्टी । कीं संतुष्टीसी तुष्टी । चरणांगुष्ठीं जयांचे ॥ ३९ ॥ ते पहाती जयांकडे । त्यांचें उगवे भवसांकडें । परब्रह्म डोळियांपुढें । निजनिवाडें उल्हासे ॥ ४० ॥ तेथें साधनचतुष्टय-सायास । न पाहती शास्त्रचातुर्यविलास । एक धरिला पुरे विश्वास । स्वयें प्रकाश ते करिती ॥ ४१ ॥ ते जगामाजीं सदा असती । जीवमात्रातें दिसती । परी विकल्पेंचि ठकिजती । नाहीं म्हणती नास्तिक्यें ॥ ४२ ॥ मातियेचा द्रोण केला । तो कौळिका भावो फळला । म्हणोनि विश्वासेंवीण नाडला । जगु ठकला विकल्पें ॥ ४३ ॥ एकाएकीं विश्वासतां । तरी वाणी नाहीं निजसत्ता । त्यांचे चरणीं भावार्थता । ठेवितां माथा विश्वासें ॥ ४४ ॥ ते नमस्कारितां आवश्यक । करून ठाकती एक । परी एकपणें सेवक । त्यांचाचि देख स्वयें होआवें ॥४५॥ त्यांचिया सेवेचिये गोडी । ब्रह्मसुखाची उपमा थोडी । जे भजती अनन्य आवडीं । ते जाणती गाढी निजचवी ॥ ४६ ॥ ते प्रकृतीसी पर । प्रकृतिरूपीं ते अविकार । आकार विकार व्यवहार । त्यांचेनि साचार बाधीना ॥ ४७ ॥ ते भोगावरी न विटती । त्यागावरी न उठती । आपुलिये सहजस्थिती । स्वयें वर्तती सर्वदा ॥ ४८ ॥ ते ज्ञातेपणा न मिरविती । पिसेपण न दाविती । स्वरूपफुंजुविस्मृती । गिळूनि वर्तती निजांगें ॥ ४९ ॥ प्रेमा अंगींचि जिराला । विस्मयो येवोंचि विसरला । प्रपंचुपरमार्थु एकु जाहला । हाही ठेला विभागु ॥ ५० ॥ स्मरण विस्मरणेंशीं गेलें । देह देहींच हारपलें । आंतुबाहेरपण गेलें । गेलें ठेलें स्मरेना ॥ ५१ ॥ स्वप्नजागृती जागतां गेली । सुषुप्ति साक्षित्वेंसीं बुडाली । उन्मनीही वेडावली । तुर्या ठेली तटस्थ ॥ ५२ ॥ दृश्य द्रष्टेनशीं गेलें । दर्शन एकलेपणें निमालें । तें निमर्णेपणही विरालें विरविर्ते नेलें विरणेनी ॥ ५३ ॥ ज्ञान अज्ञानातें घेउनि गेलें । तंव ज्ञातेपणही बुडालें । विज्ञान अंगीं

किंवा ते डोळ्यांतील दृष्टि, किंवा त्या दृष्टीचीहि दर्शक शक्ति, किंवा संतोषाची तुष्टि असून ती त्यांच्या पायांपाशीं रहाते. ३९ ते ज्यांच्याकडे पहातील त्यांचें संसाररूपी संकट नाहींसें होऊन त्यांच्या हृदयांत परब्रह्म तत्काल प्रकट होतें. ४० तेथें साधनचतुष्टयाचे श्रम करावे लागत नाहींत, किंवा शास्त्रचातुर्य लढवावें लागत नाहीं. त्यांच्यावर विश्वास ठेविला कीं, ते स्वतः प्रकाश दाखवितात. ४१ ते निरंतर जगांतच असतात, प्राणिमात्रांना दिसतात, पण विकल्पामुळें लोक फसतात व नास्तिकपणानें 'ते नाहींतच' असें म्हणतात. ४२ (एकलव्य नांवाचा एक कोळ्याचा मुलगा होता, त्यानें धनुर्विद्येंत प्रावीण्य मिळविण्यासाठीं मातीची द्रोणाचार्यासारखी एक मूर्ति बनविली व त्या मूर्तीला आपला गुरु मानून त्यानें त्या विद्येंत नैपुण्य मिळविलें, अशी महाभारतांत कथा आहे.) मातीच्या द्रोणाचार्यावर केवल दृढ श्रद्धा ठेवल्यामुळें कोळ्याला फलसिद्धि मिळाली. पण तशी श्रद्धा नसल्यामुळें जगत् खरें भासतें व विकल्पानें भ्रांति होते. ४३ परंतु पूर्ण विश्वास जर ठेविला तर आत्मस्वरूपाला उणीव नाहीं. भक्तीनें व श्रद्धेनें त्यांच्या चरणांवर मस्तक ठेविलें पाहिजे. ४४ त्यांना नमस्कार केला असतां ते स्वतःशींच एकरूप करितात. यास्तव आपण स्वतः एकत्वानें त्यांचेच सेवक होऊन रहावें. ४५ त्यांच्या सेवेच्या गोडीला ब्रह्मसुखाचीहि उपमा कमीच आहे. जे अनन्य भावानें त्यांस प्रेमानें भजतात तेच त्या आत्मस्वरूपाची खरी चव जाणतात. (म्ह. त्यांसच आत्मस्वरूपाचा अनुभव येतो.) ४६ ते प्रकृतीहून भिन्न व शरीराकार प्रकृतींत असूनहि निर्विकार असतात. त्यांना शरीराचा आकार, विकार आणि व्यवहार यांची यत्किंचितहि पीडा होत नाहीं. ४७ ते भोगांचा तिरस्कार करीत नाहींत, किंवा त्यागामध्यें तत्पर होत नाहींत. ते आपल्या सहजस्थितींत स्वभावतःच सर्वदा असतात. ४८ ते ज्ञानीपणाचा डौल मिरवीत नाहींत किंवा वेड पांघरीत नाहींत. ते आत्मस्वरूपप्राप्तीचा गर्व किंवा विसर या दोहोंना सोडून स्वरूपांत रहातात. ४९ आत्मसाक्षात्काराच्या वेळीं त्यांच्या चित्तांत प्रेमाच्या लहरी उठतात. पूर्वी कधीं न अनुभविलेल्या आनंदानें त्यांचें चित्त विस्मित होतें. उत्तम साधकाची आरंभीं अशी स्थिति होते; पण पुढें दृढ अभ्यासानें प्रेम व विस्मय जागच्याजागीं लीन होतात आणि प्रपंच व परमार्थ या दोहोंचें ऐक्य झालें कीं, हाहि भाग उरत नाहीं. ५० स्मरण विस्मरणासह नाहींसें होतें. देहभाव देहांतच लुप्त होतो. अंतर्बहिर्भाव नाहींसा होतो. गेलें किंवा राहिलें हेंहि आठवत नाहीं. ५१ पहातां पहातां स्वप्न व जागृति नाहींशा होतात. सुषुप्ति साक्षित्वांत बुडून जाते. उन्मनी अवस्था वेडावते व तुर्यावस्था तटस्थ होते. ५२ दृश्य द्रष्ट्यासह नाहींसें होतें. ते न होऊन काय करील ? मग एकटेंच राहिलेलें बिचारें दर्शन शांत होतें. हा लयहि शेवटीं लय पावतो. त्यामुळें त्यांचा लय

जडलें । परी नवें जडलें हें न मनी ।। ५४ ।। यापरी जे निजसज्जन । तिहीं करावें सावधान । द्यावें मज अवधान । हें विज्ञापन बाळत्वें ।। ५५ ।। सूर्य सदा प्रकाशघन । अग्नि सदा देदीप्यमान । तैसे संत सदा सावधान । द्यावें अवधान हें बालत्व माझें ।। ५६ ।। तंव संतसज्जनीं एक वेळा । थोर करूनियां सोहळा । आज्ञापिलों वेळवेळां । ग्रंथ करविला प्राकृत ।। ५७ ।। एकांतीं आणि लोकांतीं । थोर आक्षेप केला संतीं । तरी सांगा जी मजप्रती । कोणे ग्रंथीं प्रवर्तों ।। ५८ ।। पुराणीं श्रेष्ठ भागवत । त्याहीमाजीं उद्धवगीत । तुवां प्रवर्तावें तेथ । वक्ता भगवंत तुज साह्य ।। ५९ ।। आम्हांसी पाहिजे ज्ञानकथा । वरी तुजसारिखा रसाळ वक्ता । तरी स्तुति सांडूनि आतां । निरूपण तत्त्वतां चालवीं ।। ६० ।। तुज संतस्तवनीं उत्सावो । हा तंव कळला भावो । तरी कथेचा लवलाहो । निजनिर्वाहो उपपादीं ।। ६१ ।। या संतांचें कृपावचनें । एकाएकीं आनंदलों मनें । तेणें वाक्यपसायदानें । स्वानंदघनें उल्हासे ।। ६२ ।। जैसा मेघांचेनि गर्जनें । मयूर उपमों पाहे गगनें । नाना नवेनि जीवनें । जेवीं चातक मनें उल्हासे ।। ६३ ।। कां देखोनि चंद्रकर । डोलों लागे चकोर । तैसें संतवदनींचें उत्तर । आलें थोर सुखावित ।। ६४ ।। थोर सुखाचा केलों स्वामी । तुमचें पुरतें कराल तुम्ही । तरी वांयांचि कां मीपणें मी । मनोधर्मीं वळंगेजों ।। ६५ ।। परी समर्थांची आज्ञा । दासां न करवे अवज्ञा । तरी सांगीतली जे संज्ञा । ते करीन आज्ञा स्वामींची ।। ६६ ।। परी तुम्हीं एक करावें । अखंड अवधान मज द्यावें । तेणें दिठिवेनि आघवें । पावेल स्वभावें निजसिद्धी ।। ६७ ।। अगा तुझिया मनामाजीं मन । शब्दीं ठेविलेंसे अनुसंधान । यालागीं निजनिरूपण । चालवीं जाण सवेगें ।। ६८ ।। आतां वंदूं कुळदेवता । जे एकाएकीं एकनाथा । ते एकीवांचून सर्वथा । आणिक कथा करूं नेदी ।। ६९ ।। एक रूप दाविलें मनीं । तंव एकचि दिसे जनीं वनीं । एकचि कानीं वदनीं । एक-

---

करविणारेंहि लयाबरोबरच निवृत्त होतें. ५३ ज्ञान अज्ञानाला घेऊन गेलें तेव्हां ज्ञातेपणाहि उरला नाहीं. आत्मसाक्षात्कार तेवढा जडला, पण तो नवीन आहे, असें समजूं नये; ५४ असो, असे जे सज्जन आहेत त्यांनीं आतां सावधान चित्त करून माझ्या बोलण्याकडे लक्ष द्यावें, अशी मज लेंकरांची त्यांना प्रार्थना आहे. ५५ सूर्य निरंतर प्रकाशरूप असतो, अग्नि सर्वदा तेजोमय असतो, त्याप्रमाणें संतजन सर्वकाळ सावधानच असतात. म्हणून त्यांनीं माझ्या बोलण्याकडे चित्त ठेवावें, असें सांगणें हा माझा वेडेपणाच आहे, ५६ तेव्हां संतसमुदायानें एकदम गौरव करून पुनः पुनः आज्ञा केली व मजकडून हा प्राकृत ग्रंथ करविला. संतमंडळीनें एकान्तांत व चारचौघांत मला फार आग्रह केला. तेव्हां मीं त्यास म्हटलें कीं, मी कोणत्या ग्रंथाला आरंभ करूं तें सांगावें ५८ पुराणांत भागवत श्रेष्ठ आहे. त्यांतहि ‘ उद्धवगीत ’ परम श्रेष्ठ आहे. तरी त्यालाच तूं आरंभ कर. त्यांतील वक्ता जो श्रीभगवान् त्याचें तुला साह्य आहे. ५९ आम्हांला ज्ञान-कथा आवडते. त्यांतहि तुझ्यासारखा रसाळ वाणीनें युक्त असा वक्ता ! तेव्हां त्याची बहार काय वर्णावी ! तरी आतां तूं स्तुति सोडून मुख्य विषयाच्या निरूपणाला आरंभ कर. ६० तुला संतांची स्तुति करण्याचा फार हव्यास आहे, हा तुझा आशय आम्हांला कळला, तरी आतां कथेला सत्वर आरंभ कर. ६१ हें संतांचें कृपावचन ऐकून मनाला अत्यंत आनंद झाला. या प्रसादवाणीनें अंतःकरण प्रसन्न झालें. ६२ मेघगर्जना ऐकतांच मोर जसा आकाशाची व आपली बरोबरी करण्यास पहातो, किंवा मेघाच्या नव्या जलानें चातकाला जसा हर्ष होतो, ६३ किंवा चंद्राची कोर दृष्टीस पडतांच चकोर जसा आनंदानें डोलूं लागतो, तसे संतमुखींचे हे शब्द मला सुखवूं लागले. ६४ हे स्वामिराया ! आपण मला अतिशय सुखी केलेंत. हें कार्य तुमचें तुम्हींच शेवटास न्याल. मग मी ‘ मी- ’पणानें व्यर्थ मनोधर्मांच्या अधीन कशाला होऊं ! ६५ परंतु समर्थांच्या आज्ञेचें सेवकाला उल्लंघन करवत नाहीं. म्हणून ते सांगतील ती आज्ञा मी प्रमाण मानितों. ६६ तुम्हीं मात्र एक काम करा. माझ्याकडे सारखें लक्ष ठेवा. म्हणजे तुमच्या कृपादृष्टीनें सर्व कार्य सहजच शेवटास जाईल. ६७ ‘ अरे, तुझ्या मनामध्येंच आमचें मन आहे व तुझ्या शब्दाकडे आम्हीं लक्ष लाविलें आहे. तरी आतां लवकर निरूपणाला सुरुवात कर. ’ ६८ असो; आतां कुलदेवतेला वंदन करूं. ती ऐक्यरूपानें एकनाथामध्येंच वास करीत असल्यामुळें ऐक्यावांचून दुसरी गोष्टच बोलूं देत नाहीं. ६९ तिनें एकच रूप दाखविलें आहे. तेंच मनांत

पर्णीं एकवीरा ॥७०॥ ते शिवशक्ति रूपें दोनीं । लेऊन मिरवे एकपर्णीं । एकपणें जाली गुर्विणी । प्रसवे एकपर्णीं एकवीरा ॥ ७१ ॥ ते एकरूपें एकवीरा । प्रसवली बोधफरशधरा । जयाचा कां दरारा । महावीरां अभिमानियां ॥ ७२ ॥ तेणें उपजोनि निवटिली माया । आज्ञा पाळूनि सुख दे पितया । म्हणोनि तो जाहला विजया । लवलाह्या दिग्मंडळीं ॥७३॥ जो वासनासहस्रबाहो । छेदिला सहस्रार्जुन अहंभावो । स्वराज्य करूनियां पाहाहो । अर्पी स्वमेवो स्वजातियां ॥ ७४ ॥ तेणें मारूनि माता जीवविली । तेचि कुळदेवता आम्हां जाहली । परी स्वनांवें ख्याति केली । एकात्मबोली एकनाथा ॥ ७५ ॥ ते जैंपासोनि निवटिली । तैंपासोनि प्रकृति पालटली । रागत्यागें शांत झाली । निजमाउली जगदंबा ॥ ७६ ॥ तया वोसगा घेऊन । थोर दिधलें आश्वासन । विषमसंकटीं समाधान । स्वनामस्मरण केलिया ॥ ७७ ॥ ते जय जय जगदंबा । उदो म्हणे ग्रंथारंभा । मतीमाजीं स्वयंभा । योगगर्भा प्रकटली ॥ ७८ ॥ आतां वंदूं जनार्दनु । जो भवगजपंचाननु । जनीं विजनीं समानु । सदा संपूर्ण समत्वें ॥ ७९ ॥ ज्याचेनि कृपापांगें । देहीं न देखतीं देहांगें । संसार टवाळ वेगें । केलें वाउगें भवस्वप्न ॥ ८० ॥ जयाचेनि कृपाकटाक्षें । अलक्ष्य लक्ष्येंवीण लक्षे । साक्षी विसरली साक्षें । निजपक्षें गुरुत्वें ॥ ८१ ॥ तेणें जीवेंवीण जीवविलें । मृत्यूवीण मरणचि मारिलें । दृष्टि घेऊनि दाखविलें । देखणें केलें सर्वांग ॥ ८२ ॥ देहीं देह विदेह केलें । शेखीं विदेहपण तेंही नेलें । नेलेपणही हारपलें । उरीं उरलें उर्वरित ॥ ८३ ॥ अभावो भावेंशीं गेला । संदेह निःसंदेहेंशीं निमाला । विस्मयो विस्मयीं बुडाला । वेडावला स्वानंदू ॥ ८४ ॥ तेथ आवडी होय भक्तू । तंव देवोचि भक्तपणाआंतू । मग भज्यभजनांचा अंतू । दावी उप्रांतू स्वलीला ॥ ८५ ॥ नमन नमनेंशीं नेलें । नमितें नेणों काय जाहलें । नम्यचि अंगीं घडलें । घडलें मोडलें मोडूनी ॥ ८६ ॥ दृश्य द्रष्टा जाण ।

दृढ ठसल्यामुळें जनांत व वनांत, तेंच दिसतें. कानाला तेंच ऐकूं येतें, मुख त्याचेंच वर्णन करितें. ती एकत्वानें एकवीरा आहे. ७० ती शिव व शक्ति अशीं दोन्हीं रूपें धारण करून एकत्वानेंच मिरविते. ती एकत्वानें गर्भवती झाली. तिनें एकत्वानेंच एकवीराला जन्म दिला. ७१ ती ऐक्यरूपी एकवीरा म्ह० रेणुका देवी बोधरूपी परशुरामाला प्रसवली. मोठमोठ्या अभिमानी महावीरांनाहि त्याचा दरारा वाटूं लागला. ७२ त्यानें जन्म घेऊन पित्याची आज्ञा पाळण्यासाठीं मायेचा वध केला, म्हणून तो भूतलावर सारखा विजयी होत गेला. ७३ ज्याला वासनारूपी एक सहस्रबाहु आहेत अशा अहंकाररूपी सहस्रार्जुनाचा त्यानें वध केला आणि स्वराज्यरूपी ठेवा त्यानें स्वतःच ब्राह्मणांना अर्पण केला. ७४ त्यानें मातेचा वध करून तिला पुनः जिवंत केली, तीच आमची कुलदेवता झाली. तिला आम्हीं आमच्याच नांवानें संबोधिली, कारण एकनाथाला ऐक्यावांचून दुसरें भाषण ठाऊक नाहीं. ७५ ती जेव्हांपासून प्रसन्न झाली तेव्हांपासून माझ्या हृदयांत एकरूप होऊन राहिली व त्यामुळें माझा स्वभाव बदलला. वासनांचा त्याग करून ती माझी माउली जगदंबा शांत झाली. ७६ व तिनें मला मांडीवर घेऊन असें मोठें आश्वासन दिलें कीं, कसल्याहि संकटप्रसंगीं माझ्या नामस्मरणानें तुझें समाधान होईल. ७७ त्या जगदंबेचा जयजयकार असो. ग्रंथारंभीं मी 'उदो, उदो' म्हणतों, ती स्वयंप्रकाशदेवी समाधींत माझ्या बुद्धीमध्यें प्रकट झाली आहे. ७८ आतां संसाररूपी हत्तीचा नाश करणारा सिंहच, लोकांत व एकान्तांत एकसारखा वागणारा आणि सदा समत्वबुद्धीनें पूर्ण असलेला, अशा जनार्दनाला वंदन करूं. ७९ त्यांच्या कृपाप्रसादानें मनुष्याला देहाचे अवयवहि दिसत नाहींत. त्यानें संसाराला मिथ्या ठरविलें व क्षणांत त्याला स्वप्नवत् केलें. ८० ज्याच्या कृपादृष्टीनें दृष्टीवांचून अदृष्ट दिसतें, अलक्ष्य वस्तु लक्ष्यावांचूनच दिसते व आपल्या माहात्म्यानें साक्षी साक्ष्य वस्तूंना विसरतो, ८१ ज्यांनीं जीवावांचून जिवंत ठेविलें आणि मृत्यूवांचून मरणाला मारून टाकिलें; दृष्टि काढून घेऊन दाखविलें व सर्वांगाला देखणें केलें. देहांतच देहाला विदेही केलें, शेवटीं तें विदेहपणहि नेलें. अखेरीस तें नेणतेंपणहि नाहींसें केलें व अबाधित तत्त्व बाकी उरविलें. ८३ अभाव भावांत लीन झाला. संशय निःसंशयांत लोपला, आश्चर्य आश्चर्यांत बुडालें व स्वानंद वेडावून गेला. ८४ तेथें भक्ताला देवाची आवड उत्पन्न झाली; पण भक्तपणाच्या आंत देव असलेला दिसतांच भक्तीचा विषय व भजन या दोहोंचा अंत झाला. याप्रमाणें तो आपली अमर्याद लीला दाखवितो. ८५ त्यानें नमनानें नमनाला नाहींसें केलें. नमन करणारें काय झालें, हें कळेना. ज्याला नमन करावयाचें तें स्वतःच झाल्यामुळें बाकीचे सर्वभाव नाहींसे झाले. ८६ दृश्य व द्रष्टा या दोहोंना एकदमच

दोहींस एकचि मरण । दर्शनही जाहलें क्षीण । देखणेंपण गिळूनी ।। ८७ ।। आतां देवोचि आघवा । तेथें भक्तु-नये भक्तभावा । तंव देवोही मुकला देवा । देवस्वभावा विसरोनी ।। ८८ ।। देवो देवपणें दाटला । भक्तु भक्त-पणें आटला । दोहींचाही अंतु आला । अभेदें जाहला अनंतु ।। ८९ ।। अत्यागु त्यागेंशीं विराला । अभोगु भोगेंशीं उडाला । अयोगु योगेंशीं बुडाला । योग्यतेचा गेला अहंभावो ।। ९० ।। ऐशियाहीवरी अधिक सोसु । सायुज्यामाजीं होतसे दासु । तेथील सुखाचा सौरसु । अति अविनाशु अगोचरू ।। ९१ ।।' शिवें शिवूचि यजिजे ' । हें ऐशिये अवस्थेसि साजे । एरव्हीं बोलचि बोलिजे । परी न पविजे निजभजन ।। ९२ ।। ये अभिन्न सुखसेवे-आंतु । नारद आनंदें नाचत गातु । शुकसनकादिक समस्तु । जाले निजभक्तु येणेंचि सुखें ।। ९३ ।। सागरीं भरे भरतें । तें भरतें भरे तरियांतें । तैसें देवेंचि देवपणें येथें । केलें मातें निजभक्तु ।। ९४ ।। सागर सरिता जीवन एक । परी मिळणीं भजन दिसे अधिक । तैसें एकपणींचि देख । भजनसुख उल्हासे ।।९५।। वाम सव्य दोन भाग । परी दों नामीं एकचि अंग । तैसा देवभक्तविभाग । देवपणीं साङ्ग आभासे ।।९६।। तेवीं आपुले-पणाचेनि मानें । भक्तु केलों जनार्दनें । परी कायावाचामनें । वर्तविजे तेणें सर्वार्थीं ।।९७।। तो सुखाचें जाला निजसुख । दृष्टीतें प्रकटे सन्मुख । तोचि विवेकेंकरून देख । करवी लेख ग्रंथार्थीं ।।९८।। परी नवल त्याचें लाघव । अभंगीं घातलें माझें नांव । शेखीं नांवाचा निजभाव । उरावया ठाव नुरवीच ।।९९।। या वचनार्थें संतोषला । म्हणे भलारे भला भला । निजभाविकु तूंचि संचला । प्रगट केला गुह्यार्थु ।।१००।। हे स्तुति कीं निरूपण । ग्रंथपीठ कीं ब्रह्मज्ञान । साहित्य कीं समाधान । संज्ञाही जाण कळेना ।।१।। तुझा बोलुचि एकएकू । सोलींव विवेकाचा विवेकू । तो संतोषासीं संतोखू । आत्यंतिकू उपजवी ।। २ ।। तुझेंनि मुखें जें जें निघे ।

मरण आलें व पहातां पहातां दर्शनहि नाहींसें झालें. ८७ आतां फक्त देवच काय तो उरला. पण तेथें भक्त नाहीं व भक्तीहि नाहीं. तेव्हां देवहि देवरूपाला विसरून आपल्या देवत्वाला मुकला. ८८ व सर्वत्र देवपणानें देव भरून राहिला. त्यामुळें भक्तपणानें भक्त नाहींसा झाला. याप्रमाणें दोहोंचाहि अंत होऊन अभेदावस्थेंत केवळ अनंतरूप शिल्लक राहिलें. ८९ अत्याग त्यागांतच मिळून गेला. अभोग भोगांतच लीन झाला. अयोग योगांत बुडून गेला व योग्यतेचा अहंपणा नाहींसा झाला. ९० याहि अवस्थेपेक्षां अधिक प्राप्तीची भक्ताला इच्छा असते व तो आत्यंतिक सुखाच्या सायुज्य स्थितीचा दास होतो. तेथल्या सुखाचा रस विनाश न पावणारा व डोळ्यांना न दिसणारा आहे. ९१ शिवानेंच शिवाची पूजा करावी अशी स्थिति प्राप्त होते. एरवीं सर्व बोलणें केवळ शाब्दिक आहे. त्यानें आत्मस्वरूपाचें भजन होत नाहीं. ९२ या अभिन्न अवस्थेंतील सुखकर सेवेंत नारद आनंदानें गात व नाचत असतो. याच सुखानंदानें सनकादिक आत्मस्वरूपाचे भक्त झाले. ९३ समुद्राला भरती आली म्हणजे त्या पाण्यानें खाडी भरून जाते, त्याप्रमाणें देवानें मला आपला देवपणा देऊन भक्त केले. ९४ समुद्र व नदी यांचें पाणी एकसारखेंच असतें, पण त्या दोहोंचा संगम विशेष शोभतो. त्याचप्रमाणें परमात्म्याचें ऐक्यभावानें भजन केल्यास अधिक सुखानंद होतो. ९५ डावा आणि उजवा असे शरीराचे दोन भाग आहेत; परंतु या दोन्ही शब्दांनीं एकाच देहाचा बोध होतो. त्याप्रमाणें देव आणि भक्त हे जरी भिन्न विभाग भासले तरी त्या दोघांचाहि देवपणांत एकत्वानें अनुभव येतो. ९६ याप्रमाणें जनार्दनस्वामींनीं आपलेपणाचा मान देऊन मला भक्त केले आहे. पण आतां त्यांनीं काया, वाचा व मनानें सर्वप्रकारें मला आपलेपणानें वागवावें. ९७ तोच सुखाचें सुख झाला आहे, डोळ्यांसमोर साक्षात् प्रकट झाला आहे व तोच विवेकपूर्वक ग्रंथाचा अर्थ करीत आहे. ९८ परंतु त्याची लीला मोठी विलक्षण आहे. त्यानें अभंगांतच माझें नांव घालून ठेविलें आहे. त्यामुळें शेवटीं नांवाची जी इच्छा राहावयाची, तीहि उरली नाहीं. ९९ हें माझें वचन ऐकून त्यांना मोठा संतोष झाला व ते म्हणाले कीं शाबास ! तूं धन्य आहेस. खरोखर आत्मस्वरूपाचा खरा भक्त तूंच आहेस, म्हणूनच हा गूढ अर्थ तूं प्रकट केलास. १०० ही स्तुति म्हणावी कीं निरूपण ! ही ग्रंथाची प्रस्तावना कीं हें ब्रह्मज्ञान ! हें साहित्य कीं समाधान ! याचें कांहींच लक्षण समजत नाहीं. १ तुझा एक शब्द म्हणजे विचाराचा गाभाच आहे. तो संतोषालाहि अत्यंत संतोष देतो. २ तुझ्या मुखांतून जे शब्द निघतात, ते संतांच्या मनाला बरोबर पटतात.

तें संतहृयीं साचचि लागे । मुमुक्षुसारंगांचीं पालिंगें । रुंजी निजांगें करितील ।। ३ ।। ग्रंथारंभु पडला चोख । मुक्त मुमुक्षु इतर लोक । श्रावणमात्रेंचि देख । निजात्मसुख पावती ।।४।। येणें वचनामृततुषारें । ग्रंथभूमिका विवेकांकुरें । अंकुरली एकसरें । फळभारें सफलित ।।५।। कीं निर्जीवा जीवु आला । नातरी सिद्धां सिद्धिलाभु जाला । कीं निजवैभवें आपुला । प्रियो मीनला पतिव्रते ।।६।। तैसेंनि हरुषानंदें । जी जी म्हणितलें स्वानंदें । तुमचेनि पादप्रसादें । करीन विनोदें ग्रंथार्थू ।। ७ ।। श्रीरामप्रतापदृष्टीं । शिळा तरती सागरापोटीं । कीं वसिष्ठ-वचनासाठीं । तपे शाटी रविमंडळीं ।।८।। कीं याज्ञवल्कीच्या मंत्राक्षता । शुष्ककाष्ठांस पल्लवता । कीं धर्में श्वानू सरता । केला सर्वथा स्वर्गलोकीं ।।९।। तैसें माझेनि नांवें । ग्रंथ होती सुहावे । आज्ञाप्रतापगौरवें । गुरुवैभवें सार्थकु ।।१०।। घटित एका आणि एकादशें । राशिनक्षत्र एकचि असे । त्या एकामाजीं जैं पूर्ण दिसे । तैं दशदशांशें चढे अधिक ।।११।। मागां पुढां एक एक कीजे । त्या नांव एकादशू म्हणिजे । तरी एका एकपणचि सहजे । आलें निजबोधें ग्रंथार्थें ।।१२।। तेथें देखणेंचि करूनि देखणें । अवघेचि निर्धारूनि मनें । त्यावरी एकाजनार्दनें । टीका करणें सार्थक ।।१३।। पाहोनि दशमाचा प्रांतू । एकादशाच्या उदयाआंतू । एकादशावरी जगन्नाथू । ग्रंथार्थू आरंभी ।।१४।। म्हणोनि एकादशाची टीका । एकादशीस करी एका । ते एकपणाचिया सुखा । फळेल देखा एकत्वें ।।१५।। आतां वंदूं महाकवी । व्यास वाल्मीक भार्गवी । जयातें उशना कवी । पुराणगौरवीं बोलिजे ।।१६।। तिहीं आपुलिये व्युत्पत्ती । वाढवावी माझी मती । हेचि करितसें विनंती । ग्रंथ समाप्ती न्यावया ।।१७।। वंदूं आचार्य शंकरू । जो कां ग्रंथार्थ विवेकचतुरू । सारूनि कर्मठतेचा विचारू ।

मुमुक्षुरूपी भ्रमरांचे थवे त्यांवर गुंजारव करतील. ३ ग्रंथाचा आरंभ सुंदर झाल्यामुळें मुक्त, मुमुक्षु, साधक व इतर बद्ध जनहि केवळ याच्या श्रवणानेंच आत्मस्वरूपसुखाला प्राप्त होतील. ४ या वचनामृतरूपी तुषारानें ग्रंथरूपी भूमीवर विवेकरूपी अंकुर सर्वभर दाट उगवले व फळांच्या भारानें त्यांना सफलत्व आलें. ५ किंवा निर्जीवाला जीव आला, किंवा सिद्धाला सिद्धि मिळाली, किंवा पतिव्रतेला वैभवासह आपला पति लाभला. त्यावर मोठ्या हर्षभरानें मीं म्हटलें कीं,स्वामीराया! ठीक आहे, आपल्या पायांच्या प्रसादानें ग्रंथाचा अर्थ मी सहजलीलेनें करीन. ७ सेतुबंधनाच्या वेळीं श्रीरामचंद्राच्या नुसत्या दृष्टीच्या प्रभावानें जशा समुद्रांत शिळा तरल्या, किंवा विश्वामित्राला ब्रह्मर्षि ठरविण्याच्या वादप्रसंगीं ब्रह्मदेवानें विश्वामित्राला सूर्य, समुद्र व मेरूपर्वत या तिघांना साक्षी आणण्यास सांगितलें. परंतु हे तिघे साक्षीसाठीं गेल्यास त्यांचीं कामें कोणीं पहावीं, हा प्रश्न विश्वामित्राला सोडवितां न आल्यामुळें तो त्यांना आणूं शकला नाहीं. तेव्हां वसिष्ठ महर्षीनें सूर्याच्या जागीं आपली छाटी, समुद्राच्या जागीं आपला कमंडलु व मेरूपर्वताच्या जागीं आपला दंड ठेवून त्या तिघांसहि ब्रह्मदेवाजवळ आणिलें. या (कथेनुसार) वसिष्ठाच्या आज्ञेनें त्याची छाटी जशी सूर्यमंडळाचा प्रकाश देऊं लागली, ८ किंवा याज्ञवल्क्यमुनि आपल्या गुरूच्या आज्ञेवरून राजाच्या मस्तकावर आशीर्वादाच्या अक्षता टाकण्यास गेला असतां राजा आपल्या सिंहासनावर नव्हता. म्हणून मुनीनें त्या आसनावर अक्षता टाकल्या. तेव्हां त्या आसनाच्या लांकडाला जशी पालवी फुटली, किंवा धर्मराजानें स्वर्गारोहणप्रसंगीं आपल्या बरोबर जसें एक कुत्रें नेलें होतें, ९ त्याप्रमाणें माझ्या नांवें ग्रंथ प्रसिद्ध होणें हें गुरूच्या आज्ञाप्रतापाचें व वैभवाचें निदर्शक आहे. १० एक आणि अकरा याची रचना राशी व नक्षत्रें यांप्रमाणें एकच दिसते. एकामध्येंच जें शून्य दिसतें तेंच दहा दहा अंशानें वाढतें. ११ एकावर एक मांडला कीं त्याला अकरा म्हणतात. म्हणून एकनाथालाहि एकत्वानें सहजच ग्रंथ करण्याची स्फूर्ति झाली व ती आत्मबोधानें ग्रंथार्थरूपानें प्रकट झाली. १२ म्हणून दृष्टीलाच दर्शनाचें साधन करून मनानें सर्वांचा निश्चय करून मगच एका जनार्दनानें टीका करणें युक्त होय. १३ दहाव्या स्कंधाचा शेवटचा भाग अकराव्या स्कंधाच्या आरंभीं आहे असें पाहून श्रीकृष्ण त्या एकादश स्कंधावर निरूपण करूं लागले. १४ म्हणून एकनाथांनींहि एकादश स्कंधाची टीका आरंभिली. ती एकत्वाच्या सुखाला एकत्वानें प्राप्त होईल. १५ आतां व्यास, वाल्मीकि व शुक्राचार्य कीं ज्याचा पुराणांतून उशनाकवि असा गौरव केला आहे. (गु. भ. गी. अ. १०.) त्या सर्व महाकवींना वंदन करूं. १६ त्यांनीं आपल्या व्युत्पत्तीनें म्ह० शब्दार्थबोधानें माझ्या बुद्धीला सामर्थ्य द्यावें, अशी त्यांस ग्रंथ पुरा होण्यासाठीं विनंती करितों. १७ आतां श्रीमज्जगद्गुरु आद्य शंकराचार्यांना नमस्कार करूं. ज्यांनीं कर्मठांचा विचार बाजूला सारून

प्रबोधदिनकरू प्रकाशिला ॥१८॥ आतां वंदूं श्रीधर । जो भागवतव्याख्याता सधर । जयाची टीका पहातां अपार । अर्थ साचार पैं लाभे ॥१९॥ इतरही टीकाकार । काव्यकर्ते विवेकचतुर । त्यांचे चरणीं नमस्कार । ग्रंथा सादर तिहीं होआवें ॥ १२० ॥ वंदूं प्राकृत कवीश्वर । निवृत्तिप्रमुख ज्ञानेश्वर । नामदेव चांगदेव वटेश्वर । ज्यांचें भाग्य थोर गुरुकृपा ॥ २१ ॥ जयांचे ग्रंथ पाहतां । ज्ञान होय प्राकृतां । तयांचे चरणीं माथा । निजात्मता निजभावें ॥ २२ ॥ संस्कृत ग्रंथकर्ते ते महाकवी । मा प्राकृतीं काय उणीवी । नवीं जुनीं म्हणावीं । कैसेनि केवीं सुवर्णसुमनें ॥ २३ ॥ कपिलेचें म्हणावें क्षीर । मा इतरांचें तें काय नीर । वर्णस्वादें एकचि मधुर । दिसे साचार सारिखें ॥ २४ ॥ जें पाविजे संस्कृत अर्थें । तेंचि लाभे प्राकृतें । तरी न मनावया येथें । विषमचि तें कायी ? ॥२५॥ कां निरंजनीं बसला रावो । तरी तोचि सेवकां पावन ठावो । तेथें सेवेसि न वचतां पाहाहो । दंडी रावो निजभृत्यां ॥ २६ ॥ कां दुबळी आणि समर्थ । दोहींस रायें घातले हात । तरी दोघींसिही तेथ । सहजें होत समसाम्य ॥२७॥ देशभाषावैभवें । प्रपंच पदार्थीं पालटलीं नांवें । परी रामकृष्णादिनामां नव्हे । भाषावैभवें पालटू ॥ २८ ॥ संस्कृतवाणी देवें केली । तरी प्राकृत काय चोरापासूनि झाली ? असोतु या अभिमानभुली । वृथा बोलीं काय काज ॥२९॥ आतां संस्कृता किंवा प्राकृता । भाषा झाली जे हरिकथा । ते पावनचि तत्त्वता । सत्य सर्वथा मानली ॥१३०॥ वंदूं भानुदास आतां । जो कां पितामहाचा पिता । ज्याचेनि वंश भगवंता । झाला सर्वथा प्रियकर ॥३१॥ जेणें बाळपणीं आकळिला भानु । स्वयें जाहला चिद्भानु । जिंतोनि मानाभिमानु । भगवत्पावनु स्वयें झाला ॥३२॥ जयाची पदबंधप्राप्ती । पाहों आली श्रीविठ्ठलमूर्ती । कानीं कुंडलें जगज्ज्योती । करितां रातीं देखिला ॥३३॥ तया

म्ह० पूर्वमीमांसकांच्या मताचें खंडन करून प्रबोधसूर्य म्हणजे ज्ञानानेंच मोक्षप्राप्ति होते हा सिद्धान्त प्रस्थापित केला. १८ आतां ज्याची विस्तृत टीका पाहतां ग्रंथाचा यथार्थ अर्थ कळतो, त्या श्रेष्ठ भागवतव्याख्यानकार श्रीधरास मी वंदन करितों. १९ इतरहि सर्व टीकाकार काव्यकर्ते व विवेकनिपुण, या सर्वांना नमस्कार करून त्यांना ग्रंथश्रवणास सादर होण्याची विनंती करितों. २० आतां निवृत्तिप्रभृति ज्ञानेश्वर, नामदेव, चांगदेव, वटेश्वर व ज्यांच्यावर मोठी गुरु-कृपा आहे व ज्यांचें भाग्य थोर आहे, अशा सर्व मराठी श्रेष्ठ कवींना वंदन करूं. २१ ज्यांचें ग्रंथ वाचल्यानें प्राकृत जनांना देखील ज्ञान प्राप्त होतें, त्यांच्या चरणीं मी अनन्यभक्तीनें व आत्मभावानें मस्तक ठेवितों. २२ संस्कृत ग्रंथकर्ते तेवढे महाकवि, मग मराठी ग्रंथकर्त्यांनाच कमीपणा कां ? सोन्याचीं फुलें ताजीं व शिळीं असलीं तरी सारखींच ! २३ कपिला गायीचें तेवढें दूध व इतर गायींचें काय पाणी म्हणावयाचें ? दोन्हींचा रंग, रुचि व गोडी सारखीच असणार. २४ जें संस्कृत अर्थावरून कळणार, तेंच मराठींत असणार. तेव्हां दोहोंमध्यें भेद कसला ? २५ राजा जंगलांत जरी जाऊन बसला तरी त्याच्या नोकरांना ती जागा पवित्रच मानली पाहिजे. ते जर त्याच्या सेवेला तेथें गेले नाहींत तर राजा त्या आपल्या सेवकांना शिक्षा करील, २६ किंवा राजानें एखाद्या गरिबाच्या मुलीबरोबर व एका श्रीमंताच्या कन्येबरोबर लग्न लाविलें, तर लग्न होतांच दोघींचीहि योग्यता सारखीच होते. २७ देश व भाषा यांच्या परत्वें व्यवहारांतील वस्तूंचीं सामान्य नांवें बदलतात, पण राम, कृष्ण नारायण इत्यादि विशेष नांवें संस्कृतांत किंवा मराठींत सारखींच राहणार. त्यांत कांहीं देशकालपरत्वें किंवा भाषेमुळें बदल होत नाहीं. २८ संस्कृत तेवढें देवापासून झालें व मराठी काय चोरापासून झालें ? असो. हा सर्व अभिमानाचा भ्रम आहे. त्याची व्यर्थ चर्चा कशाला ! २९ तेव्हां आतां भाषा संस्कृत असो कीं प्राकृत असो, मी जी हरिकथा सांगणार आहे ती खरोखर पवित्र व सर्वथा मान्य आहे. ३० (विजयनगरच्या किरीटी रामराजानें पंढरीहून पांडुरंगाची नेलेली मूर्ति एकनाथांचे पणजे भानुदास यांनीं परत आणली.) आतां आमच्या आजोबांचे वडील भानुदास यांना वंदन करूं. त्यांच्यायोगें आमचा वंश भगवानाला फार प्रिय झाला. ३१ त्यानें बाळपणींच सूर्याला स्वाधीन करून घेतलें व स्वतः चिद्रूप सूर्य झाला, आणि मान-अपमानाला जिंकून स्वतः पावन झाला. ३२ त्याचें काव्यरचनाचातुर्य पहाण्यास प्रत्यक्ष श्रीविठ्ठलाची मूर्ति आली होती. तिच्या कानांत तेजस्वी कुंडलें झळकत असल्यामुळें रात्रींच्या प्रहरींहि ती मूर्ति

भानुदासाचा चक्रपाणी । तयाचाही सुत सुलक्षणी । तया सूर्य नाम ठेवूनी । निजीं निज होऊनि भानुदास ठेला ।।३४।। तया सूर्यप्रभाप्रतापकिरणीं । मातें प्रसवली रुक्मिणी । म्हणौनि रखुमाई जननी । आम्हांलागुनी साचचि ।।३५।। हे ग्रंथारंभकाळा । वंदिली पूर्वजमाळा । धन्य निजभाग्याची लीळा । आलों वैष्णवकुळा जन्मोनी ।।३६।। ते वैष्णवकुळीं कुळनायक । नारद प्रल्हाद सनकादिक । उद्धव अक्रूर श्रीशुक । वसिष्ठादिक निजभक्त ।।३७।। ते वैष्णव सकळ । ग्रंथार्थीं अवधानशीळ । म्हणौनि वैष्णवकुळमाळ । वंदिली सकळ ग्रंथार्थीं ।। ३८ ।। उपजलों ज्याचिया गोत्रा । नमन त्या विश्वामित्रा । जो कां प्रतिसृष्टीचा धात्रा । गायत्रीमंत्रा महत्त्व ।।३९।। जो उपनिषद्विवेकी । तो वंदिला याज्ञवल्की । जो कविकर्तव्यातें पोखी । कृपापीयूखीं वर्षोनी ।। १४०।। नमन भूतमात्रां अशेखां । तेणें विश्वंभरू जाहला सखा । म्हणौनि ग्रंथारंभू देखा । आला नेटका संमता ।।४१।। आतां नमूं दत्तात्रेया । जो कां आचार्यांचा आचार्या । तेणें प्रवर्तविलें ग्रंथकार्या । अर्थवावया निजबोधू ।।४२।। तो शब्दातें दावितु । अर्थु अर्थें प्रकाशवितु । मग वक्तेपणाची मातु । स्वयें वदवितु यथार्थ ।।४३।। तो म्हणे श्रीभागवत । तें भगवंताचें हृद्गत । त्यासीचि होय प्राप्त । ज्याचें निरंतर चित्त भगवंतीं ।।४४।। तें हें ज्ञान कल्पादी । चतुश्लोकपदबंधीं । उपदेशिला सद्बुद्धी । निजात्मबोधीं विधाता ।। ४५ ।। नवल तयाचा सद्भावो । शब्दमात्रें जाला अनुभवो । बाप सद्गुरुकृपा पाहाहो । केला निःसंदेहो परमेष्ठी ।। ४६ ।। तो चतुःश्लोकींचा बोधु । गुरुमार्गें आला शुद्धु । तेणें उपदेशिला नारदु । अति प्रबुद्धु भावार्थी ।। ४७ ।। तेणें नारदु निवाला । अवघा अर्थमयचि जाला । पूर्ण परमानंदें धाला । नाचों लागला निजबोधें ।।४८।। तो ब्रह्मवीणा वाहातु । ब्रह्मपदें गीतीं गातु । तेणें ब्रह्मानंदें नाचतु । विचरे डुल्लतु भूतळीं ।। ४९ ।। तो आला सरस्वतीतीरा । तंव देखिलें व्यासऋषीश्वरा । जो संशयाचिया पूरा । अतिदुर्धरामाजी पडिला ।। १५० ।।

दिसली. ३३ त्या भानुदासाचा पुत्र चक्रपाणी, त्यालाहि सुलक्षणी पुत्र झाला. त्याचें नांव सूर्य ठेवून भानुदास निजाधमास गेला. ३४ त्या सूर्यकिरणाच्या प्रभावानें रुक्मिणीनें मला जन्म दिला. म्हणून रुक्मिणी हीच आमची आई आहे. ३५ या ग्रंथाच्या आरंभाच्या वेळीं मी सर्व पूर्वजांच्या परंपरेला वंदन केलें. माझी भाग्यलीला धन्य आहे. म्हणूच मी वैष्णवकुळांत जन्मास आलों. ३६ त्या वैष्णवकुळांत नारद, प्रल्हाद, सनकादिक, उद्धव, अक्रूर, श्रीशुक, वसिष्ठादिक हे परमात्मभक्त आहेत. ३७ ते सर्व वैष्णव ग्रंथार्थामध्यें अवधान ठेवणारे आहेत. म्हणून मी या वैष्णवांच्या सर्व कुलपरंपरेला या ग्रंथाच्या आरंभीं वंदन केलें आहें. ३८ जो प्रतिसृष्टीचा कर्ता व ज्याच्यामुळें गायत्रीमंत्राला इतकें महत्त्व आलें व ज्याच्या गोत्रांत मी उत्पन्न झालों त्या विश्वामित्राला नमस्कार असो. ३९ उपनिषदांचें विवेचन करणारा व ज्ञान्यांचें कर्तव्य, कृपारूपी अमृतवृष्टीनें पुष्ट करणारा जो याज्ञवल्क्य त्याला मी वंदन करितों. १४० सर्व भूतमात्रांना नमस्कार असो. कारण त्यांच्यामुळेंच विश्वंभर सखा झाला. म्हणून हा ग्रंथारंभ चांगला व सर्वसंमत झाला. ४१ आचार्यांचाही आचार्य असा जो दत्तात्रय त्याला मी नमस्कार करितों. आत्मबोध ग्रंथरूपानें प्रकट करण्यासाठीं त्यानेंच मला या ग्रंथकार्यामध्यें प्रवृत्त केलें.४२ जो शब्दांना दाखवितो व शब्दार्थानेंच प्रतिपाद्य विषय प्रकट करितो आणि मग वक्तृत्वाचें नांव स्वतःच यथार्थ बोलवितो. ४३ तो म्हणतो कीं, श्रीभागवत हें भगवंताचें हृद्गत आहे. ज्यांचें चित्त निरंतर भगवंतामध्यें असतें त्यालाच हें प्राप्त होतें. ४४ कल्पाच्या आरंभीं भगवानानें सद्बुद्धिमान् विधात्याला हें ज्ञान चार श्लोकांनीं सांगितलें. त्याचा सद्भाव मोठा विलक्षण होता. त्याला केवळ त्या शब्दांनींच आत्मानुभव आला. ४५ सद्गुरूची कृपा किती समर्थ आहे ती पहा ! त्या कृपेनेंच ब्रह्मदेवाला निःसंदेह केलें. ४६ याप्रमाणें गुरुमार्गानें प्राप्त झालेला तो चतुःश्लोकी भागवताचा बोध ब्रह्मदेवानें नारदाला उपदेशिला. ४७ त्यामुळें श्रद्धाळु नारद ज्ञानी झाला. त्याचें चित्त शांत झालें. तो नखशिखान्त अर्थमय झाला. परमानंदानें पूर्ण तृप्त झाला व आत्मानंदानें नाचूं लागला. ४८ खांद्यावर ब्रह्मवीणा टाकून ब्रह्म-बोधक पदें गीतिरूपानें गात आणि त्या ब्रह्मानंदानें नाचत व डुलत भूतलावर संचार करूं लागला. ४९ एकदां तो सरस्वतीच्या तीरावर आला. तों तेथें संशयाच्या अति दुर्धर पुरांत पडलेल्या व्यास महर्षीला त्यानें पाहिलें. १५० व्यासानें सर्व वेदार्थानें युक्त अशीं पुराणें रचिलीं. पण

वेदार्थ सकळपुराण । व्यासें केलें निर्माण । परी तो न पवेंचि आपण । निजसमाधान स्वहिताचें ॥५१॥ तो संशयसमुद्राआंतु । पडोनि होता बुडतु । तेथें पावला ब्रह्मसुतु । नाभीं म्हणतु कृपाळू ॥ ५२ ॥ तेणें एकांतीं नेऊन देख । व्यासासि केलें एकमुख । मग दाविले चान्ही श्लोक । भवमोचक निर्दुष्ट ॥ ५३ ॥ ते सूर्यातें न दाखवुनी । गगनातेंही चोरूनी । कानातें परते सारूनी । ठेला उपदेशुनी निजबोधू ॥५४॥ तें नारदाचें वचन । करीत संशयाचे दहन । तंव व्यासासि समाधान । स्वसुखे पूर्ण हों सरलें ॥ ५५ ॥ मग श्रीव्यासें आपण । भागवत दशलक्षण । शुकासि उपदेशिलें जाण । निजबोधें पूर्ण सार्थक ॥ ५६ ॥ तेणें शुकही सुखावला । परमानंदें निमाला । मग समाधिस्थ राहिला । निश्चय ठेला निजशांती ॥ ५७॥ तेथें स्वभावेंचि जाणा । समाधि आली समाधाना । मग परिक्षिती चिया ब्रह्मज्ञाना । अवचटें जाणा तो आला ॥ ५८ ॥ पहावया परीक्षितीचा अधिकारू । तंव कलीसि केला तेणें मारू । तरी धर्माहूनि दिसे थोरू । अधिकारू पैं याचा ॥ ५९ ॥ कृष्णु असतां धर्म जियाला । पाठीं कलिभेणें तो पळाला । परी हा कलि निग्रहूनि ठेला । धर्माहूनि भला धैर्यें अधिक ॥ १६० ॥ अर्जुन-वीर्यपरंपरा निर्व्यंग । सुभद्रा मातामहीचें गर्भलिंग । तो अधिकारिरत्न उपलिंग । ज्यासी रक्षितां श्रीरंग गर्भीं झाला ॥ ६१ ॥ गर्भींच असतां ज्याच्या भेणें । स्पर्शूं न शके शस्त्र द्रौण्य । त्याचा अधिकार पूर्ण । सांगावया कोण समर्थ ॥ ६२ ॥ जेणें रक्षिलें गर्भाप्रती । तया परीक्षी सर्वांभूतीं । यालागीं नांवें परीक्षिती । अगाध स्थिति नांवाची ॥ ६३ ॥ तो अभिमन्यूचा परीक्षिती । उपजला पावन करीत क्षिती । ज्याचेनि भागवताची ख्याती । घातली त्रिजगतीं परमार्थपव्हे ॥ ६४ ॥ अंगीं वैराग्यविवेकू । ब्रह्मालागीं व्यक्तोदकू । तया देखोनि श्रीशुकू । आत्यंतिकू सुखावला ॥ ६५ ॥ बाप कोपु ब्राह्मणाचा ।

त्याला स्वतःचें हित करणारें आत्मसमाधान झालें नाहीं. ५१ तो संशय समुद्रांत पडून बुडत होता. इतक्यांत तेथें हा कृपाळु ब्रह्मपुत्र नारद आला व 'भिऊं नको' असें त्याला म्हणाला. ५२ त्यानें त्याला एकांतांत नेऊन त्याच्याशीं कानगोष्टी केल्या व संसारांतून सोडविणारे निर्दोष चारी श्लोक दाखविले. ५३ ते सूर्याला न दाखवितां, आकाशापासूनहि चोरून ठेवून, कानांनाहि दूर सारून त्याला उपदेशिले. तो आत्मबोध ऐकून व्यास तृप्त झाला. ५४ नारदाच्या त्या वचनानें व्यासाच्या संशयाला जाळून टाकिलें, त्याचें समाधान झालें व तो पूर्ण आत्मानंदानें भरून गेला. ५५ मग स्वतः श्रीव्यासांनीं दशलक्षण भागवत श्रीशुकाचार्यांला उपदेशिलें. इतर पुराणें पंचलक्षण आहेत; पण हें दशलक्षण आहे. ५६ (सर्ग, विसर्ग, स्थान, पोषण, ऊति, मन्वन्तरें, ईशानुकथन, निरोध, मुक्ति व पूर्ण आश्रयें, हीं तीं दहा लक्षणें होत.) त्यामुळें त्याच्या आत्मबोधाचें पूर्ण सार्थक झालें. त्यामुळें शुकालाहि आनंद झाला, तो परमानंदानें तृप्त झाला व समाधिस्थ होऊन आत्मशांतीमध्यें निमग्न झाला. ५७ तेव्हां सहजच त्याची बुद्धि समाधान पावली. पुढें तो अकस्मात परीक्षितीला ब्रह्मज्ञानाचा उपदेश करण्यासाठीं आला. ५८ परीक्षितीचा अधिकार पहाण्यासाठीं त्यानें त्यावर कलीचा मारा केला; पण युधिष्ठिराहूनहि त्याचा अधिकार मोठा दिसला. ५९ जोंपर्यंत श्रीकृष्ण होते, तोंपर्यंतच युधिष्ठिर राहिला. श्रीकृष्ण निजधामास जातांच धर्मराज कलीच्या भीतीनें पळाला; परंतु या परीक्षितीचें धैर्य त्याहु-नहि विलक्षण. त्यानें कलीचाच निग्रह करून ठेविला. १६० अर्जुनाचा पुत्र अभिमन्यु व त्याचा पुत्र परीक्षिती. सुभद्रेनें अभिमन्यूला जन्म दिला. त्याची पत्नी उत्तरा परीक्षितीला प्रसवली. अशा श्रेष्ठ वीरपरंपरेनें उपजलेला तो राजा अधि-काराचें केवळ रत्नच होता. कारण तो गर्भांत असतांना साक्षात् भगवानांनीं आपल्या सुदर्शनानें त्याचें रक्षण केलें होतें. ६१ त्याच्या भीतीनें अश्वत्थाम्याचें शस्त्र त्या गर्भाला स्पर्शहि करूं शकलें नाहीं. तेव्हां त्याचा पूर्ण अधिकार सांग-ण्यास कोण समर्थ आहे ? ६२ ज्यानें गर्भांत आपलें रक्षण केलें तो परमात्मा सर्व प्राण्यांच्या हृदयांत आहे, अशी त्यानें परीक्षा केली, म्हणून त्याचें नांव परीक्षिती ठेविलें. नांवाचें माहात्म्य किती अगाध आहे ! ६३ तो अभिमन्युपुत्र परी-क्षिती पृथ्वीला पावन करण्यास जन्मला होता. त्यानेंच त्रिभुवनांत भागवत नांवाची प्रसिद्ध परमार्थरूपी पाणपोयी घातली. ६४ ज्याच्या अंगीं वैराग्य व विवेक पूर्ण बाणले आहेत व ज्यानें ब्रह्मासाठीं सर्वस्वावर पाणी सोडलें आहे अशा

शापें अधिकारू ब्रह्मज्ञानाचा । तयांच्या चरणीं कायावाचा । निजभावाचा नमस्कारू ॥ ६६ ॥ ब्रह्मया-हूनि ब्राह्मण थोरू । हें मीच काय फार करूं ? परी हृदयीं अद्यापि श्रीधरू । चरणालंकारू मिरवितु ॥ ६७ ॥ म्हणोनि ब्रह्माचा देवो ब्राह्मणु । हा सत्यसत्य माझा पणु । यालागीं वेदरूपें नारायणु । उदरा येऊनि वाढला ॥ ६८ ॥ म्हणौनि ब्राह्मण भूदेव । हे ब्रह्मींचे निजावेव । येथें न भजती ते मंद-दैव । अति निर्दैव अभाग्य ॥ ६९ ॥ ब्राह्मणप्रतापाचा नवलावो । तिहीं आज्ञाधारकू केला देवो। प्रतिमाप्रतिष्ठेसि पाहाहो । प्रकटे आविर्भावो मंत्रमात्रें ॥ १७० ॥ तंव संत म्हणती काय पहावें । जें स्तवनीं रचिसी भावें । तेथें प्रमेय काढिसी नित्य नवें । साहित्यलाघवें साचार ॥ ७१ ॥ गणेशु आणि सर-स्वती । बैसविलीं ब्रह्मपंक्ती । तैशीच संतस्तवनीं स्तुती । ऐक्यवृत्ती वदलासी ॥ ७२ ॥ पाठीं कुल आणि कुलदैवता । स्तवनीं वदलासि जे कथा । ते ऐकतांचि चित्त चिंता । विसरे सर्वथा श्रवणेंचि ॥ ७३ ॥ जो सद्भावो संतचरणीं । तोचि भावो ब्राह्मणीं । सुखी केले गुरुस्तवनीं । धन्य वाणी पैं तुझी ॥ ७४ ॥ तरी तुझेनि मुखें श्रीजनार्दन । स्वयें वदताहे आपण । हे बोलतांचि खूण । कळली संपूर्ण आम्हांसी ॥ ७५ ॥ चढत प्रमेयाचें भरतें । तें नावेक आवरोनि चित्तें । पुढील कथानिरूपणातें । करीं निश्चितें आरोहण ॥ ७६ ॥ विसरलों होतों हा भावो । परी भला दिधला आठवो । याचिलागीं सद्भावो । तुमचे चरणीं पहाहो ठेविला ॥ ७७ ॥ उणें देखाल जें जें जेथें । तें तें करावें पुरतें । सज्जनांमाजी सरतें । करावें मातें ग्रंथार्थसिद्धी ॥ ७८ ॥ ते म्हणती भला रे भला नेटका । बरवी ही आया आली ग्रंथपीठिका । आतां संस्कृतावरी टीका । कविपोषका वदें वहिला ॥ ७९ ॥ याचि बोलावरी माझा भावो । ठेवूनि पावलों पायांचा ठावो । तरि आज्ञेसारिखा प्रस्तावो । करीन पाहाहो कथेचा ॥ १८० ॥ तरी नैमिषारण्याआंतु । शौनकादिकांप्रति मातु । सूत असे सांगतु । गतकथार्थु अन्वयो ॥ ८१ ॥ मागां दहावे स्कंधीं जाण । कथा जाली

परीक्षितीला पाहून श्रीशुकाला अत्यंत आनंद झाला. ६५ ब्राह्मणांचा क्रोध मोठा विलक्षण. त्यांनीं शापाच्या मिषानें त्याला ब्रह्मज्ञानाचा अधिकार दिला. मी त्यांच्या चरणांना काया, वाचा, मनानें भक्तिपूर्वक नमस्कार करितों. ६६ ब्रह्माहून ब्राह्मण श्रेष्ठ आहेत, हें मींच काय सांगावें ? साक्षात् भगवान् विष्णु आपल्या हृदयावर ब्राह्मणाच्या चरणाचा अलंकार मिरवीत आहे. ६७ म्हणून ब्रह्माचा देव ब्राह्मण आहे, हा माझा सत्य पण आहे. म्हणूनच नारायण वेदरूपानें ब्राह्मणाच्या उदरीं येऊन वृद्धि पावला. ६८ यास्तव ब्राह्मण पृथ्वीवरील देव आहेत. ते साक्षात् ब्रह्माचे अवयव आहेत. त्यांना जें भजत नाहींत ते मूढमति, अभागी, दुर्दैवी होत. ६९ ब्राह्मणांचा प्रभाव केवढा विलक्षण आहे पहा ! त्यांनीं देवांनाहि आज्ञाधारक बनविलें. मूर्तीची प्राणप्रतिष्ठा करते वेळीं केवळ ब्राह्मणांच्या मंत्रानेंच त्या मूर्तींत देवत्व येतें. १७० तेव्हां संत म्हणाले कीं, यांत काय पहावयाचें आहे ? तूं स्तवनामध्यें भक्तीनें जो भाव प्रकट करीत आहेस त्यांत चातुर्यानें साहित्याचे नवे नवे सिद्धान्त काढीत आहेस. ७१ तूं गणपति व सरस्वती यांना ब्रह्माच्या पंक्तीला बसविलेंस. त्याचप्रमाणें संतांचें स्तवन करण्यांत ऐक्यवृत्ति दाखविलीस. ७२ त्यानंतर कुल व कुलदेवता यांच्या स्तवनांत तूं जी कथा सांगितलीस ती ऐकतांच मनाला चिंतेचा विसर पडला. ७३ संतचरणीं जो सद्भाव तोच ब्राह्मणांविषयींहि प्रकट केलास. तूं स्तवनानें संतांना संतुष्ट केलेस. तेव्हां तुझी वाणी धन्य होय. ७४ तुझा गुरु जनार्दन स्वतःच तुझ्या मुखानें बोलत आहे. तुझे शब्द ऐकतांच आम्हांला ही खूण पटली. ७५ तुला प्रेमाचें भरतें आलें आहे; पण विवेकानें मन अव-रून पुढील कथेचें निरूपण करण्यास निश्चयानें आरंभ कर. ७६ त्यावर एकनाथ म्हणतात-खरेंच ! मी हा भाव विसरलोंच होतों ! पण बरी आठवण केलीत. यासाठीं मीं तुमच्या चरणावर पूर्ण विश्वास ठेविला आहें. ७७ जेथें जेथें कांहीं उणीव दिसेल, तेथें तेथें ती आपण पूर्ण करावी व ग्रंथार्थ सिद्धीस नेऊन मला सज्जनांमध्यें मान्यता द्यावी. ७८ तेव्हां ते म्हणाले कीं, शाबास ! शाबास ! हे कविश्रेष्ठ ! तूं फार चांगला आहेस. हा ग्रंथाचा इतिहास तूं चांगला प्रकट केलास. आतां तूं सत्वर संस्कृतावर टीका करण्यास आरंभ कर. ७९ या त्यांच्या बोलण्यावर भाव ठेवून मी त्यांच्या पायां पडलों व म्हणालों कीं, आपल्या आज्ञेप्रमाणें मी कथेची प्रस्तावना करीत आहें पहा ! १८० नैमिषारण्यामध्यें सूत शौनका-दिकांना पूर्वींचा कथाभाग याप्रमाणें सांगत आहे. ८१ भागवताच्या दहाव्या स्कंधांत नव लक्षणांनीं युक्त कथा सांगि-

नवलक्षण । आतां मोक्षाचें उपलक्षण । सांगे श्रीकृष्ण एकादशीं ।। ८२ ।। जो चिदाकाशींचा पूर्णचंद्र । जो योगज्ञाननरेंद्र । तो बोलता जाला शुकयोगींद्र । परिसता नरेंद्र परिक्षिती ।।८३।। तंव परिक्षिती म्हणे स्वामी । याचिलागीं त्यक्तोदक मी । तेचि कृपा केली तुम्हीं । तरी अन्य आम्हीं निजभाग्यें ।। ८४ ।। अगा हे साचार मोक्षकथा । ज्यांसि मोक्षाची अवस्था । तिहीं पाव देऊनि मनाचे माथां । रिघावे सर्वथा श्रवणादरीं ।। ८५ ।। भीतरी नेऊनियां कान । कानीं द्यावें निजमन । अवधाना करूनि सावधान । कथानुसंधान धरावें ।।८६।। बहुतीं अवतारीं अवतरला देवो । परी या अवतारींचा नवलावो । देवां न कळे अभिप्रावो । अगम्य पाहाहो हरिलीला ।।८७।। उपजतांचि मायेवेगळा । वाढिन्नला स्वयें स्वलीळा । बाळपणीं मुक्तीचा सोहळा । पूतनादि सकळां निजांगें अर्पी ।।८८।। मायेसि दाविले विश्वरूप । गोवळां दाविलें वैकुंठदीप । परी गोवळेपणाचें रूप । नेदीच अल्प पालटों ।।८९।। बाळ बळियांतें मारी । अचाट कृत्यें जगादेखतां करी । परी बाळपणाबाहेरी । तिळभरी नव्हेचि ।। १९० ।। ब्रह्म आणि चोरी करी । देवो आणि व्यभिचारी । पुत्र कलत्र आणि ब्रह्मचारी । हेही परी दाखविली ।। ९१ ।। अधर्मे वाढविला धर्म । अकर्मे तारिलें कर्म । अनेमें नेमिला नेम । अति निःसीम निर्दुष्ट ।।९२।। तेणें संगेंचि सोडिला संगू । भोगें वाढविला योगु । त्यागेंवीण केला त्यागू । अति अव्यंगु निर्दोष ।। ९३ ।। कर्मठां होआवया बोधू । कर्मजाड्याचे तोडिलें भेदू । भोगामाजी मोक्षपदू । दाविलें विशदू प्रकट करूनी ।। ९४ ।। भक्ति भुक्ति मुक्ती । तिन्ही केलीं एके पंक्ती । काय वानूं याची ख्याती । खाऊनि माती विश्वरूप दावी ।। ९५ ।। त्याचिया परमचरित्रा । तुज सांगेन परमपवित्रा । परी निजबोधाचा खरा । या अवतारी पुरा पवाडा केला ।। ९६ ।। एकादशाच्या तात्पर्यार्थीं । संक्षेपें

तली. आतां अकराव्या स्कंधांत श्रीकृष्ण मोक्षाचें लक्षण सांगत आहेत. ८२ ज्ञानरूप आकाशांतील पूर्णचंद्रच, योगज्ञानाचा इंद्रच, असा योग्यांतील श्रेष्ठ मुनि शुकाचार्य बोलूं लागला. ८३ तेव्हां तें ऐकणारा परीक्षित् राजा म्हाणला कीं, स्वामिराया ! ज्याच्या प्राप्तीसाठीं मीं सर्वस्वावर पाणी सोडलें, तेंच प्राप्त करून देण्याची आपण कृपा केलीत. या आमच्या भाग्यामुळें आम्ही धन्य झालों. ८४ खरोखर ही मोक्षकथा अगाध आहे. जे मुमुक्षु असतील त्यांनीं अहंकाराच्या शिरावर पाय देऊन आदरानें श्रवण करण्यास निघावें. ८५ अगोदर श्रवणशक्ति अंतर्मुख करावी व त्या ठिकाणीं मन लावावें आणि सावधान चित्तानें कथानुसंधानाकडे लक्ष ठेवावें. ८६ देवानें अनेक प्रसंगीं पुष्कळ अवतार घेतले; पण या अवतारांतील आश्चर्य कांहीं वेगळेंच आहे. हरीची लीला इतकी अतर्क्य आहे कीं, ती देवांनासुद्धां कळत नाहीं. ८७ तो जन्मतांच मातेपासून दूर झाला व आपणच आपल्या लीलेनें वाढला. त्यानें बाळपणींच पूतनादि राक्षसींना मुक्तीचा सोहळा दाखविला. ८८ यशोदा मातेला विश्वरूप दाखविलें. गोपांना वैकुंठ दाखविलें. तरीहि त्याच्या मूळच्या गवळ्याच्या रूपांत थोडासाहि बदल होऊं दिला नाहीं. ८९ त्यानें बालक असतांनाच प्रबलांना मारिलें. जगाला अचाट कर्में प्रत्यक्ष करून दाखविलीं. पण बाळपणाच्या बाहेर रेसभरहि गेला नाहीं. १९० स्वतः साक्षात् परब्रह्म असूनहि त्यानें चोरी केली. देव असून व्यभिचार केला, स्त्री-पुत्र असून ब्रह्मचारी कसें रहावें, हाहि एक प्रकार दाखविला. ९१ अधर्मानें धर्म वाढविला, अकर्माचरणानें कर्माचें रक्षण केलें. अनियमितपणानें वागून दुर्धर व अत्यंत कडक नियमाचें पालन केलें. ९२ तो संग करून निःसंग झाला, त्यानें भोग भोगून योग वाढविला, त्यागावांचूनच अव्यंग व निर्दोष त्याग केला. ९३ कर्मठांना बोध होण्यासाठीं कर्मजाड्याचे प्रकार तोडून टाकिले, भोगांतच मोक्षपद अगदीं स्पष्ट करून दाखविलें. ९४ भक्ति, भुक्ति व मुक्ति या तिहींना एका पंक्तींत बसविलें. याची ख्याति काय वर्णावी ! त्यानें माती खाऊन तोंड उघडून विश्वरूप दाखविलें, ९५ त्या श्रीकृष्णाचें परम पवित्र उत्कृष्ट चरित्र मी तुला सांगेन. या अवतरांत आत्मज्ञानाचा अत्यंत विस्तार केला आहे. ९६ अकराव्या स्कंधाच्या

विस्तरे मुक्ती । बोलिलीसे आद्यंतीं । परमात्मस्थिती निजबोधें ॥ ९७ ॥ तेथें नारदें वसुदेवाप्रती । संवादू निमिजायंती । सांगितली कथासंगती । संक्षेपस्थिती या नाम ॥ ९८ ॥ तेचि उद्धवाची परमप्रीती । नाना दृष्टांतें उपपत्ती । स्वमुखें बोलिला श्रीपती । ते कथा निश्चितीं सविस्तर ॥ ९९ ॥ दशमीं निरोधलक्षण । मागां केलें निरूपण । जेथें धराभार अधर्मभंजन । निर्दाळी श्रीकृष्ण नानायुक्ती ॥ २०० ॥ ज्याचेंनि अधर्मभारें क्षिती । सदा आक्रंदत होती । जिच्या साह्यालागीं श्रीपती । पूर्ण ब्रह्मस्थिती अवतरला ॥ १ ॥ दुष्ट दैत्य आणि दानव । धराभार राजे सर्व । वधिता झाला श्रीकृष्णदेव । तो गत कथाभाव शुक सांगे ॥ २ ॥

तात्पर्यांत आरंभीं व शेवटीं आत्मज्ञानानें परमात्मस्थितीचें व मुक्तीचें कोठें थोडक्यांत व कोठें विस्तारानें विवेचन केलें आहे. ९७ त्यांत नारदानें वसुदेवाला निमिजायंत यांच्या संवादरूपानें कथासंगति थोडक्यांत सांगितली. ९८ तीच कथा श्रीकृष्णानें स्वतः उद्धवावरील अत्यंत प्रेमामुळें अनेक दृष्टान्तांनीं स्पष्ट करून सांगितली. ९९ पूर्वीं दशमस्कंधांत निरोधलक्षण सांगितलें. त्यांत श्रीकृष्णानें अनेक युक्त्या योजून अधर्मी लोकांचा नाश करून पृथ्वीचा भार उतरला. २०० त्यांच्या अधर्माच्या भारानें पृथ्वी एकसारखा आक्रोश करीत होती. तिच्या साहाय्यासाठीं परब्रह्म श्रीकृष्णरूपानें पूर्णावतार घेऊन पृथ्वीवर अवतरलें. १ दुष्ट दैत्य व पृथ्वीला भारभूत झालेले सर्व राजे यांचा श्रीकृष्णदेवानें संहार केला, असा मागल्या कथेचा संबंध श्रीशुकांनीं सांगितला. २०२

[परमहंसांनीं ज्याच्या चरणकमलांतील चिन्मकरंदाचा आस्वाद घेतला आहे व जो भक्तजनांच्या मनांमध्यें निवास करितो, त्या श्रीरामचंद्राला नमस्कार असो. परमानंद श्रीकृष्णाचे जे चरणरज मस्तकावर धारण केले असतां देवेंद्रादि सर्व तेजें अनुकूल होतात, त्यांचा जयजयकार असो. या अकराव्या स्कंधांत एकतीस अध्यायांनीं मुक्ति सांगितली आहे. त्यांत संक्षेपानें व विस्तारानें अनेक इतिहासहि सांगितले आहेत. नारदानें वसुदेवाला संक्षेपानें मुक्तीचें स्वरूप सांगितलें व भगवानांनीं उद्धवाला पुढें तीच मुक्ति उपपत्तींसह विस्तारानें उपदेशिली आहे. पूर्वी—दहाव्या स्कंधांत भूमीचा भार उतरण्यासाठीं ज्यानें यदुवंशाला आपल्या ऐश्वर्यानें विभूषित केलें आहे व त्याच वंशांत ज्यानें सर्व देवांशांना अवतरित केलें आहे, अशा भगवान् श्रीकृष्णाची आपल्या कार्याला उचित अशी प्रवृत्ति सांगून ती ऐकण्यामध्यें तत्पर झालेल्या लोकांना आनंद देणारी क्रीडा सांगितली आहे. आतां भक्तांना आत्मतत्त्वोपदेश करून व क्रीडेसाठीं भूतलावर अवतार घ्यावयास लावलेल्या अधिकारी देवांशांना ब्राह्मणशापाच्या मिषानें त्यांच्या अधिकारपदाला पोंचवून ब्रह्मादि देवांवर अनुग्रह करण्यासाठीं ज्याचें योगमायावैभव अपरिमित आहे, अशा भगवानाच्या स्वस्थानारोहणाचें निरूपण केलें जातें. त्यांत कुरुक्षेत्रामध्यें ‘ कर्मानें कर्माची निवृत्ति कशी होईल तें मला सांगा. ’ याप्रमाणें कर्मयोगाविषयीं प्रश्न करणाऱ्या विरक्त वसुदेवाला नारदादिकांनीं कर्मयोग सांगितला. त्याच्या योगानें शुद्धचित्त झालेल्या व कृष्ण आणि बलराम यांना परमेश्वरत्वानें जाणणाऱ्या त्याला श्रीकृष्णानानेंच पूर्वीं ‘षड्गर्भानयनाध्यायांत’ आत्मतत्त्वाचा उपदेश केला होता; पण विषयभोगासक्तीनें तो उपदेश लुप्त झाला, म्हणून आतां या स्कंधाच्या पहिल्या पांच अध्यायांत नारदमुखानें पुनः त्याचेंच निरूपण केलें जात आहे. त्यांतील या प्रथमाध्यायांत वैराग्य उत्पन्न करण्यासाठीं, यदुकुलाला झालेल्या ब्राह्मणशापाच्या मिषानें अति उत्कृष्ट सुखाचीहि अनित्यता सांगितली आहे. त्या पुढील चार अध्यायांनीं निमि व जायंत यांच्या संवादानें साधनांसह परमतत्त्वाचें निरूपण केलें आहे. सहाव्या अध्यायांत भगवान् व उद्धव यांच्या संवादाचा आरंभ करून त्यासह पुढील तेवीस अध्यायांनीं उद्धवाला भगवत्तत्त्वाचा उपदेश केला आहे व शेवटच्या दोन अध्यायांत मौसलक्रीडेचें वर्णन आहे. याप्रमाणें एकतीस अध्यायांनीं या स्कंधाची प्रवृत्ति झालेली असून श्रीधर म्हणतात कीं, आम्ही आतां त्याचें यथामति व्याख्यान आरंभितों.]

श्रीबाद० उ०– कृत्वा दैत्यवधं कृष्णः सरामो यदुभिर्वृतः। भुवोऽवतारयद्भारं जविष्ठं जनयन्कलिम् ॥ १ ॥

पूर्णब्रह्म स्वयें श्रीकृष्ण । बळी बळिराम लोकरमण । निधडे यादव मेळवूनि जाण । दैत्यनिर्दळण श्रीकृष्णें केलें ॥ ३ ॥ जे यादवांसि न येत वधीं । तेथें श्रीकृष्ण करी बुद्धी । सखे स्वजन स्वगोत्रामधीं । कलह उत्पादी अतिघोर ॥ ४ ॥ उतरल्या धराभार । कलहमिसें शारंगधर । मारवी कौरवभार । पांडुकुमर क्षोभवुनी ॥ ५ ॥

ये कोपिताः सुबहु पांडुसुताः सपत्नैर्दुर्द्यूतहेलनकचग्रहणादिभिस्तान् ।
कृत्वा निमित्तमितरेतरतः समेतान्हत्वा नृपान्निरहरत्क्षितिभारमीशः ॥ २ ॥

दुष्ट अकर्मी अतिघोर । ज्याची सेना धराभार । हे वधार्थ करावया एकत्र । कलहाचें सूत्र उपजवी कृष्ण ॥ ६ ॥ येणें श्रीकृष्णसंकल्पोद्देशें । हीं सरले कपटफांसे । तेणें कपटें बांधून कैसे । वधवी अनायासें कौरवभार ॥ ७ ॥ जगीं द्यूत खेळिजे दुष्टें । तेंही आरंभिलें कपटें । धर्मावरी फांसे खोटे । घालिती हटें दुर्बुद्धि ॥ ८ ॥ भाळेभोळे अज्ञान जनीं । तेही गांजिती ना धर्मपत्नी । ते साचचि धर्माची

—मौसलाचा प्रसंग दाखविण्यासाठीं अगोदर दोन श्लोकांनीं दशम स्कंधाच्या अर्थाचा अनुवाद करितात—

श्रीबाद. म्हणाले–**सरामः**–बळरामासह, **यदुभिः वृतः**–यादवपरिवेष्टित, **कृष्णः**–श्रीकृष्ण, **दैत्यवधं**–दैत्यांचा वध, **कृत्वा**–करून, **जविष्ठं**–अत्यंत वेगवान, **कलिं**–कलि, (कलह) **जनयन्**–उत्पन्न करणारा होत्साता, **भुवः**–भूमीचा, **भारं**–भार, **अवतारयत्**–उतरविता झाला. [बळराम व यादव यांनीं युक्त असलेल्या श्रीकृष्णांनीं पूतना, कंस, शिशुपाल इत्यादि दैत्यांना मारून व कौरव-पांडवादि इतर राजांचा आपसांत भयंकर कलह उत्पन्न करून भूमीचा भार हलका केला. ‘ अवातारयत् ’ हा शुद्ध पाठ असून ‘ अवतारयत् ’ हा आर्ष प्रयोग आहे.] १.

पूर्ण ब्रह्मांश परमात्म्यानें श्रीकृष्णरूप धारण करून मृत्युलोकीं अवतार घेतला. बलरामासह निधड्या छातीचे यादव जमविले व दैत्यांचा वध केला. ३ यादवांकडून मारले न जाणारे जे बलाढ्य राजे होते त्या परस्पर संबंधी वीरांचें मोठ्या युक्तीनें आपसांत भांडण लाविलें ४ आणि पांडवांना कोपवून त्यांच्या हातून कौरवांचा नाश करविला. २०५.

—यावेंच अधिक विवरण करितात—

सपत्नैः–सहज शत्रूंकडून, **दुर्द्यूत-हेलन-कच-ग्रहणादिभिः**–कपटद्यूत, अपमान-तिरस्कार, स्त्रीचें वेणीग्रहण इत्यादिकांच्या योगें, **ये सुबहु कोपिताः**–जे अतिशय कोपविलेले, **पांडुसुताः**–पांडव, **तान्**–त्यांना, **निमित्तं कृत्वा**–निमित्त करून, **इतरेतरसमेतान्**–परस्पर जमलेल्या, **नृपान्**–राजांना, **हत्वा**–मारून, **ईशः**–ईश्वर, **क्षितिभारं**–पृथ्वीचा भार, **निरहरत्**–हरण करता झाला. [पांडवांचे उपजत शत्रु, अशा कौरवांनीं कपटद्यूत, अपमान, द्रौपदीची वेणी ओढणें इत्यादि अपराध करून ज्या पांडवांना क्रोध आणला आहे त्यांना निमित्त करून, परस्पर जमलेल्या राजांना युद्धांत मारून ईश्वरानें भूमीचा भार हरण केला.] २.

श्रीकृष्णानें आपल्या संकल्पाप्रमाणें कलहाचीं अशीं सहा कारणें उत्पन्न केलीं. ६ वस्तुतः जगांत दुष्ट लोकांनींच द्यूत खेळावें. पण तेंहि धर्मराजासारख्या सच्छील माणसास खेळावयास लाविलें. ७ त्यांत कौरवांनीं खोटे फांसे टाकून धर्माला जिंकिलें. ८ अज्ञानी संस्कारहीन लोकहि एखाद्या धर्मपत्नीचा–कुलीन स्त्रीचा ज्याप्रकारें छळ

मानिनी । आणिली बांधोनि सभेमाजी ॥ ९ ॥ दुःशासनें धरिले वेणीकच । तेणेंचि वाढिली कचकच । तें कर्म त्याचें त्यासीच । भंवलें साच त्याभोंवतें ॥ २१० ॥ वनीं कोणी कोणा नागवी । तो नागोवा राजा आणवी । सभेसि राजा उगाणवी । तैं मृत्यूची पदवी मस्तका आली ॥ ११ ॥ अन्यायेंवीण नागवी रावो । तैं धांवणिया धांवे देवो । द्रौपदीवस्त्रहरण पाहाहो । हा मुख्य अन्यावो कौरवां ॥ १२ ॥ अग्निदानें गरदानें धनदारा-अपहारणें । घाला घालूनि मारणें । शस्त्रपाणी होणें वधार्थ ॥ १३ ॥ अवज्ञा आणि हेळण । दुरुक्ती जें धर्मछळण । हेंचि निमित्तासी कारण । केलें संपूर्ण श्रीकृष्णें ॥ १४ ॥ पतिव्रतेचें वस्त्रहरण । तेणें तत्काळ पावे मरण । हेंचि कलहाचें कारण । कुळनिर्दळण येणें कर्में ॥ १५ ॥ ऐसा जो धर्माचा विरोधी । त्यासी देवो अवश्य वधी । यालागीं पांडवाचिये बुद्धी । अत्युग्र त्रिशुद्धी उपजवी कोपू ॥ १६ ॥ भूभारहरण-चरित्र । सखे स्वजन सुहृद स्वगोत्र । शास्त्रविवेकी अतिपवित्र । त्यांमाजी विचित्र उपजवी कलहो ॥ १७ ॥ धराभार हरावया गोविंदू । कळवळियाचे सखे बंधू । करविला तेथ गोत्रवधू । साह्य सबंधू राजभारेंसीं ॥१८॥

भूभारराजपृतना यदुभिर्निरस्य गुप्तैः स्वबाहुभिरचिंतयदप्रमेयः ।
मन्येऽवनेर्ननु गतोऽप्यगतं हि भारं यद्यादवं कुलमहो ह्यविषह्यमास्ते ॥ ३ ॥

करणार नाहींत, ९ त्याप्रकारें दुःशासनानें द्रौपदीचा छळ केला. तिला केंस धरून ओढिलें आणि कौरवसभेंत तिचें वस्त्रहरण केलें. २१० अरण्यांत चोरानें एखाद्या माणसाला नागविलें तर राजा त्या चोराला पकडवून देहदंड करितो. ११ परंतु येथें तर प्रत्यक्ष राजसभेंत राजासमक्षच दुःशासनादि दुष्टांनीं निरपराध पांडवस्त्रीला गांजिलें. तेव्हां द्रौपदीच्या प्रार्थनेनें भगवान् श्रीकृष्ण तिच्या रक्षणार्थ धांवून आले. द्रौपदीचें वस्त्रहरण हाच कौरवांनीं पांडवांचा मुख्य अपराध केला. १२ त्याखेरीज त्यांना लाक्षागृहांत—लाखेच्या घरांत जाळण्याचा प्रयत्न केला. भीमसेनाला विषप्रयोग केला. शेवटीं पांडवांची स्त्री व त्यांचें द्रव्य यांचा कपटानें अपहार केला. अशा प्रकारें कौरवांनीं आततायि[1] कर्में केल्यामुळें पांडवांना त्यांच्या वधार्थ हातीं शस्त्र घ्यावें लागलें. १३ अवज्ञा, हेलना, दुरुक्ति अशा तऱ्हेचा जो धर्मच्छल तोच युद्धाचें निमित्त झाला. १४ पतिव्रतेचा छल करणारा तत्काल मरण पावतो. कौरवकुलहि त्यामुळेंच नामशेष झालें. धर्मद्रोह करणारास देव अवश्य मारितो. १५ भगवानांनींहि धर्मविरोधामुळेंच पांडवांच्या मनांत क्रोध उत्पन्न करून त्यांना कौरवांच्या नाशाचें निमित्त केलें. १६ भगवानांस भूमीचा भार हलका करावयाचा होता. म्हणून त्यांनीं सखे, सुहृद्, पवित्र शास्त्रवेत्ते अशा लोकांतहि विचित्र कलह उत्पन्न केला १७ व जे कळकळीचे सखे बंधु, त्यांच्या हातून इतर सर्व क्षत्रियांसह आपल्या वंशाचा उच्छेद करविला. २१८.

—शिवाय—

अप्रमेयः—कोणत्याहि प्रमाणांचा विषय न होणाऱ्या (श्रीकृष्णानें), स्वबाहुभिः—आपल्या बाहुबलानें, गुप्तैः—रक्षिलेल्या, यदुभिः—यादवांकडून, भूभारराजपृतनाः—भूमीला भारभूत झालेल्या राजसेनांचा, निरस्य—नाश करवून, अचिंतयत्—विचार केला. ननु अहो—खरोखर, अवनेः गतः अपि—पृथ्वीचा भार जरी गेला आहे तरी, अगतं भारं—तो न गेल्यासारखाच, मन्ये-मी समजतों. यत्—कारण, अविषह्यं हि—दुसऱ्या कोणालाहि सहन न होणारें, यादवं कुलं—यादवकुल, आस्ते—विद्यमान आहे. [प्रत्यक्ष, अनुमान, शब्द इत्यादि कोणत्याहि प्रमाणाचा विषय न होणारे भगवान् श्रीकृष्ण आपल्याच बाहुबलानें रक्षिलेल्या यादवांकडून भूमीला भारभूत झालेल्या राजसैन्याचा नाश करवून मनांत म्हणाले कीं, खरोखर आतां पृथ्वीचा भार जरी उतरला आहे तरी तो सर्वथा कमी झाला आहे असें मला वाटत नाहीं. कारण प्रसिद्ध यादवकुल अद्यापि भूलोकीं विद्यमान आहे.] ३.

---

१. आग लावणारा, विष घालणारा, हातांत शस्त्र घेऊन धांवून येणारा, धन, स्त्री व क्षेत्र-शेत यांचा अपहार करणारा, अशा सहा प्रकारच्या लोकांना आततायी म्हणतात. कौरवांनीं पांडवांचे हे सहाहि अपराध केले होते. मु. गी. पृ. १३.

ऐसे पक्षपाती राजे अपार । अमित सेना धराभार । मारबिले अधर्मकर । मिषांतर कलहाचें ॥ १९ ॥ पृथ्वीचे अधर्मसेनासंभार । शोधशोधूनि राजे मारिले अपार । तऱ्ही उतरला धराभार । हें शारंगधर न मनीचि ॥ २२० ॥ यादव करूनि अतुर्बळ । नाना दुष्ट दमिले सकळ । परी यादव जाले अतिप्रबळ । हें न मनीच केवळ श्रीकृष्ण ॥ २१ ॥ नव्हतां यादवांचें निदान । नुतरे धराभार संपूर्ण । ऐसें मानिता जाहला श्रीकृष्ण । कुलनिर्दळण तो चिंती ॥ २२ ॥ अग्नि कर्पूर खाऊनि वाढे । कापुरांतीं अग्निही उडे । तैसें यादवांचें अतिगाढें । आलें रोकडें निदान ॥ २३ ॥ केळी फळे तव वाढे वाढी । फळपाकें माळी झाड तोडी । तैशी यादवकुळाची शीग गाढी । चढे रोकडी मरणार्थ ॥ २४ ॥ फळपरिपाकें परमळी । तें घेऊन जाय माळी । तैशीं स्वकुळफळें वनमाळी । न्यावया तत्काळीं स्वयें इच्छी ॥ २५ ॥ अनंतबाहुप्रतापें । यादव बाढले श्रीकृष्णकृपे । तोचि निधनाचेनि संकल्पें । काळरूपें क्षोभला ॥२६॥ अतुर्बळ अतिप्रबळ । वाढलें जें यादवकुळ । ते वीर देखोनि सकळ । असह्य केवळ श्रीकृष्णासी ॥ २७ ॥

नैवान्यतः परिभवोऽस्य भवेत्कथंचिन्मत्संश्रयस्य विभवोन्नहनस्य नित्यम् ।
अन्तःकलिं यदुकुलस्य विधाय वेणुस्तंबस्य वन्हिमिव शान्तिमुपैमि धाम ॥ ४ ॥

अधर्मी, दुष्ट, भूमीला भारभूत झालेले जे अनेक राजे होते, त्या सर्वांना निवडून काढून व त्यांचा आपसांत कलह लावून त्यांना जरी परस्परांकडूनच मारविलें तरीहि श्रीकृष्णाचें समाधान झालें नाहीं. २२० कारण यादव-कुळाचा निःशेष नाश झाल्यावांचून भूमीचा भार पूर्णपणें उतरला असें भगवानास वाटेना. २१ यादवांच्या कुळाचें निर्दळण झाल्यावांचून पृथ्वीचा संपूर्ण भार उतरणार नाहीं यांकरितां श्रीकृष्ण मनांत विचार करूं लागला.२२ ज्याप्रमाणें कापूर लावला असतां अग्नि त्याला जाळीत स्वतः अधिक अधिक प्रज्वलित होत जातो, परंतु एकदां कां कापूर संपला म्हणजे तोहि आपोआपच शांत होतो, त्याप्रमाणें दुष्टांचा संहार करण्यासाठीं जरी भगवानांनीं यादवांचें सामर्थ्य वाढविलें होतें तरी तें कार्य संपतांच त्यांचें मरण निश्चित होतें २३ किंवा ज्याप्रमाणें केळ तीवर केळीं येईपर्यंतच वाढत असते, पण एकदां कां केळीं येऊन तीं पिकलीं म्हणजे माळी झाडच तोडून टाकतो, २४ तद्वत्च यादव कुळाचीहि केवळ स्वतःच्या मरणासाठींच अतिशय वृद्धि झाली होती किंवा कोणत्याहि फळझाडाचीं फळें पिकून त्यांचा वास सभोंवार पसरला म्हणजे माळी तीं फळें स्वतः आपल्या हातून तोडून घेऊन जातो. २५ त्याप्रमाणें अनंतबाहु जो श्रीकृष्ण त्याच्याच कृपेनें यादव जरी इतके बलवान् झाले होते, तरी तोच आतां त्यांचा नाश करण्या-साठीं कालरूपानें क्षुब्ध झाला. कारण यादवकुल भगवानासहि असह्य वाटूं लागलें. २६. १९–२२७.

—' तर मग दुसऱ्या कोणाच्या हातून त्यांना मारवून टाकावयाचें होतें ? ' असें कोणी म्हणेल म्हणून भगवान् म्हणतात–

अस्य मत्संश्रयस्य–या माझ्या आश्रयानें राहणाऱ्या **नित्यं विभवोन्नहनस्य यदुकुलस्य**-नित्य वैभवा-मुळें उच्छृंखळ झालेल्या यादवकुळाचा **परिभवः**–पराभव **अन्यतः**–दुसऱ्या कोणाच्याहि हातून **कथंचित् न एव भवत्**–कोणत्याच प्रकारें होणार नाहीं. **वेणुस्तंबस्य**–वेळूच्या बेटांतील **वन्हि इव**–अग्नीप्रमाणें **अंतःकलिं विधाय**–(यादवांमध्यें) आपसांत कलह उत्पन्न करून **शान्ति उपैमि**– मी शांत होईन **धाम च उपैमि**– व निजधामास जाईन. [या ' यादवकुळाचा नाश देवादिकांच्या हातूनहि होणार नाहीं. कारण यादवकुळानें माझा आश्रय केलेला आहे (' तर मग तुम्ही त्यांच्या संहाराची कां इच्छा करितां ?' उत्तर–) अहो पण, हे वैभवानें फार उन्मत्त झाले आहेत. म्हणून त्यांचाहि संहार करणें मला भाग आहे. यास्तव वेळूच्या बेटांत अग्नि उत्पन्न होऊन तो त्या सर्व बेटाला जसा जाळून टाकतो, तसा मीहि त्यांच्यामध्यें आपसांत कलहाग्नि उत्पन्न करून त्यांचा संहार करितों आणि शांत होतों. त्यानंतर मी आपल्या वैकुंठधामास जाईन.] ४.

मज गेलिया निजधामा । हेचि प्रवर्ततील अधर्मा । श्रियोन्नत अतिगर्वमहिमा । मुख्य अकर्मा निजहेतु ॥ २८ ॥ हे मद्बळें अतिप्रबळ । अतिरथी जाले सकळ । यांसि अप्रतिमल्ल दिग्मंडळ । यांतें दमिता केवल मी एकु ॥ २९ ॥ हे नाटोपती इंद्रादि देवां । दैत्यराक्षसां कां दानवां । शेखीं निर्दाळावया यादवां । मागुतें मज तेव्हां पडेल येणें ॥ २३० ॥ तरी आतांचि आपुले दिठी । कुळ बांधूं काळगांठीं । ऐसा विचार जगजेठी । निश्चयो पोटीं दृढ केला ॥ ३१ ॥ यदुवंशवंशजाळी । वाढली श्रीकृष्णकृपाजळीं । तेथें अवकृपेची इंगळी । ऋषिशापमेळीं कपटें पडली ॥ ३२ ॥ ते मुळीं पेटली श्रीकृष्णसंकल्पें । धडाडली ब्रह्मशापें । ते स्वजनविरोधरूपें । काळाग्निकोपें नाशील ॥ ३३ ॥ ऐसें यादवकुळनिर्दळण । करूनियां स्वयें श्रीकृष्ण । निरसूनि निजधामा गमन । स्वलीला आपण करूं इच्छी ॥ ३४॥

एवं व्यवसितो राजन्सत्यसंकल्प ईश्वरः । शापव्याजेन विप्राणां संजव्हे स्वकुलं विभुः ॥ ५ ॥

यापरी आपुलें कुळ । नासूं आदरिलें तत्काळ । हाचि विचारू अढळ । केला समूळ कुळक्षयार्थ ॥ ३५ ॥ हेंचि कार्य होय कैसें । तें विचारिलें जगदीशें । ब्रह्मशापाचेनि मिसें । कुळ अनायासें नासेल ॥ ३६ ॥ इतकें हें जैं सिद्धी जाय । तैं सरलें अवतारकृत कार्य । मग स्वधामा यदुवर्य । जावों पाहे स्वलीला ॥ ३७ ॥ लीलाविग्रही सुंदरपूर्ण । गुणकर्मक्रिया अतिपावन । जगदुद्धारी श्रीकृष्ण । ब्रह्मपरिपूर्ण पूर्णावतार ॥ ३८ ॥

"मी निजधामास गेलों कीं हेच यादव अधर्म करूं लागतील. कारण संपत्तीमुळें उत्पन्न होणाऱ्या गर्वाचा महिमा फार विचित्र आहे. धनमदच सर्व दुराचरणाचें मुख्य कारण आहे. २८ हे माझ्या बळावर फार प्रबळ झाले आहेत. ते सर्व अतिरथी बनले आहेत. त्यांच्याशीं प्रतियुद्ध करील असा एकहि वीर या दशदिशांत कोठें नाहीं. यांचें दमन करणारा मीच काय तो एक आहे. २९ इंद्रादि देव, दैत्य, राक्षस, दानव इत्यादिकांतील कोणालाहि हे आवरतां येण्यासारखे नाहींत. त्यामुळें शेवटीं त्यांचा नाश करण्यासाठींहि मलाच पुनः अवतार घ्यावा लागेल. २३० म्हणून आतां आपल्या दृष्टीसमोरच यांना मी काळाच्या तोंडीं देतों." भगवानांनीं मनांत असा विचार करून यादवांना मारण्याचा दृढ निश्चय केला. ३१ "यादववंश हें जणुं काय वेळूचें बेट आहे. तें श्रीकृष्णाच्या कृपाजलानें होतें. पण यादवांच्या कपटाचरणामुळें त्यांना ऋषीचा शाप होऊन त्याचवेळीं भगवानांच्या अवकृपेची ठिणगीहि त्यांत पडली ३२ व श्रीकृष्णाच्या संकल्पानें त्या ठिणगीनें मुळाशींच पेट घेतला, आणि ब्राह्मणांच्या शापानें त्या आगीचा भडका उडाला म्हणजे मग आपसांतच कलह उत्पन्न होऊन कालाग्नीच्या क्षोभानें त्यांचा नाश होईल." ३३ याप्रमाणें लीलेनें यादवकुळाचा संहार करून स्वतः श्रीकृष्ण आपल्या निजधामास जाण्याची इच्छा करूं लागले. ३४. २८–२३४

राजन्–हे राजा **एवं व्यवसितः**–असा ज्यानें निश्चय केला आहे तो **सत्यसंकल्पः विभुः ईश्वरः**–सत्यसंकल्प प्रभु ईश्वर **विप्राणां शापव्याजेन**–ब्राह्मणांच्या शापाच्या मिषानें **स्वकुलं**–आपल्या कुलाचा **संजव्हे**–संहार करता झाला. [हे परीक्षित् राजा, याप्रमाणें ज्याचा दृढनिश्चय झाला आहे अशा त्या सत्यसंकल्प प्रभु ईश्वरानें ब्राह्मणांच्या शापाचें निमित्त करून आपल्या कुलाचा संहार केला.] ५.

याप्रमाणें विचार करून भगवानानें आपल्या कुलाचा समूळ सत्वर नाश करण्याचा दृढनिश्चय केला. ३५ पण 'हें कार्य सहज कसें सिद्ध होईल' याचाहि त्यानें विचार केला. ब्रह्मशापाच्या निमित्तानें माझें कुल अनायासानें नाश पावेल, ३६ असें त्यास वाटलें आणि हें एवढें कार्य झालें म्हणजे आपलें अवतार-कृत्य संपलें असें जाणून पूर्णावतार भगवान् आपल्या लीलेनें स्वधामास जाण्याचा संकल्प करूं लागले. ३७–३८. ३५–२३८.

स्वमूर्त्या लोकलावण्यनिर्मुक्त्या लोचनं नृणाम् । गीर्भिस्ताः स्मरतां चित्तं पदैस्तानीक्षतां क्रियाः ॥ ६ ॥
आच्छिद्य कीर्तिं सुश्लोकां वितत्य ह्यंजसा नु कौ । तमोऽनया तरिष्यंतीत्यगात्स्वं पदमीश्वरः ॥ ७ ॥

जो सकळ मंगळां मंगळ पूर्ण । जो कां गोकुळीं कामिनीरमण । मोक्षाचें तारूं स्वयें श्रीकृष्ण । ज्याचें बरवेपण अलोकिक ॥ ३९ ॥ जो भक्तकामकल्पद्रुम । मनोहर मेघश्याम । ज्याचें त्रिलोकीं दाटुगें नाम । स्वयें पुरुषोत्तम शोभतु ॥२४०॥ श्रीकृष्णाचिया सौन्दर्यापुढें । लक्ष्मी भुलोनि जाली वेडें । मदन पोटा आलें बापुडें । तेथ कोणीकडे इंद्र चंद्र ॥ ४१ ॥ ज्याचें त्रैलोक्यपावन नाम । जो करी असुरांतें भस्म । तो बोलिजे अवाप्तकाम । भक्तां सुगम सर्वदा ॥ ४२ ॥ त्रिलोकींचें बरवेपण । भुलोनि कृष्णापाशीं आलें जाण । ना कृष्णलेशें बरवेपण । शोभे संपूर्ण तिहीं लोकीं ॥ ४३ ॥ जो सकल सौन्दर्याची शोभा । जो लावण्याचा अतिवालभा । ज्याचिया अंगसंगप्रभा । आणिली शोभा जगासी ॥ ४४ ॥ जो हरिखत्वाचा सोलींव हरिख । कीं सुख सुखावतें परमसुख । ज्याचेनि विश्रांतिसि देख । होय आत्यंतिक विसांवा ॥ ४५ ॥ तो अमूर्त मूर्तिधारण । कीं सकललोकलावण्य । शोभा

—याप्रमाणें अवताराचें सर्व प्रयोजन संपादन करून भगवान् स्वलोकीं गेला, असें पुढील दोन श्लोकांनीं सांगतात—

लोकलावण्यनिर्मुक्त्या स्वमूर्त्या—जिच्या लावण्यानें सर्व लोक लावण्यवान् होतात त्या स्वमूर्तीनें **नृणां लोचनं**—मनुष्याचे नेत्र **आच्छिद्य**—(इतर विषयांपासून) परतवून **गीर्भिः**—आपल्या वाणींनीं **ताः**—त्या वाणीचें **स्मरतां**—स्मरण करणारांच्या **चित्तं**—चित्ताला **आच्छिद्य**—अन्य विषयांपासून परावृत्त करून **पदैः**—चरणांनीं **तानि**—त्या पावलांना **ईक्षतां**—पहाणाऱ्या जीवांच्या **क्रियाः**—गमनादि क्रिया **आच्छिद्य**—शांत करून **कौ**—पृथ्वीमध्यें **सुश्लोकां कीर्तिं**—कवींच्या पद्यांनीं युक्त अशा कीर्तीला **वितत्य**—विस्तारून **अनया**—या कीर्तीनें **अंजसा हि**—अनायासानेंच **नु तमः**—खरोखर या तमाला **तरिष्यंति**—लोक तरून जातील. **इति**—अशा आशयानें **ईश्वरः**—भगवान् **स्वपदं**—स्वस्थानीं **अगात्**—गेले. [ज्या भगवन्मूर्तीच्या अपेक्षेनें लोकांमध्यें अधिक लावण्यच नाहीं, किंवा ज्या भगवन्मूर्तीपासून लोकांना लावण्य प्राप्त होतें म्ह० ज्याच्या लावण्यसंपर्कानें लोक लावण्यवान् होतात त्या आपल्या मूर्तीनें लोकांच्या दृष्टीला अन्य विषयांपासून परत फिरवून, त्याचप्रमाणें आपल्या मधुर वाणीनें त्या वाणीचें स्मरण करणारांच्या चित्ताला अन्य वाग्विषयापासून निवृत्त करून त्याचप्रमाणें जागजागीं चिन्हित झालेल्या आपल्या पावलांनीं त्या चरणांना पाहणाऱ्या जीवांच्या इतरत्र गमनादि क्रिया कुंठित करून म्ह० तत्कालिन सर्व लोकांच्या चक्षुरादि प्रवृत्ति केवळ स्वनिष्ठ करून तसेंच, त्यापुढें उत्पन्न होणाऱ्या जीवांच्या संसारतरणासाठीं पृथ्वीमध्यें जिच्यामध्यें कवींचें सुश्लोक—उत्तम पद्यें प्रवृत्त झालीं आहेत अशा स्वकीर्तीला पसरून आतां या माझ्या कीर्तीनेंच भावी जीव अनायासानें खचित अज्ञानांधकाराचें उल्लंघन करतील असें मानून भगवानांनीं पूर्वोक्त प्रकारें आपल्या सर्व अवताराचें कार्य संपवून निजधामीं गमन केलें.] ६–७.

जो सर्व मंगलाचें पूर्ण मंगल, गोकुळांतील कामिनींच्या नेत्रांना रममाण करणारा श्रीकृष्ण संसार-सागरांतून तरून जाण्याची इच्छा करणाऱ्या जीवांना त्यांतून तरून मोक्षाला नेऊन पोंचविणारी नौकाच आहे, ज्याचें सौंदर्य अलौकिक आहे, जो भक्तांची कामना पूर्ण करणारा कल्पद्रुम आहे, ज्याचें नांव त्रैलोक्यांत प्रसिद्ध आहे, ३९ तो घनश्याम पुरुषोत्तम स्वभावतःच अत्यंत शोभतो. २४० ज्या श्रीकृष्णाच्या सौंदर्याला भुलून लक्ष्मी वेडी झाली आणि बापडा मदन त्याच्या पोटीं आला, त्या सौंदर्यापुढें इंद्र-चंद्राची काय कथा ! ४१ ज्याचें नांव सर्व त्रैलोक्याला पावन करितें, जो असुरांचें भस्म करितो, ज्याला पूर्ण-काम असें म्हणतात, तो भक्तांना सर्वदा सुलभ आहे. ४२ त्रैलोक्यांतील सर्व चांगुलपणा जणुं काय श्रीकृष्णाला भुलूनच त्याजपाशीं आला, किंवा त्रैलोक्यांतील चांगुलपणा जणुं काय भगवानांच्या चांगुलपणाच्या अंशानें शोभत आहे. ४३ जो सर्व सौंदर्याची शोभा, लावण्याला अत्यंत प्रिय, ज्याच्या स्वाभाविक अंगकांतीनें जगाला शोभा आणिली आहे, ४४ जो आनंदाचाहि आनंद, सुखाचेंहि परम सुख व ज्याच्यामुळें विश्रांतीलाहि परम विश्रांति मिळते. म्ह० जो श्रीकृष्ण या सर्वांचा आधार आहे, ४५ ज्याप्रमाणें तूप थिजलेलें असो कीं वितळलेलें

शोभवी श्रीकृष्ण । सौभाग्यसंपूर्ण साजिरा ॥ ४६ ॥ घृत थिजलें कीं विघुरलें । परी घृतपणा नाहीं मुकलें । तेवीं अमूर्त मूर्ती मुसावलें । परी तें संचलें परब्रह्म ॥ ४७ ॥ तयासि देखिलियाचि पुरे । देखादेखीं देखणेंचि सरे । पहाणें पाहातोनिसीं माघारें । लाजोनि वोसरे सलज्ज ॥ ४८ ॥ दृष्टी धाली दे ढेंकर । आपण आपुलें शेजार । होवोनियां परात्पर । सुखावे साचार श्रीकृष्णरूपीं ॥ ४९ ॥ श्रीकृष्णाची चाखिल्या गोडी । रसस्वादु रसना न सोडी । जाये चाखणेपणाची आवडी । चाखणें दवडी चाखोनी ॥ २५० ॥ नवल तेथींचें गोडपण । अमृतही फिकें केलें जाण । यापरी रसना आपण । हरिरसीं संपूर्ण सुखावे ॥ ५१ ॥ लागतां श्रीकृष्णसुवावो । अवघा संसारुचि होय वावो । सेवितां श्रीकृष्णसुगंधभावो । घ्राणासि पाहावो आन नावडे ॥ ५२ ॥ वासु सुवासु सुमन । घ्रेय घ्राता आणि घ्राण । कृष्णमकरंदें जाण । विश्रामा संपूर्ण स्वयें येती ॥ ५३ ॥ जयाचेनि अंगस्पर्शें । देह देही देहपण नासे । अंगचि अंगातें कैसें । विसरे आपैसें देहबुद्धी ॥ ५४ ॥ कठिणाचें कठिणपण गेलें । मृदुचें मृदुपणही नेलें । कृष्णस्पर्शें ऐसें केलें । स्पर्शाचें ठेलें स्पर्शत्व ॥ ५५ ॥ तयाचेनि पठणें वाचा । ठावो वाच्यवाचकांचा । नेतिशब्दें पुसोनि साचा । करी शब्दाचा निःशब्दू ॥ ५६ ॥ बोलूं बोलणेंचि ठेलें । बोलतें नेणों काय झालें । कृष्णशब्दें ऐसें केलें । वाच्यानें नेलें वाचिक ॥ ५७ ॥ चित्त चिंतितांच पाये । चित्तपणा विसरोनि जाये । मग निश्चितपणें पाहे । कृष्णचरणीं राहे निवांत ॥ ५८ ॥ चित्त चिंता चिंतन । तिहींची नुरे आठवण । चिंतितांचि श्रीकृष्णचरण । ब्रह्मपरिपूर्ण निजचित्त ॥ ५९ ॥ नवल तयाचा पदक्रम । पाहतां पारुषे कर्माकर्म । मग कर्म कर्ता क्रियाभ्रम । करी निर्भ्रम पदरजें ॥ २६० ॥

असो तें तूपच आहे, त्याचें घृतत्व त्या दोन्ही अवस्थेंत नाहींसें होत नाहीं, त्याप्रमाणें निराकार जरी साकार झालें म्ह० त्या अमूर्तानें संपूर्ण लावण्य, शोभा व सौभाग्य यांनीं युक्त असें साकाररूप जरी धारण केलें, तरी तें पूर्ण परब्रह्मच आहे. ४६-४७ त्याच्याकडे नुस्तें पाहिलें कीं पुरें, तत्क्षणीं जीवाचें पहाणेंच संपतें. (या ईश्वराच्या स्वरूपाचें एकदां दर्शन घेतलें कीं, जीवाला मग दुसरी प्रेक्षणीय वस्तूच रहात नाहीं.) त्या परब्रह्माचा साक्षात्कार होतांच पहाणारी दृष्टी लाजून विषयांपासून परत फिरते व स्वरूपांत स्थिर होते. ४८ एखादा उपाशी मनुष्य पोट भरून जेवल्यावर जशी ढेंकर देतो, त्याप्रमाणें जीवाची दृष्टिहि या ईश्वराचें स्वरूप पाहून तृप्त होते व ती श्रीकृष्णाच्या स्वरूपांत गढून जाते. ४९ श्रीकृष्णाच्या स्वरूपभूत आनंदाचा एकदा कां अनुभव आला कीं मग रसनेंद्रिय त्या रसस्वादाला सोडून दुसऱ्या बाह्य विषयाचा स्वाद घेण्यास परत फिरत नाहीं. २५० ईश्वराच्या स्वरूपाचें माधुर्य कांहीं विचित्र आहे. त्याच्यापुढें अमृतहि फिक्कें आहे, असें मानून रसना हरिरसांत पूर्ण सुखावते. ५१ श्रीकृष्णाचा तो शीत, मंदसुगंध वायु अनुभवास आला कीं सर्व संसारच नीरस होतो. श्रीकृष्णाच्या स्वाभाविक सुगंधाचा अनुभव घेतल्यावर दुसरा अनात्मगंध आवडेनासा होतो. ५२ घ्राता—वास घेणारा जीव, घ्राण—वास घेण्याचें साधन घ्राणेंद्रिय, घ्रेय—सुवासिक पुष्पादि, ही त्रिपुटी श्रीकृष्णपरागामध्यें आपोआप पूर्ण विश्रांतीला प्राप्त होते. ५३ ज्याच्या अंगस्पर्शानें देह, देही—जीव, व देहपण—जन्म, यांचा नाश होतो, देहबुद्धि पार नाहींशी होते ५४ व स्पर्शेंद्रिय श्रीकृष्णाच्या स्वरूपांत लीन होतें. ज्या श्रीकृष्णस्पर्शानें कठिण पदार्थांचें काठिण्य, मृदुपदार्थांचें मार्दव व स्पर्शाचें स्पर्शत्वहि नाहींसें होतें. ५५ त्या श्रीकृष्णाच्या नामोच्चारानें 'नेति नेति' इत्यादि शब्दांनीं वाच्य अर्थ व वाचक शब्द यांचा आधार पुसून टाकून वागिंद्रिय शब्दाला निःशब्द करितें.५६ म्ह० हा परमात्मा वाणीचा विषय नाहीं असें समजून वाक् स्वतः त्याच्या स्वरूपांत लीन होतें. 'श्रीकृष्ण-' शब्दानें ज्या वागींद्रियाला कुंठित केलें तें कोठें गेलें हेंच कळत नाहीं. वाच्यानें—पदार्थानें वाचक शब्दाला हिरावून घेतलें, ५७ श्रीकृष्णाच्या चरणाचें चिंतन करूं लागतांच चित्त आपल्या चित्तपणाला विसरलें आणि सर्व विषयचिंतन सोडून श्रीकृष्णचरणीं स्थिर राहिलें. ५८ त्याला चित्त, चिंता—चित्ताचा विषय आणि चिंतन—त्याचें कार्य, या त्रिपुटीचें भानहि राहिलें नाहीं. श्रीकृष्णाचें चरण चिंतितांच निजचित्त ब्रह्मरूप झालें. ५९ भगवानाच्या पदपंक्ति—पावलांची रांग मोठी आश्चर्यकारक आहे. तिचें दर्शन होतांच पुण्य व पाप हीं दोन्ही कुंठित होतात. मग कर्ता, कर्म व क्रिया हा भ्रम उरत नाहीं. २६० त्याच्या चरणांचा थांग

पाहतां पाउलांचा माग । तुटती कर्माकर्माचे लाग । कर्माचें मुख्य माया अंग । तिचा विभाग उरों नेदी ॥ ६१ ॥ गाईमागिल कृष्णपाउलें । पाहतां कर्म कर्तेनिसी गेलें । अकर्म म्हणणें नाहीं उरलें । ऐसें कर्म केलें निष्कर्म ॥ ६२ ॥ जयाचेनि कीर्तिश्रवणें । श्रोता नुरे श्रोतेपणें । वक्ता पारुषे वक्तेपणें । श्रवणें पावणें परब्रह्म ॥ ६३ ॥ (६)

यापरी उदारकीर्ती । थोर केली अवतारख्याती । जेणें जड जीव उद्धरती । श्रवणें त्रिजगतीं पावन होये ॥ ६४ ॥ स्वधामा गेलिया चक्रधरू । मागां तराबया संसारू । कृष्णकीर्ति सुगम तारूं । ठेवूनि श्रीधरू स्वयें गेला ॥ ६५ ॥ नवल त्या तारुवाची स्थिती । बुडवूं नेणे कल्पांतीं । श्रवणें तरले नेणों किती । पुढेंही तरती श्रद्धाळू ॥ ६६ ॥ श्रीकृष्णकीर्तीचें तारूं । घालितां आटे भवसागरू । तेथें कोरड्या पाउलीं उतारू । श्रवणार्थी नरू स्वयें लाहे ॥ ६७ ॥ जे कृष्णकीर्ति करिती पठण । त्यांच्या संसारासि पडे शून्य । कीर्तिवंत ते अतिपावन । त्यांतें सुरगण वंदिती ॥ ६८ ॥ आदरें पढतां श्रीकृष्ण-कीर्ती । पायां लागती चारी मुक्ती । त्यांचेनि पावन त्रिजगती । परमनिर्वृत्ति हरिनामें ॥ ६९ ॥ श्रीकृष्ण-कीर्ति नामाक्षरें । रिघतांचि श्रवणद्वारें । भीतरील तम एकसरें । निघे बाहेरें गजबजोनी ॥ २७० ॥ तंव कृष्णकीर्तिकथागजरीं । तमासि ठावो नुरेचि बाहेरी । धाकेंचि निमे सपरिवारीं । कृष्णकीर्तिमाझारीं परमानंदू ॥ ७१ ॥ कृष्णकीर्तिप्रतापप्रकाशें । संसार कृष्णमय दिसे । कीर्ति कीर्तिमंताऐसें । दे अनायासें निजसुख ॥७२॥ जो देखिलिया देखणें सरे । जो चाखिलिया चाखणें पुरे । जो ऐकिलिया ऐकणें वोसरे । जो चिंतितां नुरे चित्तवृत्ति ॥७३॥ ज्यासीं झालिया भेटी । भेटीस न पडे तुटी । ज्यासीं बोलतां गोठी । पडे

लागतांच पुण्यपापाचे बंध तुटतात. कर्माचें मुख्य कारण अविद्या आहे, पण भगवच्चरण तिला स्वतःहून भिन्न राहूं देत नाहीं. ६१ गायीच्या मागोमाग उमटलेलीं श्रीकृष्णाचीं पावलें पहातांक्षणीं मी कर्ता, या कर्तृत्वाभिमानासह कर्म निवृत्त होतें. त्यानंतर अकर्म हें नांवहि उरत नाहीं. याप्रमाणें त्या चरणांनीं कर्माला निष्कर्म केलें. ६२ ज्याच्या कीर्तीचें श्रवण केल्यानें श्रोता श्रवणकर्ता या रूपानें रहात नाहीं व वक्ता व्याख्याता या रूपानें रहात नाहीं याप्रमाणें भगवत्कीर्तिश्रवणानें परब्रह्मप्राप्ति होते. ६३. ३९—२६३.

याप्रमाणें भगवानांनीं फार मोठी अवतारख्याति केली. त्यांच्या त्या उदार कीर्तीनें अज्ञजीवांचा उद्धार होतो. तिच्या श्रवणानें त्रिभुवन पावन होतें. ६४ आपल्यामागें आपल्या भक्तांना संसारांतून तरून जाण्यास कृष्ण कीर्ति हें सुलभ तारूं ठेवून स्वतः भगवान् निजधामास गेले. ६५ त्या तारवाची स्थिति विचित्र आहे. तें कल्पांतींहि कोणाला बुडवीत नाहीं. या कृष्णकीर्तीच्या श्रवणानें आजवर किती श्रद्धाळु भक्तांस तारिलें आहे व पुढेंहि तारील तें कांहीं कळत नाहीं. ६६ श्रीकृष्णकीर्तीचें हें तारूं भवसागरांत घालतांच तो आटून कोरडा ठणठणीत होतो. मग श्रवणार्थी जन कोरड्या पावलांनीं त्यांतून स्वतःच जाऊं शकतो. ६७ जे कृष्णकीर्तीचें पठण करितात त्यांच्या संसाराचा अभाव होतो. ते अति पवित्र कीर्तीनें युक्त होतात. त्यांना देवगण वंदितात. ६८ श्रीकृष्णकीर्ति आदरानें पढली असतां चारहि मुक्ति भक्तांच्या पायांवर लोटांगण घालितात. त्यांच्या योगानेंच त्रिभुवन पावन होतें, हरिनामानें परम सुखाचा लाभ होतो. ६९ श्रीकृष्णकीर्तीचीं नामाक्षरें कानांतून हृदयांत शिरतांच आंतील अज्ञानतम एकदम मोठ्या गडबडीनें बाहेर निघतें. २७० पण बाहेर श्रीकृष्णकीर्तिकथेचा गजर चाललेला असतो, त्यामुळें त्या अज्ञानतमाला बाहेरहि कोठें जागा मिळत नाहीं. म्हणून त्याला मोठी भीति वाटते व तें आपल्या सर्व परिवारासह कृष्णकीर्तीमध्यें लीन होतें व स्वतःच परमानंद बनतें. ७१ श्रीकृष्णकीर्तीच्या प्रतापप्रकाशानें संसार कृष्णमय दिसूं लागतो. त्याची कीर्ति त्याच्या भक्ताला त्या कीर्तिमानासारखेंच निजसुख अनायसानें देते. ७२ ज्याला पाहिलें असतां पहाणें संपतें, ज्याचें माधुर्य चाखलें असतां स्वाद घेणें संपतें, ज्याचें श्रवण केलें असतां ऐकणें संपतें व ज्याचें चिंतन केलें असतां चित्तवृत्ति उरत नाहीं. ७३ ज्याची भेट झाली असतां पुनः वियोग होत नाहीं. ज्याच्याशीं भाषण केलें असतां परमार्थप्राप्ति होते ७४ ज्याला आलिंगिलें असतां पुनः दुसऱ्या कोणलाहि आलिंगन

मिठी परमार्थी ॥७४॥ ज्यासि दिधलिया खेंव । खेंवाची पुरे हांव । ज्याचें घेतांचि नांव । नासे सर्व महाभय ॥७५॥ तो सत्यसंकल्प ईश्वरु । स्वलीला असे सर्वेश्वरु । स्वपदासि शार्ङ्गधरु । अति सत्वरु निघाला ॥७६॥

रा० उ०–ब्रह्मण्यानां वदान्यानां नित्यं वृद्धोपसेविनाम् । विप्रशापः कथमभूद्वृष्णीनां कृष्णचेतसाम् ।

आदरें पुसे परीक्षिती । यादव विनीत विप्रभक्तीं । त्यांसि शापु घडे कैशिया रीतीं । सांग तें मजप्रति शुकयोगींद्रा ॥ ७७ ॥ यादव दानें अतिउदार । राजे होऊनि परम पवित्र । ब्राह्मणसेवे तत्पर । आज्ञाधर कृष्णाचे ॥७८॥ यादव सदा कृष्ण योगेंसीं । नित्य साधु यादवांपासीं । तेथेंचि वसे नारदऋषी । शापु यादवांसी घडे कैसा ॥ ७९ ॥ दक्षशाप न बाधी कृष्णापासीं । म्हणोनि नारद वसे द्वारकेसी । तोचि श्रीकृष्ण असतां अंगेंसीं । शापु यादवांसी घडे कैसा ॥ २८० ॥

यन्निमित्तः स वै शापो यादृशो द्विजसत्तम । कथमेकात्मनां भेद एतत्सर्वं वदस्व मे ॥ ९ ॥

शापासि मूळ मुख्य संतापु । कैसेनि ब्राह्मणां आला कोपु । कोणेपरीचा दिधला शापु । संक्षेपरूपु सांगावा ॥ ८१ ॥ यादव समस्त सखे बंधू । यांसि प्रतिपाळी स्वयें गोविंदू । एकात्मता स्वगोत्रसंबंधू ।

देण्याची इच्छा होत नाहीं, सारांश ज्याचें नांव घेतांच सर्व संसारभय नाश पावतें ७५ तो सत्यसंकल्प ईश्वर स्वतः सर्वेश्वर शार्ङ्गधर असूनहि अशी लीला करून सत्वर स्वधामास जाण्यास निघाला. ७६. ६४–२७६

—अहो पण, जे ब्राह्मणांचा अनादर करितात, जे उदार दाते नसतात व जे वृद्धांची सेवा नाहींत, त्यांच्यावर ब्राह्मणांचा कोप होतो. पण हे यादव तसे नव्हते. मग त्यांवर ब्राह्मणांचा कोप कां झाला ? अशी आशंका घेऊन–

राजा उवाच–परीक्षित् राजा म्हणाला, **नित्यं ब्रह्मण्यानां**–नित्य ब्राह्मणांचा सत्कार करणाऱ्या (**नित्यं**) **वदन्यानां**–नित्य दात्या, (**नित्यं**) **वृद्धोपसेविनां**–प्रत्यहीं वृद्धांची सेवा करणाऱ्या, (**नित्यं**) **कृष्णचेतसां**–सतत श्रीकृष्णाचें चिंतन करणाऱ्या, **वृष्णीनां**–यादवांना **विप्रशापः**–ब्राह्मणांचा शाप **कथं अभूत्**–कसा झाला ? [यादव ब्राह्मणांचा मोठा सत्कार करणारे, उदार, वृद्धांची सेवा करणारे, भगवद्भक्त होते मग त्यांच्यावर ऋषींचा कोप कसा झाला ? आणि तो जरी झाला तरी कृष्णामध्यें ज्यांचें चित्त आसक्त आहे अशा यादवांच्या ठिकाणीं तो विप्रकोप कसा व्यक्त झाला ? असा परीक्षित्-राजानें प्रश्न केला.] ८.

परीक्षिती राजानें शुकाचार्यांस आदरानें विचारिलें कीं, ब्राह्मणांची भक्ति करण्यांत तर यादवांची फार प्रसिद्धि आहे. असें असतां त्यांना शाप कसा घडला, तें हे योगिश्रेष्ठा, मला सांगा. ७७ यादव दातृत्वांत फार उदार, आचरणाने पवित्र, ब्राह्मणसेवेंत तत्पर व भगवदाज्ञा पाळणारे होते. ७८ यादवांचें चित्त सर्वदा श्रीकृष्णांत तल्लिन झालेलें, आणि साधुसंत नेहमीं यादवांपाशीं असणारे, नारदमुनि तर नित्य तेथेंच राहणारा, असें असतां त्यांना शाप कसा घडला ? ७९ श्रीकृष्णसांनिध्यानें दक्षाचा शापहि बाधत नाहीं, म्हणून नारद द्वारकेंत राहतो; पण तोच श्रीकृष्ण जवळ असतांना यादवांना शाप कसा घडला ? २८०

अर्थात् ब्राह्मणांच्या शापाचें स्पष्ट कारण कांहींच दिसत नाहीं, म्हणून राजा '**यन्निमित्तः०**' इत्यादि श्लोकानें दुसरें कारण विचारितो––

द्विजसत्तम–हे द्विजश्रेष्ठा **यन्निमित्तः**–कोणत्या निमित्तानें **यादृशः**-कोणत्या प्रकारचा **सः वै शापः**–तो प्रसिद्ध शाप होता व **एकात्मनां**–एकचित्त असलेल्या (यादवांमध्यें) **कथं भेदः**–कलह कसा उत्पन्न झाला, **एतत् सर्वं**–हें सर्व **मे वदस्व**–मला सांग. [तो शाप त्यांना कोणत्या कारणानें झाला व तो कशा प्रकारचा होता, शिवाय सर्वदा एकचित्त असलेल्या यादवांमध्यें कलह कसा झाला तें मला सांग.] ९.

शापाचें मूळ कारण कोप; पण ब्राह्मणांना तो कोप येण्यास कारण काय झालें ? त्यांनीं कोणत्या प्रकारचा शाप दिला ? हें मला थोडक्यांत सांगा. ८१ यादव तर सर्व सख्खे भाऊ होते, आणि साक्षात् गोविंद त्यांचा प्रतिपालक होता, त्या एका गोत्रांतील आप्तांचें सर्वदा एकमत होतें. (त्यांच्यांत विरोध मुळींच नव्हता) तेव्हां त्यांच्यांत आपसांत युद्धप्रसंग कसा घडला ? ८२ 'आत्माच पुत्र

त्यांमाजी युद्धभेद घडे कैसा ॥ ८२ ॥ 'आत्मा वै पुत्रनामासि' । हे श्रुति प्रमाण सर्वांसी । तेथें शाप बाधी कृष्णात्मजांसी । केवीं आलें यासीं सत्यत्व ॥ ८३ ॥ कृष्णसंकल्प कुळनाशन । तोचि ब्रह्मशापासी कारण । यालागीं बाधक जाण । हाय संपूर्ण यादवां ॥ ८४ ॥ सृष्टि सृजी पाळी संहारी । हें कृष्ण संकल्पमात्रें करी । तो यदुकुळनिधान निर्धारीं । त्याची अवतारथोरी शुक सांगे ॥ २८५ ॥

श्रीशुक उवाच–बिभ्रद्वपुः सकलसुन्दरसन्निवेशं कर्माचरन्भुवि सुमंगलमाप्तकामः ।
आस्थाय धाम रममाण उदारकीर्तिः संहर्तुमैच्छत कुलं स्थितकृत्यशेषः ॥ १० ॥
कर्माणि पुण्यनिवहानि सुमंगलानि गायज्जगत्कलिमलापहराणि कृत्वा ।
कालात्मना निवसता यदुदेवगेहे पिण्डारकं समगमन्मुनयो निसृष्टाः ॥ ११ ॥

आहे' हें श्रुतिवचन सर्वांना प्रमाण असतां श्रीकृष्णाच्या वंशजांना हा शाप कसा बाधला? त्या शापाला सत्यत्व कसें आलें? (तो शाप फळास कसा आला?) ८३ स्वकुलाचा नाश करणें हा जो श्रीकृष्णाचा संकल्प तोच ब्रह्मशापाचें निमित्त होऊन सर्व यादवांना बाधक झाला. ८४ श्रीकृष्ण केवळ संकल्पानेंच जगाची उत्पत्ति, स्थिति व लय करतो, तो यदुकुलाचा निःसंशय निधान–आधार आहे. त्याच्या अवताराची थोरवी शुकाचार्य सांगूं लागले. ८५. ८१–२८५.

—ईश्वराची इच्छाच त्याचें कारण आहे असा शुकाचार्य पूर्वोक्त आक्षेपाचा '**बिभ्रत्०**' या श्लोकानें परिहार सांगतात—

श्रीशुकः उवाच–श्रीशुकाचार्य म्हणाले, **सकलसुन्दरसन्निवेशं वपुः**–सर्व सुंदर वस्तूंचा विशेष विन्यास, विशेष प्रकारची रचना ज्यामध्यें आहे असें शरीर **बिभ्रत्**–धारण करणारा **भुवि**–भूलोकी **सुमंगलं कर्म आचरन्**– अति शुभ कर्म करणारा **आप्तकामः**– पूर्णकाम **धाम आस्थाय**– गृहस्थाश्रमाचा आश्रय करून **रममाणः**– त्यांत रममाण होणारा, **उदारकीर्तिः**– ज्याची कीर्ति उदार आहे असा **स्थितकृत्यशेषः**– व ज्याच्या भूभारहरणांतील स्वकुलाचा संहार हाच अवशेष राहिलेला आहे असा तो भगवान् **कुलं**–स्वकुलाचा **संहर्तुं**– संहार करण्यास **ऐच्छत**–इच्छा करिता झाला. [ईश्वराची इच्छाच त्या सर्वांचें निमित्त आहे असा शुकाचार्य पूर्वोक्त आक्षेपाचा परिहार सांगतात. ज्या शरीरामध्ये सर्व सुंदर वस्तूंचा संनिवेश-संग्रह केला आहे अशा शरीरास धारण करणारे भगवान, तर मग अतिसौन्दर्यामुळें ते विषयपरायण होते कीं काय? उत्तर नाहीं. तर ते अतिशय शुभाचरण करणारे होते. तर मग ते कांहीं कामनेनें शुभाचरण करीत होते कीं काय? उत्तर-नाहीं, नाहीं. ते स्वतः पूर्णकाम होते. तर मग कर्माचरण कां करीत होते? उत्तर-द्वारवती या नांवाच्या गृहाचा गृहस्थाश्रमांचा स्वीकार करून ते त्यांतच रममाण होत होते. इतर गृहस्थाश्रमी पुरुषांकडून कर्मयोगाचें ग्रहण करविण्याठीं ते स्वतः गृहस्थ होऊन कर्मनिष्ठ झाले; पण पूर्णकाम असलेल्या भगवानांना गृहासक्ति व कर्में यांचा काय उपयोग? ज्यांची कीर्ति उदार–पुष्कळ फल देणारी आहे असे ते भगवान् लोकोद्धारार्थ आपली कीर्ति जगांत पसरविण्यासाठीं स्वतः आप्तकाम असूनहि गृहस्थ व कर्मी झाले. याप्रमाणें परम ऐश्वर्यानें युक्त असलेल्या आपल्या कुलाचा संहार करण्याचा त्यांनीं निश्चय केला. तो कशासाठीं कारण त्यांच्या भूभारहरणस्वरूपकृत्यांतीं आता तेवढाच अवशेष राहिला होता.] **१०.**

—ईश्वराच्या इच्छेनें उत्पन्न झालेलें ब्रह्मशापाचें निमित्त सांगण्यासाठीं '**कर्माणि०**' या श्लोकानें म्हणतात—

पुण्यनिवहानि–पुण्य प्राप्त करून देणारीं **सुमंगलानि**–अतिश सुखात्मक **गायत्–जगत् कलिमलापहराणि**– त्यांचें गायन करणाऱ्या जगाच्या कलिमलाचा अपहार करणारीं **कर्माणि**–कर्में **कृत्वा**–करून **कालात्मना**–संहाररूपानें **यदुदेव गेहे**–वसुदेवाच्या गृहांत, **निवसता**–रहाणाऱ्या (श्रीकृष्णांनीं) **विसृष्टाः**–निरोप दिलेले **मुनयः**–मुनी **पिण्डारकं**–पिण्डारक तीर्थास **समगमन्**-गेले [कर्मासाठीं बोलाविलेले विश्वामित्रादि मुनी तीं कर्में करून भगवानांनी अनुज्ञा दिली असतां द्वारकेपासून जवळच असलेल्या पिण्डारक क्षेत्रास गेले. पूर्वोक्त उदार कीर्तित्वाचे विवरण करणारे शुकाचार्य कर्मांना तीन विशेषणें देतात-अश्वमेधादि कांहीं कर्में केवळ पुण्यालाच उत्पन्न करितात. पुत्रलालनादि कांहीं कर्में तत्काल सुखच देतात. प्रायश्चित्तादि कांहीं कर्में पापाचेंच हरण करितात. पण हीं कर्में पुण्य प्राप्त करून देणारीं, अतिशय सुखात्मक व त्यांचें संकीर्तन करणाऱ्या लोकांच्या पापाचें हरण करणारीं होतीं. अशी तीं कर्में करून वसुदेवाच्या गृहांत कालरूपानें रहाणाऱ्या आणि स्वकुलाचा संहार करण्याची इच्छा करणाऱ्या भगवानानें त्या सर्व मुनींना निरोप दिला व ते तेथून पिन्डारकक्षेत्रास गेले.] **११.**

रायासी म्हणे श्रीशुकु । कर्ता करविता श्रीकृष्ण एकु । तो शापार्थ आत्यंतिकु । आत्मजां अविवेकु उपजवी स्वयें ॥ ८६ ॥ स्वयें जावया निजधामा । थोर आवडी पुरुषोत्तमा । यालागीं अवशेषकर्मा । मेघश्यामा लवलाहो ॥ ८७ ॥ केव्हां होईल कुलक्षयो । हेंचि मनीं धरी देवो । तो देवाचाचि भावो । शापासि पाहावो दृढमूळ ॥ ८८ ॥ जो कुलक्षयो चिंती । त्या कृष्णाची सुंदरमूर्ति । शुक सांगे परीक्षितीप्रती । स्वानंदस्थिती उल्हासे ॥ ८९ ॥ सकल सौंदर्या अधिवासु । धरोनि मनोहर नटवेषु । लावण्यकलान्यासु । आणि जगदीशु निजांगें ॥ २९० ॥ नवल सौंदर्या बीक उठी । सर्वांगीं गुंतल्या जनदिठी । कृष्णस्वरूपीं पडे मिठी । होत लुलबुटी डोळयां ॥९१॥ जैशी गुळीं माशीवर माशी । तेवीं दिठीवर दिठी कृष्णरूपासी । सर्वांगीं वेढोनि चौपासीं । अहर्निशीं नोसंडिती ॥ ९२ ॥ नयन लांचावले लोभा । दृष्टीसि निघालिया जिभा । यापरी श्रीकृष्णशोभा । स्वानंदगाभा साकार ॥ ९३ ॥ तो श्रीकृष्ण देखिला ज्या दिठीं । ते परतोनि मागुती नुठी । अधिकाधिक घाली मिठी । देखे सकळसृष्टी श्रीकृष्णु ॥ ९४ ॥ ऐशी डोळयां आवडी ॥ म्हणोनि कामिनी वरपडी । यालागीं गोपिकां गोडी । अतिगाढी गोविंदीं ॥ ९५ ॥ कृष्ण अतिसुंदर मनोरम । म्हणाल असेल त्यासि विषयधर्म । तरी तो अवाप्तसकळकाम । आत्माराम श्रीकृष्ण ॥९६॥ कृष्ण अवाप्तसकळकाम । त्यासि कां द्वारकागृहाश्रम । स्त्रिया पुत्र राज्यसंभ्रम । विषयकाम कां भोगी ॥९७॥ चहूं आश्रमां प्रकाशकु । त्रिलोकीं कृष्ण गृहस्थ एकु । तोचि ब्रह्मचारी नैष्ठिकु । अतिनेटकु संन्यासी ॥९८॥ कृष्णदेहीं नाहीं दैवबळ । लीलाविग्रही चित्कल्लोळ । त्याचीं सर्व कर्मे पावनशीळ । उद्धरी सकळ श्रवणें कथनें ॥ ९९ ॥ कृष्णकर्माचें करी जो स्मरण । तें कर्म तोडी

श्रीशुकाचार्य म्हणाले, ‘ हे राजा, एक श्रीकृष्णच सर्व कर्ता, करविता आहे. त्यानें स्वतः शापासाठीं आपल्या वंशजामध्यें अत्यंत अविवेक उत्पन्न केला. ८६ त्या पुरुषोत्तमाला निजधामास जाण्याची फार मोठी आवड होती. त्यामुळें आपलें स्वकुलक्षयरूप अवशिष्ट राहिलेलें कार्य लवकर उरकून टाकण्याची त्याला तांतड झाली. ८७ माझ्या या कुलाचा क्षय केव्हां होईल असें देवास वाटूं लागलें आणि तो देवांचा आशय ब्राह्मणांच्या शापाचें मूळ कारण आहे. ’ ८८ जो आपल्या कुलाचा क्षय चिंतीत होता, त्या श्रीकृष्णाच्या सुंदर मूर्तीचें वर्णन शुकाचार्य करूं लागले. त्याबरोबर त्यांच्या स्वानंदस्थितीला भरतें आलें. ८९ जगदीशानें सर्व सौंदर्याचें अधिष्ठान असें मनोहर रूप धारण केलें. त्यानें आपल्या नटवेषांत सर्व लावण्याचा संग्रह केला. २९० सर्व लोकांच्या दृष्टि श्रीकृष्णाच्या सर्वांगीं खिळल्या. त्यांची भगवानांच्या स्वरूपीं अशी मिठी पडली कीं त्यांची तृप्तिच होईना. ९१ गुळाच्या खड्यावर माशा जशा एकावर एक बसून त्यांचें थवेच बनतात, त्याप्रमाणें श्रीकृष्णरूपावर लोकांच्या दृष्टींचे थवे त्याला सभोंवार सर्वांगीं वेढून बसले व त्याला कांहीं केल्या सोडिनात. ९२ श्रीकृष्णाच्या मूर्तीमध्यें लोकांचे नेत्र इतके लुब्ध झाले कीं, त्यांच्या दृष्टीला जणुकाय जिव्हाच फुटून त्यांनीं त्या सौन्दर्याचा स्वादच घेत आहेत कीं काय असें वाटलें. याप्रमाणें तो स्वानंदकंद साकार झाल्यामुळें श्रीकृष्णाची शोभा सर्व लोकांना सुखवूं लागली, ९३ ज्या दृष्टीनें श्रीकृष्णाला पाहिलें ती त्याच्यापासून परत न फिरतां अधिकाधिकच मिठी मारून बसत असे. सर्व सृष्टींत ती श्रीकृष्णच पाही. ९४ लोकांच्या नेत्रांना श्रीकृष्णाची मूर्ति इतकी प्रिय असल्यामुळेंच स्त्रिया त्याच्यावर लुब्ध होत असत. त्यामुळेंच गोपिकांचीहि गोविंदावर अतिशय प्रीति होती; ९५ पण श्रीकृष्ण इतका सुंदर व मनोहर होता, म्हणून तो विषयासक्त असेल असें म्हणाल तर तसें मात्र नाहीं. कारण तो परिपूर्णकाम व आत्माराम होता. ९६ अहो, तो भगवान् पूर्णकाम असतांना त्याला द्वारकेंतील गृहस्थाश्रम कोठला? स्त्रिया, पुत्र, राज्यलोभ व विषयेच्छा तरी कोठची? ९७ तो चारी आश्रमांचा प्रकाशक, त्रैलोक्यांतील एक गृहस्थ, तोच नैष्ठिकब्रह्मचारी व तो परमहंस संन्यासी. ९८ कृष्णशरीरामध्यें दैवबळ नाहीं. (म्ह॰ त्याचा देह प्रारब्धामुळें उत्पन्न झालेला नाहीं.) तर तो एक चैतन्यसागरांतील लीलाशरीरी तरंग आहे. त्याचीं सर्व कर्में अतिपवित्र असून त्यांचें श्रवण व कीर्तन यांच्यायोगें तो सर्वांचा उद्धार करितो. ९९ श्रीकृष्णकृतींचें जो स्मरण करितो ती कृति त्याचें

कर्मबंधन । ऐसें उदार कर्माचरण । आचरला श्रीकृष्ण दीनोद्धरणा ॥३००॥ श्रीकृष्ण असेल सकाम । म्हणाल यालागीं आचरे कर्म । ज्याचें नाम निर्दळी सर्व काम । तो स्वयें सकाम घडे केवीं ॥ १ ॥ श्रीकृष्णाचा स्मरतां काम । स्वयें संन्यासी होती निष्काम । सकामाचा निर्दळे काम । ऐसें उदार कर्म आचरला ॥ २ ॥ तेणें अवाप्तसकळकामें । ऐशीं आचरला अगाध कर्में । मानव ताराबया मनोधर्मे । कीर्ति मेघश्यामें विस्तारिली ॥ ३ ॥ कैसें कर्म सुमंगळु । कानीं पडतांचि अळुमाळु । नासोनियां कर्ममळू । जाती तत्काळू श्रवणादरें ॥ ४ ॥ श्रवणें उपजे सद्भावो । सद्भावें प्रकटे देवो । तेणें निर्दळे अहंभावो । ऐशी उदार पाहावो हरिकीर्ति ॥ ५ ॥ श्रीकृष्णकीर्तीचें स्मरण । कां करितां श्रवणपठण । मागें उद्धरले बहुसाल जन । पुढें भविष्यमाण उद्धरती ॥ ६ ॥ जरी केलिया होतील पुण्यराशी । तरी अवधान होय हरिकथेसी । येऱ्हवीं ऐकतां येरांसी । लागे अनायासीं अतिनिद्रा ॥ ७ ॥ जे हरिकथेसी सादर । त्यांच्या पुण्या नाहीं पार । कृष्णें सुगमोपाव केला थोर । दीनोद्धार हरिकीर्तनें ॥ ८ ॥ कृष्णकीर्तनें गर्जतां गोठी । लाजल्या प्रायश्चित्तांचिया कोटी । उतरल्या तीर्थांचिया उठी । नामासाठीं निजमोक्षु ॥ ९ ॥ ऐसा निजकीर्तिउदारू । पूर्णब्रह्म सारंगधरू । लीलाविग्रही सर्वेश्वरू । पूर्णावतारू यदुवंशीं ॥ ३१० ॥ उतरला धराभार येथ । सत्य न मनी श्रीकृष्णनाथ । यादव उरले अति अद्भुत । तेहि समस्त निर्दळावे ॥ ११ ॥ ये अवतारीं हृषीकेशी । म्हणे हेंच कृत्य उरलें आम्हांसीं । निर्दळोनि निजवंशासी । निजधामासी निघावें ॥ १२ ॥ तो यादवांमाजी माधव । कालात्मा देवाधिदेव । जाणोनि भविष्याचा भाव । काय अपूर्व करिता झाला ॥ १३ ॥ नारदादि मुनिगण । त्यांसि पाचारूनि आपण । करूं सांगे शीघ्र गमन । स्वयें श्रीकृष्ण साक्षेपें ॥ १४ ॥ ज्यांपासूनि संत दूरी

भवबंधन तोडते. श्रीकृष्णानें दीनांच्या उद्धरासाठीं अशींच उदार कर्में केली. ३०० कोणी म्हणेल कीं, तो भगवान् सकाम असेल, आणि त्यासाठींच त्यानें कर्में केलीं असतील. पण ज्याचें नाम सर्वकामांचा नाश करतें, तो स्वतः सकाम असणें कसें शक्य आहे? १ अहो, श्रीकृष्णाच्या लीलांचें स्मरण केल्यानें स्वतः संन्यासी सुद्धां निष्काम होतात आणि सकामाचा काम निवृत्त होतो, असें उदार चरित्र त्यानें आचरिलें आहे. २ आपल्या अगाध कर्मांनीं त्या मेघश्यामानें मानवांचा उद्धार होण्यासाठीं आपली कीर्ति या लोकीं पसरविली. ३ भगवानाचें सुमंगल कर्म थोडेसें कानीं पडतांच कर्ममल नाहींसा होतो. तें ऐकण्याविषयींचा आदर वाढतो. ४ त्याच्या श्रवणानें श्रोत्यांच्या मनांत सद्भाव उत्पन्न होतो. सद्भावानें देव प्रकट होतो. अहंभाव निघून जातो. ५ श्रीकृष्णकीर्तीचें स्मरण, श्रवण व पठण करून आजवर अनेक जन उद्धरिले आहेत व पुढेंहि उद्धरतील. ६ पूर्वजन्मीं जर पुण्याच्या राशी केल्या असल्या तरच हरिकथेकडे अवधान राहतें, नाहींतर त्या ऐकूं लागलें असतां अनायासें झोंप येते. ७ ज्यांना हरिकथेविषयीं आदर असतो त्यांच्या पुण्याचा अंत लागत नाहीं. हरिकीर्तन हा श्रीकृष्णांनीं दीनोद्धरणाचा सुगम श्रेष्ठ उपाय योजिला आहे. ८ श्रीकृष्णकीर्तनाच्या गोष्टी गर्जना करून सांगूं लागले असतां प्रायश्चित्तांच्या कोटी लाजतात, तीर्थांचें महत्त्व नाहींसें होतें, केवल नामानेंच मोक्षप्राप्ति होतें. ९ असा हा आपल्या कीर्तीनें उदार आहे. तो पूर्ण परब्रह्म व सर्वेश्वर असूनहि लीलाशरीर धारण करून यदुवंशी पूर्णावतार झाला. ३१० त्यानें पृथ्वीचा भार जरी वर वर्णिल्याप्रमाणें कमी केला होता तरी अतिविचित्र पराक्रमी यादव पृथ्वीवर असल्यामुळें तें आपलें भूभारहरणाचें कार्य शेवटास गेलें आहे असें त्यास वाटेना ११ म्हणून यांचाहि संहार करणें हें आपल्या अवतारकार्यांतील अवशिष्ट राहिलेलें कार्य आहे, असें मानून आपल्या वंशांतील समस्त यादवांचा नाश करून निजधामास जावें, १२ अशा संकल्पानें यादवांतील कालरूप देवादिदेव पुढील भविष्य ओळखून कोणती अपूर्व गोष्ट घडवून आणता झाला तें ऐका. १३ नारदादि मुनिगणांना त्यांनींच बोलावून आणिलें आणि मंगलकार्यें संपतांच स्वतः श्रीकृष्णच त्यांस आग्रहानें तेथून सत्वर गमन करण्याविषयीं सांगूं लागला. १४ कारण ज्यांच्यापासून संत दूर जातात तेथेंच अन-

गेले । तेथें अनर्थाचें केलें चाले । हें यादवानिधनालागीं वहिलें । लाघव केलें श्रीकृष्णें ॥ १५ ॥ भक्त संत साधु ज्यापासीं । तेथें रिघु नाहीं अनर्थासी । जाणे हें स्वयें हृषीकेशी । येरां कोणासी कळेना ॥ १६ ॥ जेथें संतांचा समुदावो । तेथें जन्ममरणांचाहि अभावो । हा श्रीकृष्णचि जाणे भावो । तो करी उपावो ब्रह्मशापार्थ ॥ १७ ॥ जेथूनि संत गेले दूरी । तेथें सद्यचि अनर्थ वाजे शिरीं । हें जाणोनियां श्रीहरी । द्वारकेबाहेरी ऋषि घाली ॥ १८ ॥ ऋषि जात होते आश्रमासी । त्यातें लाघवी हृषीकेशी । तीर्थमिषें समस्तांसी । पिंडारकासी स्वयें धाडी ॥ १९ ॥ पिंडारका मुनिगण । श्रीकृष्णें धाडिले कोण कोण । ज्यांचें करितांचि स्मरण । कळिकाळ आपण भयें कांपे ॥ ३२० ॥

विश्वामित्रोऽसितः कण्वो दुर्वासा भृगुरंगिराः । कश्यपो वामदेवोऽत्रिर्वसिष्ठो नारदादयः ॥ १२ ॥

जे तपस्तेजें देदीप्यमान । जे पूर्णज्ञानें ज्ञानघन । ज्यातें सदा वंदी श्रीकृष्ण । ते ऋषीश्वर जाण निघाले ॥ २१ ॥ जे गायत्रीमंत्रासाठीं । करूं शके प्रतिसृष्टी । जो विश्वामित्र महाहटी । तोही उठाउठीं निघाला ॥ २२ ॥ जेथ न बधी उष्णशीत । ते आश्रमीं बसे असित । ज्याचेनि नामें द्वंद्वें पळत । तोही त्वरित निघाला ॥ २३ ॥ जो सूर्यासि रिघोनि शरण । अश्वाचे कर्णीं बैसोन आपण । पूर्ण केलें वेदपठण । तो कण्वही जाण निघाला ॥ २४ ॥ जो दुर्वास अत्याहारी । आहार सेवूनि निराहारी । तोही द्वारकेबाहेरी । त्वरेंकरूनि निघाला ॥ २५ ॥ भृगूचा श्रीचरण । हृदयीं वाहे नारायण । मिरवी श्रीवत्स भूषण । तो भृगुही जाण निघाला ॥ २६ ॥ अंगिरा स्वयें सद्‌बुद्धि सृष्टीं । बृहस्पति जन्मला ज्याचे पोटीं । जो परमगुरु देवांच्या मुकुटीं । तोही उठी गमनार्थ ॥ २७ ॥ कश्यपाची नवल गोठी । सुर नर किन्नर जन्मले पोटीं । यालागीं हे काश्यपी सृष्टी । तोही उठाउठी निघाला ॥२८॥

र्थीला फावते. म्हणून श्रीकृष्णानें यादवांच्या मरणासाठीं पहिलें निमित्त योजिलें. १५ ज्यांच्या संनिध भक्त, संत असतात तेथें अनर्थांना अवकाश मिळत नाहीं. हें रहस्य एक श्रीकृष्णच जाणतो. दुसऱ्या कोणाला तें कळत नाहीं. १६ जेथें संतसमुदाय असतो तेथें जन्म-मरणाचाहि अभाव होतो, हा नियम श्रीकृष्णच जाणत असल्यामुळें यादवांना ब्राह्मणांचा शाप होण्यासाठीं त्यांनीं प्रथम संतांना दूर करणें हा उपाय योजिला. १७ जेथून संत दूर जातात तेथें अनर्थ तत्काल येऊन कोसळतो हें जाणून श्रीहरीनें ऋषिमंडळाला द्वारकेबाहेर घालविलें. १८ ते बिचारे ऋषि आपापल्या आश्रमास जाणार होते. पण या कपट नाटकी हृषीकेषानें तीर्थाच्या निमित्तानें सर्वांना पिंडारकास धाडिलें. १९ ज्यांचे स्मरण करितांच कलिकाळ स्वतः भयानें कांपूं लागतो अशा कोणकोणत्या ऋषींना त्यानें पिंडारकास धाडिलें तें ऐका. ३२०

विश्वामित्रः असितः कण्वः दुर्वासाः भृगुः अंगिराः कश्यपः वामदेवः अत्रिः वसिष्ठः नारदादयः—
(या विश्वामित्रादि ऋषींना भगवानांनी निरोप दिला असतां ते सर्व पिंडारक क्षेत्रास गेले.) १२.

आपल्या तपश्चर्येच्या तेजानें झळकणारे, ज्ञानघन व श्रीकृष्णास वंद्य असे ते सर्व श्रेष्ठ ऋषीश्वर पिंडारक तीर्थास जाण्यास निघाले. २१ गायत्रीमंत्राच्या बळानें प्रतिसृष्टि निर्माण करण्यास समर्थ झालेला निश्चयी विश्वामित्र लगबगीनें निघाला. २२ जेथें शीतउष्णाची बाधाच होत नाहीं अशा आश्रमांत रहाणारा आणि ज्याचें नांव ऐकतांच सुखदुःखादि द्वंद्वें पळून जातात असा असितमुनीहि त्वरेनें चालला. २३ ज्यानें सूर्याला शरण जाऊन त्याच्या घोड्यांच्या कानावर आरूढ होऊन वेदपठण केलें असा कण्वमहर्षि निघाला. २४ विपुल आहार करूनहि निराहार मानणारा दुर्वासहि गडबडीनें द्वारकेच्या बाहेर पडला. २५ ज्याच्या चरणाची खूण श्रीवत्सभूषण म्हणून साक्षात् नारायणांनीं आपल्या हृदयावर धारण केली आहे, असा भृगुहि उठला. २६ देवांतील श्रेष्ठ परमगुरु बृहस्पतीला ज्यानें जन्म दिला तो अंगिराऋषिहि निघाला. २७ काश्यपाचें चरित्र तर फारच विचित्र आहे. ज्याच्यापासून देव, किन्नर व मनुष्य यांची उत्पत्ति झाली, म्हणून या सृष्टीला ‘ काश्यपाचें अपत्य ’ असें नांव पडलें तो काश्यपहि

मुक्तांमाजीं श्रेष्ठ भावो । वेदीं वाखाणिला वामदेवो । तोही द्वारकेहूनि पाहावो । स्वयमेवो निघाला ॥ २९ ॥ अत्रीची नवल परी । तीनी देव जन्मले उदरीं । श्रीदत्त वंदिजे योगेश्वरीं । हे अगाध थोरी अनसूयेची ॥ ३३० ॥ तो स्वयें अत्रि ऋषीश्वर । श्रीकृष्ण आज्ञातत्पर । पिंडारका अतिसत्वर । प्रयाण शीघ्र तेणें केलें ॥ ३१ ॥ जो श्रीरामाचा सद्गुरू । ब्रह्मज्ञानें अतिउदारू । ज्याचे शाटीचा प्रताप थोरू । जिंकिला दिनकरू तपस्तेजें ॥ ३२ ॥ ऐसा जो वसिष्ठ महामुनी । तोही कृष्णसंज्ञा मानुनी । निघाला द्वारकेहूनी । शीघ्र गमनीं पिंडारका ॥ ३३ ॥ आणि देवर्षि नारदु । त्याचाही अगाध बोधु । ज्यासि सर्वदा परमानंदु । अति आल्हादु हरिकीर्तनीं ॥३४॥ ब्रह्मवीणा स्वयें वातु । ब्रह्मपदें गीत गातु । ब्रह्मानंदें नाचतु । निघे डुल्लतु पिंडारका ॥ ३५ ॥ इत्यादि हे मुनिवरू । श्रेष्ठ श्रेष्ठ ऋषीश्वरू । शिष्यसमुदायें सहपरिवारू । मीनले अपारू पिंडारकीं ॥३६॥ एवं पिंडारकी ऋषि सर्व । शापानुग्रही महानुभाव । मीनले कृष्णवैभव । अतिअपूर्व वर्णिती ॥ ३७ ॥ बाप लाघवी वनमाळी । कुलक्षयो घडावया तत्काळीं । कुमरीं ऋषीश्वरांसि रांडोळी । कपटमेळीं मांडिली ॥ ३८ ॥ निंदा अवज्ञा हेळण । करितां ब्राह्मणांसी छळण । जेथ ब्रह्मद्वेष वाढे पूर्ण । कुळक्षयो जाण ते ठायीं ॥ ३९ ॥ ब्राह्मणांच्या कोपापुढें । कुळ कायसें बापुडें । महादेवाचें लिंग झडे । इंद्रपदवी पडे समुद्रीं ॥ ३४० ॥ तो समुद्रही केला क्षार । ऐसा द्विजकोप अतिदुर्धर । हें एकएकाचें चरित्र । ते ऋषि समग्र मीनले तेथें ॥ ४१ ॥ धरातळीं ब्रह्म ब्राह्मण । त्यांचें वचन परम प्रमाण । हें सत्य करावया श्रीकृष्ण । कुळनिर्दळण स्वयें दावी ॥ ४२ ॥

क्रीडन्तस्तानुपव्रज्य कुमारा यदुनंदनाः । उपसंगृह्य पप्रच्छुरविनीता विनीतवत् ॥ १३ ॥

घाईनें उठला. २८ मुक्त झालेल्या जीवांमध्यें श्रेष्ठ आणि वेदानें ज्याला वाखाणिलें आहे, असा वामदेवहि द्वारकेहून स्वतःच निघाला. २९ जिच्या उदरीं तिन्ही देवांनीं दत्तात्रेयाच्या रूपानें जन्म घेतला अशी अनुसूयेची केवढी थोरवी आहे; ३३० पण तिचा पति अत्रिऋषिहि कृष्णाची आज्ञा मानून द्वारकेहून सत्वर मार्गस्थ झाला. ३१ श्रीरामचंद्राचा गुरु, ब्रह्मज्ञानांत अति उदार, ज्याच्या छाटीचाहि मोठा प्रताप आहे, ज्यानें आपल्या तपःप्रभावानें सूर्यालाहि जिंकिलें आहे ३२ अशा वसिष्ठ महामुनीनेंहि श्रीकृष्णाच्या वचनानुसार तत्काल पिंडारकक्षेत्रास प्रयाण केलें. ३३ अगाध ज्ञानी, हरिकीर्तनांतच सदा परम आनंद मानणारा देवर्षि नारदहि, ३४ हातीं ब्रह्मवीणा घेऊन ब्रह्मपदें गात, ब्रह्मानंदीं तल्लीन होऊन नाचत डुलत चालला. ३५. अशा प्रकारें ते सर्व श्रेष्ठ श्रेष्ठ मुनी आपापला शिष्यसमुदाय व परिवार यांसह पिंडारक तीर्थास गेले. ३६ कोपले असतां शाप देणारे व प्रसन्न झाले असतां अनुग्रह करणारे महान् सामर्थ्यवान् ते सर्व ऋषि त्या क्षेत्रांत श्रीकृष्णाच्या अद्भुत वैभवाचें वर्णन करूं लागले. ३७ सर्व जगाचा पिता कपटनाटकी श्रीकृष्ण आपल्या कुमारांच्या मनांत या ऋषिश्वरांचा कपटाचरणानें उपहास करण्याची प्रेरणा करिता झाला ३८. ब्राह्मणांची निंदा, अवज्ञा, तिरस्कार व कपटाचरण केलें असतां ब्रह्मद्वेष वाढतो. जेथें तो वाढतो तेथें कुलक्षय अवश्य होतो. ३९ अहो, ब्राह्मणांच्या कोपानें महादेव, इंद्र, चंद्र इत्यादिकांचीहि जर दुर्दशा झाली, तर या बिचाऱ्या यादवकुलाची ती काय कथा! ३४० येथें आलेल्या ऋषींतील एकेकाचें चरित्र जरी पाहिलें तरी त्यावरून प्रत्येकाचा कोप किती दुर्धर आहे, हें दिसून येतें. मग असे ते सर्व ऋषि एकत्र जमल्यावर काय विचारावें! ४१ ब्राह्मण हे भूलोकांतील ब्रह्म आहे. त्यांचें वचन परम प्रमाण आहे. तें सत्य करावयासाठीं श्रीकृष्णांनीं स्वतः स्वकुलाचा नाश करून दाखविला. ३४२

अविनीताः–उद्धत **यदुनंदनाः कुमाराः**–यादवकुमार **क्रीडन्तः**–क्रीडा करीत होत्साते **विनीतवत्**–नम्रपणाचा आव आणून **तान्**–त्या ब्राह्मणांच्या **उपव्रज्य**–समीप जाऊन **उपसंगृह्य**–त्यांच्या चरणांवर मस्तक ठेवून **पप्रच्छुः**–प्रश्न करूं लागले. [स्वभावतःच उन्मत्त असलेले ते सर्व तरुण यादव क्रीडा करीत असतांना त्या ब्राह्मणांपाशीं गेले व नम्रपणाचें ढोंग करून त्यांनीं त्यांना वंदन केलें आणि असें विचारिलें] १३.

यदुनंदन समस्त । क्रीडाकंदुक झेलित । एकमेकांतें हाणित । ठकवून पळत परस्परें ॥ ४३ ॥ ऐसे नाना क्रीडाविहार । करीत आले यदुकुमर । अंगीं श्रीमद अपार । औद्धत्यें थोर उन्मत्त ॥ ४४ ॥ अतीतअनागतज्ञानवंत । ऋषीश्वर मीनले समस्त । ज्यांचें वचन यथार्थभूत । त्यांसिही निश्चित ठकूं आम्ही ॥ ४५ ॥ जें अवघड येऊनि पडे । तें यांचें वचन कैसें घडे । म्हणोनि ऋषीश्वरांपुढें । मांडालें कुडें यदुकुमरीं ॥ ४६ ॥

ते वेषयित्वा स्त्रीवेषैः साम्बं जाम्बवतीसुतम् । एषा पृच्छति वो विप्रा अंतर्वत्न्यसितेक्षणा ॥ १४ ॥
प्रष्टुं विलज्जती साक्षात्प्रब्रूतामोघदर्शनाः । प्रसोष्यन्ती पुत्रकामा किंस्वित्संजनयिष्यति ॥ १५ ॥

पहिलेच श्रीमदें उद्भट । त्यावरी मांडिलें कपट । सांबास देऊनि स्त्रीनट । अतिवरिष्ठ बाणला ॥ ४७ ॥ तो श्यामसुंदर डोळसु । अंगा शोभला स्त्रीवेषु । प्रमदावैभवविलासु । दावी विन्यासु सलज्ज ॥ ४८ ॥ नयनीं सोगयाचें काजळ । व्यंकटा कटाक्षें अतिचपल । सुंदर सुकुमार वेल्हाळ । चाले निश्चळ हंसगती ॥ ४९ ॥ वस्त्रें बांधोनियां उदर । नावेक केलें थोर । तेणें ते गरोदर दिसे साचार इतरांसी ॥ ३५० ॥ हात घालूनि सखियांच्या खांदीं । चालतां उदर हालों नेदी । विसांवा घेत पदोपदीं । येतां ऋषिवृंदीं देखिली ॥ ५१ ॥ ऐसा स्त्रीवेष दाखवूनी । नावेक अंतरें राहोनी । इतर

ते सर्व यादव खेळण्याचा चेंडु झेलून एकमेकांस मारीत होते. परस्परांस ठकवून पळत होते. ४३ याप्रमाणें विचित्र क्रीडा करीत करीत ते ऋषींपाशीं आले. त्यांच्या अंगीं अपार द्रव्यमद होता. उद्धतपणानें ते फार उन्मत्त झाले होते. ४४ त्यामुळें ज्यांचें वचन कधींहि असत्य होत नाहीं अशा एकत्र जमलेल्या त्या त्रिकालज्ञ ऋषीश्वरांसहि आपण ठकवूं या, असा त्यांनीं संकेत केला. ४५ अहो, जें कधींहि घडावयाचे नाहीं तें यांच्या वचनानें तरी घडेल कसें? असें मानून त्यांनीं ऋषींच्यापुढें कपटाचरण आरंभिलें. ३४६

—पुढील दोन श्लोक त्यांचा प्रश्नच प्रकट करितात—

ते—ते यादव **जाम्बवतीसुतं सांबं**—जांबवतीचा पुत्र जो सांब त्याला **स्त्रीवेषैः वेषयित्वा**—स्त्रीवेषानें नटवून **विप्राः**—हे ऋषिहो **एषा अन्तर्वत्नी असितेक्षणा**—ही गर्भिणी कमलनयना **वः**—तुम्हांस **पृच्छति**—कांहीं विचारीत आहे. **पुत्रकामा सा**—पुत्राची इच्छा करणारी ती **साक्षात् प्रष्टुं**—तुम्हांला प्रत्यक्ष विचारण्यास **विलज्जती**—लाजत आहे म्हणून **अमोघदर्शनाः**—अहो त्रिकालज्ञ मुनीहो **प्रसोष्यन्ती**—लवकर प्रसवणारी ही **किंस्वित् संजनयिष्यति**—काय बरें प्रसवेल? **प्रब्रूत**—तें तिला सांगा. १४–१५. [ऋषींचा उपहास करणाऱ्या त्या यादवांनीं जाम्बवतीपुत्र सांबाला स्त्रीचें सोंग देऊन, ‘ पूज्य ब्राह्मणांनो, ही सुंदरी गर्भिणी आहे. ती आपल्याला पुत्र होईल कीं कन्या होईल असें विचारीत आहे. समक्ष तुम्हांलांच विचारण्यास ती लाजत आहे. करितां तिला काय होईल तें सांगा ’ असें म्हटलें.] १४–१५.

ते अगोदरच संपत्तीच्या मदानें उन्मत्त झाले होते. त्यांतच त्यांनीं कपटाचरणाला आरंभ केला. सांबाला स्त्रीवेष दिला. तो त्याला फारच शोभला. ४७ त्याचे नेत्र अगोदरच काळेभोर होते. त्याच्या ठिकाणीं तरुण स्त्रियांचे हावभाव करण्याचेंहि कौशल्य होतें. त्यामुळें तर त्याला तो स्त्रीवेष फारच शोभला. तो लाजून उभा राहिला. ४८ त्यानें डोळ्यांत उत्तम प्रतीचा सुरमा घातला. त्याच्या भुंवया अगोदरच कुटिल होत्या. त्यांतून आपल्या वेषाला शोभेल अशा रीतीनें तो त्या इतस्ततः कटाक्ष फेकूं लागला. सुंदर व सुकुमार स्त्रीवेष धारण करणारा सांब हंसाप्रमाणें मंद गतीनें चालूं लागला. ४९ पोटावर वस्त्रें बांधून तें थोडेसें फुगीर दिसेलसें केलें. त्यामुळें पाहाणाराला ती खरोखरच गरोदर स्त्री आहे असें दिसूं लागलें. ३५० वेषधारी सख्यांच्या खांद्यावर हात ठेवून चालतांना तिनें आपलें उदर हालूं दिलें नाहीं. दोन चार पावलें चालून जणुंकाय चालवत नाहीं, अशा बहाण्यानें ती मध्यें मध्यें थांबत होती. अशा रीतीनें येत असलेल्या तिला ऋषींनीं पाहिलें. ५१ असा स्त्रीवेष धारण करणारी ती ऋषींपासून थोड्या अंतरावर उभी

ऋषींजवळी येऊनी । लोटांगणें घालिती ॥ ५२ ॥ पूर्वश्लोकींचा श्लोकार्थ तेथ । व्याख्यानीं नव्हेंच समस्त । यालागीं तोचि येथ । वाखाणिजेत कथान्वयें ॥ ५३ ॥ छळाचेनि मिषें जाणा । ऋषींसि करिती प्रदक्षिणा । अत्यादरें लागती चरणा । म्हणती दर्शना आम्ही आलों ॥ ५४ ॥ ऐसे यदुकुमार समस्त । अविनीत परी विनीतवत । कर जोडोनी राहिले तेथ । मृदु विनवीत मुनीश्वरां ॥ ५५ ॥ स्वामी पैल हे जे सुंदर । तुमच्या वचनीं भावार्थ थोर । आसन्न प्रसव गरोदर । स्वयें सुकुमार पुसों लाजे ॥५६॥

स्वयें येऊन तुम्हांप्रती । तिचेनि न बोलवे निश्चितीं । यालागीं आम्हांहातीं । सेवेसि विनंती करविली ॥५७॥ तुम्ही सत्यदर्शी साचार । अमोघवीर्य तुमचें उत्तर । शिरीं वंदिती हरिहर । ज्ञानें उदार तुम्ही सर्व ॥ ५८ ॥ यालागीं हे गर्भवती । सादरें असे पुसती । पुत्रकाम असे वांछिती । काय निश्चितीं प्रसवेल ॥ ५९ ॥ ऐसें कपटाचेनि वालभें । विनीत कर जोडूनि उभे । तैशीच फळें भावगर्भें । छळणलोभें पावती ॥ ३६० ॥ कर्म जाणोनियां कुडें । नारदु नाचे ऋषींपुढें । मुनि म्हणे यादवांचें गाढें । निधन रोकडें वोढवलें ॥ ६१ ॥ मुंगिये निघालिया पांख । तिसी मरण ये अचुक । तेवीं ब्राह्मण छळणें देख । आवश्यक कुळनाश ॥ ६२ ॥ शापीत आलिया द्विजजन । त्यांसीं सद्भावें करावें नमन । मारूं आलिया ब्राह्मण । मस्तक आपण वोढवावें ॥६३॥ त्या ब्राह्मणांसि छळण । तें जाणावें विषभक्षण । विषें निमे भक्षित्याचा प्राण । कुळनिर्दळण द्विजछळणें ॥ ६४ ॥ अविद्य सुविद्य न म्हणतां जाण । घरातळीं ब्रह्म ब्राह्मण । त्याचें करूं जातां छळण । कुळनिर्दळण आवश्यक ॥ ६५ ॥

राहिली व इतर कपटी यादव ऋषींच्या जवळ येऊन त्यांनीं त्यांना लोटांगणें घातलीं. ५२ यांतील पहिल्या श्लोकाचा अर्थ त्याच्या व्याख्यानांत पुरा झाला नाहीं, म्हणून कथेच्या संबंधानें तोच अर्थ वर्णितों. ५३ कपटमिषानें त्यांना प्रदक्षिणा केल्या. मोठ्या आदरानें त्यांच्या चरणावर मस्तकें ठेविलीं व आम्ही आपल्या दर्शनासाठीं आलों आहों असें ते म्हणाले. ५४ याप्रमाणें ते सर्व यादव वस्तुतः अनम्र असूनहि अतिशय विनयानें त्यांच्यापुढें उभे राहिले आणि त्या मुनीश्वरांना मृदुस्वरानें असें विनवूं लागले ५५ ' हे भगवन्, ही जी पलिकडे सुंदर स्त्री उभी आहे तिची आपल्या वचनावर फार श्रद्धा आहे. ती गरोदर असून तिचे दिवस आतां अगदीं भरले आहेत. ती सुकुमारी स्वतः विचारण्यास लाजते. ३५६.

तिच्या मनांतून स्वतःच येऊन विचारावयाचें होतें. पण तिच्यानें बोलवेना, म्हणून आमच्या द्वारा तिनें तुमच्या चरणापाशीं ही विनंति केली आहे ५७ तुम्ही सत्यदर्शी अहां, तुमचें वचन कधींहि असत्य व्हावयाचें नाहीं. भगवान् विष्णु व शंकरहि आपल्याला वंदन करितात. आपण ज्ञानानें फार थोर अहां ५८ म्हणून ही गर्भवती स्त्री पुत्राच्या इच्छेनें तुम्हांला मोठ्या आदरानें प्रश्न करीत आहे. खरोखर हिला काय होईल तें कृपाकरून सांगा. ५९ याप्रमाणें त्या ऋषींशीं कपटाचरण करण्याच्या लोभानें नम्रपणें हात जोडून ते विचारूं लागले. तेव्हां त्यांना त्यांच्या दुष्ट आशयाप्रमाणें फलहि भोगावें लागलें ३६०. हें कपट जाणून नारद ऋषींच्या पुढें नाचूं लागला. तो म्हणाला, आतां यादवांचें मरण खास ओढवलें आहे. ६१ मुंगीला पंख फुटले कीं तिला अचुक मरण येतें. त्याप्रमाणें ब्राह्मणांशीं कपट केल्यानें कुलक्षय अवश्य होतो. ६२ ब्राह्मण शिव्या, शाप देत पुढें आल्यास त्यांना सद्भावानें वंदन करावें. तो मारावयास आल्यास मस्तक वांकवावें. ६३ पण त्याच ब्राह्मणाशीं असें कपटाचरण करणें हें विषभक्षणच आहे. विष खाणारा जसा मरतो, तसा ब्राह्मणांशीं कपट करणाराचा कुलक्षय होतो. ६४ विद्वान किंवा अविद्वान हा भेद मनांत न आणतां ब्राह्मण भूलोकींचें ब्रह्मच आहे, असें जाणावें. असें असतांहि त्यांचा जो छल करितो त्याचा कुलक्षय झाल्यावांचून रहात नाहीं. ३६५.

एवं प्रलब्धा मुनयस्तानूचुः कुपिता नृप । जनयिष्यति वा मंदा मुसलं कुलनाशनम् ॥ १६ ॥

ऐकें परीक्षिति नृपवरा । यापरी यादवकुमरां । निधनाचा भरला वारा । तेणें ते ऋषीश्वरां छळूं गेले ॥ ६६ ॥ कपट जाणोनियां साचार । थोर कोपले ऋषीश्वर । मग तिहीं काय वाग्वज्र अतिअनिवार सोडिलें ॥ ६७ ॥ अरे हे प्रसवेल जें बाळ । तें होईल सकळकुळा काळ । निखळ लोहाचें मुसळ । देखाल सकळ मंदभाग्यें ॥ ६८ ॥

तच्छ्रुत्वा तेऽतिसंत्रस्ता विमुच्य सहसोदरम् । साम्बस्य ददृशुस्तस्मिन्मुसलं कुलनाशनम ॥ १७ ॥

ऐकूनि शापाचें उत्तर । भयभीत झाले कुमर । सोडूनि सांबाचें उदर । अतिसत्वर पाहती ॥६९॥ तंव तें लोहमय मुसळ । देखते जाहले तत्काळ । मग भयभीत विव्हळ । एकाएकीं सकळ दचकोनि ठेले ॥ ३७० ॥ नासावें यादवकुळ । ऐसा श्रीकृष्णसंकल्प सबळ । तोचि जाला लोहाचें मुसळ । जाण तत्काळ ऋषिवाक्यें ॥ ७१ ॥ जें जें ब्राह्मणाचें वचन । तें तें अन्यथा हों नेदी श्रीकृष्ण । ब्राह्मणाचें वदे वदन । तें श्रीकृष्ण स्वयें सत्यत्वा आणी ॥ ७२ ॥ देखोनि ऋषीश्वरांचा कोप । ऐकोनि कुलक्षयाचा शाप । यदुकुमरां अतिसंताप । भयें कंप सूटला ॥ ७३ ॥

किं कृतं मंदभाग्यैर्नः किं वदिष्यन्ति नो जनाः । इति विह्वलिता गेहानादाय मुसलं ययुः ॥ १८ ॥

नृप–हे परीक्षित् राजा **एवं**–याप्रमाणें **प्रलब्धाः मुनयः**–वंचना केले गेलेले मुनी **कुपिताः**–क्रुद्ध होऊन **तान्**–त्या यदुकुमारांना **ऊचुः**–म्हणाले. **मंदाः**- हे मंदमतींनो, **वः कुलनाशनं मुसलं- ही** तुमच्या कुलाचा नाश करणारें मुसळ **जनयिष्यति**--प्रसवेल. [याप्रमाणें यादवकुमारांच्या कपटाचरणानें रागावलेले मुनि म्हणाले कीं, हे मूर्खांनो, हिला तुमच्या कुलाचा नाश करणारें मुसळ होईल.] १६.

हे परीक्षिती राजा ऐक, याप्रमाणें यादवकुमारांच्या अंगांत जणुंकाय मरणाचें वारेंच शिरलें व त्यामुळें ते त्या महर्षींची परीक्षाच पाहावयास गेले. ६६ पण त्यांचें कपट ओळखून ते ऋषि फार रागावले आणि असे वज्राप्रमाणें असह्य शब्द बोलले. ६७ अरे मूढांनों, तुमच्या सगळ्या वंशाचा काळच होणारे असें लोखंडी मुसळ हिला झालेलें तुम्ही आपल्या मंद भाग्यामुळें पहाल. ३६८.

तत—तें श्रुत्वा -ऐकून **अतिसंत्रस्ताः ते**--अतिशय भ्यालेले ते यादवकुमार **साम्बस्य उदरं**--सांबाचे उदर **सहसा**--लगेच **विमुच्य**--सोडून **तस्मिन**--त्यांत **कुलनाशनं मुसलं**--कुलाचा नाश करणारें मुसल **ददृशुः**--पहाते झाले. [तें मुनींचे वचन ऐकून यादवकुमार फार बाबरले व त्यांनीं लगेच सांबाच्या पोटावर बांधलेलीं वस्त्रें सोडिलीं, तों त्यांत त्यांना मुनिवचनाप्रमाणें कुलक्षय करणारें मुसळ दिसलें.] १७.

ही शापवाणी ऐकून यादवकुमार भयभीत झाले आणि चटकन् सांबाच्या उदरावरील वस्त्रें सोडून पाहूं लागले. ६९ तों त्यांस लोखंडाचें मुसळ त्यांत दिसलें. तें पहातांच सर्वजण घाबरून विह्वल झाले आणि दचकून जागच्या जागीं थिजले ३७० यादवकुलाचा नाश व्हावा असा श्रीकृष्णाचा जो दृढ संकल्प, तोच जणुंकाय ऋषींच्या वचनानें लोखंडी मुसळ झाला. ७१ ब्राह्मणांचा शब्द श्रीकृष्ण केव्हांहि मिथ्या होऊं देत नाहीं. ब्राह्मणांची वाणी जें जें उच्चारिते तें तें भगवान् सत्य करून दाखवितो. ७२ ऋषींचा कोप पाहून व ती कुलक्षयाची शापवाणी ऐकून यादवांना फार खेद झाला व ते भयानें कांपूं लागले. ३७३.

मंदभाग्यैः--आम्हीं मंदभाग्यांनीं **किं कृतं**--हें काय केलें ? **नः जनाः**--आमचे नगरवासी जन **नः**--आम्हाला **किं वदिष्यन्ति**–काय म्हणतील ? **इति**–अशा चिंतेनें **विह्वलिताः**–व्याकुल झालेले ते कुमार **मुसलं आदाय**–मुसळ घेऊन **गेहान**–घरीं **ययुः**–गेले [' आम्हीं अभाग्यांनीं हे काय केलें ? आतां आम्हांला आमचे लोक काय म्हणतील ? ' असें म्हणून व्याकुल झालेले तें कुमार ते मुसळ घेऊन घरीं गेले.] १८.

आम्हीं मंदभाग्यें करंटे । ऋषीश्वरू कोपविले शठें । निजघाता जालों पैठे । कुळक्षयो कष्टें जोडिला आम्हीं ॥ ७४ ॥ काय म्हणती नगरजन । कां छळूं गेले हे ब्राह्मण । चिंताक्रांत म्लानवदन । मुसळ घेऊन घरा आले ॥ ७५ ॥

तच्चोपनीय सदसि परिम्लानमुखश्रियः । राज्ञ आवेदयांचक्रुः सर्वयादवसन्निधौ ॥ १९ ॥

सभेसि वसुदेव उग्रसेन । बळराम आणि अनिरुद्ध प्रद्युम्न । यादव बैसले संपूर्ण । एकला श्रीकृष्ण तेथ नाहीं ॥ ७६ ॥ सभे सांबादि आले सकळ । पुढां ठेवूनि लोहमुसळ । शापु सांगीतला समूळ । मुखकमळ अतिम्लान ॥ ७७ ॥

श्रुत्वाऽमोघं विप्रशापं दृष्ट्वा च मुसलं नृप । विस्मिता भयसंत्रस्ता बभूवुर्द्वारकौकसः ॥ २० ॥

ऐकून द्विजांचा परमकोपू । यादवां सुटला भयकंपू । मिथ्या नव्हे ब्रह्मशापू । भयें संतापू सर्वांसी ॥ ७८ ॥ प्रत्यक्ष देखोनि मुसळ । थोर सुटली खळबळ । नगरनागरिकां हलकल्लोळ । यादवकुळ उरे कैसेनी ॥ ७९ ॥ ऐक राया परीक्षिती । सबळ भविष्याची गती । वृत्तांत श्रीकृष्णा न सांगती । विचार आपमतीं तिहीं केला ॥ ८० ॥

तच्चूर्णयित्वा मुसलं यदुराजः स आहुकः । समुद्रसलिले प्रास्यल्लोहं चास्यावशेषितम् ॥ २१ ॥

आम्हीं अभाग्यांनीं कपट करून ऋषींना कोपविलें, स्वतःच्याच नाशाला आम्हीं कारण झालों आणि कुलक्षय पदरांत घेतला. ७४ हें ऐकून आतां आमचे नगरवासी जन काय म्हणतील ? ‘ हे ब्राह्मणांशीं कपट करावयास गेले कशाला ’ असें लोक बोलूं लागतील. याप्रमाणें खेद करीत म्लानवदन झालेले ते कुमार चिंताक्रांत होऊन व तें मुसळ घेऊन घरीं आले. ३७५.

परिम्लानमुखश्रियः–ज्यांचीं मुखें म्लान झालीं आहेत असे ते कुमार **तत् उपनीय**–तें मुसळ नेऊन **सदसि**–सभेमध्यें **सर्वयादवसंनिधौ**–सर्व यादवांच्या समक्ष **राज्ञे**–राजा उग्रसेनाला **आवेदयांचक्रुः**–निवेदन करिते झाले. [ज्यांचीं मुखें म्लान झालीं आहेत अशा त्या कुमारांनीं तें मुसळ सर्व यादवसभेपुढें ठेवून राजा उग्रसेनाला घडलेला सर्व वृत्तान्त कथन केला.] १९.

सभेमध्यें वसुदेव, उग्रसेन, बलराम, अनिरुद्ध, प्रद्युम्न इत्यादि सर्व बसले होते. एकटे श्रीकृष्णच काय ते तेथें नव्हते. ७६ इतक्यांत ज्यांचीं मुखकमलें म्लान झालीं आहेत म्हणजे ज्यांचीं तोंडें अगदीं उतरून गेलीं आहेत असे ते सांबासह सर्व कुमार तेथें आले आणि त्यांनीं लोखंडाचें तें मुसळ त्यांच्यापुढें ठेवून सर्व शापाचा वृत्तान्त त्यांना सांगितला. ३७७

हे नृप–हे परीक्षित् राजा **अमोघं**–कधींहि निष्फल न होणारा **विप्रशापं**–ब्राह्मणांचा शाप **श्रुत्वा**–ऐकून **च**–आणि **मुसलं दृष्ट्वा**–मुसळ पाहून **द्वारकौकसः**–द्वारकावासीजन **विस्मिताः**–विस्मित **भयसंत्रस्ताः**–व भयभीत **बभूवुः**–झाले. [तो ब्राह्मणांचा अमोघ शाप ऐकून व तें भयंकर कालरूपी मुसळ पाहून द्वारकावासीजन आश्चर्यचकित झाले व त्यांना अतिशय भीतिहि वाटली.] २०.

ब्राह्मणांनीं क्रोधानें दिलेला तो उग्र शाप ऐकून यादवांना कांपरें भरलें. ब्राह्मणांचा शाप कदापि मिथ्या होणार नाहीं असें मानून त्या सर्वांना फार विषाद वाटला. ७८ तें मुसळ प्रत्यक्ष पाहून तर मोठीच खळबळ उडाली. आतां यादवकुल उरणार कसें म्हणून नागरिकांत एकच हलकल्लोळ झाला. ७९ हे परिक्षिती राजा, ऐक. भवितव्याची गति मोठी बलवत्तर आहे. त्या सर्व यादवांनीं हा वृत्तांत श्रीकृष्णास न कळविण्याचा आपसांत विचार केला. ३८०.

सः यदुराजः आहुकः–तो यादवराज उग्रसेन **तत् मुसलं**–तें मुसळ **चूर्णयित्वा**–चूर्ण करून **च**–आणि **अस्य**–याचें **अवशेषितं लोहं**–अवशिष्ट राहिलेलें लोखंड **समुद्रसलिले**–समुद्राच्या जलांत **प्रास्यत्**–फेंकता झाला. [त्या यादवराज उग्रसेनानें श्रीकृष्णास न विचारतांच त्या मुसळाचें चूर्ण करविलें व तें समुद्रांत फेंकविलें. त्याचप्रमाणें कुटला न जाणारा त्याचा अवशिष्ट भागहि समुद्रांत टाकविला.] २१.

कोणी न सांगतां हें पेखणें। जाणीतलें सर्वज्ञें श्रीकृष्णें। परी द्विजशापू अन्यथा करणें। हें निजमनें स्पर्शेना ॥ ८७ ॥ म्हणाल हें नव्हे त्यासी । पालटवेना द्विजशापासी। जो निमाल्या आणी गुरुपुत्रासी। कृष्ण कळिकाळासी नियंता ॥ ८८ ॥ पाडूनि कळिकाळाचे दांत। देवकीचे गतगर्भ आणित। ईश्वरा ईश्वरू श्रीकृष्णनाथ । जाणे सर्वार्थ निजसिद्धी ॥ ८९ ॥ निद्रा न मोडितां तिळभरी। मथुरा आणिली द्वारकेभीतरी। श्रीकृष्ण काय एक न करी। तोही ममता न धरी कुळाची ॥ ३९० ॥ निजकुळा क्षयो जऱ्ही आला। तऱ्ही अन्यथा न करी ब्राह्मणबोला। ब्राह्मणें पांपरा जरी हाणीतला। तो हृदयीं धरिला पदांकू ॥ ९१ ॥ तेंचि श्रीवत्सलांछन। सकळ भूषणां भूषण। हृदयीं मिरवी श्रीकृष्ण। यालागीं पूर्ण ब्रह्मण्यदेवो ॥ ९२ ॥ श्रीकृष्ण शिरीं वंदी ब्राह्मण। अन्यथा न करी ब्राह्मणवचन। यालागीं ब्रह्मण्यदेवो पूर्ण। वेदवंदिजन वर्णिती ॥ ९३ ॥ ब्राह्मणरूपें श्रीहरी। यालागीं ब्राह्मणांचा कैवारी। कुळक्षयो जाहला जरी। तरी द्विजांवरी क्षोभेना ॥ ९४ ॥ ऐकोनि ब्राह्मणांचा शापू। न धरी मोहाचा खटाटोपू। म्हणे सिद्धि गेला कृतसंकल्पू। कुळक्षयानुरूपू संतोषें ॥ ९५ ॥ यापरी श्रीगोविंदु। काळरूपी मानी आनंदु। कुळक्षयाचा क्षितिबाधू। अल्पही संबंधू धरीना ॥ ९६ ॥ पूर्ण संतोष श्रीकृष्णनाथा। पुढील अध्यायीं ज्ञानकथा। अतिरसाळ स्वानंदता। अवधान श्रोतां मज द्यावें ॥ ९७ ॥ जेथें नारद आणि वसुदेवा। संवाद होईल सुहावा। जनक आणी आर्षभदेवा। प्रश्नोत्तरीं जीवा स्वानंदु दाटे ॥ ९८ ॥ हे रसाळ ब्रह्मज्ञानमातु। चाखवीन निजपरमार्थु। एका जनार्दनीं विनवितु। श्रोते कृपा करितु अर्थावबोधें ॥ ३९९ ॥ इति श्रीमद्भागवते महापुराणे एकादशस्कंधे परमहंससंहितायां एकाकारटीकायां विप्रशापो नाम प्रथमोऽध्यायः ॥ १ ॥

श्रीमहाभागवते महापुराणे एकादशस्कंधे विप्रशापो नाम प्रथमोऽध्यायः ॥ १ ॥

तें लोखंडी मुसळ कुटून त्याचें चूर्ण समुद्रांत फेंकून दिल्याचा वृत्तान्त श्रीकृष्णास जरी कोणीं कळविला नाहीं, तरी त्या सर्वज्ञ प्रभूनें तो तेव्हांच जाणला. परंतु ब्राह्मणांचें वचन मिथ्या करण्याचा विचार त्यांच्या मनांतहि आला नाहीं. ८७ कोणी कदाचित् असें म्हणेल कीं ब्राह्मणाच्या शापांत बदल पाडणें हें श्रीकृष्णाच्या सामर्थ्याबाहेर होतें. पण तें खोटें आहे कारण ज्यानें मृत गुरुपुत्रालाहि परत आणिलें, त्या कळिकाळाच्या नियंत्याला हें अशक्य नव्हतें. ८८ ज्यानें कळिकाळाचें दांत पाडून देवकीचे मृतगर्भहि परत आणिले त्या श्रीकृष्णरूपी ईश्वरांच्याहि ईश्वराला कांहींच अशक्य नव्हतें. आपल्या स्वाभाविक सिद्धीनें तो सर्व जाणत होता. ८९ अहो, निजलेल्या लोकांची झोंप तिळभरहि न मोडतां ज्यानें मथुरेला द्वारकेंत आणिलें त्याला अशक्य काय आहे? पण त्यानें या वेळीं आपल्या कुळाची ममता धरली नाहीं. ३९० आपल्या कुळाचा क्षय होण्याच्या प्रसंग आला असतांहि त्यानें ब्राह्मणवचन खोटें केलें नाहीं. ब्राह्मणांचा पादप्रहार श्रीवत्सलांछन या रूपानें तो आपल्या हृदयावर धारण करूं लागला. ९१ म्हणूनच तो पूर्ण ब्राह्मणभक्त आहे. ९२ श्रीकृष्ण स्वतः ब्राह्मणांना वंदन करितो. त्यांचें वचन खोटें करीत नाहीं, म्हणून तो पूर्ण ब्रह्म आहे असें वेदानुयायी वर्णन करतात. ९३ तो स्वतः ब्राह्मणरूप आहे म्हणून तो ब्राह्मणांचा इतका कैवार घेतो. कुलक्षय-जरी झाला तरी तो ब्राह्मणांवर रागावत नाहीं. ९४ ब्राह्मणांचा शाप ऐकून तो मोहाच्या खटाटोपांत पडला नाहीं. उलट कुलक्षयाविषयींचा आपला संकल्प सिद्धीला गेला असें समजून तो संतुष्ट झाला. ९५ तो काळरूपी श्रीगोविंद खिन्न होण्याऐवजीं आनंद मानूं लागला. भावी कुलक्षयाविषयीं त्याच्या मनाला यत्किंचित्‌हि खेद वाटला नाहीं. ९६ आतां पुढील अध्यायांत अति रसाळ निजानंदरूप ज्ञानकथा मी सांगणार आहें. तिकडे श्रोत्यांनीं अवधान ठेवावें. ९७ त्यांत नारद आणि वसुदेव यांचा सुंदर संवाद होईल. जनक व आर्षभदेव यांचीं प्रश्नोत्तरें ऐकून जीवांच्या मनांत स्वानंदाचें भरतें येईल. ९८ ही ब्रह्मज्ञानकथा फार रसाळ आहे. ती मी श्रोत्यांना परमार्थरूपानें चाखवीन. तिचा अर्थ समजून घेण्याची श्रोत्यांनीं कृपा करावी, एवढीच जनार्दनस्वामींचें शिष्य एकनाथ यांची सर्वांस विनंति आहे. ३९९.

इति श्रीमद्भागवत महापुराणांतील एकादशस्कंधाचा परमहंस संहितेमधला श्रीधर-एकनाथविरचित टीकांनुसार विष्णुशर्मकृत सान्वयार्थ—भावार्थासह विप्रशाप नांवाचा प्रथम अध्याय समाप्त झाला.
